९६७५

म. ग्रं. सं. ठाणें.

इतिहास

सं. ३५



REFBK-0001159



नवयुग

हें मराठी मासिकपुस्तक नवंबर १९१३ पासून दर महिन्यास प्रसिद्ध होत असतें. प्रत्येक अंकांत पुरीं ८० पानें मजकूर व कमींत कमी १०--१२ सुंदर चित्रें असतात. यांत नेहमीं उपयुक्त, बोधप्रद व भारदस्त असाच मजकूर येत असल्यामुळें प्रत्येक घरांतील लहान मुलापासून थोरांपर्यंत सर्व स्त्रीपुरुषांनीं हें मासिक पुस्तक अवश्य वाचावें. शांत वेळीं मनन करण्यासारखे विचार व विश्रांतीच्या वेळीं मन रंजविणारी करमणूक असा दोन्ही तऱ्हेचा मजकूर प्रत्येक अंकांत असतो.

नवयुगाच्या बारा अंकांचें पुस्तक ह्मणजे विद्वानांच्या लेखांचा, सुरस कवितांचा व सुंदर चित्रांचा एक बहुमोल संग्रह आहे.

वार्षिक वर्गणी मुंबईत व बाहेरगांवीं चार रुपये. टपालें व व्ही. पी. खर्च माफ. दुसरें वर्ष नवंबर १९१४ त सुरू झालें.

मालक व प्रकाशक

डी. काशीनाथ आणि कंपनी

२०-२४ कस्टम हौस रोड, फोर्ट, मुंबई

नवयुग

The Bombay Art Printing Works, Fort.

नवयुग

मासिक पुस्तकाच्या डिसेंबर १९१४ च्या अंकांतून

गुरख्यांचा जर्मनांवर हल्ला

नवयुगाच्या प्रत्येक अंकांत लढाईचीं व विविधविषयक पुष्कळ सुंदर चित्रें असतात.

३८७२

युरोपांतील सांप्रतचें महायुद्ध.

(उपयुक्त व विविध माहितीचा संग्रह.)

(रंगीत नकाशे व विविध चित्रें यांसह.)

ग्रं. १२९६९

REFBK-0001159

रचणार

'एक इतिहासभक्त'

प्रकाशक

दामोदर सांवळाराम आणि मंडळी,

जनरल प्रिंटर्स, पब्लिशर्स, एजंटस् इ.-ठाकुरद्वार-मुंबई,

सन १९१९ इ.

किंमत १॥ रुपया.

हें पुस्तक रा० रा० दामोदर सांवळाराम यंदे, यांनीं घर नं. ४३४ ठाकुरद्वार रोड, मुंबई, येथें " इंदुप्रकाश " छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

वा पुस्तकासंबंधानें भाषांतर वगैरेचे सर्व हक्क प्रकाशकांनीं आपणांकडे ठेविले आहेत.

प्रस्तावना.

प्रस्तुत पुस्तक म्हणजे, सांप्रत युरोपांत जें महायुद्ध चाललें आहे, त्याचा इतिहास नव्हे, हें येथें आरंभींच वाचकांस सांगून ठेविलेलें बरें. तसा सांगंत व खरा इतिहास लिहिणें आज शक्यही नाहीं. कारण इतिहास लिहिण्यास जी माहिती पाहिजे ती युद्ध समाप्त झाल्यावरच उपलब्ध होईल. तोंपर्यंत युद्धाच्या ज्या बातम्या सांप्रत लोकांपुढें येत आहेत, त्या समजण्यास सुलभ व्हावें, हाच उद्देश मुख्यतः पुढें ठेवून, हें पुस्तक तयार केलें आहे.

या पुस्तकांत ज्या माहितीचा संग्रह केला आहे, ती मिळवितांना अनेक इंग्रजी ग्रंथांचें साहाय्य घ्यावें लागलें आहे. म्हणून त्या त्या ग्रंथकारांच्या उपकारांचें स्मरण येथें केल्यावांचून राहवत नाहीं.

युद्धाचीं कारणें व पूर्वेतिहास यासंबंधाची बहुतेक सर्वप्रकारची माहिती, **मि० दा. ग. पाध्ये, एम्. ए.** यांनीं '**नवयुग**' मासिकपुस्तकांत जे अत्यंत उपयुक्त लेख लिहिले होते, त्यांतून घेतली आहे. या लेखांचा उपयोग करण्यास '**नवयुगा**' च्या मालकांनीं आनंदानें परवानगी दिली, हे त्यांचे मोठे उपकार झाले आहेत.

पुस्तक फार घाईनें तयार करावें लागल्यामुळें, व कांहीं ग्रंथांच्या नव्या आवृत्त्या न मिळाल्यामुळें यांत ज्या उणीवा राहून गेल्या असतील, त्यांची वाचकांनीं क्षमा करावी.

मुंबई,
ता. १३ जानेवारी १९१५

पुस्तककर्ता.

प्रकाशकाचे दोन शब्द.

—०*०—

इंदुप्रकाश आणि सयाजीविजय अशीं दोन्ही पत्रांच्या ग्राहकांस नवीन वर्षारंभीं दरसाल एखादें उपयुक्त पुस्तक भेट देण्याचा आमचा क्रम आहे. गुदस्त सालीं सर नारायण गणेश चंदावरकर यांचे निवडक लेख व व्याख्यानें एकत्र करून त्यांच्या अल्प चरित्रासह तयार केलेलें पुस्तक आमच्या ग्राहकांस भेटीदाखल देण्यांत आलें होतें. यंदांचे सालीं युरोपांत महायुद्ध सुरू होऊन त्या युद्धाशी आमच्या सार्वभौम ब्रिटिशसरकारचा निकट संबंध जडल्यानें हिंदुस्थानांतील अखिल जनांचें लक्ष त्या महायुद्धाकडे वेधलें गेलें; आणि व्यवहारांतील सर्व विषयांत हा युद्धाचा विषय अत्यंत महत्त्वाचा होऊन बसला अशा प्रसंगीं या महायुद्धासंबंधानें जितकी अधिक माहिती मिळेल तितकी मिळविण्याबद्दल सर्वांची जिज्ञासा वाढणें स्वाभाविक आहे. मराठी वाचकांची ही जिज्ञासा यथाशक्त्या शक्य तितकी पूर्ण करावी; अशा उद्देशानें हें पुस्तक विविध माहिती एकत्र करून तयार केलें आहे. या पुस्तकाचा उपयोग आमच्या मराठी भाषेच्या वाचकांस सांप्रतच्या प्रसंगीं बराच होईल, अशी आम्हास उमेद आहे. आणि आमचा हा अल्प प्रयत्न हंसक्षीरन्यायानें वाचकवर्ग गोड करून घेतील; असा आम्हांस भरंवसा आहे.

सदर पुस्तक छापण्याचे कामीं चित्रमयजगत्, मासिक मनोरंजन, नवयुग ह्या तीन प्रमुख मासिकांच्या चालकांनीं चित्रांचे ब्लॉक वगैरे संबंधानें जी मदत दिली, त्याबद्दल त्यांचे, तसेंच नकाशे तयार करण्याचे कामीं आणि वेळोवेळीं लागणारी जरूरीची माहिती पुरविण्याचे कामीं ज्या हितचिंतक मंडळींनीं वेळोवेळीं आम्हांस मदत दिली, त्याबद्दल त्या सर्वांचे आम्ही या ठिकाणीं प्रेमपूर्वक आभार मानतों.

प्रकाशक.

अनुक्रमणिका.

प्रकरण.	विषय.	पृष्ठ.
१	आरंभीची थोडीशी हकीकत...	११
२	ब्रिटिश साम्राज्य...	१७
३	हिंदुस्थानची मदत	२०
४	युरोपखंडाची रूपरेखा.	२३
	१ हवामान, २ लोकवस्ती, ३ इतिहास, ४ युरोपांतील सभ्यांच्या राष्ट्रांचा जन्म, ५ उद्योगधंदे, ६ निरनिराळ्या खंडांचा विस्तार व लोकसंख्या, ७ वंशविस्तार व ८ धर्म.	
५	युरोपांतील जातिभेद व धर्मभेद	३३
	१ मनुष्य जातीचीं मुख्य कुटुंबें, २ वसतीस्थानें, ३ धर्मभेद. ...	
६	स्लाव लोकांची एक राष्ट्रीयत्वासाठीं धडपड	३८
७	लढाईशीं रशियाचा संबंध	४०
८	जर्मनीची उत्क्रांति-पूर्वार्ध	४६
९	जर्मनीची उत्क्रांति-उत्तरार्ध	५१
१०	सांप्रतच्या युद्धाचीं बीजारोपणें	५४
११	कैसर विल्हियम यांची महत्त्वाकांक्षा व महत्त्वाकांक्षेनें उत्पन्न केलेला तिरंगी संघ	५७
१२	प्रिन्स बिस्मार्क व कैसर विल्हियम यांचीं धोरणें व जर्मनीची वाढ ...	६१
१३	जर्मनीची रणनीति व राजनीति.	६६
१४	राष्ट्रव्यवहारांतील कांहीं नीतितत्त्वें.	६९
१५	आतांचीं शस्त्रास्त्रें	७२
१६	आतांचीं शस्त्रास्त्रें	७५
१७	लढाईंतील नवे डावपेंच	७७
१८	युरोपियन राष्ट्रांच्या लष्करी प्रगतीची तुलना	८१
१९	समुद्रांतील लढाई.	८३
२०	समुद्रयुद्धसंबंधीं नव्या सुधारणा.	९०
२१	ऑस्ट्रिया-हंगेरी (ऑस्ट्रियाचें राजघराणें).	९५
२२	सर्व्हिया.	९९

प्रकरण.	विषय.	पृष्ठ.
२३ बेल्जियम.	... ...	१०३
२४ जर्मनी.	... ...	१०७
२५ जर्मना (पुढें चालू) राजघराणें.	... ...	१०९
२६ फ्रान्स...	... ...	१:१४
२७ रशिया.	... ...	१११
२८ इतर देश (आल्बेनिया वगैरे).	... .	११८
२९ व्यापारांचें जाळें...	... ...	११९
३० जर्मनीचा व्यापार.	... ...	१२६
३१ सरकारी प्रेस नोट.	... ...	१२९
३२ तुर्कस्तानाशीं युद्ध.	... ...	१३८
३३ राष्ट्रांचा दळभार ...	... ...	१४२
३४ राष्ट्रांचें आरमार ...	... ...	१५४
३५ राष्ट्रांची आरमारें-पुढें चालू...	... ...	१६२
३६ लढाईंतील मुख्य स्थलांचा कोश.	... ...	१६६
३७ तुर्कस्तान	... ...	१७९
३८ हेग ट्रिब्यूनल	... ...	१८२
३९ राष्ट्रांची व्यापारी जहाजें ...	... ...	१८४
४० लढाईचा खर्च	... ...	१८५
४१ युरोपांतील राष्ट्राधिपति व त्यांचीं परस्परांशीं नातीं	... ...	१८८
४२ पारिभाषिक शब्दांचा कोश...	... ...	१९०
४३ युद्धाशीं संबंध असलेल्या और पुरुषांचा कोश. ...	... ...	१९५

पुस्तकांत आलेलीं विविध चित्रें.

१ सार्वभौम बादशहा पंचम जॉर्ज.
२ बादशहांचा जाहिरनामा.
३ बेलजमचे राजे आलबर्ट.
४ रशियाचे झार दुसरे निकोलस.
५ फ्रान्सचे प्रेसिडेन्ट रेमंड पॉइंकेर.
६ जर्मनीचे कैसर दुसरे विलियम.
७ सर्व्हियाचे राजे पिटर.
८ आस्ट्रियाचे बादशहा फ्रान्सिस जोसेफ.
९ सर एडवर्ड ग्रे (इंग्रजी परराष्ट्रीय प्रधान).
१० जनरल जोफर (फ्रेंच मुख्य सेनापति).
११ लॉर्ड किचनेर (ब्रिटीश लढाईखात्याचे मुख्य प्रधान).
१२ जनरल स्काडक होम लिनोफ (रशियाचे मुख्य सेनापति).
१३ व्हॉन टिरपिटझ (जर्मनीचे मुख्य ॲडमिरल).
१४ ॲडमिरल सर जॉन जेलिको (ब्रिटीश आरमाराचे मुख्य सेनापति).
१५ कैसर न झार यांची मुलाखत.
१६ सर एडवर्ड गोलचेन (इंग्रजाचे बर्लिन येथील वकील).
१७ कैसरच्या भेटीचे वेगवेगळे प्रसंग.

१ झार व कैसर, २ बेलजमनृप व कैसर, ३ सम्राट् पंचम जॉर्ज व कैसर, ४ स्वित्झर्लंडचे प्रेसिडेंट व कैसर ५ डेनमार्कचे राजे व कैसर, ६ इटालीचे राजे व कैसर.

१८ महायुद्धांतील प्रमुख राष्ट्रपुरुषांची माला.

१ ग्रेटब्रिटन, २ जर्मन, ३ फ्रान्स, ४ रशिया, ५ आस्ट्रिया.

१९ लढाईंत भाग घेणारें युरोपांतील स्त्रीमंडळ.

१ मिसेस लुई हारकोर्ट, २ मिसेस हॉबहाऊस, ३ मार्शनेस ऑफ लॉन्सडाऊन, ६ काउंटेस बॅथर्स्ट, ७ लेडी होप. ८ लेडी नॉर्थक्लीफ ९ मिसेस आस्किथ.

२० घोडेस्वारांच्या पोषाकांत रशियाची साम्राज्ञी.
२१ बेलजमची पतिनिष्ठराज्ञी एलिजाबेथ व तिचीं मुलें.
२२ अलिकडेपर्यंत जर्मनीच्या कैसरांची मुलगी व सून.
२३ धारातीर्थी देह ठेवणारे ब्रिटनचे शूर वीर.
२४ आधुनिक बोटांचा मारा.

२५ तुर्कस्तानने विकत घेतलेले जर्मन क्रूझर (गोबेन).
२६ चाचेपणा करणारें ' एमडन ' क्रूझर.
२७ घेंट येथील सेंट निकोलसचें मंदिर.
२८ घेंट येथील कार्पोरेशनची इमारत.
२९ ब्रुसेल्स येथील न्यायमंदिर.
३० अँटवर्पचा लांबून दिसणारा देखावा.
३१ महायुद्धांत भाग घेणारें हिंदुस्थानांतील राजमंडळ.
१ पट्याळाचे महाराज भूपेंद्रसिंग.
२ किसनगडचे महाराज मदनसिंग.
३ भोपाळचे युवराज नवाब जादे, कर्नल औंबेदुल्लाखान
४ बिकानेरचे महाराज, गंगासिंघजी.
५ जावराचे नवाब, इफ्तीखार अल्लीखान.
६ सचीनचे नवाब, नजबअल्लीखान.
७ रतलामचे महाराज, श्री. सज्जनसिंग.
८ जोधपूरचे महाराज, सर प्रतापसिंग.

नकाशे.

१ पृथ्वीचा रंगीत नकाशा.
२ युरोपखंडांतील रणक्षेत्रांचा रंगीत नकाशा.
३ फ्रांको-बेलजम रणक्षेत्राचा नकाशा.
४ आस्ट्रो-रशियन आणि जर्मन सरहद्दीचा नकाशा.

° सार्वभौम बादशहा पंचमजार्ज

पंचमजार्ज महाराज यांनीं युरोपांतील महायुद्धासंबंधानें प्रसिद्ध केलेला जाहिरनामा.

BY THE KING.

A PROCLAMATION

REGARDING THE DEFENCE OF THE REALM.

GEORGE R.I.

WHEREAS by the law of Our Realm it is Our undoubted prerogative and the duty of all Our loyal subjects acting in Our behalf in times of imminent national danger to take all such measures as may be necessary for securing the public safety and the defence of the realm:

AND WHEREAS the present state of Public Affairs in Europe is such as to constitute a national danger:

NOW THEREFORE, WE strictly command and enjoin Our subjects to obey and conform to all instructions and regulations which may be issued by Us or Our Admiralty or Army Council or by any officer of Our Navy or Army, or any other person acting in Our behalf for securing the public safety and defence of the realm in accordance with any such instructions or regulations or otherwise in the execution of any powers duly taken for securing those objects.

Given at Our Court at Buckingham Palace, this Fourth day of August, in the year of our Lord one thousand nine hundred and fourteen, and in the Fifth year of Our Reign.

GOD SAVE THE KING.

बादशहांचा जाहिरनामा.

सम्राट् पंचम जॉर्ज

यांचा

हिंदुस्थानाला संदेश.

" गेले कांहीं आठवडे ग्रेटब्रिटन व आयर्लंडमध्यें व समुद्रापलीकडे रहाणारे माझ्या साम्राज्यांतील सर्व लोक एकचित्त होऊन, मनुष्यजातीची चिरंतन शांतता व संस्कृति भंग करण्याचा जो विलक्षण प्रयत्न करण्यांत आला, त्याला तोंड देऊन त्याचा प्रतिकार करण्याच्या उद्देशानें प्रेरित झाले आहेत. हा अनर्थावह कलह मीं होऊन उत्पन्न केलेला नाहीं. पहिल्यापासून माझें सर्व वजन शांतता रहावी म्हणून खर्च करण्यांत आलेलें आहे. कलहाचीं कारणें नाहींशीं करण्याकरितां व माझ्या साम्राज्याशीं संबंध नसलेला विरोध शमविण्याकरितां माझ्या प्रधानांनीं झटून यत्न केले.

" ज्या हमींत माझ्या राज्याचा संबंध होता तिला न जुमानून बेल्जिअमची भूमि भ्रष्ट होत असतां, तेथील शहरें उध्वस्त होत असतां, फ्रेंच राष्ट्राचा प्रत्यक्ष प्राणदेखील नष्टप्राय होण्याची वेळ आली असतां, जर मी स्वस्थ बसलों असतों, तर मी आपल्या अब्रूला आंचवलों असतों ! आणि माझ्या साम्राज्याच्या व मनुष्यजातीच्या स्वतंत्रतेचा मीं संहार होऊं दिला, असें झालें असतें ! या प्रसंगीं जें काय करावयाचें म्हणून मीं ठरविलें, त्याला साम्राज्याच्या प्रत्येक भागाची संमति मिळालेली पाहून मला फार समाधान वाटत आहे. राष्ट्र व राजपुरुष यांनीं दिलेलीं वचनें व केलेले तह विशेष आदरबुद्धीनें पाळणें हें इंग्लंड आणि हिंदुस्थान या दोहोंचेंही कुलव्रत आहे !

" माझें साम्राज्य अखंड व एकजीव रहावें म्हणून त्यांतील निरनिराळीं राष्ट्रें एकदिलानें पुढें सरसावलीं, त्या प्रसंगीं ब्रिटिशसाम्राज्याच्या बचावाकरितां आपलें जीवित व आपलें सर्वस्व अर्पण करण्याला अत्यंत उदारपणानें तयार होऊन माझ्या इंग्लंडांतील व हिंदुस्थानांतील प्रजाजनांनीं आणि हिंदी मांडलिकांनीं व संस्थानिकांनीं माझ्या गादीविषयीं जी हटकट निष्ठा व्यक्त केली, तिच्यामुळें माझें अंतःकरण अगदीं भरून आलें आहे ! रणांगणांत आपण पुढें जावें म्हणून जी प्रत्येकाची मागणी आहे, तिच्या योगानें माझें हृदय अगदीं द्रवून गेलें आहे ! मी व माझी हिंदी प्रजा यांचा संबंध अत्यंत प्रेमाचा आणि भक्तीचा आहे, हें तर मी जाणतोंच; परंतु या वेळीं त्यांच्यापासून उत्कृष्ट तऱ्हेची फलनिष्पत्ति झालेली आहे !

" दिल्ली येथील राज्याभिषेकदरबाराचा मोठा समारंभ आटोपून १९१२ च्या फेब्रुवारी महिन्यांत मी परत आलों. त्या वेळीं माझें अभिनंदन करण्याकरितां हिंदुस्थानानें ब्रिटिशराष्ट्रांला, जो सद्भावाचा व सन्मैत्रीचा संदेश प्रेमपूर्वक पाठविला, त्याची मला आज आठवण होते ! ग्रेटब्रिटन व हिंदुस्थान, यांच्या भाग्याची कधींही न सुटणारी गांठ बांधली गेली आहे, असें तेव्हां तुम्हीं आश्वासन दिलें होतें. आजच्या संकटसमयीं तें तुम्हीं अत्यंत उदारपणानें सिद्धीला नेलेलें व त्याचें फल भरपूर मिळत असलेलें मी पहातें आहें. "

" पंचम जॉर्ज. "

युरोपांतील सांप्रतचें महायुद्ध.

(उपयुक्त व विविध माहिती संग्रह.)

प्रकरण १ लें.

आरंभींची थोडीशी हकीगत.

गाच्या इतिहासांत आजपर्यंत हजारों दुष्ट दिवस उगवले असतील, पण सांप्रतच्या महाअनर्थकारक महायुद्दाचा वणवा प्रज्ज्वलित करणारी ठिणगी ज्या दिवशीं पडली, तितका वाईट मुहूर्ताचा दिवस अद्याप कधींही उगवलेला नव्हता. ता० २८ जून १९१४ रोजीं ऑस्ट्रिया-हंगारीच्या गादीचे भावी अधिपति आर्चडयूक फ्रान्सिस फर्डिनांड व त्यांची प्रियपत्नी होहेनबर्गची डचेस यांचे, बॉस्नियाची राजधानी जी सेराजेव्हो तिच्या रस्त्यांत, त्यांच्या अंगावर बाँब पडून खून झाले. हे भयंकर खून ज्यांनी ले, त्यांचा हें अमानुष कृत्य करून कांहींही मिळविण्याचा हेतु असो, पण सांप्रतच्या महायुद्धास मुहूर्त करून देण्यास त्या माणसांचें हें घोर कृत्य कारण झालें, यांत शंका नाहीं. कोणी म्हणतात कीं, हें युद्ध आज नाहीं उद्यां होणारच होतें, पण त्याला मुहूर्त मिळण्यांत कालावधि लोटत चालला होता. तो मुहूर्त वरील रक्तपातानें साधून दिला. आर्चडयूक फ्रान्स फर्डिनांड व त्यांची पत्नी यांची खुद्द युरोपांत देखील फारशी प्रख्याति नव्हती. कारण आर्चडयूक साहेबांनीं केलेला विवाह प्रेमविवाह असल्यामुळें व्हिएन्ना येथील दरबारी मंडळीस तो फ़ारसा आवडला नव्हता, व त्यामुळें ऑस्ट्रियांतील लोकांची या जोडप्यासंबंधानें जशी प्रेमळ भावना असावी, तशी नव्हती. पण या विवाहासंबंधानें अश्रेयस्कर प्रवाद मात्र लोकांत यत्किंचित्ही उत्पन्न झाला नव्हता. हें दंपत्य विलायतेंत गेलें असतां तेथें त्यांचा चांगलाच आदरसत्कार झाला. स्वतः आर्चडयूक हे सुस्वभावी असून त्यांना राजकारणापेक्षां बागाइती-सारख्या गोष्टींचीच विशेष आवड असे; व साधी खेडेगांवांतील राहणी त्यांस

फार आवडे. त्यांची पत्नी ही एका जुन्या कुलीन बोहेमियन घराण्यांतील होती; व तीही आपल्या पतीप्रमाणेंच सुस्वभावी व प्रजावत्सल होती. या उभयतांच्या मनांतील हेतु असा होता कीं, ऑस्ट्रियन साम्राज्याचे आज जे दोन भाग आहेत, त्याऐवजीं तीन भाग करून नवा भाग जो करावयाचा, त्यांत राज्यांतील सर्व स्लाव्ह लोक येतील, अशी व्यवस्था करावी. ऑस्ट्रियाच्या लवकरच गादीवर येणाऱ्या त्या राजदंपत्याचा हा हेतु स्तुत्य, प्रजाकल्याणकारक व राज्यास उत्तम मजबुती आणणारा होता, यांत शंका नाहीं. असें असतां त्यांचा खून झाला, ही गोष्ट कोणालाही क्रौर्याची व अन्यायाचीच वाटेल; मग आधींच दैवाचे अनेक भयंकर आघात बसून जर्जर झालेला व ज्यानें चतुर्थाश्रम घेतला होता, असा जो ऑस्ट्रियाचा अतिवयोवृद्ध बादशहा फ्रान्सिस जोसेफ त्यास अपरिमित दुःख झालें असल्यास नवल नाहीं. बादशहा फ्रान्सिस जोसेफ यांच्याइतके दुर्दैवी बादशहा दुसरे क्वचित्च असतील. परमेश्वरानें त्यांना दीर्घायुष्य देऊन जणूं काय त्यांच्या दुःख सोसण्याच्या शक्तीची परीक्षाच मांडली आहे, असें त्यांचें समग्र चरित्र वाचलें असतां दिसल्याशिवाय राहत नाहीं. जाणों एका दुःखांतून ते मुक्त होतात न होतात, तोंच दैवानें नव्या दुःखाचा पेला त्यांजकरितां भरून ठेवलेलाच आहे. त्यांचे बंधु मॅक्झिमिलियन यांचा बंडखोरांनीं मेक्सिकोमध्यें गोळ्या घालून खून केला. त्यांची रूपवती पत्नी एलिझाबेथ हिचा एका वेड्यानें प्राण घेतला. त्यांचे चिरंजीव रूडोल्फ यांच्या अब्रूसंबंधानें कांहीं भानगड उपस्थित झाल्यानें त्यांनीं आत्महत्या करून घेतली. रूडोल्फच्या मरणानंतर आर्चडयूक जॉन हे समुद्रांत सफरीला गेले. त्यांची पुढें कांहींच वार्ता आली नाहीं. इतकीं प्रियजनवियोगदुःखें फ्रान्सिस जोसेफ बादशहांनीं सहन केलीं; पण आणखी एक दुःख, व तेंही परिणामीं महा भयंकर दुःख दैवानें त्यांच्याकरितां वाढून पुढें आणलेंच. आर्चडयूक फ्रान्सिस फर्डिनांड यांच्या प्राणांचे बळी ज्या दिवशीं पडले, त्या दिवशीं कोणासही असें वाटलें नसेल कीं, पुढें लवकरच जे लाखों प्राणांचे बळी पडणार, त्यांपैकीं ही पहिली आहुति आहे. या पहिल्या प्राणबळीनें एकट्या हॅप्सबर्ग घराण्यांतच शोकाचा कोलाहल मांडून दैव संतृप्त झालें नाहीं, तर एकट्या यूरोपखंडांतीलच नव्हे, तर जगाच्या अनेक भागांतील लक्षावधि कुटुंबांस शोकाकुल करण्याचा त्यानें जसा काय निश्चयच केला. ता. २८ जून १९१४

महायुद्धांतील प्रमुखराष्ट्रपुरुषांची माला.

पंचम जॉर्ज. सर एडवर्ड ग्रे. फिल्डमार्शल फ्रेंच. ॲडमिरल जेलिको.

ब्रि ट न

कायसर. हरफॉनबेथमन् हाल्वेज. ज. फाल्केन्हॅम. ॲ. व्हॉटिर्पिस.

जर्मनी

प्रेसि. पॉइंकेर. व्हिव्हियानी जॅ. जॉफरे. ॲ. बौडिलेपियेरे.

फ्रान्स

झार. सॅझोनॉफ. ज. सोखोम्लिनॉफ. ॲ. ग्रेगोविच.





रशिया

फ्रान्सिस जोसेफ. काटबर्चटोल्ड. ज. फॉन्हेट झेंड्राफ. आ. डब्ल्यू. का स्टिफन

आस्ट्रिया

कायसरच्या भेटीचे वेगवेगळे प्रसंग.

झार व कायसर.

सम्राट पंचमजार्ज व कायसर.

बेल्जियम-नृप व कायसर

स्वित्झरलन्दचे प्रसिडेंट व कायसर.

डेनमार्कचे राजे व कायसर.

इटलीचे राजे व कायसर.

रोजीं पडलेल्या पहिल्या ठिणगीनें युरोपखंडांत अवघ्या मासपंचकाच्या अवधींत केवढा वणवा धडधडून पेटविला आहे, व त्या वणव्याच्या ज्वालांनीं अखिल अवनितल कसें होरपळून जात आहे, हें येथें विस्तारानेंच सांगितलें पाहिजे, असें नाहीं.

फ्रान्स फार्डिनांड व त्यांची पत्नी ह्यांचे जे खून झाले, तें कर्म करणारी कोणी एकटीच व्यक्ति नसून कोणा तरी मंडळीचें तें काम असावें, ही गोष्ट आरंभापासूनच दिसूं लागली होती. पुढें या प्रकरणाची चवकशी झाली, त्या वेळीं असें बाहेर आलें कीं, ह्या गुप्त कटाचें मुख्य ठाणें सर्व्हियांत होतें. जे बाँब फेंकून खून करण्यांत आले, ते सर्व्हियाच्या लष्कराच्या कारखान्यांतून आले होते. त्यांचा उपयोग कसा करावा, याची माहिती त्याच लष्करांतील अंमलदारांनीं दिली होती; व सर्व्हियाच्या सरहद्दीवरील अंमलदारांनीं ते बाँब बॉस्नियांत नेऊं देण्यासही मदत केली होती. हे सर्व अंमलदार 'नरोदना ओब्राना' नामक एका सर्व्हियांतील मंडळीचे सभासद होते. या मंडळीचा कार्यक्रम, बॉस्नियांतील सर्व लोक व त्यांचे सर्व्हियांतील बंधु यांचें एकीकरण करावें, असा होता. या कार्यक्रमास अनुसरूनच वरील खून झाला, असें ऑस्ट्रियास वाटून त्यानें त्याबद्दल सर्व्हियास प्रायश्चित्त देण्याचें योजिलें.

येथपर्यंत ऑस्ट्रियाच्या ह्या कृत्यास सर्व जगाची सहानुभूति होती, पण ऑस्ट्रियानें सर्व्हियाकडे पाठविलेली हुकूमवजा यादी ज्या वेळीं प्रसिद्ध झाली, त्या वेळीं पहिली सहानुभूति बरीच कमी झाली. ती यादी पाहतांच चतुर मुत्सद्यांनीं, ह्या भांडणाचा निकाल थोडक्यांत लागण्याचा संभव दिसत नाहीं, असें त्याच वेळीं ताडलें. ह्या यादींत कांहीं कलमें अशी होतीं कीं, त्यांचा परिणाम फार दूरवर पोंचणारा होता. ऑस्ट्रियाच्या राज्यास भीति उत्पन्न करणाऱ्या चळवळीशीं सर्व्हियानें कोणत्याही प्रकारचा संबंध ठेवूं नये, त्याचप्रमाणें वर सांगितलेल्या खुनाच्या कृत्यांत सर्व्हियाचे जे प्रजाजन सामील असतील, त्यांस त्यानें शिक्षा करावी; व अशा प्रकारची ऑस्ट्रियास घातक अशी कोणतीही चळवळ सर्व्हियानें आपल्या राज्यांत चालूं देऊं नये, ह्या ऑस्ट्रियाच्या मागण्या योग्य होत्या; पण ऑस्ट्रिया एवढ्याच मागण्या करून थांबला नाहीं, तर ऑस्ट्रियाच्या राष्ट्रीय स्वातंत्र्यास संपुष्टांत आणणाऱ्याही कांहीं मागण्या ऑस्ट्रियानें केल्या. सर्व्हियाच्या राज्यांतील चळवळींत आपला

हात शिरकविण्याचीही ऑस्ट्रियानें अट घातली. ही अट अर्थात्च सर्व्हियाला मान्य झाली नाहीं, व त्यानें आपला दोस्त जो रशिया, त्याजकडे सल्ला विचारली; पण रशियाचे सुज्ञ व शांतताप्रिय बादशहा व त्यांचे दूरदर्शी मंत्री यांनीं भावी परिणामाकडे पूर्ण लक्ष पोंचवून, सर्व्हियानें ऑस्ट्रियाच्या बहुतेक सर्व मागण्या कबूल कराव्या, अशी शहाणपणाची सल्ला दिली. या वेळीं या दोन राष्ट्रांत झालेला पत्रव्यवहार वाचला, म्हणजे यूरोपाची शांतता भंग पावूं न देण्यासाठीं रशियानें किती तत्परता दाखविली व मनःपूर्वक कसा प्रयत्न केला, हें दिसून येतें. फार काय सांगावें, पण बापानें मुलास हातीं धरून ज्याप्रमाणें बळेंच एखादी गोष्ट करावयास लाविली, त्याप्रमाणें रशियानें आपलें वजन खर्च करून सर्व्हियास ऑस्ट्रियाच्या अटी कबूल कर, असें सांगितलें. सर्व्हियाही त्याप्रमाणें करण्यास तयार झाला. तसें उत्तरही त्यानें ऑस्ट्रियाच्या दरबाराकडे रवाना केलें. मात्र स्वतंत्र राष्ट्राच्या इभ्रतीस कमीपणा आणणाऱ्या ज्या बाबी होत्या, तेवढ्यांसच त्यानें रुकार भरला नाहीं. सर्व्हियाचें हें उत्तर ऑस्ट्रियास मान्य झालें नाहीं, व आपलें यादीरूपी आज्ञापत्र सर्व्हियानें अमान्य केलें, असा आरोप त्याजवर ठेवून ता. २८ जुलै १९१४ रोजीं ऑस्ट्रियानें सर्व्हियावर स्वारी केल्याचें बिगुल वाजविलें. ह्याच्या पूर्वीं दोन दिवस० रशियानें ऑस्ट्रियास इशारा दिला होता कीं, सर्व्हियावर ऑस्ट्रियाकडून कांहीं कमी अधिक प्रसंग झाल्यास आपल्याकडून स्वस्थ बसणें होणार नाहीं.

येथपर्यंत हा तंटा तीनच राष्ट्रांपर्यंत पोंचला होता. मूळ भांडण ऑस्ट्रिया व सर्व्हिया यांचें, व रशिया हा सर्व्हियाचा पाठीराखा म्हणून प्रसिद्ध असल्यामुळें तो सर्व्हियाची बाजू उचलून घ्यावयास गेला, हें यथार्थ झालें; पण ऑस्ट्रियास जर्मनीनें जी भर दिली, ती कां? वास्तविक या वेळीं जर्मनीच्या हातांत इतकें महा सामर्थ्य होतें कीं, त्यानें ह्या नाजूक प्रसंगीं जर एक शब्द खर्च केला असता, तर आजचा महाप्रलय थांबण्याचा पूर्ण संभव होता; पण जर्मनीचें दुर्दैव म्हणा, युरोपचें दुर्दैव म्हणा, अगर जगाचें दुर्दैव म्हणा आ वांसून उभें राहिलें होतें, म्हणून ऑस्ट्रियास शहाणपणाची सल्ला देणें जर्मनीस रुचलें नाहीं; उलट ऑस्ट्रियाच्या एकूणएक मागण्या सर्व्हियाकडून कबूल न झाल्यास ऑस्ट्रियानें स्वस्थ बसूं नये, अशीही भर जर्मनीनें त्यास दिली. यांतील जर्मनीचा उद्देश हाच होता कीं, सर्व्हियाची बाजू घेऊन रशिया उठणार,

व मग त्याचा पराभव करण्यास आपल्यास आयतीच संधि मिळणार. जर्मनीचा हाच उद्देश होता, हें अलीकडे जे सरकारी पत्रव्यवहार प्रसिद्ध झाले आहेत, व त्याचप्रमाणें महत्त्वाची जी खात्रीलायक बातमी जगापुढें आली आहे, त्यांवरून आरशांत रूप दिसावें, त्याप्रमाणें स्वच्छ दिसत आहे. जर्मनीच्या या राजकारणाची विशेष मीमांसा पुढें योग्य स्थळीं केलेली वाचकांस आढळून येईल. असो.

ऑस्ट्रिया व सर्व्हिया यांमधील तंटा रशियाच्या पलीकडे पसरूं नये, यासाठीं इंग्रजांचे परराष्ट्रराजकारणमंत्री सर एडवर्ड ग्रे यांनीं अत्यंत शिकस्त केली. या प्रसंगीं त्यांनीं बराच मोठा पत्रव्यवहार केला, व निरनिराळ्या राष्ट्रांस चार समजुतीच्या गोष्टी सांगून महायुद्धाचा प्रसंग टाळण्याचा अखेरपर्यंत प्रयत्न केला. ता. २६ जुलै १९१४ रोजीं त्यांनीं लंडनमध्यें एक राष्ट्रांच्या प्रतिनिधींचें कॉन्फरन्स भरवून त्यांच्यापुढें हा प्रश्न मांडण्याचें योजिलें; पण त्या कॉन्फरन्सचा हेतु कांहीं तडीस गेला नाहीं. यांत जर्मनीचा नाकबुलीचा हेतु उघड उघड दिसून आला. इकडे शांतता भंगूं न देण्याचें सर एडवर्ड ग्रे यांचे असे प्रयत्न चालले होते, पण तिकडे युरोपांत ऑस्ट्रियानें उघडपणें सर्व्हियावर लढाई जाहीर केलीच होती. रशिया आपल्या सैन्याची जमवाजमव करूं लागला होता. जर्मनीनेंही सैन्याची जमवाजमव करण्यास आरंभ केला होता. शेवटीं ता. १ ऑगस्ट रोजीं शनिवारीं सायंकाळीं ५ वाजतां जर्मनीनें रशियावर स्वारी केल्याचें जाहीर केलें.

जर्मनी या लढाईंत पडल्यामुळें फ्रान्सचा रशियाशीं जो करार झाला होता, त्या करारांप्रमाणें त्यासही आपल्या शब्दास जागावें लागलें; व अर्थात्च रशियास मदत करण्यास फ्रान्स उद्युक्त झाला.

इंग्लंड व जर्मनी यांच्यामध्यें लढाईस सुरुवात होण्याचें प्रत्यक्ष कारण म्हटलें म्हणजे जर्मनीनें बेल्जमच्या त्रयस्थपणाचा भंग केला हें होय. लंडनच्या तहान्वयें इंग्लंड, फ्रान्स, रशिया, ऑस्ट्रिया आणि प्रशिया यांनीं बेल्जमचा त्रयस्थपणा अबाधित पाळावा, असें सर्वांच्या संमतीनें ठरविण्यांत आलें होतें. ही अट या प्रसंगीं तुर्की पूर्ववत् पाळणार कीं नाहीं, असें सर एडवर्ड ग्रे यांनीं फ्रान्स व जर्मनी या उभयतांस विचारलें. त्याचें उत्तर

फ्रान्सनें 'होय' असें लागलीच दिलें; पण जर्मनीनें मात्र कांहींच निश्चित उत्तर दिलें नाहीं.

ता. २ ऑगस्ट रोजीं बेल्जमप्रमाणेंच त्रयस्थ ह्मणून मान्य केलेलें लहानसें संस्थान जें लक्सेंबर्ग त्यास जर्मनीनें वेढा दिला. ता. ३ ऑगस्ट रोजीं जर्मनीनें बेल्जमच्या राज्यांतून आपलें सैन्य घेऊंन जाण्यास वाट मागितली. आणखी त्याबरोबर बेल्जमकडे असाही निरोप पाठविला कीं, तुह्मी जर तुमच्या मुलुखांतून आम्हांस बिनतक्रार जाऊं दिलें, तर तुमचें स्वातंत्र्य आम्ही कायम राखूं. आणि असें न केलेंत तर तुम्हांस आम्ही आमचे शत्रु लेखूं. बेल्जम लहान झाला, तरी त्यास परक्याचें मग तो अगदीं जवळचा शेजारी झाला म्हणून काय झालें, हें उद्दामपणाचें वर्तन कसें खपणार? त्याच्या स्वाभिमान परिपूर्ण तेजास जर्मनीची धमकावणी तुच्छ वाटली; व त्यानें जर्मनीच्या आततायीपणास प्रतिबंध करण्याचा निश्चय केला. ता. ४ ऑगस्ट रोजीं इंग्लंडाकडे त्यानें मदत मागितली. इतक्यांत इकडे जर्मनी बेल्जमच्या राज्यांत घुसलाही होता. इंग्लंडनें जर्मनीपाशीं या गोष्टीचा जबाब विचारला, पण त्याजकडून कांहीं उत्तर न आलेलें पाहतांच इंग्लंडनें जर्मनीकडे निर्वाणीचा खलिता पाठवून ठरीव वेळेपर्यंत त्याचें उत्तर न आल्यामुळें त्याच दिवशीं म्हणजे **तारीख ४ ऑगस्ट १९१४ रोजीं ११ वाजतां जर्मनीवर लढाई जाहीर केली.**

प्रकरण २ रें.

ब्रिटिश साम्राज्य.

तारीख ४ आगस्ट १९१४ इसवी रोजीं ग्रेटब्रिटन जर्मनीशीं युद्ध करण्यास निघालें, असें ब्रिटिश साम्राज्याचे बादशहा पांचवे जॉर्ज यांनीं जाहीर करतांच ब्रिटिश साम्राज्यांत अर्थांतच मोठी चळवळ उडून गेली.

इंग्लंड या महायुद्धांत कां उतरलें, तें स्वखुषीनें लढाईस गेलें, कीं परिस्थितिच तशी उपस्थित झाल्यामुळें त्यास तरवार हातीं धरावी लागली, या गोष्टींचें विशेष विवेचन पुढें योग्यस्थळीं येईलच. ह्यापूर्वी ब्रिटिश साम्राज्याचा विस्तार केवढा आहे, आणि त्याच्या वसाहती कोठकोठें आहेत ह्याची थोडीशी माहिती आपण करून घेऊं.

ब्रिटिश साम्राज्य पांचही खंडांत पसरलें आहे. त्याचा विस्तार १,३१,२३,७१२ चौरस मैल असून त्यांत सुमारें ४३$\frac{1}{4}$ कोटी लोकवस्ति आहे. यापैकीं कोणत्या खंडांत ब्रिटिश साम्राज्याचा केवढा भाग आहे व त्यांतील लोकसंख्या किती आहे, व त्यांत आयात व निर्गत मालाचा केवढा व्यापार चालतो, हें पाहूं:—

[खालील आंकडे १९१२-१३ सालचे आहेत.]

देशाचें नांव.	क्षेत्रफळ चौरस मैल	लोकसंख्या	आयात मालाची किंमत पौंड.	निर्गत मालाची किंमत पौंड
१ ग्रेटब्रिटिन व आयर्लंड	१२१६३३	४६०३५५७७	८४३०६२५५७	६९७२५९१७२
युरोप खंड				
२ जिब्राल्टर	२	१८४४६	०	०
३ माल्टा	११८	२१६६१७	२६६१०९६	१०९२५९८
एशिया खंड.				
४ हिंदुस्थान (संस्थानांसुद्धां)	१८०२६५७	३१५१५६३९६	१५९२०८७०४	१७७५६१३४५
५ सैप्रस	३५८४	२८२३८८	७०७०३७	७९९४१५
६ एडन, पेरीम, सोकोट्रा	१०५८७	५८१६५	४६२०७३९	४५३६७६०
७ सीलोन	२५३२१	४१८९२४६	१२१३३३१२	१३२६३६६०

देशाचें नांव.	क्षेत्रफळ चौरस मैल.	लोकसंख्या.	आयात मालाची किंमत पौंड.	निर्गत मालाची किंमत पौंड.
८ स्ट्रेटस् सेटलमेंटस्	१६३०	७४५३२	५२५०४५५१	४३७६५०२०
९ फ्युडेटरी मलाया स्टेटस्	२७५०६	९१७२५००	८५९६६२९	१८०२२५२८
१० इतर मलाया स्टेटस्	२४६००	९५००००	४४१४६८	३८०२१४
११ बोर्निओ, सारावाक	७३१०६	७०८०००	१४४६४४७	१६७५६५९
१२ हांगकांग व टेर	४०५	४५६७३९	०	०
१३ वै-है-वै	२८५	१४७१३३	०	०
आस्ट्रेलिया व पासिफिकमधील.				
१४ आस्ट्रेलिया	२९७४५८१	४८०२१७४	७९७१२०००	७५११३०००
१५ पापुआ	९०५४०	२७१०००	२१८३२३	१२८०१६
१६ न्यू झीलांड	१०३८६१	११२८१६०	२०९७६५७४	२१७६०५८१
१७ फिजी	७४३५	१४९१७१	९४००४४	१०५८९६०
१८ टोंगा, सालोमन व जिल्बर्ट बेटे	१५३५६	२०१०००	४०२५४८	६१३४९५
आफ्रिका खंड.				
१९ अॅसेन्शन	३४	४००	०	०
२० सेंट हेलेना	४७	३५१९	४१७४९	६१५०
२१ उत्तर नायजेरिया	२५६२००	९६१२०००	७९९२७५	९७४२४१
२२ द. नायजेरिया व प्रॉट	७९८८०	७८६००००	६४३०९०१	६०८९७०६
२३ सेराल्लियान आणि प्राट	३१०००	१४०३१३२	१४२४८६४	१५४०७५४
२४ गोल्डकोस्ट व प्रॉट	८००००	१५०३३८९	४०२३३२	४३०७८०२
२५ गॅम्बीयान व प्राट	४५००	१३८४००	७५६८५३	७३५१७२
२६ मॉरिशस्	८००	३७८४२७	२१७५०८२	२५०७३३०
२७ सिचेलिस	१५६	२३५०७	७८४३४	११७१३६
२८ सोमाली लॅन्ड	६८०००	३४७०००	२४९५२९	२२९४४८
२९ईस्ट आफ्रिका प्रोटेक्टरेट	२४६८२२	४०३८०००	१८०८३४३	१२०३२०१
३० युगांडा	१२१४३७	२८९३४९४	७७९९४६	४५७०१०
३१ झांझिबार व पेंबा	१०२०	१९७२००	१०३०९९६	१०३६१२७
३२ नियासा लॅन्ड	२९३१५	१००००००	३२२३९२	२७४५४३
३३ दक्षिण आफ्रिका यूनिअन	४७३१००	६२११९००	३९८४५२१०	६३२७२७४३
३४ व्हॉडेशिया	४३८५७५	१७५००००	३१८२२८६	३२७८०५४
३५ खाल्कीलॅन्ड	६५३६	१००००	•	•

देशाचें नांव.	क्षेत्रफळ चौरस मैल.	लोकसंख्या.	आयात मालाची किंमत पौंड.	निर्गत मालाची किंमत पौंड.
३६ बासुटो लॅन्ड	११७१६	४०४५०७	०	०
३७ बॅचुआना लॅन्ड	२७५०००	१२५३५०	०	०
अमेरिका खंड.				
३८ कानडा	३७२९६६५	७७५८०००	१४२२५११०३	८०८३१०३४
३९ न्यूफौंडलंड व लाब्राडोर	१६२७३४	२४५१३७	३२९१४३०	३०१६०९४
४० हंडुरास	८५९८	४१०००	७१८८०९	५८७०९६
४१ ग्वायना	९०२७७	२९९०४४	१७०३३५६	१७९८५९७
४२ बर्मुडा	१९	१९१५२	६३७१७८	११६५८६
४३ बाहामा	४४०४	५६३१८	३५८१११	२७६१५
४४ तुर्क व कोकोचेटें	१६६	५६१५	२७६६२	२५९४७
४५ जमेका	४२०७	८५५६८२	३०५०४७९	२७०९२८३
४६ कायमन बेटें	८९	५५६४	२८४४४	१३२३
४७ विंडवार्ड बेटें	६७२	३३४८७२	२१८९८०९	१५१४२३२
४८ लीवार्ड बेटें	७१५	१२७७८४	६४०७२७	७६३४२
४९ ट्रिनिदाद व टोबागो	१८६८	३४५३९७	४६८२३२५	४४७२७७
५० फॉकलंड बेटें	७५००	३२९८	९३२६४	१०५७०००

ग्रेटब्रिटन व हिंदुस्थान यांत व त्याशिवाय निरनिराळ्या खंडांत ब्रिटिश साम्राज्याचा विस्तार केवढा आहे हें खालील कोष्टकांत दिलें आहे.

देशाचें नांव.	क्षेत्रफळ चौरस मैल	लोकसंख्या.	आयात मालाची किंमत पौंड.	निर्गत मालाची किंमत पौंड.
ग्रेटब्रिटन व आर्यलंड	१२१६३३	४६०३५५७०	८४३०६२५ ७	६९७२५९१७२
युरोप	१२०	२३५०६३	२६६१०९६	१०९२५९८
हिंदुस्थान	१८०२६५७	३१५१५६३१६	१५९२०८७०४	१७७१६९३४५
एशिया (हिंदुस्थानवजा)	१६६८३४	८७०९५३३	८०४५०३०३	८२४४३२२६
आस्ट्रेलिया व पाशिफिक बेटें	३१९१७७३	६५५१५१३	१०३२४९४८९	९८६८४०१२
आफ्रिका	२१३५१४७	३७९९०२२२	६२१४९९६७	८५०५४७४२
अमेरिका	४०१०९१४	१००९६८६३	१५९६७२६९७	१६९८०५२८

कारास आतांपर्यंत केली आहे. व एक खास स्वतःचे खर्चानें हॉस्पिटल-जहाजहीं दिलें आहे. पंजाबमधील मुसलमानी लोहारूकडून आणि बलुचिस्तानांतील दोन संस्थानांकडून उंटांची मदत मिळालेली आहे. रेवाच्या महाराजांनीं तर आपली फौज व आपला खजिना सरकारास अर्पण करण्याचा मनोदय व्यक्त केला एवढेंच नव्हे, तर आपला जो खासगी अलंकारादि सरंजाम तोही देण्याची इच्छा प्रदर्शित केली. काश्मीरचे महाराज, बुंदीचे महाराज, ग्वाल्हेरचे महाराज, इंदूरचे महाराज व ओर्छाचे महाराज यांनीं प्रिन्स ऑफ् वेल्स यांच्या फंडांत मोठमोठ्या रकमा भरल्या आहेत. हिंदुस्थानांत उभारलेल्या सार्वजनिक फंडांत काश्मीरच्या महाराजांनीं मोठी रक्कम भरली आहे. इंदूरच्या महाराजांनीं आपल्या संस्थानच्या पदरचे सर्व घोडे सरंजामासह सरकारास देण्याची इच्छा व्यक्त केली. हैदराबादचे निजाम, जामनगरचे जामसाहेब व मुंबई-इलाख्यांतील दुसऱ्या अनेक सरदारांनीं अशाच प्रकारची मदत देऊं केली आहे. मुंबई-इलाख्यांतील प्रत्येक संस्थानिकानें आपल्या संस्थानाचा सर्व पैसा सरकारास जरूर लागेल, तेव्हां त्यांनीं घ्यावा, अशी इच्छा प्रदर्शित केली आहे. राजनिष्ठेचे संदेश तर हिंदुस्थानांतून इतके गेले आहेत कीं, त्या सर्वांचा उल्लेख करणें म्हणजे एक मोठा ग्रंथच होईल. चित्रळचे मेहतार व खैबरच्या आसमंतांतील भागांतील निरनिराळ्या लोकसंस्थांनीं पूर्णराजनिष्ठेचे निरोप धाडले आहेत. अगदीं बारीक सारीक संस्थानें धरून, झाडून सर्व संस्थानांनीं ज्यांस जी मदत देणें शक्य ती ती मदत देण्याचें त्यांनीं आश्वासन दिलें. नेपाळच्या दरबाराकडूनही मोठी मदत मिळण्याचें अभिवचन आलें नेपाळ दरबारानें आपली सर्व सेना ब्रिटिश-सरकारच्या हवालीं करण्याची इच्छा प्रदर्शित केली; व गुरखा पलटणीस तोफा वगैरे देण्यासाठीं ३,००,००० रुपये दिले. याशिवाय इंडियन फंड व प्रिन्स ऑफ् वेल्स फंड यांतही नेपाळदरबारानें मोठमोठ्या रकमा भरल्या.

या समयीं हिंदुस्थानांत अशी एकही संस्था, एकही समाज, एकही जात किंबहुना अशी एकही व्यक्ति सांपडावयाची नाहीं कीं, ज्यांनीं सरकारास राजानिष्ठापूर्वक मदत करण्याची इच्छा प्रदर्शित केलेली नाहीं. व्हाइसराय यांजकडे तर कैक दिवस पत्रें व तारा यांचा जणों काय मोठा पूरच चालला होता. 'ऑल-इंडिया मॉस्लेम लीग,' हिंदूंच्या

शेंकडों संस्था बंगाल व रंगूनमधील मुसलमानांच्या अनेक संस्था, अलीगर कॉलेजचे ट्रस्टी, बिहार व कलकत्ता येथील प्रमुख संस्था. नामदार आगाखान व त्यांचे अनुयायी, 'पंजाब मॉस्लेम लीग,' 'बिहार लँड होल्डर्स ॲसोसिएशन, औंधचे तालुकदार, प्रॉव्हिन्शियल काँग्रेस कमिट्या वगैरे वगैरे अनेक संस्थांकडून राजनिष्ठेचे निरोप गेले. मद्रासच्या जमीनदारांनीं ५०० घोडे देऊं केले. 'इंपीरियल रिलीफ फंडां'त चोहोंकडून वर्गण्या आल्या. युद्ध सुरू झालें, त्या सुमारास यूरोपांत कित्येक हिंदी संस्थानिक होते; त्यांनीं सर्वप्रकारची मदत करण्याविषयीं सरकाराकडे निरोप धाडले. भरतपूरचे महाराज, पदुकोटाचे राजेसाहेब यांनीं संस्थानचा सर्व पैसा सरकारच्या हवालीं करण्याची इच्छा प्रदर्शित केली. अक्कलकोटचे राजेसाहेब मोहिमेवर जाण्यास तयार झाले. बडोद्याचे श्रीमंत महाराज गायकवाड सरकार यांनीं आपली सर्व फौज व संस्थानचा सर्व पैका सरकारास देऊं केला. खैरपूरच्या मीरसाहेबांच्या चिरंजीवांनीं मोहिमेवर जाण्याची इच्छा प्रदर्शित केली. याशिवाय हिंदुस्थानच्या रयतेपैकीं पुष्कळांनीं प्रत्यक्ष समरभूमीवर जाऊन तेथें निरनिराळ्या कामगिऱ्या बजावण्याचीही उत्कट इच्छा प्रदर्शित केली.

इंग्लंडनें लढाई जाहीर केली, त्या दिवसापासून म्हणजे ता० ४ ऑगस्टपासून आतांपर्यंत ब्रिटिश-सरकारास हिंदुस्थानांतील राजांनीं व रयतेनें किती मदत केली आहे, तिची सविस्तर हकीकत अजून सरकारी-रीतीनें एकत्र प्रसिद्ध झालेली नाहीं; पण ज्यावेळीं ती स्वतंत्र ग्रंथरूपानें प्रसिद्ध होईल, त्यावेळीं तो मदतीचा इतिहास पाहून कोणत्याही राष्ट्राच्या मनांतील हिंदुस्थानासंबंधाचा आदरभाव शतपटीनें वृद्धिंगत होईल, ह्यांत शंका नाहीं.

प्रकरण ४ थें.

यूरोपखंडाची रूपरेखा.

विस्तार.

सर्व खंडांत यूरोपखंड हें अगदीं लहान आहे. या खंडाच्या चतुःसीमा कांहीं अंशीं याच्या सृष्टिनिर्मित स्थितीनें व कांहीं अंशीं राजकीय परिस्थितीनें ठरविल्या आहेत. आग्नेयीकडील बाजूस, कास्पियन समुद्रापासून डॉननदीच्या

सुखापर्यंत जो मॅनिक नामक प्रदेश आहे,तीच सरहद्द समजतात. पूर्वेकडील बाजूस याची सरहद्द जणूं काय उरल पर्वत व उरल नदी हीं त्या ठिकाणीं निर्माण करून सृष्टीनें ठरवून टाकिली आहे. यूरोपच्या मुख्य भूप्रदेशाचें त्याच्या जवळील बेटें धरून एकंदर क्षेत्रफळ सुमारें २५ लक्ष ५६ हजार चौरस मैल आहे. यांत ऐसलँड, नोव्हा झेम्ला आणि स्पिटसबर्जन हीं धरलीं तर या सर्व प्रदेशाचें एकंदर क्षेत्रफळ सुमारें ३८ लक्ष ५६ हजार चौरस मैल होईल.

एकंदर जगाचा नकाशा पुढें मांडून पाहूं लागलें तर यूरोपास खंड हें पद देण्याची त्याचे अंगीं प्रांतविस्ताराच्या मानानें योग्यता आहे असें दिसून येणार नाहीं. फार झालें तर ज्या विस्तीर्ण भूप्रदेशांतून आशिया-नामक खंड बनलें आहे, त्या प्रदेशाचें यूरोपखंड हें एक मोठें द्वीपकल्प आहे, असें म्हणतां येईल.

बेटें सोडून दिलीं असतां यूरोपच्या किनाऱ्याची लांबी सुमारें ४८ हजार मैलपर्यंत असावी असा अंदाज केला आहे. या बाबतींत मात्र हें खंड इतर खंडांपेक्षां श्रेष्ठ आहे. यूरोपचा व्यापार सर्वत्र इतका फैलावून निरानिराळे देश भरभराटीस येण्याचें कारण त्याच्या बहुतेक बाजूस समुद्राचें वेष्टन आहे, व त्याच्या पोटांतही समुद्रवजा प्रचंड सरोवरें आहेत, हें होय.

यूरोपखंडांतील प्रदेश ज्यास उत्तरेकडील समशीतोष्ण कटिबंध म्हणतात त्यांत आहे; व या खंडांतील पश्चिमेकडील देश पृथ्वीच्या गोलार्धांतील भूप्रदेशाच्या मध्यभागाजवळ आहेत. रशियाचा विस्तार यूरोपखंडाच्या जवळ जवळ निम्मे भागांत आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. जर्मनीपेक्षां तो १० पटीनें मोठा आहे. ब्रिटिशबेटांचा विस्तार, एकंदर विस्ताराच्या एकतिसांशाइतका होईल. यूरोपखंड हें आशियाखंडाचें द्वीपकल्प आहे, हें वर सांगितलेंच आहे. या खंडांतील डोंगराळ प्रदेशाची रांग चीन व हिंदुस्थानांतून सुरू होऊन ती पश्चिमेकडे इराण व कॉकेशस पर्वताजवळून बाल्कन प्रदेशांतून आल्पस पर्वताकडे जाते. आणि तेथून पुढें इटलीमध्यें जाऊन ती आफ्रिकेच्या उजवेकडील प्रदेशांत दृग्गोचर होते.

यूरोपांत दोन तऱ्हेच्या नद्या आहेत. तळघांटाच्या प्रदेशांतील नद्या; यांतून १२ ही महिने तारवें जाऊं येऊं शकतात. यापैकीं प्रशियांतील होलगा नदी रशियांतून वाहत जाऊन कास्पियन समुद्रास मिळते, व डॉन व डीफर या काळ्या

युरोपांतील महायुद्ध—राजमंडळ.

बेल्जमचे राजे आल्बर्ट.

रशीयाचे झार दुसरे निकोलस.

फ्रान्सचे प्रेसिडेन्ट रेमंड पॉइंकरे.

जर्मनीचे केसर दुसरे वुइल्यम.

ऑस्ट्रियाचे बादशहा फ्रान्सिस जोसेफ.



सर्व्हियाचे राजे पिटर.

सर एडवर्ड ग्रे.



(इंग्रजी परराष्ट्रीय प्रधान)

जनरल जॉफ्रे.



(फ्रेंच मुख्य सेनापति)

समुद्रास जाऊन मिळतात. या रहदारीच्या सोईमुळें चांगलेसे रस्ते बांधलेले नसले तरी आंतील प्रदेश व किनाऱ्याकडील प्रदेश यांमध्यें दळणवळण राहण्यास अडथळा येत नाहीं. (२) दुसऱ्या प्रकारच्या नद्या म्हटल्या म्हणजे दक्षिणेकडील पर्वतांतून वाहत जाणाऱ्या होत. या नद्या वर सांगितलेल्या नद्यांप्रमाणें सर्वकाळ सारख्याच रहदारीस सोईच्या नाहींत. तथापि, यामुळें त्यांचें महत्त्व अगदींच कमी आहे, असें मात्र नाहीं. या नद्यांपैकीं विश्चुला, ओडर, एल्ब, वेसर आणि ऱ्हाईन या नद्या जर्मनींत आहेत. यांपैकीं जर्मनींतील पहिल्या प्रतीचें बंदर जें हँबर्ग तें एल्बनदीच्या कांठीं आहे.

ऱ्हाईन नदीही जर्मनींत आहे, हें त्या देशाचें मोठें भाग्यच आहे, असें म्हटलें पाहिजे. कारण या नदीच्या प्रवाहांतून हजार पौंडांचीं जहाजें अगदीं देशाच्या अंतरभागांत मॅन्हीमपर्यंत जाऊं शकतात. यामुळें हें शहर देखील यूरोपांतील एक बंदर आहे, असें समजण्यांत येतें.

ऑस्ट्रियांतील डॅन्यूब नदी, ही देखील तारवांच्या रहदारीस अशीच फार सोईची आहे. ऱ्हाईन व डॅन्यूब नदी यांच्या उगमस्थानांत जें थोडेंसें अंतर आहे तें जर नसतें, तर यूरोपखंडाचे या प्रचंड जलप्रवाहांनीं कदाचित् विभागही पडले असते.

हवामान.

यूरोपांतील पश्चिमेकडील प्रदेशाचें हवामान अटलांटिक-महासागरांतून जे वारे वाहत येतात त्यांवर कांहींसें अवलंबून आहे. हे वारे हिंवाळ्याच्या दिवसांत विषुववृत्ताजवळील प्रदेशांतून उष्णता वाहून आणतात. असेंही म्हणावयास हरकत नाहीं कीं, ब्रिटन देशाचा जो उत्कर्ष झाला त्यास कारण पश्चिमेकडून हिंवाळ्याच्या दिवसांत त्याच्या किनाऱ्यावर येणाऱ्या वाऱ्यांबरोबर येणारी ईश्वरानें विशेष मेहरबानीनें योजिलेली उष्णता होय. ही उष्णता महासागरांतील पाण्याच्या प्रवाहानेंही मिळत असते. याशिवाय विषुववृत्ताजवळील प्रदेशांत जे समुद्र आहेत, त्यांतूनही यूरोपखंडास उष्णता प्राप्त होत असते. ही उष्णता वाहून आणण्यास आग्नेयीचे व पश्चिमेचे वारे व महासागराच्या पृष्ठ भागावरील पाण्याचे प्रवाह मदत करीत असतात. या परिस्थितीमुळें कोळ्यांस बारमहा उत्तर समुद्रांत आपला उद्योग चालवितां येतो. ब्रिटनमध्यें बारमहा पाऊस पडत असतो. त्यामुळें पूर्वकाळीं त्या देशाची मेंढरें, लोंकरीचीं वस्त्रें याविषयीं प्रख्याती झाली.

फ्रान्स व बेलजम हे देशही अशाच रीतीनें समुद्राच्या सन्निद्ध असल्यानें त्यांसही असाच फायदा झाला.

प्रशिया व पूर्व-जर्मनी यांतील देशांत पाऊस थोडा पडतो. उन्हाळ्यांत उष्णता फार असते व हिंवाळ्यांत थंडीचा माराही भयंकर असतो. दक्षिण रशियांतील काळ्या समुद्राच्याजवळील भाग मात्र उष्ण व सुपीक आहे.

लोक व भाषा.

युरोपांत ज्या भाषा सध्यां चालू आहेत त्यांवरून यूरोपांतील लोकांचे भेद फळून येण्यासारखे आहेत हें खरें; पण त्यांवरून निश्चित अशीं अनुमानें मात्र बांधितां येणार नाहींत. इतिहासांत ज्या अनेक उलथापालथी झाल्या त्यांनीं जगाच्या इतर प्रदेशांत ज्याप्रमाणें मानववंशांच्या शाखांचें सांमिश्रण केलें, तसाच प्रकार यूरोपांतही घडला आहे. त्याचप्रमाणें अनेक प्रांतांतील मूळ भाषेंत फरक होण्यासही अनेक गोष्टी कारण झाल्या आहेत. पण जर भाषेवरूनच वंशभेद ठरवावयाचा असेल, तर त्यांत एक महत्त्वाची गोष्ट लक्षांत ठेवावयाची आहे ती ही कीं, सांप्रत यूरोपखंडांत जेवढे लोक आहेत त्यांपैकीं शेंकडा ९९ असामी, ज्यांस आर्यभाषांचा समुदाय असें म्हणतात, त्या समुदायांतील भाषा बोलणारे आहेत; व त्यांपैकीं शेंकडा ९० लोक त्या समुदायाच्या ज्या तीन मुख्य शाखा कीं, ग्रीकोइटालिक, टयुटॉनिक आणि स्लॅव्हॅनिक यांपासून निघालेल्या भाषा बोलणारे आहेत. यांपैकीं, पहिल्या शाखेची भाषा बोलणाऱ्या लोकांकडे पाहिलें तर त्यांचा वंश व भाषा यांत फारसें कांहींच साम्य आढळून येत नाहीं. या शाखेची एक भाषा जी. लॅटिन ती एके वेळीं रोमन-साम्राज्याच्या विस्ताराबरोबर इटली, आजचा फ्रान्स, बेलजम, स्पेन, पोर्तुगाल आणि स्विट्झर्लंड आणि ऑस्ट्रिया यांचा कांहीं भाग यांत पसरलेली होती. आज मितीस टयूटॉनिक व स्लॅव्होनिक भाषा बोलणाऱ्या लोकांपेक्षां ग्रीकोइटालिक भाषा बोलणाऱ्या लोकांची संख्या कमी आहे. अलिकडील कांहीं वर्षांत खुद्द यूरोपखंडांत स्लॅव्हॅनिक भाषा बोलणारांची संख्या टयूटॉनिक भाषा बोलणारांच्या संख्येहून झपाट्यानें वाढत चालली आहे. टयूटॉनिक भाषेच्या शाखेंत जर्मन, स्कँडिनेव्हीयन, डच, फ्लेमिश, आणि इंग्लिश या भाषा मोडतात. टयूटॉनिक भाषा बोलणाऱ्या लोकांची संख्या यूरोपाच्या बाहेर मात्र पुष्कळच वाढत आहे. याशिवाय आर्य-भाषा

समुदायापैकीं यूरोपांत बोलण्यांत येणाऱ्या भाषा म्हटल्या म्हणजे कैल्टिक, लेटिक आणि लिटयूनियन या होय. केल्टिक भाषा वेल्स, स्कॉटलंडमधील हायलंड, आयर्लंड, ब्रिटनीमधील पूर्वेकडील प्रांत यांमधील सुमारें २० लक्ष लोक बोलतात. लिथ्यूनियन भाषा पूर्व रशिया आणि पोलंड यांतील ३० लक्षाहून काहीं जास्त लोक बोलतात.

यूरोपांतील अनार्य-भाषांपैकीं मुख्य समुदायास फिनो-टार्टार अशी संज्ञा आहे. या भाषा उत्तर स्कँडिनेव्हिया आणि फिनलँड यांमधील लॅप्स आणि फिन्स, उत्तर-रशियातील कांहीं जातीचे लोक, हंगारींतील मागियार लोक आणि तुर्कस्तानांतील तुर्क लोक हे बोलतात. याशिवाय ज्या भाषेच्या उगमाचा कांहीं पत्ता सांपडत नाहीं, अशी भाषा स्पेन व फ्रान्समधील ९ लक्ष १० हजार लोक बोलतात. यूरोपखंडांत ज्यू लोकांची वस्ती सर्वत्र पसरलेली आहे. पण त्यांतल्यात्यांत पोलंड, पूर्वरशिया व आस्ट्रिया-हंगारी आणि जर्मन राज्य यांतील जवळ जवळचे प्रदेश यांत ती फार आहे. हे लोक ज्या देशांत ते राहतात त्या देशांतील भाषेशिवाय मोडकी हिब्रू भाषाही बोलतात.

इतिहास.

यूरोपच्या सुधारणेचा प्रारंभ आग्नेयी-दिशेकडून झाला व तो भूमध्य-समुद्रापासून इतर प्रदेशांत पसरत गेला. एजन-समुद्राच्या किनाऱ्यावर व बेटांत, आशियाखंडांतील व मिसरदेशांतील सुधारणेचा परिणाम होऊन ग्रीक-लोकांच्या आश्चर्यकारक उत्कर्षास मोठी मदत झाली. ग्रीक-लोकांनीं आपलें वजन व्यापाराच्या योगानें एजियन-समुद्रापासून काळ्या समुद्रापर्यंत व त्याच-प्रमाणें सिसिली व इटली यांत वसाहती करून वाढविलें. हा व त्याच-प्रमाणें रोमच्या उत्कर्षाचा इतिहास मोठा मनोरंजक आहे.

यूरोपांतील सध्यांच्या राष्ट्रांचा जन्म.

यूरोपांत आज जीं राष्ट्रें आहेत त्यांच्या मर्यादा कांहीं बाबतींत भूगोल-निर्मित स्थितीनें व कांहीं बाबतींत ऐतिहासिक घडामोडीनें ठरविल्या आहेत. स्पेन व पोर्तुगालच्या राज्यांचा जन्म, सॉरासन किंवा मूर लोकांपासून आयबे-रियन पेनिनशुला हस्तगत करण्यासाठीं जीं युद्धें झालीं, त्यात झाला. या लढायांत अनेक संस्थानें उदयास आलीं. पण यांपैकीं बहुतेक फर्डिनांड व इसाबेला यांच्या इतिहासप्रसिद्ध-विवाहानें संयुक्त झालीं. पुढें यांचा नातू

जो जर्मनीचा पांचवा जार्ज त्यास इ. स. १९१६ त या बहुतेक संस्थानांचें राज्य प्राप्त झालें. यांतून पोर्तुगाल मात्र निराळेंच राहिलें.

पांचव्या शतकाच्या आरंभीं रोमन लोक ब्रिटिश बेटें सोडून निघून गेल्यावर त्याच शतकाच्या उत्तरार्धांत टयुटॉनिक् लोकांच्या अँग्ल व सॅक्सन नामक टोळ्यांनीं ग्रेटब्रिटनवर स्वारी केली. हेच लोक इंग्लंड व स्कॉटलंड मधील राज्याचे मूळ संस्थापक होत.

फ्रान्स व जर्मनी या दोन निरनिराळ्या राष्ट्रांचा प्रारंभ इ. स. ८७० त झाला; असें म्हणावयास हरकत नाहीं. आजच्या जर्मन–राष्ट्राची संस्थापना १८७१ सालीं झाली. त्याच्यांत व पूर्वकाळच्या जर्मन–राष्ट्रांत पुष्कळच अंतर आहे. पूर्वीच्या साम्राज्यांत आस्ट्रिया, हंगारी, स्वित्झर्लंड ज्यास लोकंट्री म्हणतात ते प्रदेश वगैरे बरेच भाग समाविष्ट होतात.

लोकंट्रीज नामक प्रदेशाचीं आतां बेलजम व नेदरलंडस नामक स्वतंत्र राष्ट्रें बनलीं आहेत. त्यांस ही सुस्थिति प्राप्त होण्यास काळाचे अनेक तडाके सोसावे लागले आहेत. राष्ट्रांचा उत्कर्ष कसा होतो ह्या दृष्टीनें हा इतिहास महत्त्वाचा आहे. बेलजमच्या राज्याची स्थापना १८३० मध्यें झाली. स्वित्झर्लंडची स्थापना वेस्ट फालिया येथें झालेल्या तहानें १६४८ त झाली होती.

जर्मन राज्यांत जो स्लॅव्होनिक प्रांत आहे, तो पोलंडच्या पूर्वीच्या राज्यांतील प्रदेशांतून घेतला आहे. पोलंडचें राज्य १२२० मध्यें स्थापन झालें. व कांहीं काल त्याचा विस्तार व सामर्थ्य हीं मोठीं होतीं. पण पुढें राज्यकारभारांत अव्यवस्था माजली. त्यामुळें तिघां शेजाऱ्यांत तीन वेळां त्याची वांटणी होऊन ती कायमची झाली. हे तीन शेजारी म्हणजे प्रशिया, रशिया व आस्ट्रिया हे होत. त्यांपैकीं शेवटची वांटणी १७९५ त झाली. या वांटणीपूर्वी फ्रान्समधील राज्यक्रांतीस सुरवात झाली होती. पुढें व्हिएन्ना येथें भरलेल्या कांग्रेसनें १७९५ मधील वांटणी मान्य केली. याच वेळेपासून स्वीडन व नॉर्वे या देशांचें राज्यछत्र एक असावें ही व्यवस्थाही मान्य करण्यांत आली. यापूर्वी नॉर्वे व डेनमार्क यांची जोडी होती.

या वेळेनंतर यूरोपच्या नकाशांत झालेले मुख्य फेरफार म्हटले म्हणजे, अलसेस लोरेन प्रांत इ० स० १८७१ सालीं फ्रान्सकडून जर्मनीस मिळाले. हा, व १९१२ त झालेल्या बाल्कन–युद्धानें त्या प्रदेशांतील प्रांताची पुन्हा

वांटणी केली, हे होत. रुमानिया व सर्व्हिया या देशास स्वतंत्र राज्याची पदवी अनुक्रमें इ० स० १८८१ व १८८२ या सालांत मिळाली.

उद्योगधंदे.

यूरोपाच्या पश्चिमेकडील प्रांतांत दाट लोकवस्तीचे बरेच प्रदेश आहेत. याच पश्चिमेकडील प्रांतांतून एकंदर जगास लागणाऱ्या दगडी कोळशांपैकीं सुमारें अर्ध्या कोळशाचा पुरवठा होतो. जर्मनीच्या खाणी डार्टमंड, बॉन आणि ब्रेसलॉ येथें असून फ्रेंचांच्या खाणीं व्हॅलेनसिनीस व सेंटएटनि येथें आहेत. पण हे दोन्ही देश ब्रिटनकडून पुष्कळ कोळसा घेतात. बेलजममधील दगडी कोळशाच्या खाणी शार्लेराय आणि मान्स यांच्या सभोंवार आहेत.

ज्या ठिकाणीं दगडी कोळशाच्या खाणी आहेत, त्याच्या आसमंतांत प्रदेशांत यंत्रें व लोखंडाचें सामान तयार करण्याचे कारखाने आहेत. कारण तेथें लोखंडाचीही समृद्धि आहे, बेलजममधील अशाप्रकारचीं कामें लीएज व नेमर जवळ चालतात. जर्मनीचीं कामें डॉर्टमंड, बॉन आणि सारब्रुकेन यांचे सभोंवतीं आहेत; व फ्रेंचाचे कारखाने नेन्सी, ब्रे, व सेंट एटीन यांच्या शेजारीं आहेत.

रुएन, लिले, घेंट, डयुसेलडार्फ आणि कलोन या ठिकाणीं कापसाचीं वस्त्रें वगैरे तयार करण्याचे कारखाने आहेत. रुबेक्स, बार्मिन, आणि आकेन येथें लोंकरीचीं वस्त्रें तयार होतात. लिआन्स आणि क्रेफील्ड येथें रेशमी वस्त्रें तयार होतात. लिले, क्यांब्रै, कुरब्रै, टुर्नै व घेंट येथें तागाची वस्त्रें तयार होतात. या सर्व वस्त्रांस लागणारा माल अनेक ठिकाणांहून येतो. बेलजममध्यें ताग पुष्कळ पिकतो. लोंकरीची पैदास यूरोपांत होते, व बाहेरून ऑस्ट्रिलिया व आर्जेंटाईन यांमधूनही येते. रेशीम फ्रान्स, इटली व चीममध्यें पैदा होतें. व कापसाची आयात मुख्यत्वेंकरून युनायटेड स्टेट्समधून होते.

पश्चिम-यूरोपांत, परदेशांतून येणाऱ्या कच्च्या मालाचा व्यापार करणारीं पुष्कळ बंदरें भरभराटीस आलीं आहेत. याच बंदरांतून तयार झालेला माल पुन्हा परदेशीं व्यापारास जातो. यांपैकीं मुख्य बंदरें म्हटलीं म्हणजे बेलजममध्यें एँटवर्प, फ्रान्समध्यें हेवर, बोर्डो आणि डंकर्क; आणि जर्मनींत हँबर्ग हीं होत.

आपल्या गरजेस लागणारा गहूं एकटा आपणच उत्पन्न करूं शकेल, असा पश्चिम-यूरोपांत एकच देश आहे. तो फ्रान्स होय. बाकी सर्व देशांत परदेशांतून धान्य आणावें लागतें सर्व जगांत गव्हांचा मोठा बाजार म्हटला म्हणजे लंडन येथील होय. तेथील बाजारांतील भावावरून फ्रान्स व जर्मनी-मधील भाव होत असतात. ग्रेटब्रिटनला साखरेचा पुरवठा यूरोपांत तयार होणाऱ्या बीटसाखरेपासून होतो. बीटसाखर जर्मनी, लोकंट्रीज आणि फ्रान्स यांत तयार होते.

निरनिराळ्या खंडांचा विस्तार व लोकसंख्या.

प्रदेश.	चौरस मैल.	लोकसंख्या.
युरोप.	३७,५६,७०३	३६,००,००,०००
एशिया.	१,७०,४३,४९७	८५००००००
आफ्रिका.	१,१२,७६,८७२	२०,७३,५२,०००
अमेरिका.	१;४८,००,८१०	१३,३३,९३,०००
ऑस्ट्रेलिया.	२९,७१,३२३	३९,९०,०००
ओशियानिया.	४,८७,६०५	३,९०,१०,०००
हिंदीमहासागरांतील बेटें.	२,३३,०९६	२६,४८,०००
अटलांटिक ,, ,,	१२,३८,७९०	३,०००
उत्तरध्रुवाकडील प्रदेश.	१४,७७,०७३	१,०८,०००
क्षिण ,, ,,	२,५३ ६६८	—
एकूण	५,२३,१२,०२४	१,५९,७४,०४,०००

वंशविस्तार.

१ इंडोजर्मनिक अथवा आर्यन (यूरोप, इराण, हिंदुस्थान) ७९ कोटी
२ मंगोलियन अथवा टुरेनियन (आशिया) ५७ कोटी २० लक्ष.
३ सेमेटिक अथवा हॅमेटिक (उत्तर आफ्रिका आणि अरबस्तान) ९ कोटी.
४ नीग्रो अथवा बंटू (मध्य आफ्रिका) ११ कोटी ७० लक्ष.
५ हाटेंटाट आणि बुशमेन (दक्षिण-आफ्रिका) १॥ लक्ष.
६ मॅले आणि पॉलिनीशियन (आस्ट्रेलिया आणि पॉलिनेशिया) ३ कों. ६० ल.
७ अमेरिकन इंडियन ... ... ३ कोटी
८ इतर (हिंदुस्थान, सीलोन ग्रीनलंड वगैरे) १ कोटी ३० लक्ष.

धर्म.

१ रोमन क्याथोलिक.	२६,४५,०६,०००
२ प्रॉटेस्टंट	१६,६६,२७,०००
३ ग्रीक आर्मेनियन आणि अबिसीनियन.	११,७८,७५,०००
एकूण ख्रिश्चन.	५४,९०,०८,०००
४ बुद्धिस्ट आणि कनफ्यूशियन.	४२,१०,००,०००
५ हिंदु.	२१,४०,००,०००
६ मुसलमान.	१७,५२,००,०००
७ ज्यु.	१,१६,२५,०००
८ इतर.	२१,६४,८१,०००
एकूण	१,०,४८,३९,९९,०००

बाल्कन युद्धापूर्वीची व नंतरची बाल्कन-प्रदेशांतील स्थिति.

सन १९१३ सालीं जें बाल्कन युद्ध झालें त्याचे पर्यवसानीं युरोपांतील तुर्कस्तानाच्या प्रदेशाची वांटणी होऊन बाल्कन प्रदेशांतील देशांच्या चतु:सीमा बदलल्या. हें युद्ध कोणास कसें फायदेशीर झालें; व तुर्कस्तानास किती नुकसान आणणारें झालें हें खालील माहितीवरून दिसून येईल:—

देशाचें नांव.	क्षेत्रफळ चौरस मैल.		लोकसंख्या.	
	युद्धापूर्वी.	युद्धानंतर.	युद्धापूर्वी.	युद्धानंतर.
आल्बेनिया	...	११३१७	...	८५००००
बल्गेरिया	३३६४७	४३३१०	४३३७५१६	४४६७००६
ग्रीस	२५०१४	४१९३३	२६६६०००	४३६३०००
मांटेनिग्रो	३४७४	५६०३	२५००००	५०००००
रुमानिया	५०७२०	५३४८९	७२३०४१८	७५१६६४८
सर्व्हिया	१८६५०	३३८९१	२९११७०१	४५२७९९२
युरोपियन तुर्कस्तान	६५३५०	१०६८२	६१३०२००	१८९१०००

वरील देशांच्या सांप्रतच्या (बाल्कन युद्धानंतरच्या) चतुःसीमा अथवा देशविस्तार पाहण्यास १९१४ सालापूर्वी प्रसिद्ध झालेले नकाशे निरुपयोगी आहेत. आल्बेनिया हा देश त्या युद्धानंतरच अस्तित्वांत आला, हें वरील कोष्टक पाहिल्यावर वाचकांचे लक्षांत आलें असेलच.

बाल्कन युद्धापूर्वीच्या तुर्कस्तानांतील कोणत्या मुलखाचा केवढा तुकडा कोणाच्या वांट्यास आला, हें खालीं दिलें आहे:—

ऑड्रिआनोपल	...	...	...	(१४५२७ चौरस मैल)
बल्गेरियास...	...	...	...	५७७१ ,, ,,
ग्रीसला ...	...	...	...	११२ ,, ,,
सॅळोनिका ...	...	...	...	(१४१७५ चौरस मैल)
बल्गेरियास...	...	...	...	३०८० ,, ,,
ग्रीसला ...	...	...	...	९३०० ,, ,,
सर्व्हियास ...	...	...	...	१७९५ ,, ,,
जानीका ...	...	...	...	(६७२३ चौरस मैल)
ग्रीसला ...	...	...	...	२८०१ ,, ,,
आल्बेनियास	...	...	...	३९२२ ,, ,,
मोनॅस्टीर ...	...	...	...	(११७०८ चौरस मैल)
ग्रीसला ...	...	...	...	४७०१ ,, ,,
सर्व्हियास ...	...	...	...	३४७३ ,, ,,
आल्बेनियास	...	...	...	३५२९ ,, ,,
स्कुटारी ...	...	...	...	(३१३८ चौरस मैल)
मांटेनिग्रोस ...	...	...	...	१६८ ,, ,,
आल्बेनियास	...	...	...	२९७० ,, ,,
कोसोव्हो ...	...	...	...	(१२८३० चौरस मैल)
मांटेनिग्रोस ...	...	...	...	१९६१ ,, ,,
आल्बेनियास	...	...	...	८९६ ,, ,,
सर्व्हियास ...	...	...	...	९९७३ ,, ,,

प्रकरण ५ वें.

युरोपांतील जातिभेद व धर्मभेद.

मागील प्रकरणांत युरोपाची रूपरेखा वर्णन करितांना त्या खंडांत सांप्रत वसत असलेल्या लोकांची थोडीशी ओळख वाचकांस करून दिलीच आहे. तिजवरून वाचकांचे लक्षांत एवढी गोष्ट येऊन चुकलीच असेल कीं, युरोपांतील सर्व देशांत एकाच रक्तसंबंधाचे व सजातीय लोक नसून, मानव-कुटुंबाच्या भिन्न भिन्न शाखांचा विस्तार तेथें बराच झालेला आहे. एक देश एका शाखेच्या वंशजांनीं वसलेला, तर त्याच्या शेजारचाच देश त्यांहून अगदीं भिन्न अशा लोकांनीं वसलेला आहे. कांहीं देशांत तर अशी स्थिति आहे कीं, एका जातीचे कांहीं लोक या देशांत तर कांहीं दुसऱ्या देशांत, म्हणजे कांहीं एका राज्यछत्राखालीं तर त्यांचेच भाऊबंद दुसऱ्या राज्यछत्राखालीं, अशी त्यांची विभागणी झाली आहे. ह्यामुळें अर्थात्च, राष्ट्रांतील सर्व प्रजेंत जो एकजीव असावयाचा तसा नसून, सजातीयांचा सजातीयांकडे असलेला ओढा कांहीं राष्ट्रांच्या इमारतीच्या पोटांत सुरुंग घालून ठेवण्यास कारणीभूत झालेला आहे. चालू युद्धाच्या आरंभीं ह्याच सुरुंगाचा स्फोट झाला, व दोन देशांच्या भांडणांत तिसरा देश आपल्या सजातीयांच्या परित्राणार्थ धांवून आला ऑस्ट्रियानें सार्व्हियास पाठविलेला खलिता ज्या दिवशीं प्रसिद्ध झाला, त्याच वेळीं इतिहासज्ञांनीं भाकित केलें कीं, रशिया आपले भाऊबंद जे सार्व्हियांतील स्लाव्ह लोक त्यांचा पक्ष घेऊन उठल्याशिवाय राहणार नाहीं; व हें भविष्य थोडक्याच दिवसांत खरें झालेलेंही जगानें पाहिलें. ह्यावरून युरोपांतील लोकांमधील जातिभेदांचा तेथील राष्ट्रांच्या राजकीय घडामोडींशीं किती निकट व महत्त्वाचा संबंध आहे, हें दिसून येतें. ह्यासाठीं युरोपांतील राजकारणाची माहिती करून घेतांना तेथील लोकांत कोणकोणते भेद आहेत, व कोणत्या जातीचे लोक कोणत्या देशांत वसले आहेत, हें समजून घेणें आवश्यक आहे.

मनुष्यजातीचीं मुख्य कुटुंबें.

" पृथ्वीवरील मनुष्यजातीचीं तीन चार मुख्य कुटुंबें आहेत, तीं अशीं:—

१) युरोप, हिंदुस्थान, इराण वगैरे देशांतील आर्य लोक;

(२) ज्यू, अरब पूर्वीचे फिनिशियन किंवा सध्याचे उत्तर आफ्रिकेंतील कांहीं लोक वगैरे मिळून झालेले सेमिटिक लोक;

(३) जपान, चीनमधील वगैरे पीतवर्ण मँगोलियन लोक; आणि

(४) इतर–द्राविडियन, नीग्रो, रेड इंडियन, मलेशियन वगैरे लोक.

युरोपखंडात जाऊन वसति केलेल्या आर्य लोकांस इंडो–युरोपियन ही संज्ञा आहे. ह्यांचे मुख्य चार विभाग आहेत; ते असेः—(१) केल्ट, (२) ग्रेकोरोमन, (३) टयूटॉनिक व (४) स्लेव्ह ऊर्फ स्लॅव्होनिक. यांपैकीं यूरोपखंडांत प्रथम मोहिम केली ती इंडो–युरोपियन आर्यांच्या केल्ट ह्या शाखेनें होय. ह्यांनीं तेथील मूळ अनार्य रहिवाशांचा उच्छेद करून पश्चिम यूरोपांतील बहुतेक सर्व भागांत आपली वस्ती केली; व तेथें आपलें साम्राज्य स्थापिलें. त्यांच्यानंतर ग्रेकोरोमन लोक युरोपांत येऊन त्यांनीं ग्रीस व इटलींतील कांहीं भाग व भूमध्यसमुद्रांतील बेटें यांत व त्यांचे किनाऱ्यावर वस्ती केली. कालांतरानें ग्रीसचीं राज्यें उदयास येऊन त्यांनीं पाश्चात्य सुधारणेचें जनकत्व आपल्याकडे घेतलें; पण त्यांची सत्ता फारशी वाढली नाहीं. इटलींतील रोमन लोकांनीं मात्र प्रथम इटलींत, व नंतर उत्तर जर्मनी व रशिया हे देश खेरीज करून बाकी राहिलेल्या युरोप व एशियामायनरमध्यें, आपलें मोठें साम्राज्य स्थापन केलें. ग्रेकोरोमन लोकांबरोबर किंवा थोडेसें त्यांच्या पाठीमागून, उत्तर जर्मनींत टयूटॉनिक लोकांनीं, व रशिया आणि तुर्कस्तानांतील बऱ्याच भागांत इंडो–युरोपियन नामक आर्यांच्या चवथ्या म्हणजे स्लेव्ह किंवा स्लॅव्होनिक नांवाच्या कुटुंबानें वसति केली.

ह्या आर्यांच्या चार जातींपैकीं ग्रेकोरोमन लोकांची सद्दी व त्यांची साम्राज्यसत्ता ५ व्या शतकापर्यंत अबाधित राहिली. तदनंतर जर्मनींत वसति करून राहिलेले व प्रायः रानटी अवस्थेंत असलेले, पण शूर, कडवे व कर्तृत्ववान् आणि बुद्धिमान् असे जे टयूटॉनिक लोक, त्यांच्या भाग्योदयाचा काळ आला. त्यांच्या अनेक टोळ्यांनीं स्वाऱ्यांवर स्वाऱ्या करून एका शतकांत युरोपांतील ग्रेकोरोमन लोकांचें साम्राज्य मोडून टाकलें, व रोमच्या बादशहास आपलें राजधानीचें ठाणेंच कॉन्स्टँटिनोपल येथें उचलून नेण्यास लाविलें. पुढें ह्या पूर्व दिशेकडील रोमन राज्याचाही इ० स० १४५३ सालीं नाश करून तुर्क ह्या अनार्य लोकांनीं युरोपच्या

आग्नेय दिशेच्या कोंपऱ्यांत आपलें राज्य स्थापन केलें. सहाव्या शतकांत पश्चिम युरोपांतील रोमन साम्राज्याचा उच्छेद केल्यावर टयूटॉनिक लोकांच्या निरनिराळ्या टोळ्यांनीं जिकडे तिकडे आपलीं स्वतंत्र राज्यें स्थापण्याविषयीं एकसारखा खटाटोप केला. हा झगडा अर्थात् मूळचे रहिवासी जे केल्ट लोक व इटलींतील रोमन लोक त्यांच्यांशीं चालला. ह्या झगडयांची अखेर १५–१६ व्या शतकांत होऊन सांप्रतचीं युरोपांतील राज्यें स्थापित झालीं, व ग्रेकोरोमन सुधारणा व खिश्चनधर्म यांनीं निबद्ध अशा नव्या मनूचा (Modern Europe) प्रारंभ झाला. यानंतर कित्येक ठिकाणीं मूळ केल्ट लोकांचा समूळ उच्छेद होऊन, केवळ टयूटॉनिक लोकांच्या भिन्नभिन्न शाखांच्या टोळ्यांचींच राज्यें स्थापिलीं गेलीं. कित्येक ठिकाणीं टयूटॉनिक लोक व केल्ट लोक यांचें संमीलन होऊन मिश्रस्वरूपी राज्यें स्थापित झालीं. या राष्ट्रांस लॅटिन राष्ट्रें ही संज्ञा मिळाली आहे.

वर सांगितलेल्या मुख्य चार विभागांपैकीं चवथा विभाग जो स्लॉव्ह ऊर्फ स्लॉव्हानिक, त्या स्लॅव्होनिक लोकांची मुख्य भूमि रशिया देश होय. पण त्यांच्या पुष्कळशा शाखा रशियाचेबाहेर युरोपांतील आग्नेय दिशेकडील कोंपऱ्यांतही वसति करून राहिल्या आहेत. ह्याच भागांत निरानिराळ्या अनार्य जातीही बऱ्याच येऊन त्या तेथें कायमची वस्ती करून राहिल्या आहेत. त्यांपैकीं तुर्क लोकांखेरीज बाकीचे सर्व युरोपियन लोक खिश्चन धर्मानुयायी असून त्यांच्यांत रोटीबेटीव्यवहाराचा निषेध नसल्याकारणानें, व व्यापारधंदे इत्यादिकांसाठीं स्वभूमि सोडून कित्येक कुटुंबें दुसऱ्या स्थळीं जाऊन कायमची वस्ती करण्याचा प्रकार तिकडे चालू असल्याकारणानें, अमुक एका भागांत फक्त अमक्याच जातीचे किंवा शाखेचे लोक आहेत, असा प्रकार अर्थातच कायम राहिलेला नाहीं. तथापि ठोकळ मानानें बहुजनसंख्येकडेच लक्ष देतां, युरोपांतील निरनिराळ्या देशांत किंवा प्रांतांत वर सांगितलेल्या इंडो–युरोपियन आर्यांच्या चार शाखांचे, व त्याचप्रमाणें अनार्य लोक, कसकसे वसलेले व पसरलेले आहेत, हें पुढील माहितीवरून वाचकांचे लक्षांत येईल.

शाखा	वसतिस्थानें.
केल्ट	आईसलंड, स्कॉटलंडचा उत्तरार्ध ऊर्फ हायलंड्स अल्स्टरखेरीजचें आयर्लंड, वेल्स व इंग्लंडच्या नैर्ऋत्येकडील काउंटी डेव्हन आणि कार्नवाल.
ग्रेकोरोमन	ग्रीस व भूमध्यसमुद्रांतील कांहीं बेटें, (इटलींमधील रोमन लोक तेथील केल्ट व ट्यूटॉनिक लोकांत मिसळून गेले आहेत.)
ट्यूटॉनिक	स्वीडन, नॉर्वे, डेनमार्क, हॉलंड, इंग्लंड, स्काटलंडचा दक्षिणार्ध ऊर्फ लोलंड्स, आयर्लंडांतील अल्स्टर, सध्यांच्या जर्मन बादशाही साम्राज्यांत समाविष्ट झालेलीं २६ संस्थानें (प्रशिया, बॅव्हेरिया, सॅक्सनी, सायलेशिया, वर्टेंबर्ग, हेसी, बेडन, मेकलेनबर्ग, श्वेरिन, ब्रन्सवुईक, वगैरे), ऑस्ट्रो-हंगारी बादशाही अमलांतील ऑस्ट्रिया प्रांत, (हा नकाशांत सूक्ष्म रीतीनें अवलोकन केल्यास फारच लहान दिसून येईल.)
लॅटिन	(बहुसंख्याक केल्ट लोकांत ट्यूटॉनिक लोक मिसळून झालेली विशिष्ट जात)—फ्रान्स, बेलजियम, स्विट्झरलंड, इटली, स्पेन, व पोर्तुगाल, (स्पॅनिश व पोर्तुगीझ लोकांत फिनीशियन आणि मूर लोकांचें वरेंच रक्त मिसळलेलें आहे.)
स्लॅव्होनिक शाखा नं. १	रशिया (येथें "मोठे", "लहान" व "गोरे" स्लॅव्ह अशा तीन पोटजाती आहेत). वल्गेरिया, सर्व्हिया, आस्ट्रियाच्या ताब्यांत असलेले क्रोआशिया, डालमेशिया व स्लोव्हेनिया हे प्रांत.
स्लॅव्होनिक शाखा नं. २	ऑस्ट्रियन बादशाहींतील बोहेमिया, मोरॅव्हिया व गॅलिशिया हे प्रांत (येथील लोकांस झेच, स्लोव्हाक, सर्ब, ल्यूसिटोनियन, व कॅसुबिनियन अशा संज्ञा आहेत) आणि आस्ट्रिया, प्रशिया व रशिया ह्या देशांत विभागला गेलेला पोलंड देश (ह्यांतील लोकांस लेचिस ही संज्ञा दिली जाते.) मॉंटिनीग्रो, व ऑस्ट्रियानें १९०८ सालीं गिळंकृत केलेले बोस्निया, व हरजेगोव्हिना हे प्रांत.

इ. स. पूर्वीचा काल.

शाखा	वसतिस्थान.
——हंगारियन	ऑस्ट्याच्या ताब्यांतील हंगारी प्रांत.
——रूमेनियन ऊर्फ मॅगिआर	रूमेनिया देश, व ऑस्ट्याच्या ताब्यांतील ट्रॅन्सिलव्हेनिया प्रांत.
——तुर्क	सध्यां अवशिष्ट राहिलेलें तुर्कस्तान (बरेच तुर्क लोक गेल्या बाल्कन-लढाईचे पर्यवसानीं सर्व्हिया, ग्रीस व बलगेरिया यांत वांटलेल्या मॅसिडोनिया प्रांतांत आहेत.)
——अलबेनियन वगैरे	अलबेनिया व इतरत्र.

धर्मभेद.

धर्माचे बाबतींत युरोपियन लोकांचे स्थूल मानानें जे विभाग करितां येतात, ते येणेंप्रमाणें:—

(१) आयर्लंडमधील केल्ट व लॅटिन लोकांचीं राष्ट्रें, आणि ऑस्ट्रिया-हंगारीच्या बादशाही सत्तेखालील टयूटॉनिक, हंगारियन व स्लॅव्होनिक शाखेचे लोक हे सर्व रोमनकॅथोलिक आहेत.

(२) ब्रिटिश, व अल्स्टर, स्वीडन, नॉर्वे आणि हॉलंड येथील लोक हे एपिस्कोपल व कलव्हिनिस्ट नामक प्रॉटेस्टंट धर्माच्या उपशाखेचे अनुयायी आहेत.

(३) जर्मनींतील लोक, त्या देशांतील कांहीं थोडीं पश्चिमेकडील संस्थानें सोडून देतां, ल्यूथरन नामक प्रॉटेस्टंट धर्माच्या उपशाखेचे आहेत.

(४) स्लॅव्होनिक शाखेंतील पश्चिमेकडीललोक रोमनकॅथोलिक आहेत म्हणून वर सांगितलेंच आहे. रशिया, बलगेरिया व ग्रीस येथील लोक फार पुरातन काळीं (प्रॉटेस्टंट व कॅथोलिक हा भेद करणारी १६ व्या शतकांतील प्रचंड धर्मक्रांति झाली त्यापूर्वीं सुमारें हजार वर्षें) ख्रिश्चन लोकांत पहिली दुफळी झाली तेव्हांपासून ग्रीकचर्च नामक स्वतंत्र ख्रिश्चन धर्मशाखेचे अनुयायी आहेत. ग्रीकचर्चेचें मुख्य आदिपीठ रशियांत असून, ज्याप्रमाणें महंमदी धर्माचा मुख्य वाली व आधारस्तंभ कॉन्स्टँटिनोपल येथील सुलतान मानला जातो, त्याप्रमाणेंच रशियाचा झार हा ग्रीकचर्चचा आधारस्तंभ मानला जातो.

सांप्रतच्या युरोपखंडांतील निरनिराळ्या राज्यांत कोणकोणत्या भिन्न भिन्न जाति-पोटजातींचे आणि धर्म व धर्मशाखांचे लोक आहेत, ह्याचें वर जें

विवेचन केलें, त्यासंबंधीं एक मुख्य ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट ही आहे कीं, पश्चिम-युरोपखंडांतील बहुतेक राष्ट्रें परिपक्व स्थितीस आलेलीं असून, खुल्या समुद्रापर्यंत त्यांची राज्यमर्यादा वाढलेली आहे; आणि तीं मुळापासूनच एकजातीय व एकधर्मीय असलेल्या किंवा चिरकालीन सलोख्यामुळें आणि राजकीय बाबतींत सुख-दुःखाचे व हक्क-अधिकाराचे बाबतींत तीं समप्रमाणानें वांटेकरी झाल्यानें, तीं वस्तुतः एकजीव झालेल्या प्रजाजनांनीं वसलेलीं आहेत. ग्रेट-ब्रिटनखेरीज प्रजाजनांत जातिधर्मविषयक फारशी दुही ह्या पश्चिम-युरोपांतील देशांत नाहींच, असें म्हटल्यास चालेल. "

प्रकरण ६ वें.

स्लाव्ह लोकांची एकराष्ट्रीयत्वासाठीं धडपड.

आर्य व अनार्य लोकांच्या निरनिराळ्या जाति युरोपांत कशा वसल्या आहेत, याचा तक्ता मागील प्रकरणांत दिला आहे; त्याकडे अवलोकन केल्यास वाचकांचे लक्षांत येईल कीं, " ऑस्ट्रिया-हंगेरीच्या सांप्रतच्या बादशाही राज्य-विस्तारांत फक्त खास ऑस्ट्रिया येथील लोक टयूटॉनिक आहेत, व हंगारींतील मागियार लोक अनार्य आहेत. ह्या दोहोंची लोकसंख्या अनुक्रमें सुमारें एक कोटी दीड लक्ष व ८७ लक्ष आहे. ऑस्ट्रिया-हंगारीच्या राज्यांत सुमारें ३८ लक्ष अर्धेमुर्धे स्लॅव्होनिक बनलेले रुमेनियन लोक आहेत; व सुमारें दोन कोटी दहा लक्ष स्लॅव्होनिक जाति-पोटजातींपैकीं आहेत. वस्तुतः ऑस्ट्रिया-हंगारी हें राज्य स्लॅव्होनिक असावयास पाहिजे होतें; म्हणजे त्याची राज्यघटना सुसंघटित व अढळ झाली असती. निदान ऑस्ट्रियानें आपल्या स्लॅव्होनिक प्रजेस सुराज्य-स्वराज्यादि साम्राज्यांतर्गत इष्ट गोष्टींची देणगी देऊन संतुष्ट ठेविलें असतें, तर ऑस्ट्रियास स्वतःसिद्ध असें विशेष सामर्थ्य प्राप्त झालें असतें इतकेंच नव्हे, तर तुर्कस्थानचे तुकडे होऊन स्वतंत्र होऊं इच्छिणारे जे सर्व्स, मांटेनेग्रिन्स, बलगेरियनस् वगैरे लोक त्यांचें प्रेम व स्नेह संपादून ऑस्ट्रियास रशियाला मोठा शह देतांही आला असता. परंतु ह्या सर्व तुर्क-स्लॅव्होनिक लोकांच्या मनोरथांची पावलोपावलीं पायमल्ली करून ऑस्ट्रियानें केवळ त्यांचा द्वेष व वैमनस्य संपादन केलें, एवढेंच नव्हे तर आपल्या अंतर्गत राज्यव्यवस्थेंतही

पंक्तिप्रपंच करून खास आपल्या राज्यांतील स्लॅव्होनिक लोकांतही तीव्र असंतोष माजविला आहे.

स्लेव्ह कुटुंबाच्या सर्व शाखांचें संमीलन करून त्यांचा प्रबल राज्यसंघ करण्याचा कार्यक्रम ज्यास इंग्रजींत (Panslavism propaganda) असें म्हणतात, तो प्रथम ऑस्ट्रियांतच उत्पन्न झाला. ऑस्ट्रियाचे अमलाखालीं अन्यायानें दडपलेले व नानापरीनें गांजलेले झेच, क्रोट, स्लॅव्हान इत्यादि निरनिराळ्या पोटजातींचे जे स्लॅव्ह लोक, त्यांमध्यें स्वकीयोन्नति करून घेण्यासाठीं हा कार्यक्रम उदयास आला. ह्या कार्यक्रमाचा जनक स्लॅव्होनिक जातीचा जोहान कोलर हा असून त्याचा जन्म बोहेमियांत झाला.पहिली पॅनस्लॅव्होनिक कांग्रेस प्रेग (बोहेमिया) येथें इ० स० १८४८ सालीं भरली. पुढें ही चळवळ रशियांत गेली व ॲक्सेको, कॅटोव वगैरे पुढाऱ्यांनीं तींत जोम आणिला. जुलुमी ऑस्ट्रियाविषयींचा द्वेष व सुराज्य–स्वराज्याची इच्छा अशीं दोन मुख्य तत्त्वें ह्या चळवळीचे मुळाशीं होतीं: बाल्कन प्रदेशांत स्लॅव्होनिक लोकांच्या स्वराज्यसाधनाच्या प्रयत्नांस प्रत्येक वेळीं ऑस्ट्रिया व जर्मनी हीं आड आलीं. ऑस्ट्रियानें दोन स्लेव्ह प्रांत गिळंकृत करून सर्व्हिया व मान्टेनिग्रोच्या हातांतून त्यांनीं विजयानें मिळविलेल्या प्रांतांतील महत्त्वाचे दोन भाग गेल्या बाल्कन–लढाईच्या अंतीं हिसकावून घेतले. याचे उलट रशियानें अनेक प्रसंगीं झीज सोसून, त्यांचे वतीनें लढाया करून, स्वतः भूमीचा अभिलाष न धरितां, सर्व बाल्कन संस्थानांची सहानुभूति व प्रेम आणि तदनुषंगानें तेथील अनभिषिक्त राजत्व संपादन केलें. यामुळें साहजिकच स्लॅव्हानिक लोकांचा ओढा रशियाकडे लागून राहून, जर्मनी व ऑस्ट्रिया यांविषयीं एकप्रकारचा असंतोष त्यांचे मनांत वागत आला आहे. व या पॅनस्लॅव्हिझमच्या चळवळीमुळें ऑस्ट्रिया व रशिया या देशांत वैमनस्य उत्पन्न झालें आहे.

पॅनस्लॅव्हिझमची चळवळ परिणत होऊन ती यशस्वी होणें म्हणजे, ऑस्ट्रिया–हंगेरी बादशाहींतील अर्ध्याहून अधिक प्रजा व अर्धा मुलूख जाऊन तेथें रशियाशीं प्रेमनिबद्ध बाल्कन संस्थानांसारखीं स्वतंत्र संस्थानें स्थापन होणें, किंवा त्यांची रशिया, रुमेनिया, सर्व्हिया व मांटेनिग्रो ह्या संस्थानांत वाटणी होणें होय. ही ऑस्ट्रियास प्रत्यक्ष रीतीनें मोठी भीति आहे व तेणेंकरून रशियाचें सामर्थ्य व इभ्रत आणि वजन फार वाढण्याचा संभवही आहे. व या गोष्टींच्या संभवामुळें अप्रत्यक्ष रीतीनें जर्मनीसही थोडी-

बहुत भीति उत्पन्न झाली आहे. पण ह्या सर्वांचा दोष ऑस्ट्रियानें स्वतःच्या स्लॅव्होनिक प्रजेवर चालविलेल्या जुलुमाचे, आणि त्यानें व जर्मनीनें बाल्कन संस्थानांशीं दाखविलेल्या अत्यंत अनुदार आणि केवळ आपमतलबी धोरणाचे माथीं आहे, हें उघड आहे. ह्या दोन्ही राष्ट्रांचें धोरण पाहिलें असतां तें स्वतःच्या टयूटॉनिक शाखांच्या प्रजेचें सर्वत्र सार्वभौमस्वामित्व असावें, स्वतःच्या अंमलाखालील इतर सर्व जातींच्या प्रजाजनांस दडपून ठेवावें, आणि बाल्कन संस्थानांस आपलीं अंकित, गुलाम किंवा जोहोकूम मांडलिक राज्यें करावीं, व रशियास दुय्यम दर्जाचें राष्ट्र करावें, असें असल्याचें पदोपदीं दिसून आलें आहे. ह्या जर्मन व स्लेव्ह लोकांतील निर्वाणीच्या झगडयांची मजल आज नाहीं तर उद्यां दारुण संग्रामापर्यंत येणार, व त्या संग्रामाचे शेवटीं चार तऱ्हेच्या चार खुरांवर उभा असलेला ऑस्ट्रिया-हंगेरियन पातशाही सत्तेचा डोलारा डळमळून मोडूनही पडणार, अशीं अनुमानें ह्या पांच दहा वर्षांत इतिहासज्ञांनीं वारंवार केलीं होतीं. इतकेंच नव्हे, तर आस्ट्रियाच्या पोटांतला हा पॅनस्लॅव्हिझमचा सुरुंग उडाल्यावर आस्ट्रिया-हंगेरीच्या संयुक्त राष्ट्राचीं कशीं छकलें होतील व पुढें तीं कोणकोणाच्या वांट्यास येतील ह्याचीही वाटाघाट त्यांनीं केली होती. ती वाटाघाट कितपत खरी ठरते हें चालू युद्धाच्या पर्यवसानावर अवलंबून राहील.

प्रकरण ७ वें.

लढाईशीं रशियाचा संबंध.

पॅनस्लॅव्हिझमच्या चळवळीचें जें थोडेंसें दिग्दर्शन पूर्वीच्या प्रकरणांत केलें आहे, त्यावरून या चळवळीशीं रशियाचा कसा व किती निकट संबंध आहे हें दिसून येण्यासारखें आहे. ही चळवळ रशियानें उत्पन्न केलेली नाहीं. पण सजातियांचा सजातियांकडे जो स्वाभाविक ओढा, त्यामुळें रशियाला या चळवळीच्या उत्कर्षाची कळकळ मात्र खास वाटत आहे.

" खास रशिया हें स्लेव्ह लोकांचें मातृगृह व वसतिस्थान आहे. हा देश मोठा विस्तृत आहे. त्यांतील लोकसंख्या मोठी आहे, व त्यांचें लष्करी साम-

रतलामचे महाराज



सज्जनसिंग.

जोधपूरचे महाराज

हिज हायनेस सर प्रतापसिंह.

सचीनचे नबाब

नजब अल्लीखान.

जावराचे नवाब

इफ्टीखार अल्लीखान.

र्थ्यही मोठें आहे; हें खरें. परंतु तो देश संस्कृतींत आणि औद्योगिक बाबींत प्रगल्भ दशेस आलेला नाहीं. रशियन लोकांत पाश्चात्य संस्कृति व शिक्षण आणि राजकीय ऐक्य हीं वस्तुतः प्रसिद्ध पीटर धी ग्रेट ह्यांच्या अमदानींत सतराव्या शतकाचे शेवटीं सुरू झालीं, व राजधानीचें ठिकाण मास्को येथून सेंटपीटर्सबर्ग येथें इ० स० १७०२ मध्यें नेण्यांत आलें. नेपोलियन बोनापार्ट नेहमीं म्हणे कीं, "Scratch a Russian and you will find a Tartar below" म्हणजे सुधारणेचें वरचें पातळ बाह्य कवच जरासें घांसलें, म्हणजे अंतर्यामींचा रशियन हा टार्टर लोकांसारखा शुद्ध रानटी प्राणी आहे, असें आढळून येईल. आणि खरोखर रशियांतील मध्यम व कनिष्ठ स्थितींतील लोक बरेच अंशीं मध्य-एशियांतील पौर्वात्य लोकांसारखे जंगली व असंस्कृत पण शूर, कडवे आणि देशाभिमानी आहेत. तेथील राजकीय परिस्थिति अझूनही गोंधळाची आहे. बादशाही एकसत्ता आणि अभिजात व अधिकारीवर्ग यांचें स्तोम तेथें फार आहे. रशियांत सुविहित सुराज्यता नाहीं व प्रजासत्ताकत्वाचा केवळ ओनामा झालेला आहे. बहुजनसंख्याक जो शेतकरी वर्ग त्याची दास्यमुक्तता गेल्या ५० वर्षांतच झालेली आहे. देशांतील कित्येक भाग सुपीक असूनही ओसाड पडलेले आहेत. लोकांच्या अंगीं जोम असल्यानें, त्यांची सर्व तऱ्हेनें प्रगति होत आहे हें खरें; पण रशियाच्या भावी उत्कर्षास एक मोठा अवरोध आहे. तो हा कीं, त्याचा रिघाव खुल्या समुद्रापर्यंत असावा तसा नाहीं. बालटिक समुद्राचें मुख स्वीडन, नार्वे व डेनमार्क यांच्यांमधील अरुंद सामुद्रधुन्यांनीं अडवून धरलें आहे. काळ्या समुद्राचें नाकें कांन्स्टाटिनोपल येथील तुर्कांनीं अडवून धरलें आहे. इराणी आखातांत येण्यास इराणवरील कब्जा कायमचा झाला पाहिजे. राहतां राहिला पूर्वेकडील पॅसिफिक समुद्र. तेथें रशियाचीं कांहीं बंदरें आहेत खरीं; पण तीं पडलीं राज्याच्या अगदीं एका टोंकाला व अधिक वस्तीच्या भागांपासून हजारों मैल लांब. ह्या सर्व परिस्थितीचा आणि रशियन लोकांच्या स्वाभाविक शौर्य व स्वदेशभक्ति इत्यादि गुणांचा विचार केला असतां, त्यांच्या महत्त्वाकांक्षा काय असाव्या व त्यांचें राजकीय धोरण कसें असावें, याचा अजमास सहज होईल.

आपली उन्नति करून, देशास प्रगल्भ स्थितींत आणून खुल्या समुद्रापर्यंत आपली राज्यमर्यादा वाढवावी, हें ध्येय रशियन लोकांच्या व मुत्सद्यांच्या नेत्रांसमोर सदैव आहे. आणि युरोपांत सगळ्यांच्या मागून आलेल्या ह्या स्लॅव्ह

शाखेची इतरांप्रमाणेंच पूर्ण प्रगति होऊं नये असें तरी कोण व कां म्हणेल ? अर्थात् नैसर्गिक व स्वतःचे अधिकारान्वयें रशियाची उन्नति झाली, म्हणजे तें राष्ट्र अत्यंत प्रबळ होणार, हें उघड आहे. ही उन्नति आपल्या वैभवास व सुरक्षिततेस धोका आणणारी आहे, अशी नजीकच्या प्रशिया व ऑस्ट्रिया देशांनीं आपली समजूत करून घेतली आहे. व रशियास जेथें तेथें अडविण्याचा व त्याला शह देण्याचा क्रम त्यांनीं एकसारखा चालविला आहे. वस्तुतः जर्मनीचें बादशाहीपण संपादन केलेल्या प्रशियास कालावकाशानें प्रगल्भ होणाऱ्या रशियाकडूनही निष्कारण आगळीक होण्याची व नुकसान पोहोंचण्याची दहशत निष्कारण आहे असें वाटतें. ऑस्ट्रिया-हंगारी राज्यासही सुराज्य-स्वराज्यानें आपल्या प्रजाजनांस संतुष्ट ठेवून, व प्रशियाशीं सत्त्वगुणी संबंध ठेवून, या भीतीचें निराकरण करणें शक्य आहे. पण ही रशियाची भीति व दहशत खरी आहे, व तिजविषयीं आधींच योग्य तजवीज करणें अवश्य होतें व आहे असें मानलें तरी, प्रशिया व ऑस्ट्रियांस एक शहाणपणाचा मार्ग खुला होता.

'आजारी' पडलेल्या युरोपांतील पूर्वींच्या विस्तृत तुर्कस्थानचें राज्य, जसेंच्या तसें, निदान स्लिश्चन आर्य लोकांनीं वसलेल्या भागांत तरी, कायम टिकणें अशक्य नव्हतें हें १९ व्या शतकांत उघड झालें. ह्या भागांतील लोकांना तुर्की साम्राज्याचें जूं आपल्या मानेवरून काढून टाकून, स्वतंत्र होण्याची इच्छा झाली, व त्यासाठीं त्यांनीं तलवार हातीं घेतली. त्या वेळेपासून त्यांच्यांशीं पूर्ण आणि लोभविरहित अशी सहानुभूति दाखवून, जर त्यांस प्रशिया व ऑस्ट्रिया यांनीं योग्य साह्य केलें असतें, व त्यांचीं एक किंवा अधिक स्वतंत्र राज्यें स्थापून व त्यांचा संघ करून तो संघ आपल्याशीं प्रेमाच्या आणि स्नेहसलोख्याच्या संबंधांनीं जोडून घेतला असता, तर ही एक नवीन शक्ति रशियाला शह देणारी व रशियन आगळिकींस आळा घालणारी उत्पन्न झाली असती. तेणेंकरून जर्मनी व ऑस्ट्रिया यांच्या सुरक्षिततेचा विमा उतरला जाऊन, राष्ट्रशक्तीच्या समतोलपणाचें तत्त्वही पूर्णपणें संवर्धित केलें गेलें असतें; परंतु ही राजनीति ऑस्ट्रिया आणि जर्मनी ह्यांनीं अंगिकारिली नाहीं. त्यांनीं आपलीं मुख्य धोरणें अशीं ठेविलीं कीं, एक तर रशियास अडवावयाचें, व त्याचे राज्यविस्तारास आणि त्याबरोबरच त्याच्या इभ्रतीच्या व स्नेहसंबंधाच्या वृद्धीसही प्रतिरोध करावयाचा. आणि

दुसरें असें करीत असतां, इकडे तुर्कस्तानांतील ख्रिश्चन प्रजेच्या स्वतंत्र संस्थानें स्थापण्याच्या उत्क्रांतीस होतां होईल तों आळा घालावयाचा, व प्रत्येक संधि साधून स्वतःचें हित नाना तऱ्हांनीं करून घ्यावयाचें. ह्याचे उलट रशियानें एकंदरीनें आपली राजनीति फार दूरदर्शी व शहाणपणाची ठेविली आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं.

खुल्या भूमध्यसमुद्रापर्यंत येण्याला रशियाला दोन मार्ग आहेत; एक आडदांडपणाचा व दुसरा सामदामस्नेहाचा; पहिला मार्ग म्हणजे, तुर्क लोकांपासून कॉस्टँटिनोपल आपल्या ताब्यांत घेऊन, मार्मोराचा समुद्र व डार्डानेल्स आणि बॉस्फोरसच्या सामुद्रधुन्या आपल्याशा करणें आणि तेथपर्यंत आपला खास राज्यविस्तार वाढविणें, हा होय. दुसरा मार्ग, तेथील ख्रिश्चन व तुर्क नसलेली प्रजा यांचें प्रेम आणि भक्ति संपादून त्यांचीं स्वतंत्र संस्थानें स्थापण्यास मदत देऊन, भूमध्यसमुद्रापर्यंतचा प्रांत आपल्या प्रेमबद्ध दोस्तांचा करणें हा होय. एकोणिसाव्या शतकापर्यंत रशियानें पहिला मार्गच स्वीकारला होता असें म्हणण्यास हरकत नाहीं; आणि त्या वेळच्या तुर्कस्तान गिळंकृत करून घेण्याच्या रशियाच्या धोरणास मुख्यत्वें इंग्लंड व फ्रान्स यांनीं सदैव अडथळा करण्याचें धोरण ठेवून 'क्रिमिया'दि युद्धेंही केलीं. परंतु १९ व्या शतकांत ग्रीक लोकांनीं बंड करून तुर्क लोकांचें जूं ११ वर्षांचे दारुण कलहाचे अंतीं झुगारून देऊन आपलें स्वातंत्र्य स्थापिलें. तेव्हांपासून तुर्कस्थानांतील सर्व राजकारस्थानांचें स्वरूपच फिरलें, असें म्हटलें पाहिजे. पूर्वीचा प्रश्न, तुर्की राज्य कोणत्या युरोपियन महाराष्ट्रांत वांटलें जावें, हा होता. पुढें ग्रीसच्या स्वातंत्र्यार्थ झालेल्या युद्धामुळें मृत्युपंथास लागलेल्या तुर्कराज्यांतून भिन्न भिन्न समजातिधर्मगुणबद्ध लोकांचीं कोणचीं नवीं स्वराज्योपभोगी राज्यें स्थापिलीं जावीं, व त्यांचे वाली कोणीं होऊन त्यांस पाठिंबा कोणीं द्यावा, हा मुख्य प्रश्न उत्पन्न झाला.

बाल्कन संस्थानांतील बहुतेक लोक स्लॅव्होनिक शाखेचे आहेत, म्हणजे जातिगुणांनीं ते रशियन लोकांचे सगोत्रज सप्रवरबंधु होत, हें वर सांगितलेंच आहे. त्यांस स्वातंत्र्य मिळविण्यांत मदत देण्याची राजनीति रशियानें शहाणपणानें अंगीकारिली. युरोपच्या राष्ट्रांनीं १८२९ सालीं झालेल्या तहानें तुर्की सुलतानास सर्व्हिया वगैरे प्रांतांस थोडेंसें स्वराज्य देण्यास व ग्रीसचें स्वातंत्र्य कबूल करावयास भाग पाडलें. त्या वेळच्या युद्धांत रशियानेंच प्रमुख भाग घेतला.

प्रचंड युद्ध सुरू झालें आहे, त्याचें मुख्य कारण, बाल्कन संस्थानांत रशियानें सुयुक्तीनें मिळविलेला मानमरातब व इभ्रत, यांविषयीं ऑस्ट्रिया–जर्मनीची मत्सरग्रस्त असहिष्णुता हें होय. ह्या पूर्वेतिहासाच्या सिंहावलोकनावरून आजच्या लढाईंत रशिया कां पडला हें दिसून येईल.

प्रकरण ८ वें.

जर्मनीची उत्क्रांति.

पूर्वार्ध.

जर्मन लोकांनीं वसलेला युरोपांतील मुलूख म्हणजे, सांप्रतच्या युरोपच्या नकाशांत प्रशियाच्या प्रमुख सत्तेखालीं असलेला जर्मन बादशाही ह्या नांवानें संबोधिलेला मुलूख व ऑस्ट्रिया–हंगेरींतील ऑस्ट्रिया प्रांत एवढाच होय. १९ व्या शतकाचे पूर्वीं जर्मनीचें बादशाहीपद, सध्यां ऑस्ट्रियाचे गादीवर असलेल्या हॅप्सबर्ग राजघराण्याकडे शतकेंच्या शतकें होतें. सहाव्या शतकांत रोमन पातशाहीचा व्यूटॉनिक लोकांनीं विध्वंस केल्यापासून इ० स० १२७३ सालपर्यंत जर्मनीचा कोणी बादशहा असा नव्हताच, असें म्हटलें असतां चालेल. इ० स० १२७३ सालीं हॅप्सबर्ग घराण्यांतील रुडोल्फ हा बादशहा निवडला गेला. पुढें इ० स० १३५६ सालीं जर्मन संस्थानांस साम्राज्यांत जोडून, बादशाहीपद कायमच्या पायावर निश्चित करणारी गोल्डनबुल नांवाची सनद, मुख्य धर्माधिकारी पोप ह्यांच्या अधिकारानें पवित्र होऊन, अमलांत आली. त्याअन्वयें त्या वेळच्या शेंकडों लहानमोठ्या व प्रायः स्वतंत्र असलेल्या जर्मनींतील संस्थानांपैकीं सात संस्थानांचे अधिपतींस जर्मनीचा बादशहा निवडण्याचा अधिकार व तद्दर्शक 'इलेक्टर' ही पदवी मिळाली. हे सात इलेक्टर येणेंप्रमाणें:––(१) ऑस्ट्रिया, (२) सॅक्सनी, (३) बव्हेरिया आणि (४) ब्रँडेनबर्ग येथील राजे; व (५, ६, ७) कोलोन, ट्रीव्स; आणि मेन्झ येथील आर्चबिशप. यांत पुढें पॅलाटिनेट ऑफ ऱ्हाईन (ज्यास पुढें हॅनोव्हर ब्रॅन्सवुईक हें नांव मिळालें) ह्या संस्थानाची भर पडली. जर्म-

नींतील सर्व संस्थानांत, ऑस्ट्रिया हें संस्थान, त्याच्याशीं बोहेमिया, मोरेव्हिया, हंगेरी, क्रोआशिया, स्टीरिया वगैरे दुसरीं जर्मन नसलेलीं संस्थानें, रणविजय, लग्नसंबंध इत्यादि कारणांनीं जोडलीं गेल्यामुळें, अत्यंत बलिष्ठ होतें. त्यामुळें बादशाही निवडणुकींत ऑस्ट्रियाचे अधिपतीसच बादशहा निवडण्याचा प्रघात पडला. बादशहाचे हयातींतच त्याच्या वडील चिरंजीवास "**किंग ऑफ रोमन्स**" नांवाच्या पदवीनें युवराज निवडण्याचा, व पुढें दुसरी निवडणूक न होतां, तोच बादशहा होण्याचाही प्रघात अमलांत आला. अशा रीतीनें कायद्यानें निवडणुकीच्या तत्त्वावर बसलेलें, पण व्यवहारांत वंशपरंपरेनें चालत येणारें जर्मनीचें बादशाहीपद ऑस्ट्रिया–हंगारीच्या **हॅप्सबर्ग** राजघराण्याकडे **नेपोलियन बोनापार्ट**चे वेळेपर्यंत (फक्त एकदा बादशहास औरस पुत्र नव्हता, तेव्हां त्याच्या कन्येस मुलगा होऊन तो वयांत येईतों दुसरें बादशहा झाले होते तो अपवाद वजा जातां) कायम राहिलें. बादशाही साम्राज्यसत्ता फारशी मोठी नव्हती. बादशहाच्या अधिकारास एका जर्मन **डायेट** नामक सभेचें लोंढणें होतेंच. सोळाव्या शतकांत प्रॉटेस्टंट पंथ स्थापन करणारी मोठी धर्मक्रांति झाली. त्यानंतर उत्तरेकडील सर्व जर्मन संस्थानांनीं प्रॉटेस्टंट धर्म स्वीकारला, व ऑस्ट्रियानें स्पेनसह कॅथोलिक धर्माचे मुख्य प्रवर्तकाचें व संरक्षकाचें व्रत स्वीकारलें. त्या वेळेपासून जर्मनींत मोठी दुही माजली, व ऑस्ट्रियाच्या बादशाही अधिकारास हरताळ लागूं लागली. ऑस्ट्रियाचा पगडा मोडून तेथील हॅप्सबर्ग वंशाचे हातून बादशाहीपद हिसकून घेण्याची महत्त्वाकांक्षाही कित्येक संस्थानांचे अधिपतींत उत्पन्न झाली. इ० स० १६१८ पासून १६४८ पर्यंत युरोपांतील प्रॉटेस्टंट व कॅथोलिक राष्ट्रांमध्यें धर्मासाठीं तीस वर्षें घनघोर युद्ध झालें. त्यांत व त्यानंतर ही जर्मनींतील दुही फारच माजून कायम स्वरूपाची झाली. सामान्यतः प्रॉटेस्टंट पंथानुयायी उत्तर जर्मनींतील इलेक्टर व दुसरे संस्थानाधिपति हे एकीकडे, व ऑस्ट्रिया आणि स्पेन हे दुसरे बाजूस अशी स्थिति झाली. बव्हेरियाचा इलेक्टर कॅथोलिक असे. तो कांहीं काळ ऑस्ट्रियाचे बाजूस असे. पण पुढें ऑस्ट्रिया आणि फ्रान्स यांमध्यें चुरस होऊन एकमेकांवर सरशी करण्यासाठीं त्यांच्या सतत झटापटी व खटपटी व अनेकदां युद्धप्रसंग होऊं लागले. त्यांत बव्हेरिया बहुतेक फ्रान्सकडे असून तेथील राजघराण्यास जर्मन बादशाहीचें पद मिळविण्याची महत्त्वाकांक्षा झाली.

अशा तऱ्हेनें परस्परकलहानें फूट पडलेल्या जर्मनीच्या अर्धवट अराजकतेच्या परिस्थितींत, सांप्रत जर्मनीचे बादशाहीपदास पोंचलेल्या **कैसर वुइल्यमचें होहेनझोलर्न** राजघराणें पुढें सरसावलें. ह्या घराण्याची पहिली पदवी फक्त ब्रँडेन्बर्गच्या मार्क्विसची होती, आणि ती त्यास एका कर्जाची फेड म्हणून मिळाली होती (१४१७). ह्या मार्क्विसी संस्थानानें प्रशियाची डयूकडम् १६०८ सालीं मिळविली. पुढें संस्थानाधिपति **फ्रेडरिक वुइल्यम 'धि ग्रेट इलेक्टर'** यानें १६९७ सालीं प्रशियाचा राजा ही पदवी घेतली. तेव्हांपासून ब्रँडेनबर्ग–प्रशियाच्या राज्याची व इभ्रतीची एकसारखी भरभराट होऊन त्यास प्रत्यक्ष–ऑस्ट्रियाशीं सामना करण्याची योग्यता आली. इ० स० १७४० मध्यें ऑस्ट्रियाहंगारीचा हॅप्सबर्ग घराण्यांतील राजा व जर्मनीचा बादशहा **सहावा चार्लस** मरण पावला, व त्यास पुत्र नसल्यानें त्याची कन्या **मराया थरीसा** ही गादीची वारस झाली. त्या वेळेस तिजवर जवळच्या सर्व संस्थानिकांनीं काहूर उठविलें. त्या काहुराची संधि घेऊन प्रशियाच्या सुप्रसिद्ध **फ्रेडरिक धि ग्रेट** नामक युद्धकलाप्रवीण राजानें ऑस्ट्रियाच्या राज्यांतील सायलेशिया हा प्रांत आपल्या राज्यास कायमचा जोडून घेतला (१७४८). पुढें रशिया, फ्रान्स व ऑस्ट्रिया ह्या तिन्ही देशांनीं प्रशियाचें राज्य समूळ खणून काढून तें आपसांत वांटून घेण्याचा सैतानी कार्यक्रम योजिला. त्याचें निराकरण करण्यासाठीं १७५६ पासून १७६३ पर्यंत प्रचंड रणसंग्राम **फ्रेडरिकला** करावा लागला. त्यांत इंग्लंडनें **फ्रेडरिकची** बाजू उचलली व त्या अपूर्व बुद्धिमत्तेच्या रणधुरंधर योद्धयानें तिन्ही प्रचंड शत्रूंवर मात केली. त्या वेळेपासून सर्व जर्मन लोकांत प्रशियाचा मानमरातब वाढून सर्व जर्मनीचें प्रशियाच्या प्रमुखतेखालीं संयुक्त साम्राज्य स्थापिलें जावें, व खरोखर जर्मन नसलेल्या प्रांतांमुळें महत्त्व पावलेल्या ऑस्ट्रियाच्या **हॅप्सबर्ग** घराण्याची जर्मन कारभारांतून उचलबांगडी करावी, असा कार्यक्रम जन्मास आला. हाच कार्यक्रम १८७० सालीं सिद्धीस गेला. मध्यंतरीं त्याची सांगता झाली नाहीं; याचें एक कारण, **फ्रेडरिक धि ग्रेटचे** वंशज विशेष कार्यधुरंधर नव्हते हें, व दुसरें, १८९ सालीं फान्समध्यें मोठी राज्यक्रांति होऊन **नेपोलियन बोनापार्टनें** सर्व युरोप आपल्या आधीन करण्याचा प्रचंड उपक्रम केला हें होय.

नेपोलियननें ऑस्ट्रिया व प्रशिया या दोहोंसही अनेक लढायांत चीत केलें, व जर्मन बादशाही उद्ध्वस्त करून आपल्या प्रमुख अमलाखालीं '**कॉनफेडेरेशन ऑफ ऱ्हाईन**' नामक राज्यव्यवस्था अमलांत आणिली. सन १८१५ सालीं **नेपोलियनचा** पाडाव झाल्यावर पुनः ऑस्ट्रियाच्या प्रमुखतेचें जर्मन साम्राज्य प्रस्थापित झालें. पण प्रशिया नेहमीं नेहमीं उचल खाई, व त्यानें आपला मुलूखही जवळचीं संस्थानें किंवा प्रदेश खाऊन वाढविण्याचा क्रम चालविला होता. अखेर निर्वाणीचें युद्ध **सन १८६६ सालीं** झालें, व त्यांत सात आठवड्यांतच प्रशियानें ऑस्ट्रियाचा पूर्ण पराजय केला. लढाईचे शेवटीं प्रेग येथें तह होऊन असा ठराव झाला कीं, इत्युत्तर ऑस्ट्रियाचा जर्मनीशीं कांहींएक संबंध राहूं नये, व तेथील राजाची पदवी '**जर्मनीचा बादशहा**' हिच्या ऐवजीं '**आस्ट्रियाचा बादशहा**' अशी असावी. ह्या वेळीं प्रशियानें डेनमार्कपासून श्लेसवुइक व हॉलस्टिन हे प्रांत मिळविले, व हॅनोव्हर आणि दुसरीं नजीकचीं १० जर्मन संस्थानें खालसा केलीं. पुढें **युरोपियन राष्ट्रांचें कॉन्फरन्स** भरून ही व्यवस्था सर्वांनीं मान्य केली. त्यासंबंधीं झालेल्या **लंडनच्या तहाच्या** अन्वयें बेल्जमप्रमाणें लक्सेंबर्ग संस्थानाचें स्वातंत्र्य व तटस्थता (Neutrality)–म्हणजे कोणत्याही परराष्ट्राचें सैन्य तेथें न यावें अशी व्यवस्था–सर्व राष्ट्रांनीं मान्य केली.

येथें प्रशियाच्या आधुनिक उत्कर्षाचा पूर्वार्ध संपला.

इ० स० १८७० पर्यंत जर्मनीचे गादीवर बसलेले राजे व बादशहा.

सध्यांच्या कैसरच्या होहेनझोलर्न घराण्यानें जर्मनीचें बादशाहीपद प्राप्त करून घेतलें, त्यापूर्वी म्हणजे इ० स० १८७१ पर्यंत जर्मनीचे गादीचे जे अधिपति होऊन गेले, त्यांच्या कारकिर्दी येणेंप्रमाणें:—

चार्ल्स धि ग्रेटचें घराणें.

१ पहिला कार्ल	इ०स०	८००-८१४	५ कार्ल	... इ०स०	८८१–८८७
२ पहिला लडविग	,,	८१४–८४०	६ आर्नुल्फ	... ,,	८८७–८९९
३ दुसरा लडविग	,,	८४३-८७६	७ तिसरा लडविग	,,	८९९–९११
४ दुसरा कार्ल	,,	८७६–८७७			

फ्रँकोनिया घराणें.

१ पहिला कॉनरड .... इ०स० ९११—९१८

सॅक्सनी घराणें.

१ पहिला हेनरी	,,	९१९—९३६	४ तिसरा ओटो	,,	९८३–१००२
२ पहिला ओटो	,,	९३६—९७३			
२ दुसरा ओटो	,,	९७३—९८३	५ दुसरा हेनरी	,,	१००३–१०२४

फ्रँकोनिया घराणें.

१ दुसरा कॉनरड	,,	१०२४–१०३९	३ चवथा हेन्री	,,	१०५६–११०६
२ तिसरा हेन्री	,,	१०३९–१०५६	४ पांचवा हेन्री	,,	११०६–११२५

सॅक्सनी घराणें.

२ दुसरा लोथर	....	....	...	...	,, ११२५–११३७

होहेन स्टोफेन घराणें.

१ तिसरा कॉनरड	,,	११३८–११५२	५ चौथा ओटो	,,	१२०८–१२१५
२ पहिला फ्रेडरिक	,,	११५२–११९०	६ दुसरा फ्रेडरिक	,,	१२१५–१२५०
३ सहावा हेन्री	,,	११९०–११९७	७ चौथा कॉनरड	,,	१२५०–१२५४
४ फिलिप ओटो	,,	११९८–१२०८	८ विलीयम	,,	१२५४–१२५६
९ रिचर्ड ऑफ् कार्नवाल ...		...	...	...	१२५६–१२७२

हॅब्सबर्ग घराणें.

१ पहिला रुडोल्फ	...	...	....	....	१२७३–१२९१

नॉसो घराणें.

१ ॲडॉल्फ	...	...	....	....	... १२९२-१२९८

हॅब्सबर्ग घराणें (ऑस्ट्रिया).

१ आल्ब्रेच्ट	...	...	....	...	... १२९८-१३०८

लक्सेंबर्ग, बव्हेरिया वगैरे घराणीं.

१ सातवा हेन्री	१३०८–१३१३	४ चौथा कार्ल	१३४७–१३७८
२ चौथा लडविग	१३१४–१३४७	५ वेन्सिलास	१३७८–१४००
३ फ्रेडरिक ऑफ् ऑस्ट्रिया	१३१४–१३३०	६ रुप्रेच्ट	१४००–१४१०
		७ सिग्मंड	१४१०–१४३७

हॅब्सबर्ग (ऑस्ट्रिया) घराणें.

१ आल्ब्रेच्ट	१४३८–१४३९	७ दुसरा रुडोल्फ	१५७६–१६१२
२ तिसरा फ्रेडरिक	१४४०–१४९३	८ मॅथिअस	१६१२–१६१९
३ पाहिला मॉक्झीमिलियन	१४९३–१५१९	९ दुसरा फर्डिनांड	१६१९–१६३७
		१० तिसरा फर्डिनांड	१६३७–१६५७
४ पांचवा कार्ल....	१५१९–१५५६	११ पहिला लिओपोल्ड	१६५७–१७०५
५ पहिला फर्डिनांड	१५५६–१५६४	१२ पहिला जोसेफ	१७०५–१७११
६ दुसरा मॉक्सिमिलियन	१५६४–१५७६	१३ सहावा कार्ल	१७११–१७४०

बव्हेरिया घराणें.

१ सातवा कार्ल	इ०स०		१७४२–१७४५

हॅब्सबर्ग-लोरेन घराणें.

१ पहिला फ्रॅन्झ	,,	१७४५–१७६२	३ दुसरा लिओपोल्ड	,, १७९०–१७९२
२ दुसरा जोसेफ	,,	१७६५–१७९०	४ दुसरा फ्रॅन्झ	,, १७९२–१८०६

कॉन्फिडरेशन ऑफ धि-हाईन इ०स० १८०६–१८१५
जर्मन 'बंड' ... . ,, १८१५–१८६५
नॉर्थ जर्मन कॉन्फिडरेशन .... ,, १८६६–१८७१

प्रकरण ९ वें.

जर्मनीची उत्क्रांति-उत्तरार्ध.

इ० स० १८७० सालीं स्पेनच्या गादीसाठीं पुढें आलेल्या उमेदवारांपैकीं एक उमेदवार होहेनझोलर्न घराण्यांतील होता. त्यास फ्रान्सचा बादशहा तिसरा नेपोलियन (इ० स० १८५२ ते १८७०) यानें हरकत घेतली; त्यामुळें त्या उमेदवारानें उमेदवारांचे यादींतून आपलें नांव काढून टाकण्याचें कबूलही केलें. तथापि तेवढ्यानें समाधान न पावतां नेपोलियननें अशी मागणी केली कीं, होहेन झोलर्न वंशांतील कोणाही पुरुषास स्पेननें आपला राजा निवडला, तर त्याचे विरुद्ध प्रशियाच्या राजानें फ्रान्सला मिळून प्रत्यक्ष युद्ध करावें. ही मागणी अर्थात् मर्यादेबाहेरची होती. यांत आंतली गोम अशी होती कीं, पहिल्या नेपोलियनाप्रमाणें (इ० स० १८०४ ते १८१४) आपला पराक्रम करून जगाचे डोळे दिपवावे, व सन १८६६ पासून प्रशियाचें महत्त्व फार वाढलें आहे त्यास चीत करावें; आणि प्रशियाच्या किंवा दुसऱ्या कोणत्याही राष्ट्राच्या प्रमुखतेखालीं जर्मनीचें ऐक्य होऊं देऊं नये; अशी तमोगुणी महत्त्वाकांक्षा तिसऱ्या नेपोलियनास उत्पन्न झाली होती. शिवाय त्याच्या स्वतःच्या अधिकारातिरेकानें व कुराज्यव्यवस्थेनें लोकांत असंतोष उत्पन्न होऊन प्रजासत्ताक पक्ष पुनः बळावत चालला होता. त्याचें निराकरण करण्यास परराष्ट्रांशीं युद्ध करून जय मिळविणें हा उत्तम उपाय होय, असेंही दुर्दैवी तिसऱ्या नेपोलियनास वाटलें. त्यानें जुलई १८७० मध्यें प्रशियाविरुद्ध युद्धाची द्वाही फिरविली. हें कृत्य जितकें अन्यायाचें होतें, तितकेंच मूर्खपणाचेंही होतें; असें परिणामीं दिसून आलें. फ्रान्सच्या लष्करी व्यवस्थेंत अतिशय अंदाधुंदी माजली होती. कागदावर सैन्य १०।१२ लाखांचें होतें; पण भगीरथ प्रयत्नानेंही ४ लाख सैन्यसुद्धां प्रसंगास सज्ज करतां आलें नाहीं. उलट, प्रशियाची तयारी कडेकोट होती. या प्रसंगीं संयुक्त होऊन महाराष्ट्रपद प्राप्त करून घेण्याच्या उत्कंठेनें प्रेरित झालेल्या सर्व जर्मन लोकांचें साह्य व सहानुभूति प्रशियास मिळाली. त्याचप्रमाणें सुदैवानें या वेळीं सैन्याची हालचाल, मोहिमींची रीत व युद्धाचा संकलित कार्यक्रम (strategy) ठरविण्यास **व्हॉन माल्टके**सारखा युद्धशास्त्रविशारद पुरुष

व **प्रिन्स बिस्मार्क**सारखा निश्चयी व दूर धोरणाचा मुत्सद्दी हे अनुक्रमें सेनाधिपति व मुख्य मंत्रिपदीं विराजित होते. या युद्धांत प्रशिया व जर्मनींतील इतर संस्थानांतून १० लाखांवर सैन्याचा प्रचंड पूर फ्रान्सवर, त्याचें सैन्य तयार होण्याचे पूर्वींच, लोटला गेला. या लढाईंत नॅन्सी व मेटझ् येथें फ्रेंचांचे मोठे पराभव झाले, व त्यांत त्यांची फार हानि झाली. जर्मन सैन्याचा वेढा खास पारिस शहरालाही पडला. या आणीबाणीचे वेळीं फ्रेंच लोकांनीं स्वदेशभक्ति दाखवून व्हॉलंटीयर सैन्यें तयार करून स्वदेशाची अब्रू सांभाळण्याकरितां पुष्कळ खटाटोप केला, पण सर्व व्यर्थ गेलें. या युद्धांतील अखेरची लढाई सेडान येथें होऊन फ्रेंचांस हार खावी लागली, व तहाचें बोलणें शेवटीं मान्य करावें लागलें. व्हर्सेलिस येथें फेब्रुआरी १८७१ मध्यें तह होऊन फ्रान्सनें ऑल्सेस व लॉरेन* हे आपल्या पूर्व सरहद्दीवरील प्रांत आणि नुकसानीची भरपाई म्हणून २० कोटी पौंडांची रक्कम प्राशियास देण्याचें कबूल केलें. ह्या रकमेची पूर्ण फेड १८७३ सालीं झाली. तोंपर्यंत जर्मन लष्कराचें ठाणें फ्रान्समध्यें होतें.

अशा प्रकारें वर सांगितलेले महाविजय अनुक्रमें ऑस्ट्रियावर व फ्रान्सवर प्रशियानें मिळविल्यामुळें, युरोपांतील परराष्ट्रीय राजकारणांत प्रचंड क्रांति घडून आली. त्यांतील पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे, जर्मनीचें संयुक्त साम्राज्य सुविहित रीतीनें स्थापिलें जाऊन, त्याचें बादशाही पद प्रशियाच्या राजघराण्याकडे वंशपरंपरेनें चालावें; अशी व्यवस्था अमलांत आली. त्या वेळेपासून जर्मनींतील महत्त्वाच्या सर्व संस्थानांत साम्राज्यांतर्गत स्वराज्य असून, मुख्य साम्राज्यकारभार खास बादशहा, व बंडस्राथ आणि रीचस्टा ह्या दोन अर्धवट पार्लमेंटासारख्या सभांनीं चालवावा, अशी व्यवस्था झाली आहे. व त्या वेळेपासून जर्मनीची सर्व खटपट आपलें महत्त्व वाढविण्याविषयीं

---

* ता० १० मे १८७१ रोजीं शेवटा तह होऊन त्या तहाअन्वयें फ्रान्सकडून जर्मनीनें घेतलेले ह प्रांत किती मोठे व किती उत्पन्नाचे आहेत हें खालील आंकडयांवरून दिसून येईल.

क्षेत्रफळ.....५६०५ इंग्लिश चौरस मैल.
लोकसंख्या..... १८,७४,०१४.
गेल्या वर्षाच्या उत्पन्नाचा अंदाज ३८,४२,६८६ पौंड.

व सार्वदैशिक उन्नति करून घेण्याविषयीं चालली आहे. ही खटपट इ० स० १८७१ सालीं जर्मनीच्या बादशाही पदीं विराजित झालेल्या, पहिल्या **वुइल्यमच्या** (इ० स० १८७१ ते १८८८) अमदानींत दूरदर्शी मुत्सद्दी **प्रिन्स बिस्मार्क** ह्यांच्या नेतृत्वाखालीं, मोठ्या कुशलतेनें व बऱ्याच नेमस्तपणानें चालली. बादशहा **पहिला वुइल्यम** इ० स० १८८८ सालीं मरण पावला व त्याचा मुलगा **फ्रेडरिक, महाराणी व्हिक्टोरियाचा** जांवई, थोडे महिने (मार्च ते १५ जून १८८८) गादीवर राहून, अकालीं मृत्यु पावल्यावर सांप्रतचे कैसर **वुलियम** हे ता० १५ जून १८८८ रोजीं अधिकारापन्न झाले.

प्रकरण १० वें.

सांप्रतच्या युद्धाचीं बीजारोपणें.

सांप्रतचें महायुद्ध सुरू होण्यास, ऑस्ट्रियाचा अभिषिक्त राजपुत्र आर्चडयूक फ्रान्सिस फर्डिनांड याचा खून हें निमित्त कारण झालें एवढेंच; बाकी या युद्धाचीं बीजारोपणें आजकालचीं नसून, जर्मन संस्थानांनीं प्रशियाच्या नेतृत्वाखालीं संयुक्त होऊन कमकुवत झालेल्या फ्रान्सचा पराभव केला, तेव्हांपासूनच झालेलीं आहेत. आर्चडयूक फ्रान्सिस फर्डिनांड याचा खून हेंच, किंवा ह्या कृत्यांशीं जिचा संबंध लागतो ती पॅनस्लॅव्हिझमची चळवळ एवढेंच जर या युद्धाचें एक कारण असतें, तर युद्धाचा वणवा ऑस्ट्रिया, सर्व्हिया व रशिया यांच्याबाहेर पसरला नसता. आणखी, आरंभीं रशियानें युद्धापर्यंत पाळी न येऊं देण्याचीं जी खटपट केल्याचें प्रसिद्ध झालें आहे, ती खटपट कदाचित् यशस्वी होऊन ऑस्ट्रियाच्या दुर्दैवी वृद्ध **बादशहाचे** शेवटचे दिवस बरेचसे शांततेंत गेले असते. पण जर्मनीनें हा सुयोग घडून येऊं दिला नाहीं. तो युद्धांत उतरण्याबरोबर या युद्धास विस्तृत स्वरूप येण्यास प्रारंभ झाला. आणि थोड्याच दिवसांच्या अवकाशांत अन्य राष्ट्रांस त्यांत पडावें लागलें.

१८७०–७१ सालीं झालेल्या लढाईंतच फ्रान्स देशांत राज्यक्रांति होऊन तेथें स्थापित झालेल्या प्रजासत्ताक राज्यव्यवस्थेखालीं मोठी जागृति होऊन सर्व दिशांनीं प्रगति झाली. अर्थात् जर्मनीनें हिसकून घेतलेले **आल्सेस व लॉरेन**

प्रांत, व गेलेली अब्रू पुनः परत मिळविण्याची इच्छा सर्व फ्रेंच लोकांत उद्भूत झाली, व प्रशिया-जर्मनीच्या प्रबल सेनेशीं सामना करण्यास योग्य असें सैन्य तयार करण्याची व्यवस्था एकदिलानें चालू झाली. याच वेळेपासून, आपलें वर्चस्व कायम ठेवावयाचें व फ्रान्सला डोकें वर करूं देणें अशक्य करावयाचें, असा जर्मनीनें निश्चय करून, फ्रान्सनें सैन्य वाढविलें कीं, लगेच त्याहून दीडपट-दुप्पट आपलेंहीं सैन्य वाढविण्याचा क्रम जर्मनीनें सुरू केला.

सैन्य वाढविण्याची रीति ह्या उभय राष्ट्रांत सुरू झाली ती अशीः—

कांहीं सैन्य कायमच्या पगारावर ठेवावयाचें; शिवाय कांहीं लोकांस कांहीं वर्षें कायम सैन्यांत नोकरी केल्यावर, परत घरीं जाऊं देऊन दुसरे धंदे करूं द्यावयाचे; पण त्यांस थोडेंसें वेतन देऊन त्यांच्याशीं अशी अट करावयाची कीं, सरकार बोलावील तेव्हां त्यांनीं लष्करी नोकरी करण्यास यावें. अशा सैन्यास **रिझर्व्ह** म्हणतात. मात्र लढाईचे प्रसंगीं मुख्य भिस्त असते ती '**कॉनस्क्रिप्शन**' म्हणजे सक्तीनें सर्व प्रजाजनांस सेनेंत सामील करण्याच्या व्यवस्थेवर असते. त्याअन्वयें प्रत्येक सदृढ प्रकृतीच्या प्रजाजनानें कांहीं वर्षें (२—३) लष्करी खात्यांत घालविलींच पाहिजेत, व त्याशिवाय वयाच्या कांहीं मर्यादेपर्यंत सरकार बोलावील तेव्हीं विशिष्ट मुदतीसाठीं सैन्यांत येऊन मिळालेंच पाहिजे, असा कायद्यानें निर्बंध घातला आहे.

फ्रान्स व जर्मनीनें या तिन्ही रीतींनीं सैन्य वाढविण्याची पद्धति सुरू केल्यावर, फक्त इंग्लंडखेरीज युरोपांतील सर्व राष्ट्रांस तिचा अंगीकार, आत्म-संरक्षणार्थ म्हणा, किंवा चढाओढीनें म्हणा, करावा लागला आहे. आणि याचाच परिणाम हा झाला आहे कीं, प्रचंड लष्करी तयारीच्या आगी ज्याच्या अंतर्यामीं जळत आहेत, अशा ज्वालामुखी पर्वताचीं सांप्रतची स्थिति युरोपखंडास प्राप्त झाली आहे. १८७०।७१ सालच्या फ्रांको-जर्मन लढाईचे अखेरीस आल्सेस व लॉरेन हे फ्रान्सचे प्रांत जर्मनीनें घेतले नसते, तर कदाचित् हा सैन्यवृद्धीचा अतिरेक घडून आला नसता. पण फ्रान्सवर नेहमीं सरशी ठेवण्याच्या जर्मनीच्या धोरणामुळें दुसऱ्याही अनिष्ट गोष्टी घडून आल्या. धूर्त मुत्सदी **प्रिन्स बिस्मार्क** यांनीं, फ्रान्सपासून व कदाचित् रशियापासूनही जर्मनीस जसें भय आहे तसें तुम्हांसही आहे, अशी ऑस्ट्रिया व इटलीची समजूत घालून, व आपण तिघे एक झालों तर युरोपांत

आपण वाटेल तें करूं शकूं असा त्यांस मोह पाडून, त्यांशीं अनुक्रमें १८७८ व १८८२ सालीं, परचक्र आलें असतां परस्परांस मदत करण्याविषयीं, तह केले. ह्या जर्मनी, ऑस्ट्रिया व इटली यांमधील **तिरंगी संधीस** "Triple Alliance" ही संज्ञा आहे. वस्तुतः फ्रान्सचें भय इटलीस व ऑस्ट्रियास नव्हतें व नाहीं. शिवाय, ऑस्ट्रियानें स्वतःला जर्मनींतून काढून लावून बादशाहीपद बळकावणाऱ्या प्रशियाच्या मगरमिठींत जाणें इष्टही नव्हतें. या तिरंगी संधीपासून युरोपास शांततासुख अनुभविण्यास मदत तर कांहीं मिळाली नाहींच; पण त्याचे उलट त्या संधीचा परिणाम असा झाला कीं, ह्या तीन प्रबल राष्ट्रांच्या संघाची व विशेषतः त्यांचा अधिपति जो जर्मनी त्याची—सर्व युरोपास दहशत व भीति मात्र वाटूं लागली. फ्रान्सनें जर्मनीचा सूड घेण्याचे ऐवजीं, जर्मनी व त्याचे दोन दोस्त फ्रान्सलाच केव्हां तरी चिरडून टाकतील, व तेणेंकरून युरोपांतील राष्ट्रांचा समतोलपणा विनाश पावेल, असें सर्वांस स्पष्टपणें दिसून येऊं लागलें. ह्यामुळें फ्रान्सची पाठराखणी करण्यास रशिया देश पुढें आला, व त्यांच्यांत स्नेहवृद्धि होऊन, इ० स० १८९५ सालीं कायमचा संधि झाला. ह्यास "Dual Alliance" **"दुरंगी संघ"** ही संज्ञा देण्यांत आली.

सांप्रतचे **कैसर वुलियम** हे १८८८ सालीं गादीवर आल्यावर त्यांनीं वरील **"तिरंगी संधी"** च्या जोरावर व स्वतःच्या प्रचंड लष्करी सामर्थ्याच्या मदानें धुंद होऊन, आपल्या आजाचें शहाणें व नेमस्त धोरण सोडून दिलें. **प्रिन्स बिस्मार्क** यांस घरीं बसावयास लाविलें; आणि जिकडे तिकडे आगळिकी करण्याचा, आपलें घोडें पुढें ढकलण्याचा व जर्मनीस जगाच्या कारभाराच्या मुख्य नियंत्याचे पदीं विराजमान करण्याचा उपक्रम त्यांनीं आरंभिला. जर्मन लोकांचीच महती वाढवावयाची हें धोरण, बहुतेक प्रजा जर्मन असलेल्या नव्या जर्मनीच्या अंतर्गत राज्यकारभारांत चालविणें धोक्याचें नाहीं; पण हेंच धोरण जर्मनीच्या चिथावणीवरून ऑस्ट्रियानें स्वीकारिलें. यामुळें उपायच नाहीं म्हणून, ऑस्ट्रियाचे राजघराण्यास, हंगेरी प्रांतांतील मॅगियार लोकांस जर्मनप्रजेशीं समाधिकार देऊन त्यांस चांगल्या रीतीनें वागविणें अवश्य झालें आहे. पण ऑस्ट्रियांत राज्यांतील अर्ध्याहून अधिक असलेली जी स्लॅव्होनिक प्रजा तिजवर सरकारी जुल्म होत आहे; त्यासही बऱ्याच अंशानें मुख्य कारण म्हटलें म्हणजे, जर्मन बादशहाची चिथावणी म्हणा किंवा

हल्लीचे किसनगडचे महाराज

मदनसिंग.

पत्र्याळेच महाराज

भूपेंद्रसिंह.

भोपाळचे युवराज नबाब जादे

कर्नल ओबेदुल्लाखान.

हिज हायनेस दि महाराजा ऑफ बिकानेर

रंगा सिंगजी.

सहानुभूति म्हणा, हें होय. जर्मनी व ऑस्ट्रियाचे बादशहा **कैसर वुलियम** व **फ्रॅन्सिस जोसेफ** यांनीं आपली अशी नीतिच ठरवून टाकिली होती कीं, प्रथम पदोपदीं रशियाला शह, काडशह देऊन त्याच्या प्रगतीस प्रतिरोध करावयाचा; व दुसरें, बाल्कन प्रांतांतील लोकांस आपल्या राज्यांत ओढावयाचें. आणि तें न जमल्यास तेथील संस्थानांस आपलें अंकित व आज्ञाधारी मांडलिक करावयाचें; आणि तिसरें, स्वत:च्या राज्यांत असलेल्या सर्व स्लॅव्होनिक वगैरे जर्मन नसलेल्या प्रजेस दडपून खालच्या पायरीवर ठेवावयाचें. या राजनीतीमुळें व घातुक व अरेरावीच्या धोरणामुळें फायदा तर कांहीं आदा झाला नाहींच; पण वैराचा अग्नि पोटांतल्या पोटांत धुमसूं लागला. व त्यामुळें युरोपांतील कोणत्याही राष्ट्रास निर्धास्तपणें राहणें अशक्य झालें.

प्रकरण ११ वें.

कैसर विलियम यांची महत्त्वाकांक्षा व त्या महत्त्वाकांक्षेनें उत्पन्न केलेला 'तिरंगी संघ'

जगाच्या राज्यकारभारांत व्यावहारिक दृष्टीनें संपूर्ण अशी प्रमुख बादशाही सत्ता संप्राप्त करूं इच्छिणाऱ्या **कैसर विलियम**च्या महत्त्वाकांक्षेचें क्षेत्र, अर्थातच रशिया व बाल्कन संस्थानें इतक्याच प्रदेशांत, किंवा फ्रान्सला वर डोकें उचलूं द्यावयाचें नाहीं एवढ्याच कार्यक्रमांत मर्यादित झालें आहे; असें नाहीं. फ्रान्स देश पुनः चिरडला गेला व रशिया चीत झाला, तर आपलें आयुष्य संपल्यासारखें होणार, हें **डेनमार्क, बेलजियम व हॉलंड** या देशांस पूर्णपणें अवगत आहे. परभूमीच्या अपहारपरंपरेनें बलिष्ठ झालेल्या ज्या बँडेनबर्गप्राशियानें १८७१ सालीं १० जर्मन संस्थानें खालसा केलीं, तो पुढील युद्धांत यशस्वी झाल्यास आपल्यासही गिळणार किंवा आपले अंकित मांडलिक करणार, हें त्यांस ठाऊक आहे; पण हीं बिचारीं लहान राष्ट्रें करणार काय? "**तिरंगी संधी**" नें प्रबळ झालेल्या जर्मनी-विरुद्ध तराजूचा कांटा खालीं नेण्यास समर्थ असें एकच राष्ट्र युरोपांत होतें; तें राष्ट्र अर्थात् **ब्रिटन** होय. जर्मनीचा बादशहा जर सुज्ञ, चतुर व लांबवर

धोरण ठेवणारा असता, तर त्यानें युरोपांतील "दुरंगी" व "तिरंगी" संघांतील राष्ट्रांच्या कलहांपासून इंग्लंडला युक्तीनें अलिप्त ठेविलें असतें. परंतु, **कैसर विलियमनें**, महत्त्वाकांक्षेनें प्रेरित झालेल्या अनेक उपक्रमांनीं व प्रमादांनीं

"तिरंगी स्नेह"

ह्या नांवानें प्रसिद्ध असलेला नवा राष्ट्रसंघ घडवून आणला. हाच संघ सध्यांचे लढाईंत जर्मनीसच कसा अत्यंत जड झालेला आहे हें स्पष्ट दिसतच आहे.

ज्याप्रमाणें जमिनीवरील रणसामर्थ्यांत आपण श्रेष्ठ, त्याचप्रमाणेंच अफाट समुद्राचेंही आपण मुख्य स्वामी व्हावें, अशी कैसर वुलिम यांस इच्छा झाली. ब्रिटनच्या एवढें आरमार तयार करण्याचा, व ब्रिटनच्या इतकें आपलेंही वसाहती-खालसा राज्यें-बंदरें इत्यादिकांनीं युक्त असें युरोपाबाहेर साम्राज्य उभारण्याचा उपक्रम जर्मनीनें उघडपणें योजिला, व तो जोरानें पुढें सरसावला. आपली शक्ति, महत्त्व व दर्यावर्दी साम्राज्य वाढविण्यास प्रत्येक राष्ट्रास अर्थात् अधिकार आहे, व त्यास अनुसरून इंग्लंडप्रमाणें आम्हींही कां मोठें होऊं नये, अशी मनःप्रवृत्ति जर्मनीची असल्यास त्यांत नवल नाहीं. परंतु चालू वहिवाटीचें तत्त्व परराष्ट्रराजकारणांतही लागू केलेंच पाहिजे. त्या तत्त्वान्वयें, जर्मनीस कोणाही राष्ट्राच्या स्थापित हक्कांविरुद्ध आगळीक करण्याचा अधिकार नैतिकदृष्ट्या पोंचत नाहीं. आणि शिवाय, इंग्लंडच्याइतकें मोठें आरमार जर्मनीनें तयार केलें तर, इंग्लंडपासून जर्मनीस जी भीति व दहशत आहे. तिच्यापेक्षां, इंग्लंडास जर्मनीपासून दसपट अधिक भीति व दहशत आहे, हें उघड आहे. जर्मनीच्या जमिनीवरील ५५ लाख सैनेविरुद्ध इंग्लडचें सैन्य फार तर ६।७ लाखांचें होईल. इंग्लंडचें समुद्रावरील वर्चस्व नाहींसें झाल्यास जर्मन सैन्य इंग्लंडवर सहज स्वारी करूं शकेल, व संख्याश्रेष्ठत्वानें खास इंग्लंडचें स्वातंत्र्यही हरूं शकेल. शिवाय कोणत्याही तऱ्हेनें जर्मनीचें प्राबल्य अत्यंत वाढून जर्मनीचा बादशहा जगांतील राज्यकारभारांचा शास्ता व नियंता झाला, तर राष्ट्रांचा समतोलपणा नाहींसा होऊन, कधींना कधीं तरी इंग्लंडासही हार खाऊन दुय्यम योग्यतेच्या राष्ट्राचे पदवीस उतरावें लागण्याचा प्रसंग येणार. ही भावी स्थिति पाहून जर्मनीशीं कोणचाही एक देश मिळाला तरी, त्या उभयतांच्या संयुक्त आरमारांवर सरशी करील, असें आपलें आरमार हमेश ठेवण्याचें धोरण इंग्लंडाला अंगीकारावें लागलें. पण एवढ्यानें जो मुख्य इष्ट कार्यभाग—कीं, जर्मन बादशहाच्या अनिवार महत्त्वाकांक्षेस आळा

घालून राष्ट्रांचा समतोलपणा ठेवणें–तो सिद्ध होणार नाहीं, असें जर्मनींच्या अनेक आगळिकींवरून इंग्लंडास दिसून आलें.

बाल्कन संस्थानांतील ऑस्ट्रिया व जर्मनीची स्वार्थैकदृष्टि, व स्लॅव्होनिक लोकांचे स्वराज्यविषयक मनोरथ चिरडून टाकणारी नीति, इंग्लंड व फ्रान्स यांस आवडणें अर्थात् अशक्य होतें. तत्संबधींची रशियाची नवी उदारवृत्ति त्यास पसंत पडून, त्या तिघांच्या धोरणाची एकवाक्यता झाली. पुढें १८९४ सालीं **जपाननें** चीनला जिंकून मिळविलेला **लायटांग** प्रांत जपानचे हातांतून हिसकावून घेण्यांत जर्मनीनें प्रमुखपणा घेतला; आणि नंतर चीनपासून ९९ वर्षांच्या करारानें **किआचौ** बंदर व्यापारासाठीं ह्मणून उसनें घेतलें. पण लवकरच त्या बंदरांत तटबंदी करून दर्यावर्दी लढाईला उपयोगी पडेल, अशा आरमारयुक्त बंदराचें स्वरूप त्यास दिलें. पुढें १८९९ ते १९०२ पर्यंत चाललेल्या प्रसिद्ध **बोअर लढाईंत कैसर वुलियम** यांनीं बोअर लोकांशीं पूर्ण सहानुभूति दाखवून **प्रेसिडेंट क्रूगर** यांस उत्तेजक संदेशही पाठविला. ह्या सर्वांचा परिणाम असा झाला कीं, इंग्लंडच्या परराष्ट्रीय राजकीय धोरणांत राजे **सातवे एडवर्ड** (१९०१–१०) यांच्या अमदानींत व विशेषतः त्यांच्या नेतृत्वाखालीं मोठी क्रांति घडून आली, आणि तिची परिपूर्ण सांगता सध्यांचे ब्रिटनमधील परराष्ट्रराज्यकारभाराचे मुख्य मंत्री **सर एडवर्ड ग्रे** यांनीं मोठ्या कुशलतेनें व धिम्मेपणानें पण दृढनिश्चयानें केली.

इंग्लंडचें पूर्वींचें धोरण, युरोपच्या भानगडींत आपण पडूं नये, फक्त आपल्या साम्राज्यास धक्का लागला तरच शस्त्र हातीं घ्यावें, नाहीं तर फक्त युक्तीच्या चार गोष्टी सांगाव्या, असें होतें. ह्या स्वहितार्थी तटस्थवृत्तीस अनुसरूनच, फ्रँको–जर्मन लढाईंत इंग्लंड फ्रान्सचे मदतीस गेलें नाहीं, व बाल्कन संस्थानांच्या स्वातंत्र्यसाधनाचे प्रयत्नांस त्यानें फारसें साह्य दिलें नाहीं, किंवा तुर्कांसही मदत केली नाहीं. ह्यामुळें युरोपांत इंग्लंडास "कपटी आपमतलबी" (Perfidious Albion) अशी अपकीर्ति प्राप्त झाली. बोअर लढाईच्या वेळीं इंग्लंडाशीं शब्दानेंही सहानुभूति दाखविणारें एकही राष्ट्र, युरोप, एशिया किंवा अमेरिकेंत नव्हतें. ह्या स्वार्थी एकलकोंडेपणानें साम्राज्यास घात होईल, हें **राजे एडवर्ड** व इंग्लंडच्या मुख्य मुत्सद्यांनीं ओळखिलें, आणि त्यांनीं इतर राष्ट्रांशीं स्नेहसंबंध करण्याचा उपक्रम आरंभिला. त्याचें पहिलें फळ इ०स० १९०२ सालीं झालेला व १९०५ सालीं अधिक विस्तृत स्वरू-

पानें पुनरुज्जीवित केलेला **जपान व इंग्लंड यांमधील** तह होय. पुढें १९०४ सालापर्यंत अनेक वादांच्या गोष्टींचा निकाल सलोख्यानें लावला जाऊन फ्रान्स व इंग्लंडमध्यें कायमचीं दोस्तीचीं बोलणीं होऊन (लेखी तह नव्हे) स्नेह झाला. इंग्लंडच्या मध्यस्थीनें रशिया व जपान यांमध्यें संधि, तह वगैरे घडून येऊन शेवटीं खास इंग्लंड आणि रशिया यांमध्यें १९०७ सालीं संधि होऊन अफगाणिस्तान, पर्शिया व तिबेट यांसंबंधींच्या वादांचा निकाल लागला. दरम्यान फ्रान्स व जपान यांमध्येंही समजूत पटली. सारांश, पूर्वी ऑस्ट्रिया, जर्मनी व इटली यांच्या **"तिरंगी संघाशीं"** सामना करण्यास जो एक फ्रान्स व रशिया यांचा **"दुरंगी संघ"** होता, त्याचे ऐवजीं इंग्लंड, फ्रान्स व रशिया यांचा **"तिरंगी स्नेह"** (Triple Entente) हा प्रस्थापित झाला. खरोखर यांत जपान देशासही सामील करून चौरंगी स्नेह हें नांव दिलें पाहिजे. आपल्या विरुद्ध ही प्रचंड शक्ति उभारली जात आहे, व ती आपणांस वेळीं जड जाईल, ही गोष्ट महत्त्वाकांक्षेनें, व १८६६ व १८७० सालच्या जयांच्या आठवणीनें दृढ झालेल्या स्वसामर्थ्यमदानें अंध झालेले जे कैसर विलियम त्यांस समजली नाहीं अगर उमगली नाहीं. आणि जाणो ह्या चार विरुद्ध राष्ट्रांस चिथविण्यासाठींच कीं काय, कैसर विलियम यांच्या अनुमतीनें ऑस्ट्रियानें १९०८ सालीं बोसनिया व हरजेगोव्हिना हे प्रांत गिळंकृत केले, व गेल्या बाल्कन लढाईंत सर्विया व मांटेनिग्रोस चेपून आलबेनियाचें राज्य स्थापविलें. अशा रीतीनें जर्मनीनें रशियावर मात केली. खास जर्मन बादशहानें १९०४ व १९०५ सालीं फ्रान्सचें स्वामित्व प्रस्थापित झालेल्या मोरोक्कोंत ढवळाढवळ केली, व तेथून फ्रान्सला हाकलून देण्याचा व आपण एक बंदर मिळविण्याचा प्रयत्न केला.

इंग्लंडनें विशेष जोर करून त्या वेळेस कैसरला अडविलें. कैसरनें त्या वेळीं गम खाल्ली; पण त्याचें कारण इंग्लंडशीं कांहीं तरी टिकाव धरील इतकें आरमार कैसरपाशीं तयार नव्हतें हें होय. त्या वेळेपासून जर्मनींत आरमार वाढविण्याविषयीं अंविश्रांत खटपट चालली आहे. गेल्या बाल्कन लढाईचे नंतर जर्मनीनें सैन्यांतही वाढ केली. त्यामुळें फ्रान्स व रशिया यांसही तशींच वाढ करणें जरूर वाटून, त्याप्रमाणें त्या राष्ट्रांत योजना होत होत्या. त्या अमलांत येण्यास अवधि आहे व त्यांविषयीं फ्रान्समध्यें मतभेदही आहे, ही गोष्ट ध्यानांत घेतली, तर सध्याच्या महायुद्धाचा नगारा आजच कां

वाजला, हें कोडें सहज सोडविण्यासारखें आहे. आपण जी नव्यानें आपल्या प्रचंड सैन्यास प्रचंडतर करण्याकरितां वाढ केली, तीस प्रत्युत्तर ह्मणून रशिया व फ्रान्स येथील राज्यकर्त्यांनींही आपापल्या सैन्याची वाढ करावयाची योजना केली आहे. ती सफल व्हावयाच्या पूर्वीच ह्या राष्ट्रांस चीत करून टाकावें, हाच मनोरथ **कैसर वुलियमचा** व त्याच्या मंत्र्यांचा होता; असें आतां बाहेर आलें आहे. शिवाय, इंग्लंड बहुतकरून पूर्वीच्या धोरणास अनुसरून–प्रत्यक्ष त्याचे वाटेस आपण न गेल्यास–तटस्थ राहील, असेंही कैसर यांस वाटलें असलें पाहिजे. आपलें सैन्य कडेकोट तयारीचें व अप्रतिहत गतीचें, आणि ह्या कामांत फ्रेंच सरकार ढिलें आणि त्याहीपेक्षां रशियन सरकार ऐदी व ढिलें, अशी जर्मन लोकांची समजूत फारा दिवसांपासूनची आहे. ही सर्व परिस्थिति पाहून जर्मनीला आपला डाव साधून घेण्यास आजचाच मुहूर्त उत्तम वाटला.

प्रकरण १२ वें.

प्रिन्स बिस्मार्क व कैसर विलियम यांचीं धोरणें, व जर्मनीची वाढ.

सांप्रतच्या महायुद्धांत जगाची सर्वांत कमी सहानुभूति जर्मनीकडेच कां, तटस्थ राष्ट्रांना देखील जर्मनीविषयीं कमी प्रेम व अधिक राग कां वाटत आहे, त्याच्या कारणांचा अजमास करणें कठीण नाहीं. ह्या अप्रीतीचें कारण प्रशिया व जर्मनी यांच्या वैभवाविषयींचा मत्सर असेल असें जर कोणास वाटलें, तर त्यासंबंधीं ही गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी आहे कीं, ही अप्रीति फक्त अलीकडील १५ वर्षांत म्हणजे सांप्रतचे **कैसर विलियम** हे गादीवर आल्यापासूनच विशेष जोराची व सार्वत्रिक झाली आहे. ह्या बाबतींत १८६६–७० च्या व १९१४ सालच्या स्थितींत जमीनअस्मानाचें अंतर आहे. याचें कारण

प्रिन्स बिस्मार्क व कैसर वुइल्यम

ह्यांच्या धोरणांत, मुत्सद्दीगिरींत आणि राजनीतिकौशल्यांत पुष्कळच फरक झाला आहे हें होय. उभयतांचा हेतु प्रशियाचें महत्त्व व बल वाढवावें

हा खरा, परंतु **प्रिन्स बिस्मार्क** यांनीं आपल्या महत्वाकांक्षेंत नेमस्तपणा ठेविला होता. त्या हेतूस जितकें सुंदर स्वरूप देतां येईल तितकें देण्याविषयीं त्यांची खटपट असे. युरोपांतील लोकमत आपणास सर्वथा प्रतिकूल न होऊं देण्याविषयीं ते काळजी घेत, आणि त्यांनीं जीं युद्धें केलीं त्यांस कारण आपल्याविरुद्धच असह्य आगळीक झाली असें दर्शविण्याचा त्यांनीं नेहमीं प्रयत्न केला, व तो यशस्वीही झाला. जर्मनसंस्थानांतील अनुचित यादवी मोडून त्यांचें एक संयुक्त साम्राज्य करावें,हा जो **बिस्मार्कचा** मुख्य हेतु, तो जाल्या शुद्ध व प्रशंसनीय असून, युरोपांतील परराष्ट्र्यवहारांचे सर्वमान्य नीतितत्त्वांस अनुसरूनच होता. १८६६ सालीं प्रशिया व ऑस्ट्रिया यांचें युद्ध होऊन त्यांत ऑस्ट्रियास जर्मनींतील राज्यव्यवस्थेंतून हांकून लाविलें. ह्यांत सक्तदर्शनीं आगळीक करणारा ऑस्ट्रिया असून खास फ्रान्सनेंही ऑस्ट्रियास साह्य देण्याचें नाकारलें. त्यानंतर फ्रान्सशीं लढाई करण्याचा पक्का निश्चय व तयारी असतांही बिस्मार्क यांनीं ४ वर्षें गम खाल्ली. दरम्यान प्रशियाचे वर्चस्वाखालीं जर्मनीचें एक मोठें राष्ट्र व्हावें, असें लोकमत त्यांनीं जर्मनींत युक्तिप्रयुक्तीनें तयार केलें. १८७० सालीं फ्रान्सच्या **तिसऱ्या नेपोलियन** बादशहानें तक्रार केल्यावरून स्पेनच्या गादीवर हक्क सांगणाऱ्या प्रशियन राजपुत्रास तो हक्क त्यांनीं सोडून देण्यास लाविला. प्रशियन राजघराण्यांतील कोणताही राजपुत्र कधींही स्पेनचे गादीवर येणार नाहीं असें आश्वासन द्या, अशी अतिरेकी व अरेरावीची मागणी करून **नेपोलियननेंच** युद्धाची द्वाही प्रथम फिरवावी असा योगही **बिस्मार्क** यांनीं घडवून आणला. बेलजियमच्या तटस्थेचा प्रश्न त्या वेळींही इंग्लंडनें काढला. त्या वेळीं आपण बेलजियमच्या वाटेस देखील जाणार नाहीं, व दुसरा कोणी गेल्यास त्याचें पारिपत्य आपण उभयतां करूं, असा इंग्लंडशीं तहनामा देखील केला. कौटिल्यनीतीचा एक बोलाचालीचा नुसता खरडा होता तो प्रसिद्ध करून त्या वेळीं तरी **बिस्मार्क** यांनीं अशी जगाची खात्री करून दिली कीं, फ्रान्सचाच हेतु बेलजियम गिळंकृत करण्याचा आहे, त्यामुळें ह्या लढाईंत इंग्लंड किंवा कोणचेंही राष्ट्र मध्यें पडलें नाहीं. पुढें प्रशियाच्या वर्चस्वाखालीं १८७१ सालीं जर्मनपादशाही स्थापन झाल्यावर प्रिन्स **बिस्मार्कचें** मुख्य धोरण इंग्लंडशीं स्नेहसलोखा ठेवण्याचें, व विशेषतः अंतर्गत व्यवहारांत प्रगति करून जर्मनीची संपत्ति, खुष्की सैन्यबल, व परराष्ट्र्यवहारांत राष्ट्रांच्या समतोलपणाचा कैवार या बाबतींत महत्त्व वाढवि-

ण्याचें होतें. प्रतिस्पर्धी राष्ट्रांत चुरस व मत्सर कायम ठेवण्याचें धोरणही त्यांनीं ठेविलें होतें. ऑस्ट्रियास रशियाचें भय दाखवून व फ्रान्सला टयूनिस व इतर आफ्रिकेंतील प्रांत घेऊं देऊन आपणांसही तसाच कांहीं तरी लाभ व्हावा ह्मणून त्यांनीं इटलीस आपल्याकडे ओढून तिरंगी संधींत बांधून घेतलें. रशियनांचा कॉन्स्टॉंटिनोपलपर्यंतच्या व हिंदुस्थानाकडील प्रगतीचा बाह्यात्कारी निषेध करून, पण आंतून फूस देऊन, त्यांनीं इंग्लंड व रशियांतील वैमनस्य वाढविलें, व फ्रान्सच्या ईजिप्तमधील वगैरे धोरणास फूस देऊन इंग्लंड व फ्रान्स यांमधील पुरातन काळापासून चालत आलेलें मत्सर व वैमनस्य कायम ठेविलें. सारांश, इटली व ऑट्रिया यांस सर्वस्वी आपणांवर अवलंबून ठेवून व इतर राष्ट्रांत परस्पर वैमनस्य वाढवून इंग्लंडशीं स्नेहाचें वर्तन ठेवण्याचें धोरण बिस्मार्क यांनीं चालविलें होतें.

सांप्रतच्या **कैसर विलियमनीं** गादीवर येतांच हें सर्व धोरण बदललें. त्यांनीं बिस्मार्क यांस घरीं बसावयास लाविलें, व इंग्लंडशीं स्नेह कायम ठेवण्याचे ऐवजीं त्याच्या आरमाराशीं टक्कर देण्याइतकें आरमार तयार करून, जसें जमीनीवर तसें समुद्रावरही आपलें स्वामित्व स्थापण्याचा उपक्रम आरंभिला. त्यामुळें जर्मनीचें खुष्कीबल अत्यंत श्रेष्ठ ठेवावयाचें हें जें बिस्मार्क यांचें सुज्ञतेचें व मुख्य धोरण त्यास हरताळ लागला. हें कसें हें खालील कोष्टकावरून दिसून येईल:—

वर्ष.	जर्मनीचें अगदीं तयार खुष्की सैन्यबळ.	खर्च (मार्कस). मार्क म्हणजे १३॥ शिलिंग.	जर्मनीचें दर्यावर्दी बळ.	खर्च.
१९०१	६०४१६८	९७७९३२००	३११७१	१९४८९२
१९०२	६०५८११	६६९१८००००	३३५६३	२०५३५६
१९०३	६०५९७५	६५९९७००००	३५७६८	२१२६२८
१९०४	६०६८७२	६४७०७८०००	३८४०६	२०६५५५
१९०५	६०८०५८	६९७१२६०००	४०८६२	२३१४८३
१९०६	६१४३५३	७५२६४००००	४३३०८	२४५४७३
१९०७	६१६८३८	८०६८३५०००	४६७४७	२१०८८३
१९०८	६१९९४०	८२७४५९०००	५०३२१	३७८७०८
१९०९	६२१११२	८५४७८४०००	५७०६८	४०५५६८
१९१०	६२२२८५	८०७२२३०००	६२०१३	४३४०१५
१९१४चा अंदाज	७९०९८५	११००००००००	७३०००	६०००००

सन १९०१ सालापासून जर्मनीची लोकसंख्या ५६० लक्षांपासून ६६० लक्षापर्यंत वाढली आहे. शेंकडा एक याप्रमाणें त्यांच्या सैन्याच्या वाढीचें प्रमाण होतें तें पुढें कसें तुडविण्यांत आलें, हें वरील आंकड्यांवरून दिसून येईल. जर्मनीच्या आरमाराच्या वाढीपेक्षां निदान दीडपट तरी आपल्या आरमाराची वाढ करावयाची असें इंग्लंडचें धोरण असल्यामुळें इंग्लंडच्या आरमाराची बरोबरी करणें जर्मनीस पूर्वीइतकेंच कठीण झालें आहे. मात्र त्यास तिकडे अधिकाधिक पैसा खर्च करावा लागल्यानें खुष्की सैन्याचें वर्चस्व कमी कमी होत गेलें आहे. फ्रान्सची लोकसंख्या सुमारें ४ कोटी असतांही त्यांचें अगदीं तयार असें खुष्की सैन्यबल, त्यांच्याहून दिडीपेक्षां अधिक लोकसंख्येच्या जर्मनीच्या बळाजवळजवळ म्हणजे सुमारें ६॥ लाख आहे. सक्तीच्या लष्करी देशसेवेच्या कायद्याप्रमाणें जर्मनी आज ५० लक्ष लोक रणांत आणूं शकेल तर फ्रान्स ४० लाख आणूं शकेल. जसें जमिनीवर तसें समुद्रावरही पहिल्या प्रतीचें श्रेष्ठत्व मिळवावें या जर्मनीच्या महत्वाकांक्षेनें खुष्की सैन्याची हयगय झाली इतकेंच नव्हे,तर सरकारी कर्ज व वार्षिक करांचा बोजाही अतोनात वाढून त्यामुळें निःसीम प्रजासत्तावादी व सोशिॲलिस्ट पक्ष अधिक बळावून देशांत दुही माजत चालली आहे. रीचस्टा व बंडस्राथ ह्या राजसभांच्या मतदारांत १८८७ सालीं सदरहू पक्षाचे मतदार फक्त ७,६२,००० होते. १९१२ सालीं त्यांची संख्या ४२॥ लक्षांहून अधिक होती. देशांतील औद्योगिक प्रगतीचें मान गेल्या दहा वर्षांत कमी झालें आहे, व लोकांतील साधेपणा, काटकपणा व नीतिमत्ता हीं कमी होत चाललीं आहेत. बर्लिनमध्यें जन्मणाऱ्या मुलांपैकीं शेंकडा २० वैवाहिक संबंधाशिवाय जगांत येतात. सारांश, अंतर्गत हितसंबंधांत बिस्मार्कच्या अमदानींतील सुराज्यता नाहींशी होऊन परराष्ट्र्व्यवहारांत तर कैसर वुलियम ह्यांनीं, एक आस्ट्रिया खेरीज करून, बाकी बहुतेक सर्व प्रबल राष्ट्रांचा रोष, वैमनस्य, भय व तिरस्कार सांप्रतची लढाई सुरू होण्यापूर्वीच संपादन केला होता. सर्व जगाचें खुष्की व दर्यावर्दी श्रेष्ठत्व आपल्या एकट्याच्याच हातीं आणण्याची जी रावणी महत्वाकांक्षा तिचें फळ असेंच निपजावयाचें.

प्रकरण १३

जर्मनीची रणनीति व राजनीति.

जर्मनीविषयींच्या अप्रीतीचें सर्वांत बलवत्तर कारण म्हटलें म्हणजे **जर्मनीच्या सुधारणेंतील लष्करी बाण्याचा अतिरेक**—ज्यास "German Militarism" म्हणतात तें होय ह्या लष्करी बाण्याचें स्वरूप विस्तृत असून त्यांत अंतर्गत राज्यव्यवस्था, सामाजिक आचारविचार व परराष्ट्रव्यवहारनीति यांचा समावेश होतो. सांप्रतच्या सुसंस्कृत व प्रागतिक राष्ट्रांच्या राज्यकारभारांत प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष रीतीनें लोकमतांचें प्राबल्य असतें राजे व मंत्रिजन त्याचेच अनुरोधानें चालतात, व शांततेनें होणाऱ्या प्रगतीकडे सर्वांचें अधिक लक्ष असतें रणांतील विजयापेक्षां सरस्वती, संस्कृति व लक्ष्मी ह्यांचे योगें साधणाऱ्या सुखद विजयांचें महत्त्व तेथें अधिक मानलें जातें, व धैर्यशौर्यादि गुणांचा तेथें योग्य गौरव केला जातो. पण लष्करी अंमलदारांस किंवा लष्करी खात्यास डोईजड न होऊं देण्याविषयीं, आणि त्यांचा हात राज्यकारभारांत पडूं न देण्याविषयीं विशेष खबरदारी घेण्यांत येत असते. त्याचप्रमाणें लष्करी पेषा व लष्करी धंदा यांचें अति स्तोम होऊं दिलें जात नाहीं.

प्रशियाच्या श्रेष्ठत्वाखालीं १८७० सालीं निर्माण झालेल्या जर्मन साम्राज्यांत रणदेवता ही आदिदैवत मानण्यांत येऊं लागली, व सर्व धंद्यांत लष्करी पेषा पहिल्या प्रतीचा मानला जाऊन लष्करी अंमलदार व शिपाई यांस सर्व सामाजिक बाबतींत सर्वांहून श्रेष्ठ मानमरातब देण्यांत येऊं लागला, व आजही दिला जात आहे. सर्व जर्मनी देश तलवार धरणाऱ्या शिपयांचा असावा (A nation in arms), त्यानें तलवारींच्या जोरावर जगावर स्वामित्व चालवावें, आणि आपल्या लष्करी सुधारणेचीं ध्येयें सर्वत्र पसरावीं, असें जर्मन सरकारचें सदैव जागृत ध्येय आहे. तेथील इतर बाबतींत बादशहाचे सत्तेला थोडाबहुत आळा रिचस्टा व बंडस्राथ ह्या पार्लमेंटरूपी राजसभांचा आहे; परंतु प्रधानमंडळ निवडण्याचा अधिकार **कैसर** ह्यांसच आहे, व तें प्रधानमंडळ फक्त **कैसर** ह्यांसच जबाबदार असतें. लष्करी बाबींत व परराष्ट्रव्यवहारांतील युद्ध, विग्रह, तह, संधि वगैरे बाबींत **कैसर**चा अधिकार अगदीं निकट

आहे. जर्मन सैन्यांतील प्रत्येक शिपायास व ऑफिसरास अशी शपथ घ्यावी लागते कीं, " माझें तन आणि मन (Conscience) हीं दोन्हीं मी आज कैसर बादशहा ह्यांच्या हवालीं करितों, व त्यांनीं हुकूम केल्यास आईबापांवरही गोळी चालण्यास मी अनमान करणार नाहीं. "

अशा रजस्तमोगुणांनीं कलुषित झालेली सुधारणा, तरवारीच्या जोरावर सर्व जगावर आपलें स्वामित्व स्थापून आपण सर्वत्र पसरावी, असा ईश्वरी संकेतच आहे अशी भावना जर्मनलोकांची व विशेषतः त्यांच्या कैसरची असल्यामुळें, त्या देशाचा जगांत आज खरा स्नेही नाहीं, अशी स्थिति झाली आहे. आणि त्यामुळेंच ह्या जर्मनसुधारणेच्या लष्करी बाण्याचा बीमोड केल्याशिवाय सुरू झालेलें युद्ध संपवूं नये, असें इंग्लंड, फ्रान्स, बेलजियम वगैरे देशांतीलं आणि सामान्यतः एकंदर जगांतील लोकमत आहे.

येथें सत्याचा अंशतःही अपलाप होऊं नये म्हणून एक गोष्ट थोडक्यांत नमूद केली पाहिजे, ती ही कीं, वर वर्णिलेल्या जर्मनसुधारणेचें मुख्य माहेरघर प्रशिया होय. त्यास अपवाद अशीं पुष्कळ जर्मनसंस्थानें–विशेषतः बव्हेरिया वगैरे दक्षिणेकडील संस्थानें–आहेत. जर्मनसंस्कृतींतील सुंदर स्वरूपाचें वसतिस्थान जर्मनीच्या दक्षिण व पश्चिम दिशांकडील संस्थानांत आहे. त्यांपैकीं बरींच संस्थानें जर्मनींत खुषीनें संयुक्त झालेलीं नाहींत; पण प्रशिया सर्वांत मोठा व प्रबल, व त्याचा पगडा चोहोंकडे बसलेला, ह्यामुळें जो लष्करी अतिरेक प्रशियाचे अंगीं खिळलेला तो थोडाबहुत आज सर्व जर्मनींत फैलावला आहे. सुधारलेल्या पाश्चात्य राष्ट्रांचा जो विशेष कटाक्ष आहे, तो जर्मनीविषयीं आहे असें म्हणण्याऐवजीं, जर्मनीचे नाकांत वेसण घालून त्यास बळानें आपल्यामागून ओढून नेणाऱ्या प्रशियाविषयीं–विशेषतः 'फ्यूडल' उर्फ अंधतेच्या काळांतील ध्येयें अद्यापि कायम ठेवणाऱ्या सरदार घराण्याविषयीं व होअेनझोलर्न राजवराण्यासंबंधीं आहे, असें म्हणणें सयुक्तिक होईल. त्यांचेंच प्रस्थ सर्व जर्मनींत माजल्यामुळें तेथील सुधारणा लष्करी आतताईपणानें, अनिवार स्वाभिमानानें व अतिरेकी महत्त्वाकांक्षेनें दूषित झाली आहे. सांप्रतच्या लढाईचे शेवटीं एवढ्या दोषांचा परिहार होऊन बाकी जर्मनसुधारणा प्रागतिक जगाचे कल्याणार्थ हवीच आहे. तिचा किंवा सर्व जर्मनीचा सर्वस्वी विध्वंस झाल्यास जगाचें नुकसान होणार आहे. असो.

वर वर्णन केलेल्या जर्मनसुधारणेच्या अतिरेकी लष्करी स्वरूपाची परमावधि सहजिकपणेंच **जर्मनीच्या संधि-विग्रह-नीतींत** दिसून येते. सदा सर्वकाल युद्धाची पूर्ण तयारी ठेवणें, हा एकपरी राज्याच्या सुव्यवस्थेचा एक चांगला भागच समजला पाहिजे. पण जर्मनीच्या सर्व लष्करी खात्याच्या उभारणीचा हेतु केवळ परशत्रु आल्यास त्याचें निवारण करूं एवढाच नसून, तंटा थोडा निकरावर जातो असें वाटल्यास दुसऱ्या देशांतील सैन्य तयार होण्याच्या-पूर्वीच त्यावर मोहीम करून धुडगूस घालतां याव, अशा प्रकारचा आहे. लढाई सुरू करण्याचा प्रसंग आल्यापासून आणि विशेषतः लढाई सुरू झाल्यावर, नीतितत्त्वांचा संपूर्ण लोप होतो, आणि जयासाठीं अवश्य गोष्टी करण्यास कोणताही निर्बंध आड येऊं देतां कामा नये (Necessity has no low) असें जर्मनलोकांचें व सरकारचें ठाम मत आहे. तदनुसार त्यांनीं सांप्रतची लढाई सुरू केली व ती चालविली आहे. यास आतां बळकट पुरावाही मिळाला आहे. ऑस्ट्रियानें सर्व्हियनसरकारास निर्वाणींचा खलिता पाठवून एकदम चढाव केला, हें सर्व कैसरच्या पसंतीनें झालें असें मानण्यास आतां बहुतेक खात्रीचा पुरावा पुढें आला आहे. ज्या दिवशीं बेलग्रेडवर ऑस्टियन तोफांचा भडिमार झाला त्याच दिवशीं म्हणजे ता. २८ जुलैला, कैसरनीं आगंतुक रीतीनें रशियाच्या झारला तार पाठवून ऑस्ट्रियाच्या करणीचें मंडन करून सर्व्हियाचें पारिपत्य झालेंच पाहिजे असें आपलें मत कळविलें. पण आपण ऑस्ट्रियाला सामाची सल्ला देत आहों असा कांगावा केला. झारनीं लगेच ता. २९ रोजीं जबाब पाठवून, प्रबल ऑस्ट्रियानें लहान सर्व्हियाकडे अनुचित मागण्या करून त्याच्याशीं उपस्थित केलेलें युद्ध क्षुद्रमनस्कतेचें आहे असें आपलें मत कळवून, ऑस्ट्रिया जर हात आवरणार नाहीं, तर सर्व रशियन लोकमत मला सर्व्हियाचे प्राणरक्षणार्थ जाण्यास भाग पाडील; करितां तुम्ही तुमच्या स्नेह्यास सामोपचाराचा सल्ला देऊन प्रचंड लढाईचें अरिष्ट टाळा अशी विनंति केली. त्यावर कैसरनीं जबाब घाडला कीं, झार यांनीं व्हिएन्ना येथें सामोपचाराचें बोलणें सुरू करावें व त्यास आपण मदत करूं. पण त्याबरोबर अशीही मागणी केली कीं, झारनीं आपल्या सैन्याची कांहींही तयारी करूं नये. ऑस्ट्रियानें लढाई सुरू केलेली, व एकदम रशियांत घुसण्यास तयार असलेली जर्मन सेना सरहद्दीवर तयार; अशी स्थिति असतां तुम्ही गुपचूप बसा असें कैसरनीं रशियास सांगणें किती अन्यायाचें होतें, याचा वाचकांनींच विचार

कराव्या. तें असो, पण झारनीं कैसरना असें उत्तर धाडलें कीं, सैन्याची हालचाल अगदीं बंद करणें अशक्य आहे; तथापि जोंपर्यंत व्हिएन्ना येथें सामोपचाराचें बोलणें चालू आहे, तोंपर्यंत माझें सैन्य अल्पही आगळीक करणार नाहीं असें मी वचन देतों. आणि ईश्वरावर भरंवसा ठेवून तुमच्या मध्यस्थीस परमेश्वर यश देवो, असें मी मनःपूर्वक इच्छितों. यावर कैसरनीं एवढाच जबाब दिला कीं, जर रशिया आपल्या सैन्याची तयारी करणें एकदम बंद करणार नाहीं, तर लढाई झालीच पाहिजे. लगेच ता० १ आगस्टला जर्मनीनें रशियाशीं युद्धाची द्वाही फिरविली व जर्मन-ऑस्ट्रियन सैन्य रशियन पोलंडमध्यें शिरलें तें अद्यापि तेथून हाकलून देण्यांत आलेलें नाहीं. त्याच दिवशीं जर्मन सैन्य फ्रान्सच्या पूर्वसीमेवरील सिरिस शहरावर चाल करून गेलें. ता. २ रोजीं जर्मनीनें बेलजियमपाशीं तुमच्या देशांतून आमचें सैन्य जाऊं द्या अशी मागणी करून, तिचा निषेधार्थी जवाब मिळाला असतांही, दुसरे दिवशीं त्या देशावर चाल केली. इंग्लंडनें ह्याविरुद्ध तक्रार केली त्यास जर्मनसरकारानें असें उत्तर दिलें कीं, बेलजियमच्या तटस्थपणाची हमी म्हणजे 'कागदाच्या कपट्यावरील एक वाक्य,' त्याची काय मातब्बरी !!! या दृढ इंत तुमचे काय हेतु आहेत ह्मणून इंग्लंडनें प्रश्न विचारला, त्यास असा जबाब मिळाला कीं, बेलजियममधून आमचें सैन्य आम्ही नेऊन फ्रान्सला पादाक्रांत करणारच, परंतु त्यांचा युरोपातील कांहींही प्रदेश घेणार नाहीं. फक्त फ्रान्सच्या दर्यावर्दी मुलुखांतील वाटेल तो मुलूख आम्ही घेण्यास मोकळे आहों. त्यावर ता. ४ रोजीं इंग्लंड युद्धांत सामील झालें. सारांश, हें युद्ध जर्मनीनें आपल्या आततायीपणानें ऑस्ट्याकडून उपस्थित करविलें व व्हिएन्ना येथें रशिया व ऑस्ट्रियामध्यें सामोपचाराचें बोलणें चालू असतां, व तें यशस्वी होण्याचा पुष्कळ संभव असतां, सैन्य तयार नसतां, आणि रशिया व फ्रान्स अनुचित मागण्या करील तर त्याचे साह्यास आम्ही जाणार नाहीं असें इंग्लंडनें अभिवचन दिलें असतांही कैसरनीं फ्रान्स व बेल्जियमवर चाल केल्यामुळें इंग्लंडास स्नेहासाठीं व वचनप्रतिपालनासाठीं युद्धांत पडणें भाग पडलें. आपल्या वृत्तींत नीतिभंग झाला ह्मणून प्रत्यक्ष जर्मन चॅन्सलर **हर व्हॉन बेथमन हॉलवेग** ह्यांनींही रिचस्टीमध्यें कबूली जबाब दिला आहे तो असा:—

' लक्सेंबर्ग व बेल्जियम ह्यांनीं आमचें सैन्य आपल्या प्रदेशांतून नेऊं नका ह्मणून केलेला न्यायाचा निषेध अवमानणें आह्मांस भाग पडलें. आम्ही केलेल्या अन्यायाचें-मी स्पष्टपणें बोलतों परिमार्जन, आमचा लष्करी हेतु सिद्ध झाल्याबरोबर, जितकें होईल तितकें करण्याचा आह्मी यत्न करूं. आमच्या-सारखें संकट ज्यावर येईल त्याचेपुढें एकच विचारें राहाणार तो हाच कीं, लांडगेतोड करून (hack ones way through) पुढें कसें जावयाचें ? "

प्रकरण १४ वें.

राष्ट्रव्यवहारांतील कांहीं नीतितत्त्वें.

या तत्त्वांपैकीं तीन चार विशेष महत्त्वाचीं आहेत. पहिलें तत्त्व ज्यास (Balance of Power) **राष्ट्रशक्तींचा समतोलपणा** म्हणतात तें होय. कोणतेंही राष्ट्र दुसऱ्या स्वतंत्र असलेल्या राज्यांस किंवा त्यांतील भागांस गिळंकृत करून इतकें प्रबल होऊं देतां कामा नये कीं, तें डोईजड होऊन वाटेल तेव्हां शांततेचा भंग करूं शकेल, किंवा वाटेल त्या राष्ट्रास आपल्या कबजांत आणूं शकेल; व सर्व पृथ्वीचें चक्रवर्तित्व आपल्या हातीं वस्तुतः घेऊं शकेल. आणि अशा तऱ्हेची दुसऱ्यास घातक होण्याचा संभव असलेली महत्त्वाकांक्षा धरून कोणी राष्ट्र आगळिकी करूं लागेल, तर त्यास इतर राष्ट्रांनीं संघ करून आळा घालण्याचा उपक्रम केला पाहिजेः—अशी, पाश्चात्य राष्ट्रांत प्रसृत असलेल्या ह्या राष्ट्रशक्तींच्या समतोलपणाच्या तत्त्वाची व्याख्या करितां येईल. अशा तऱ्हेचीं, चक्रवर्तित्व संपादन करूं इच्छिणाऱ्या महत्त्वाकांक्षेचीं आधुनिक युरोपियन इतिहासांतील ठळक उदाहरणें म्हटली म्हणजे, स्पेनचा राजा दुसरा फिलिप, फ्रान्सचा राजा चवदावा लुई, व फ्रान्सचा जगत्प्रसिद्ध बादशहा नेपोलियन बोनापार्ट, हीं होत. इतर युरोपियन राष्ट्रांनीं संघ करून ह्या रावणी महत्वाकांक्षा धरणाऱ्या राजांचा पाडाव केला; व त्या खटाटोपांत इंग्लंडनें प्रमुख भाग घेऊन लोकोत्तर कीर्ति मिळविली, हें इतिहासांत प्रसिद्ध आहेच.

युरोपियन परराष्ट्रनीतींतील दुसरें मान्य झालेलें राजनीतितत्त्व असें आहे कीं, वंशपरंपरा, आचारविचार इत्यादिकांनीं ज्या जाति किंवा पोट-जाती मिळून झालेले लोकसमूह इतरांहून प्रभिन्न आहेत, ते विस्कळित व

असमाधानकारक स्थितींत असतील, तर त्या सर्वांस, एक होऊन, जूट करून आपली उन्नति साधून घेण्याचा नैसर्गिक ईश्वरदत्त हक्क आहे. अर्थात् ह्या हक्कांत व 'कायद्यांत' (म्हणजे प्रस्थापित सत्तेच्या राज्यकर्त्यांनीं आपल्या ताब्यांत असलेल्या प्रजाजनांस घातलेल्या निर्बंधांत) कधीं कधीं विरोध येण्याचा संभव असतो, हें चाणाक्ष वाचकांचे सहज ध्यानांत येईल. उदाहरणार्थ, रशियाच्या ताब्यांत असलेल्या मुसलमानांनीं वसलेल्या मुलुखांतील लोकांस जर एकदृष्टीनें सर्व सजातीय मुसलमानांचें एक प्रचंड साम्राज्य स्थापन करण्याच्या कार्यक्रमांत सामील होण्याचा नैसर्गिक व ईश्वरदत्त हक्क आहे, तर जवळ जवळ तितकाच जोराचा आपल्या प्रजाजनांतील बंडें वगैरे मोडून त्यांस आपल्या ताब्यांत ठेवण्याचा व बंडांत मदत करणाऱ्या परकीयांबरोबर युद्ध करण्याचा अधिकार व हक्क रशियन सरकारासही पण आहे. असा हक्क अमान्य केल्यास अराजकत्वाची तरफदारी केल्यासारखें होईल. पण सुदैवानें, सुज्ञ राज्यकर्ते या उभय तत्त्वांचा व्यावहारिक मेळ, परकीय जातिधर्माच्या लोकांस चांगल्या रीतीनें वागवून, त्यांस समानाधिकारी करून व पर्यवसानीं साम्राज्यांतर्गत स्वराज्य देऊन, घालूं शकतात. किंबहुना, सामान्यतः असा नियम घालून देतां येईल कीं, कोणच्याही राष्ट्रांत अन्य धर्मजातींचे लोक जर सुराज्य आणि स्वराज्य उपभोगीत असले तर त्यांस बंड करण्याचा किंवा स्वजांतीयांच्या दुसऱ्या प्रबल राष्ट्रांत स्वतःस समाविष्ट करून घेण्याचा-हातचें सोडून पळत्याचे पाठीं लागण्याचा-मोह उत्पन्नच होत नाहीं. असह्य जुल्मम-जाचणुकींतून मुक्तता करून घेण्याच्या अन्य उपायांचे अभावीं निर्वाणीचे उपाय योजण्याचा नैतिक हक्क केवळ मनुष्यसमुदायांसच नव्हे, तर व्यक्तींसही आहेच.

युरोपियन राष्ट्रास, ज्या ज्या साधनांनीं आपला पूर्ण विकास करून आपला राज्यविस्तार, सामर्थ्य व ऐहिक सुखसंपत्ति वाढवितां येईल, तीं तीं साधनें दुसऱ्या स्वतंत्र राष्ट्रांवर आगळीक न करितां, योजण्याचा पूर्ण अधिकार आहे. अशा उन्नतीच्या अवश्य साधनांपैकीं एक साधन खुल्या समुद्रापर्यंत आपल्या राज्याचा विस्तार वाढविणें हें होय, असेंही मानलें जातें. अफाट समुद्रांत स्वतंत्ररीतीनें जातां येतां येईल अशीं बंदरें नसल्यास, कोणत्याही राष्ट्राच्या व्यापारास भरभराटी येणें व लढाईचे प्रसंगीं स्वतःची अब्रू राखणें शक्य नसतें, असा इतिहासाचा अनुभव

आहे. ह्या तिसऱ्या तत्त्वांत आणि वर सांगितलेल्या पहिल्या तत्त्वांत कित्येकदा विरोध येतो. उदाहरणार्थ रशिया. हा देश कालक्रमानें पूर्ण लोकसंख्येचा होऊन त्यांतील सध्यां ओसाड पडलेल्या सर्व भागांत वस्ति झाली, व खुल्या समुद्रांत त्याचा पूर्णपणें रिघाव झाला, तर सहजगत्याच तो अत्यंत प्रचंड व प्रबळ होऊन त्याचें वजन युरोपियन राजकारणांत अत्यंत वाढेल व सध्याच्या राष्ट्रांचा समतोलपणा राहाणार नाहीं. तथापि, रशियन लोक हे एकाच जातीचे आहेत, तेव्हां त्याची उन्नति होऊन ते अति प्रबळ होत गेले, तरी दुसऱ्यांच्या विरुद्ध ते आगळिकी करीत नाहींत तोंपर्यंत त्यांचे आड येण्यास किंवा त्यांचे प्रगतीस जबरदस्तीनें अवरोध करण्यास कोणासही नैतिक अधिकार नाहीं, असेंच सध्यांचें मत आहे. अर्थात् स्वतंत्र राष्ट्रांवर अशा वाढत्या राष्ट्रांनीं निवळ आगळीक केली, तर त्या राष्ट्रास आगळीक करणाऱ्या राष्ट्रांशीं झगडण्याचा व दुसऱ्या राष्ट्रांस त्यांचे मदतीस येण्याचा अधिकार आहे.

एखादी जात ईश्वरानें विस्तृत लोकसंख्येची केली आहे, तरी तिचें मोठें राष्ट्र बनूं नये अशी भावना रास्त नाहीं, असें मानलें जातें. पण, असलीं वाढतीं राष्ट्रें जर सुनीत असून त्यांचा राज्यकारभार सुज्ञ मुत्सद्यांचा हातांत असला, तर आपला विस्तार वाढविणें व खुल्या समुद्राशीं स्वतःचीं राज्यमर्यादा नेऊन भिडविणें, हीं कामें तीं, सामदामानें, व समानाधिकारदान इत्यादि प्रेममय उपायांनीं दुसरीं लहानसान राज्यें राजीखुषीनें आपल्या राज्यांत संमीलित करून घेऊन करितात.

युरोपीयन परराष्ट्रनीतींतील चवथें एक तत्त्वही ध्यानांत ठेविलें पाहिजे. तिसऱ्या तत्त्वाप्रमाणें रशिया, जर्मनी ह्यांसारखीं राष्ट्रें प्रबळ होऊन राष्ट्रांच्या समतोलपणाच्या तत्त्वास तात्पुरता बाध आणूं शकतात. उलट, इतरांहून भिन्न अशा लोकांचें राज्य जरी आकार, लोकसंख्या व बल ह्यांनीं लहान असलें, तरी देखील त्या राष्ट्राची इच्छा असेल तर स्वतंत्र राहण्याचा त्यास अधिकार आहे, आणि त्याचे मर्जीविरुद्ध त्यावर कबजा बसविण्याचा कोणी दुर्विनीत राष्ट्र प्रयत्न करील, तर त्याला सर्व सुधारलेल्या राष्ट्रांनीं संघ करून प्रतिरोध करावा, ही नीतिही सर्वमान्य समजली जाते. अर्थात् अशा लहान राष्ट्रांत जोम व जूट आणि स्वतंत्रता पाहिजे; सुराज्यता व लष्करी सुव्यवस्थाही पाहिजे. केवळ रडतरावांस घोड्यावर स्वार करून ठेवण्याचा प्रयत्न कोणीही शहाणा मुत्सद्दी करणार नाहीं; व केलाच तर त्यास यशही येणार नाहीं.

प्रकरण १५ वें.

जुनीं युद्धें व नवीं युद्धें.

युद्धशास्त्र व युद्धकला ह्यांतील प्रावीण्याविषयीं तीन मुख्य सदराखालीं विचार करितां येईल:—

(१) लढाईसाठीं लष्कर, शस्त्रास्त्रसाधनें, सैनिकांचें शिक्षण व त्यांच्या हालचाली, दाणागोटा इत्यादिकांची तयारी. (Organization, training and mobilization)

(२) लढाई सुरू झाल्यावर कोणते सैन्याचे भाग कोठें जमवून ते कोणत्या भागावर स्वारी करण्यास पाठवावयाचे व प्रत्येक स्वारीनें कोणतें ध्येय साधावयाचें याविषयींचें, म्हणजे मोहिमींच्या कार्यक्रमासंबंधाचें योजनाचातुर्य. (Strategy.)

(३) शत्रुशीं सामना झाल्यावर लढाईंत यश येण्यासाठीं योजावयाचे डावपेंच. (Tactics.)

शेवटल्या दोन बाबींसंबंधानें एक सामान्य तत्त्व, पुरातनकाळापासून अभिमत झालेलें व वस्तुतः भविष्यकाळींही अबाधितच राहिलें पाहिजे, असें आहे. तें हें कीं, मोहिमेच्या योजनेंत आणि त्याचप्रमाणें लगट होऊन घडून येणाऱ्या प्रत्येक लढाईंत मुख्य सेनाधिपतीचें खरें चातुर्य म्हटलें म्हणजे, शत्रूच्या सैन्यव्यवस्थेत कोणतें स्थळ दुर्बल आहे, तें शोधून काढून त्यावर आपल्या सैन्यांतील मुख्य भाग एकत्र करून जोराचा मारा करावयाचा; व त्यांत विजय मिळवून शत्रूच्या सैन्याची सर्व घडी मोडून टाकून त्यांच्या विस्कळीत भागांस क्रमाक्रमानें पादाक्रांत करावयाचें ह्यांत दिसून येतें. यासाठीं प्रत्येक सेनापति आपल्या प्रतिस्पर्ध्यास वरील तऱ्हेच्या हुलकावण्या देतो. त्यांत जो दुसऱ्याचे पेंच ओळखून व त्यांचें निवारण करून स्वतःचे पेंच यशस्वी करतो तो जय मिळवितो. हा सामान्य सिद्धांत सांप्रतच्या युद्धासही लागू पडतो, ह्यांत संशय नाहीं.

परंतु ह्यासंबंधींही वर सांगितलेल्या तीन बाबींपैकीं पहिल्या बाबींत आधुनिक काळांत म्हणजे एकोणिसाव्या शतकाचे मध्यापासून, एकामागून एक अशा अत्यंत

लढाई होण्यापूर्वी पंधरा दिवस केसर व झार यांची झालेली मुलाखत.

सर एडवर्ड गोसचेन. (इंग्रजांचे बर्लिन येथील वकील.)

युरोपांतील महायुद्ध—राजमंडल.

जनरल स्काउकहोम लिनोफ.

रशियाचे मुख्य सेनापति.

व्हान टिरपिट्झ.



जर्मनीचे मुख्य ॲडमिरल.

ॲडमिरल सर जॉन जेलिको.

ब्रिटिश आरमाराचे मुख्य सेनापति.

क्रांत्या झाल्यामुळें, पुष्कळ महत्त्वाचे फेरफार घडून आले आहेत. पहिली मुख्य क्रांति म्हटली म्हणजे एक इंग्लंडखेरीज बाकी युरोपांतील प्रत्येक राष्ट्रांत सैन्याची झालेली विलक्षण वाढ ही होय. पूर्वीच्या मनूंत मोठमोठ्या राष्ट्रांचें खडें व कडेकोट तयारीचें सैन्य (Field Army) लाख दोन लाखांवर नसे. त्याहून अधिक नवें सैन्य तयार करण्याचें काम प्रायः लढाई सुरू झाल्यावर हातांत घेण्यांत येई; आणि त्याचा कार्यक्रमही पूर्वी प्रायः निर्णीत केलेला असा नसे. ह्यामुळें मोहिमेच्या योजना विशेष गुंतागुंतीच्या नसत, व मुख्य सैन्यांच्या टक्करी लौकरच घडून येत. त्यांत एखादा निश्चित आणि मोठ्या स्वरूपाचा जय एका पक्षास मिळाला म्हणजे आपल्या जयाचीं सर्व फलें त्वरेनें साधून घेण्याचें चातुर्य व कर्तबगारी विजयी सेनापतीच्या अंगीं असली, तर शत्रूला पुनः तोंड वर करूं न देणें आणि तह करावयास भाग पाडणें हें त्यास सोपें असे. परंतु सांप्रत युरोपियन महाराष्ट्रांचें खडें सैन्य-बळ सातपासून दहा लाखांचें झालेलें आहे, व एकंदर लष्कराचे भाग करून, ते निरनिराळ्या नाक्याच्या ठिकाणीं टेविलेले असतात. हा प्रत्येक भाग स्वतंत्र मोहीम करूं शकेल असा सर्वांगपूर्ण असतो. प्रत्येक सैन्य, पायदळ, स्वार, तोफांचा रिसाला व त्यास अवश्य असलेला दारूगोळा, दाणागोटा व इतर सामुग्री यांनीं सज्ज असतें. हीं सैन्यें वाटेल त्या दिशेकडे नेण्यासाठीं, किंवा प्रसंगीं एकत्र करण्यासाठीं रेलवेरस्त्यांची वगैरे पूर्ण तयारी केलेली असते.

ह्या खड्या सैन्यांच्या पहिल्या ओळीच्या मागें दुसरी एक ओळ असते. ही ओळ, खड्या लष्करांत कांहीं वर्षें चाकरी करून, पुनश्च कांहीं वर्षेंपर्यंत वाटेल त्या वेळेस बोलावणें आल्याबरोबर नोकरीवर रुजू होऊं, अशा शर्तीवर थोडें वेतन देऊन घरीं जाऊं दिलेल्या सैनिकांची असते. त्यांस राखून ठेवलेलें सैन्य (Reserves) म्हणतात, व तें बहुधा दोनचार आठवड्यांत खड्या सैन्याच्या मागें त्यांचें बळ वाढविण्यास आणि त्यांच्यांतील मरण, आजार, जखमा इत्यादिकांनीं पडणाऱ्या खिंडी भरून काढण्यास सज्ज अशा रीतीनें उभारण्याची व्यवस्था असते.

राष्ट्रीय सैन्याची तिसरी ओळ, किल्ले व इतर तऱ्हेची तटबंदी, खंदक, बांध, सुरुंग इत्यादि साधनांनीं सुरक्षित केलेलीं ठिकाणें (Intrenched positions) ह्यांचे संरक्षणार्थ ठेविलेल्या सैनिकांची असते.

ह्यांचे पाठीमागें, देशाच्या संरक्षणार्थ सर्व हातपाय शाबूत असलेल्या नागरिकांनीं तसाच प्रसंग आल्यास युद्धास सज्ज झालें पाहिजे ह्या तत्त्वास अनुसरून प्रचलित असलेल्या सक्तीच्या कायद्याप्रमाणें (conscription) तयार करतां येणाऱ्या लोकांची म्हणजे राष्ट्रीय लष्करी सामर्थ्याची चौथी ओळ येते. यांपैकीं पहिल्या तीन ओळींचें महत्त्व अत्यंत आहे, हें सांगणें नको. चौथ्या ओळींतील लोक विशेष तरबेज असूं शकत नाहींत, व निर्वाणीचे प्रसंग आल्यावर व खड्या सैन्याची पिछेहाट झाल्यावरच त्यांच्यावर भिस्त येते, हें विशेष रीतीनें सांगणें नको.

पूर्वीच्या मनूंत सैन्यें अल्पसंख्याक व साध्या रचनेचीं असल्याकारणानें सर्व लष्करी व्यवस्था, व सैन्य उभारणें, मोहिमीची योजना करणें आणि लढाया करणें, वगैरे सर्व गोष्टींचा सूत्रधारपणा बहुतेक एकाच मुख्य सेनाधिपतीचे हातीं एकवटलेला असे, आणि लढायाही थोड्या परिघाच्या क्षेत्रांत होत असल्यामुळें त्यांतील डावपेंच त्याच्याच तंत्रानें होत. परंतु वर वर्णन केल्याप्रमाणें आतां सैन्यरचना विस्तीर्ण प्रमाणाची व गुंतागुंतीची झाल्याकारणानें आणि महायुद्धांत मोहिमी अनेक दिशांस पाठविणें जरूर झाल्यानें लष्करी खात्यांतील श्रेष्ठ कारभारांत व अधिकारांत श्रमविभागणी झाली आहे. लष्कर गोळा करण्याचें, व त्याचे विभाग करून निरानिराळीं सैन्यें निरनिराळ्या ठिकाणीं भिन्न भिन्न ध्येयें व कार्यभाग साधण्यासाठीं पाठविण्याच्या कार्यक्रमाची सर्व योजना करण्याचें काम एका स्वतंत्र अधिकाऱ्याकडे, व त्या योजनेप्रमाणें वागून लढाया करण्याचें काम दुसऱ्या अधिकाऱ्याकडे दिलेलें असतें. प्रत्येकाचें खातें व ऑफिस निराळें असतें. पहिल्यास "चीफ ऑफ धी स्टाफ" अथवा "जनरालि सिम्मो" व दुसऱ्यास मुख्य सेनानी असें म्हणतात. अलीकडील लढाया मोठ्या प्रमाणावर आणि विस्तीर्ण परिघाच्या क्षेत्रावर होत असल्याकारणानें प्रत्येक सैन्याच्या मुख्य सेनाधिपतीसही खास लढायांत भाग घेतां येत नाहीं. फक्त दुरून टेहळणी करून जागजागीं जाऊन भिन्नभिन्न सैन्याचे तुकड्यांस हुकूम सोडावे लागतात. ह्या गोष्टी पूर्वीं घोडेस्वार व जासूद यांच्या द्वारें होत. आतां त्यास विमानें, तारायंत्र व टेलिफोन यांनीं अश्रुतपूर्व साह्य मिळालें आहे. नवीन मनूंत अर्थातच खालच्या दर्जाच्या कामगारांवर मोठ्या महत्त्वाची जबाबदारी व कामगिरी येऊन पडते. आणि ह्यासाठीं त्यांस अभ्यासक्रमपरीक्षादि कडक शिस्तीखालून जावें

लागतें.साध्या शिपायांसही चांगलें शिक्षण देऊन ते प्रसंगीं स्वतःची बुद्धि खर्च करतील अशा रीतीनें त्यांस तरबेज करण्याची अलीकडे प्रवृत्ति झालेली आहे. सारांश, आधुनिक युद्धशास्त्र व युद्धकला ह्या कठीणांतील कठीण व चिराभ्यासानेंच साध्य होणाऱ्या विद्या झाल्या आहेत.

प्रकरण १६ वें.

आतांचीं शस्त्रास्त्रें.

हिस्तवार उभारलेलें खडें सैन्य वगैरेच्या संबंधानें झालेल्या क्रांतीहून अधिक महत्त्वाची क्रांति लढाईंत वापरल्या जाणाऱ्या शस्त्रास्त्रांत झाली आहे. स्यामुळें लढाईंतील पूर्वींचे डावपेंच सर्व समूळ बदलले आहेत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. ज्याप्रमाणें लढाईंत दारूगोळ्याचा उपयोग प्रथम सुरू झाला त्या वेळीं, पूर्वींच्या मनूंतले तलवार, भाले, धनुष्य ह्या आयुधांनीं चालणारे, घोडेस्वार आणि हत्तीसारख्या प्रचंड प्राण्यांवर विशेष भिस्त ठेवणारे, आणि विस्तीर्ण किल्ल्याचें अतोनात महत्त्व असलेले डावपेंच पूर्ण बदलून गेले, त्याचप्रमाणें तोफा आणि बंदुका यांच्या विध्वंसक शक्तीसंबंधानें गेल्या ५०–६० वर्षांत जी विलक्षण प्रगति झाली आहे, तिच्यामुळेंही लढाईच्या सर्व डावपेंचांत अत्यंत महत्त्वाची क्रांति घडून आलेली आहे. पूर्वींच्या बंदुका व तोफा कामगिरीचे मानानें फार जड असत, त्यांची नळी अगदीं साधी असे, त्यांत भरल्या जाणाऱ्या गोळ्या व गोळे गोल असून, बार पुढल्या बाजूनें रुळानें भरावा लागे. बार सोडण्यासाठीं चकमकीसारखे उपाय करावे लागत. बंदुकीच्या अचूक माऱ्याची मर्यादा पूर्वीं पाव किंवा अर्धा मैल व तोफांची दोन तीन मैल असे, आणि एकेक बार भरण्यास बिलंब लागे. गोळ्या व गोळे कांहीं थोडे यार्डच सरळ जाऊन नंतर पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाच्या व हवेच्या प्रतिबंधाचे योगानें अर्धवर्तुळाकृति मार्ग स्वीकारीत. त्या वेळीं तोफा व बंदुका यांचा दूरचा मारा शत्रूंत गोंधळ उडवून ते भित्रे असले तर त्यांस घाबरवून टाकण्यासच विशेष उपयोगी पडे.

शिस्तवार सैन्यामध्यें लढाई चालली असतां उभय सैन्यानें मुख्य धोरण होतांहोईल तितक्या रीतींनीं शत्रुशीं लगट करण्याचें असे; व शिपायाशिपायांत हातवाईचें द्वंद्वयुद्ध ते घडवून आणीत. तेव्हां लढाई बहुधा एक दिवसाचे आंत आटोपे, आणि पराजित सैन्य पळावयास लागल्याबरोबर त्यांच्या पाठीवर असलेल्या सैन्यास त्यांचा अतोनात विध्वंस करितां येई. त्या समयीं पायदळ शिपायांच्या रांगा मोडण्याचे कामीं आणि शत्रूच्या तोफा हस्तगत करून घेण्याचे कामीं घोडेस्वारांचा अत्यंत उपयोग होत असे. तोफा व बंदुका यांच्या माऱ्यानें फारशी प्राणहानि होत नसल्यामुळें शूर व शिस्तीच्या सैन्यास एकदम चाल करून जाऊन शत्रूशीं लगट करण्यास फारशी अडचण येत नसे. पण हा सर्व प्रकार सांप्रत अगदीं बदलून गेला आहे. उदाहरणार्थ, बत्तीस पौंड वजनाचा गोळा फेंकणाऱ्या तोफेचें वजन पूर्वी ५६ हंड्रेडवेट होतें; तें आतां २६ झालें असून बार मारण्यास पूर्वीच्या अर्धी दारू पुरते. आतांच्या तोफा व बंदुका पूर्वीच्याहून अधिक मजबूत पण वजनास हलक्या असतात. बार भरण्याचा तो तोंड फिरवून भरण्याचे ऐवजीं मध्यभागीं सहज रीतीनें भरण्याची, त्यांत दारू आणि गोळा एकदम त्वरेनें भरण्याची आणि चाप दाबल्याबरोबर बार सुटण्याची व्यवस्था (Breech loading automatic guns) केलेली असते. हल्लींच्या गोळ्या व गोळे लांबट व पुढें कोनस्थानीं टोंक असलेले असे करतात. ते नळींतून बाहेर पडतांना आंतल्या बाजूनें नागमोडीसारख्या खोदणींतून (Groove) फिरत जावे, अशी व्यवस्था असते. ह्यामुळें ते नळींतून बाहेर पडल्यानंतर चक्राप्रमाणें फिरत जातात व त्यामुळें त्यांच्या सरळ व सवेग गतीस गुरुत्वाकर्षणानें बाध न येतां त्यांचा मारा थेट नेमका व लांबवर जातो. उदाहणार्थ, ब्रिटिश सैन्यांतील लीयनफील्ड बंदुकीची गोळी २८०० यार्डपर्यंत अचुक नेमानें व सरळमार्गानें एका सेकंडास २०६० यार्ड ह्या गतीनें जाऊं शकते. फ्रेंच सैन्यांतील ले बेल, जर्मन सैन्यांतील मॉसर, ऑस्ट्रियन सैन्यांतील मांचियर व रशियन सैन्यांतील निगँट ह्या बंदुकीविषयींचे वर सांगितलेल्या मारगिरीच्या बाबींसंबंधाचे आंकडे अनुक्रमें २१८७,२१३२,२०९६ व १९८५ यार्ड आणि २३८०,२०९३,२०३४ आणि १९८० यार्ड याप्रमाणें आहेत. ह्या बंदुकीचें वजन, पुढें लावण्याची संगीन वजा जातां, चार ते साडेचार शेर असतें व लांबी ४४ ते ५० इंचपर्यंत असते. ह्या गोळ्या प्रसंगीं एका

मिनिटास दहावीस सोडतां येतात मशनिगन म्हणून दोनचार माणसांनीं चालवितां येण्यासारखी बंदुक असते. तिच्यांत यंत्रानें बारावर बार भरण्याची योजना असल्यामुळें मिनिटांत शेंकड्यांनी व हजारांनीं गोळ्या सोडतां येतात.

बंदुकीचें वडील भावंड, रावणाहून कुंभकर्णाप्रमाणें विस्तीर्णदेही, जी तोफ त्यांत वर सांगितलेल्या सर्व कृत्ति व शास्त्रीय योजना समाविष्ट असून विशेष हें आहे कीं, त्यांतून सोडावयाच्या गोळ्यांत अत्यंत प्रबळ असे स्फोट होणारे पदार्थ घातलेले असतात. ह्या तोफांचे हॉवित्झर, मॉर्टर, गॅटलिंग, पामपाम, फील्डगन, सीजगन, नेव्हलगन असे नानाविध प्रकार आहेत. व त्यांचा लढाईंतील निरनिराळ्या प्रसगीं विशिष्ट उपयोग केला जातो. त्यांतून सोडल्या जाणाऱ्या गोळ्यांस बांब्स, शेल्स, श्राप्नेल इत्यादि संज्ञा आहेत, त्यांचें सामर्थ्य निरनिराळें असतें व त्यांचा मारा कमींत कमी २ ते ५ मैल असतो. नळीचा व्यास ४ इंचांपासून १७ इंचांपर्यंत असतो. गोळे शत्रूंच्या रांगांत पडल्यावर फुटतात; दर्यावर्दी तोफांचे गोळे जहाजांचें लोखंडी कवच फोडून आंत गेल्यावर फुटतात; आणि ते आसपास असणाऱ्या सर्व वस्तूंचा-किल्ल्यांच्या प्रचंड भिंतींचा देखील विध्वंस करितात. उदाहरणार्थ. ब्रिटिश सैन्यांतील आर्मस्ट्रांग तोफ ५००० यार्ड अंतरावर नऊ फूट लांब रुंदीच्या निशाणावर शेंकडा ९० गोळे अचूक नेमानें टाकूं शकते. या गोळ्यांचें वजन १०-१२ पौंडांपासून हजार पौंडांपर्यंत असतें. जर्मनीनें अँटवर्पचा किल्ला वगैरे हस्तगत करण्यांत वापरलेल्या १७ इंच व्यासाच्या तोफांची गाडी ओढण्यास ४०-४० घोडे लागतात तिच्या चाकांचा व्यास ७ फूट असतो व तोफांचा मारा १० मैलांपर्यंत नेमानें करितां येतो, असें म्हणतात!!! ब्रिटिश व फ्रेंच सैन्यांतील सर्वांत मोठ्या तोफांच्या नळीचा घेर आजपर्यंत १५ इंचांवर नव्हता.

प्रकरण १७ वें.

लढाईंतील नवे डावपेंच.

पूर्वी वर्णन केल्याप्रमाणें युरोपियन राष्ट्रांच्या लष्करी बलाचा झालेला अश्रुतपूर्व विस्तार, त्या बलाची निरनिराळ्या नाक्यांच्या ठिकाणीं ठेविलेल्या

कडेकोट तयारीच्या सैन्यमार्गांमध्यें झालेली विभागणी, मोहिमींची योजना व त्यांची अंमलबजावणी ह्या दोन गोष्टींची पृथक् पृथक् लष्करी मुख्याधिकारांत झालेली योजना व त्यामुळें सध्या झालेली विशिष्टबाबतींतील प्रवीणता, आणि बंदुका व तोफा ह्यांच्या विध्वंशक शक्तींत शास्त्रीय शोधामुळें घडून आलेली आसुरी प्रगति ह्या सर्व गोष्टीमुळें सांप्रत काळीं दृष्टीस पडणाऱ्या

युद्धसंबंधी योजना व डावपेंच ह्यामधील क्रांत्या

अत्यंत महत्त्वाच्या होत. त्यांपैकीं मुख्य क्रांत्या येणेंप्रमाणें:—

(१) आगळीक करून प्रथम चाल करून जाणाऱ्या (Offensive) राष्ट्रानें शत्रूस बरीच हुलकावणी दाखवून विशेष जोराचा मारा कोठें होणार ह्याविषयीं त्यास चकवणें हें बरेंच सोपें असतें. चाल करून येणाऱ्या शत्रूच्या सर्व शक्य मार्गांवर कामचलाऊ प्रतिबंध करण्यापुरत्या सैन्याच्या तुकड्या ठेवून, पाठीमागल्या बाजूस मुख्य सैन्यें तयार करून, प्रथम शत्रूच्या सैन्याच्या सर्व विभागणीची माहिती मिळवून तिजवरून जिकडून शत्रूचा मुख्य मारा होणार असें निश्चित होईल, तिकडेच मुख्य सैन्य जमा करून नेण्यांत आत्मसंरक्षण करणाऱ्या (Defensive) राष्ट्राच्या सेनानायकाचें चातुर्य दिसून येतें. संरक्षक सैन्य चांगलें बलवान् असलें तरी त्यास फार सावधगिरीनें हालचाली कराव्या लागतात. त्यास कांहीं काळ तरी फक्त नाकीं अडवून धरून प्रसंगीं पिछेहाटही करून शत्रुसैन्य कोणत्याही बाजूनें आंत भेद करून येऊं शकणार नाहीं, असें कडें (line of defence) तयार करावें लागतें. एकदा कां शत्रूचें सैन्य आंत आलें व स्वकीय सैन्यबलाचे एकमेकांपासून अलिप्त असे तुकडे झाले म्हणजे मग ढांसळलेली बाजू सांभाळणें फार कठीण जातें.

(२) चाल करून जावयाची ती प्रथमतः तर जितक्या त्वरेनें व भर कुमकेनें होईल तितकी करावी लागते. परंतु शत्रूचें सैन्य खास लढाईसाठीं पुढें ४।५ मैलांचें अंतरावर म्हणजे तोफांच्या माऱ्याच्या कक्षेंत येऊन उभें असलें, तर मग मार्गक्रमणाची गति अगदीं हळू व सावधगिरीची करावी लागते. बंदुकीच्या माऱ्यांत सैन्यें आलीं म्हणजे तर विशेष धिम्मेपणा व सावधगिरी ठेवावी लागते. पूर्वीच्या मनूंत तोफांच्या भडिमाराचा उपयोग प्रायः शत्रुसैन्यांत गोंधळ करून त्यांस घाबरवून टाकण्याकडे होत असे. त्या वेळीं बंदुकीचा माराही फार जलद, जोराचा व अचुक नेमाचा नसल्यामुळें एकदम

लगट करून हस्ताहस्ती द्वंद्वाचा प्रसंग सत्वर येऊन बहुधा एका दिवसांतच लढाईचा निकाल होऊन सोक्षमोक्ष होत असे, हें वर सांगितलेंच आहे. पण अलीकडील काळांतील तोफा व बंदुकींपुढें अशा तऱ्हेची जोराची चाल व लगट करूं पाहणें म्हणजे जवळ जवळ निष्फळ आत्महत्या करण्यासारखें आहे. सध्यांची रीत खूप लांब पल्ल्यापर्यंत सैन्याच्या तुकड्या पसरून हळू हळू पुढें सरण्याची आहे. (extended formations and slow advance) बलिष्ठ महाराष्ट्रांमधील लढायांचें क्षेत्र पाचपंचवीस मैलांचें व मोहिमींचें क्षेत्र शेंदीडशें मैलांचें असतें. पायदळ सैन्यावर त्यांची सारी भिस्त असून. घोडेस्वारांचा उपयोग अघाडीस जाऊन वातमी आणण्याकडे व पाठीमागें होणाऱ्या मुख्य सैन्याच्या जुळवणीस आडपडदा होऊन राहण्याकडे व क्वचित् तोफा काबीज करण्याकडे होतो. पायदळ पलटणी पुढें जातात. त्या हळू हळू डोंगर झाडें इत्यादिकांच्या पडद्यांचा आश्रय घेऊन (taking cover) पुढें जातात. दुरून शत्रूच्या सैन्यास आपण दिसूं नये व त्यांच्यातील अचुक नेम मारणाऱ्यांस आपला एकेक शिपाई अचुक उडविता येऊं नये, म्हणून सैन्याचा पोषाख खाकी, फिक्कट, अस्मानी वगैरे जमीन व गवत इत्यादिकांशीं मिळत्या रंगाचा असतो. मैदानांतून पुढें चाल करून जाणें असल्यास बहुधा रात्रीं, किंवा ढग, धुकें इत्यादिकांनीं सूर्यप्रकाश मंद झाला असेल अशा वेळीं एक दोन मैलांच्या मजलींनीं कूच करितात. प्रत्येक पुढचा पल्ला गांठल्यावर शिपाई ३।४ फूट खोल खंदक म्हणतात व त्यांतील माती पुढें रचून, ह्या खंदकाचे आंत, एकमेकांचे शेजारीं जवळ जवळ निजून, बंदुकींचा मारा करतात. शत्रूंकडील तोफांच्या माऱ्याचें संधान बहुतेक ह्या खंदकांवरच अवलंबून असतें. बऱ्याच लढाया बहुतेक वेळां गोळीबाराच्याच म्हणजे हस्ताहस्तीं लगट न होतां होतात. आपलीं ठिकाणें सांभाळण्यापुरते शिपाई उरले नाहींत असें पाहतांच शहाणीं सैन्यें नवी कुमक मिळेपर्यंत माघार घेऊन मग पुनः खंदक वगैरे खणून (Intrenchments) उठाव करितात. प्रबल राष्ट्रांमधील अलीकडील लढाया पुष्कळ लांब क्षेत्रमर्यादेच्या आणि दिवसांचे दिवस-प्रसंगीं आठवडेच्या आठवडेही—कां चालतात, याचें कारण आतां वाचकांच्या लक्षांत आलें असेलच.

(३) लढणाऱ्या राष्ट्रांचें लष्करी सामर्थ्य पहिल्या प्रतीच्या विस्ताराचें असल्यास अलीकडील युद्धांत किल्ले, तटबंदी वगैरेंचा फारसा उपयोग होत

नाहीं. प्रचंड राष्ट्रांतील लढाया मैदानांवरच जिंकिल्या पाहिजेत, असा आधुनिक युद्धशास्त्रकलेंत मान्य झालेला मोठा सिद्धांत आहे. आधुनिक तोफांच्या स्फोटक गोळ्यांच्या माऱ्यापुढें चिरकाल टिकेल असा किल्ला आतां बांधणेंच अशक्य झालें आहे. आधुनिक किल्ले पूर्वीसारखे प्रचंड विस्ताराचे व पुष्कळ सैन्याचा आंत समावेश होईल असे नसतात. त्यांचा उपयोग फक्त शत्रुसैन्यास कांहीं वेळ अवरोध करावा व तोंपर्यंत स्वसैनेस तयार होण्यास अवधि, व प्रसंगीं आसरा द्यावा, एवढ.च असतो; म्हणून सांप्रतच्या किल्ल्यांची रचना एकाच प्रचंड किल्ल्याची नसून लहान लहान किल्ल्यांच्या एकेरी व दुहेरी कड्यांची असते (Ring-fortresses). शत्रूचें सैन्य दूर अंतरावर थोपवून धरण्यापुरतें मैदानांत लढणारें स्वत:चें सैन्य ह्या किल्ल्यांचे सरक्षणास तयार नसलें तर शत्रूचें मोठें सैन्य त्यावर चाल करून आल्यास; आणि त्यानें अनिवार माऱ्याच्या तोफांचा त्यांवर भडिमार चालविल्यास ही किल्ल्यांची तटबंदी ढांसळलीच पाहिजे. अर्थात् अशीं ठिकाणें सर करण्यास मनुष्यबळ बरेंच बळी द्यावें लागतें. उलटपक्षीं असल्या किल्ल्यांवर वगैरे कोणत्याही कारणासाठीं विशेष भरंवसा टेविल्यास त्यांत बरेंच सैन्य अडतें व खुल्या मैदनांत लढाई करणाऱ्या सैन्यबलांत तितकी खोट येते. हा यापासून तोटा आहे.

(४) पुष्कळ सैन्य एकत्र घनदाट जमवून (Massed Formation) तोंडासमोर हल्ला (Frontal Atrack) करणें हें आधुनिक काळीं अत्यंत हानिकारक झाल्यामुळें लढाई जिंकण्यासाठीं विशेष उपयोगी ठरलेला डावपेंच म्हटला म्हणजे मुख्य सैन्याच्या बाजूनें त्याच्या पाठीकडे जाण्यास सैन्य पाठविणें (Flanking Movement) हा झाला आहे. पाठीमागून शत्रूचें सैन्य यावयास लागलें म्हणजे शहाण्या सेनानीस पीछेहाटीशिवाय दुसरें गत्यंतर नसतें. नुसती माघार घेणें हा पराभव नव्हे. कुमक मिळेतोंपर्यंत माघार घेणाऱ्या सैन्यानें स्वत:च्या ओळी मोडूं न देतां व दारूगोळा, तोफा इत्यादिकांचें संरक्षण केलें तर त्यांत मोठी शिताफी दाखविली असें होतें.

प्रकरण १८ वें.

युरोपियन राष्ट्रांच्या लष्करी प्रगतीची तुलना.

रथलमानानें असें म्हणतां येईल कीं, सैन्याचा विस्तार, खडया सैन्याची कडेकोट तयारी, मोहिमींची व्यवस्था व तत्संबंधीं ठरीव योजना, आणि लष्करी शिक्षण आणि शस्त्रास्त्रसामुग्री या बाबतींत एकंदरीनें जर्मनी सर्वांत श्रेष्ठ आहे–निदान लढाईच्या आरंभीं होता. जर्मनीच्या सैन्यांतील शिस्तीबद्दल व ऑफिसर लोकांच्या शिक्षणाच्या सर्वांगपूर्णतेबद्दलही मोठी ख्याति आहे. युद्धाचा प्रसंग आल्यास आपण शत्रूवर त्यांचें सैन्य तयार होण्याचे पूर्वीच जोरानें तुटून पडूं व त्यांची नांगी मोडून टाकूं; अशा पायावर त्यांच्या सर्व लष्करी सामर्थ्याची बांधणी बांधलेली आहे. ह्यामुळें जर्मनीच्या सैन्याच्या तुकड्या सरहद्दीवर ठेविलेल्या असून, तेथील सेनानीपाशीं उत्तम रीतीनें आंखून तयार केलेल्या अनेक मोहिमांच्या योजना होत्या. जर्मनींत किल्ले, व तटबंदीचीं ठिकाणें अर्थातच फारशीं नाहींत हे त्यांचे गुण झाले. पण उलटपक्षीं असें म्हणतात कीं, जर्मनीच्या सैन्यांतील ऑफिसर शिक्षणातिरेकामुळें केवळ यंत्रमय व मुख्य नेत्यांकडून (Headquarters) हुकूम येतील त्यांचें अवलंबन करणारे झाले आहेत. स्वबुद्धिकर्तृत्वता त्यांच्यांत फारशी दिसून येत नाहीं. साधारण जर्मन शिपायांस तर हुकूम होईल, त्याप्रमाणें हालचाल करण्यापलीकडे शिक्षणच नाहीं असें म्हणतात. खांद्यास खांदा भिडवून जुटीनें, जोरानें व त्वरेनें पुढें चाल करून जाण्याची जी जुनी रीति ती आधुनिक काळीं तेथें फार घातक म्हणून ठरली आहे. यावर व अशाच प्रकारें घातुक असलेल्या घोडेस्वारांच्या हल्ल्यांवर जर्मन लष्कराची असावी त्याहून फार अधिक भिस्त आहे. यानें निर्बळ शत्रु त्वरित पादाक्रांत होतो, पण त्यांत नासाडी पुष्कळ होते, व प्रबळ शत्रूसमोर तर फारच नुकसान होतें.

फ्रेंच व इंग्लिश सैन्यांत जर्मनीच्या इतक्या मोठ्या तोफा नाहींत, पण त्यांचें अचुक नेम मारण्याचें कौशल्य अधिक आहे. त्यांच्या ऑफिसरांस शिक्षण बेताचेंच, परंतु प्रसंग येईल त्याप्रमाणें योग्य युक्ति काढण्याची कर्तबगारी त्यांच्यांत पुष्कळ अधिक आहे. सामान्य शिपाई जर्मन शिपायांपेक्षां

अधिक व हुषार व आत्मप्रत्ययी आहेत, आणि कूच करतांना लपंडावी करण्यांत (taking cover) ते अधिक कुशल आहेत असें म्हणतात फ्रेंच लोकांच्या लष्करी संरक्षकव्यूहांत किल्ले व तटबंदीस बरेंच महत्त्व दिलें जातें.

इंग्लिश सैन्याची गोलंदाजी तर चांगलीच आहे, पण त्यांचे मुख्य गुण म्हणजे चिकाटी व शांतवृत्ति हे होत. ब्रिटिश पायदळाचे व्यूह, त्यांतील सर्व शिपाई कामास येईपर्यंत भंग पावत नाहींत, अशी त्यांची चिरकालगत ख्याति आहे. बेलज्यमच्या सैन्याविषयीं फारसें लिहिणें नको. त्यांचें सैन्य थोडें, त्यावर जर्मनीस प्रचंड मारा करणें अगदीं सुलभ होतें. बेलज्यमला मुख्य आसरा किल्ले तटबंदीचा. हे किल्ले म्हणजे अर्थातच वर सांगितल्या-प्रमाणें आज नाहीं उद्यां सर झालेच पाहिजेत अशापैकीं. त्यांच्यांपाशीं मोठ्या तोफाही फार थोडया. फार तर काय, पण त्यांच्यांजवळ खाकी वगैरे रंगाचे सध्यांचे काळीं अवश्यक असलेले पोषाखही ह्या युद्धाचे आरंभीं नव्हते.

ऑस्ट्रियन सैन्याची उभारणी जवळ जवळ जर्मन सैन्यासारखीच आहे; पण त्यांच्यांतील मुख्य गोम ही कीं, सैन्यांतील पुष्कळ भाग ऑस्ट्रियन व हंगारियन लोकांनीं दडपून टाकलेल्या असंतुष्ट स्लॅव्होनिक लोकांचा आहे. खास स्लॉव्हानिक पलटणी ऑस्ट्रियानें बेलज्यम व फ्रान्सकडे पाठविल्या आहेत, असें म्हणतात. रशियन सैन्यासमोर लढणाऱ्या सैन्यांत स्लॅव्ह शिपायांमध्यें ऑस्ट्रियन व हंगारियन शिपाई घालून रांगा तयार करतात; ह्यामुळें एक-दिलाचें व खऱ्या मानसिक प्रेरणेचें जें सैन्यांत उत्साहबल असतें तें ऑस्ट्रियन सैन्यांत नाहीं. म्हणूनच सांप्रतच्या लढाईंत आजपर्यंतच्या चकमकींत ऑस्ट्रियाचे सगळ्यांत अधिक अपजय झालेले आहेत.

रशियन लष्करी सामर्थ्याचा मुख्य आधारस्तंभ म्हटला म्हणजे रशियन शिपाई. त्यांचा स्वभाव अत्यंत देशाभिमानी, आपत्तीविषयीं बेगुमान आणि अखंड चिकाटीचा. ह्यामुळें सैन्येंच्या सैन्यें नाश पावलीं, तरी रशियास नवीं सैन्याचीं सैन्यें उभारण्याचें सामर्थ्य आलेलें आहे. पूर्वीचे रशियन आफिसर अगदीं जंगली असत. पण आतां ते पुष्कळ शिक्षित झाले असून, त्यांनीं आपले नवे विशिष्ट डावपेंच काढून ते परिपक्व केले आहेत. रशियाच्या सरहद्दींतील (पोलंड) व त्यांच्या जवळील ऑस्ट्रिया व जर्मनीच्या सरहद्दींतील डोंगराळ व दलदलींनीं भरलेल्या प्रदेशांत लढाई करण्यास हे डावपेंच विशेष उपयोगाचे

आहेत असें म्हणतात. रशियन लोकांच्या तोफा, बंदुका वगैरे बऱ्यापैकीं आहेत. पण त्या देशाच्या लष्करी सामर्थ्यांतील मोठी गोम म्हणजे ही कीं, निरनिराळीं सैन्यें व त्यांचीं ठाणीं फार दूर दूर अंतरावर पसरलेलीं आहेत. सैन्यांत येऊन दाखल होणारे रिझर्व वगैरे लोक त्यांच्या पलटणींच्या मुख्य स्थानापासून दूर अंतरावर राहतात. ह्या कारणानें रशियन सैन्यें तयार होऊन सरहद्दीपर्यंत येणें अर्थात् विलंबाचें काम असतें. म्हणूनच रशियाला "स्टीम रोलर" ही संज्ञा मिळाली आहे.

आमच्या हिंदुस्थानांतील सैन्य इंग्लंडसारखेंच थोडें आहे. पण जें आहे तें अत्यंत तरबेज व कडेकोट तयारीचें असें आहे. लॉर्ड किचनेर हे त्याचे सेनाधिपति झाल्यावेळेपासून त्याची तयारी अशा प्रकारची ठेवण्यांत आली आहे. बंगालच्या घोडेस्वारांच्या पलटणी कोणासही हार जाणार नाहींत; असें म्हणतात.

प्रकरण १९ वें.

समुद्रांतील लढाई.

जसें शत्रुसैन्यांतील भेद्य व दुर्बळ ठिकाणें किंवा मर्मस्थलें शोधून काढून त्या ठिकाणीं आपल्या सैन्यांतील श्रेष्ठ व प्रबळ भाग संकलित करून जोराचा हल्ला करणें, आणि अशा रीतीनें शत्रूचें सर्व सैन्य क्रमाक्रमानें चीत करणें, हें जमिनीवरील लढाईंतील मुख्य ध्येय कालानें अबाधित असून फेर-फार व्हावयाचा तो फक्त शस्त्रास्त्रादि साधनें आणि डावपेंच इत्यादिकांतच; त्याचप्रमाणें, दर्यावरील युद्धाचीही स्थिति आहे. त्याचें मुख्य ध्येय द्विविध आहे. तें, (१) शत्रूच्या आरमारी सामर्थ्याचा विध्वंस करणें व (२) शत्रूच्या प्रजेस (अ) बंदरांत तोफांचा भडिमार करून (ब) दर्यावरील त्याचा व्यापार विनष्ट करून आणि (क) त्याच्या अमलांतील दूरचीं बेटें, वसाहती वगैरे कबज्यांत घेऊन, शत्रूचें जितकें सांपत्तिक व दर्यापलीकडे साम्राज्याचें नुकसान करवेल तितकें करणें हें होय. अर्थात् अनुषंगानें स्वदेशाच्या किनाऱ्याचें, दर्यावरील व्यापाराचें, व ताब्यांतील बेटें, वसाहती वगैरेंचें

संरक्षण करणें, ही कामगिरीही देशाच्या आरमाराकडे येते. तिसरी एक महत्त्वाची कामगिरी आरमाराकडे येत असते ती, आपल्या देशांतील सैन्य खुष्की लढाईसाठीं एके ठिकाणाहून दुसरे ठिकाणीं दर्यामार्गानें नेणें असल्यास तें सुखरूप रीतीनें पोंचविणें, त्यास वेळोवेळीं युद्धसामग्री, दाणापाणी वगैरे पोंचविणें आणि व्यवहाराचा रस्ता खुला व सुरक्षित ठेवणें ही होय. कधीं कधीं किनाऱ्याजवळ होणाऱ्या जमिनीवरील लढाईंत मदत करण्याची कामगिरीही देशाच्या आरमाराकडे येते.

हीं निरनिराळीं ध्येयें साधण्याच्या रीतींत ज्यास कोंडमारी (Blockade) म्हणतात त्या डावपेंचाचें महत्त्व विशेष असतें. दर्याबर्दी युद्धांतील कोंडमारी दोन प्रकारची असते. एक खास युद्धसंबंधाची (Naval) व दुसरी व्यापाररोधाविषयींची (Commercial). पहिली कोंडमारी म्हणजे शत्रूचें आरमार त्याच्याच बंदरांत कोंडून ठेवणें ही होय. ह्यांतही खुली कोंडमारी (Open blockade) व पूर्ण कोंडमारी (Close blockade) असे दोन प्रकार आहेत. खुल्या कोंडमारींत शत्रूच्या आरमारास हवें तर खुल्या समुद्रांत बाहेर पडून युद्धास येण्यास मार्ग मोकळा ठेवलेला असतो. ब्रिटिश आरमारी युद्धाच्या इतिहासांत अजरामर कीर्ति मिळविलेला प्रसिद्ध योद्धा नेलसन हा नेहमीं खुल्या कोंडमारीचा पक्षपाती होता, व त्याचे सर्व डावपेंच शत्रूच्या आरमारास खुल्या दर्यांत आणून मग त्यावर हल्ला करावा अशा ध्येयाचे असत. पूर्ण कोंडमारीला स्वतःचें आरमारी सामर्थ्य फारच मोठें असावें लागतें; आणि शत्रूच्या आरमारानें निश्चयच केला कीं आपण आपल्या किनाऱ्याजवळ सुरक्षित बंदरांतच दबा धरून राहणार, तर अशा तऱ्हेच्या कोंडमारीनें जो फायदा होतो तो एवढाच कीं, शत्रूच्या दर्यावरील व्यापाराचा तेणेंकरून समूल उच्छेद करून स्वदेशाचा व्यापार अव्याहत चालविता येतो; पण शत्रूच्या आरमाराचा विध्वंस हा मुख्य हेतु त्यानें साध्य होत नाहीं. व्यापारी कोंडमारी म्हणजे शत्रूच्या अमुक एका कक्षेंतील किनाऱ्याशीं कोणत्याही रीतीचा व्यवहार सर्व जगास मना करणें. अशी कोंडमारी केल्यावर तटस्थ राष्ट्रांसही तेथें आपलीं जहाजें धाडतां येत नाहींत. धाडलीं तर तीं, व त्यांमधील सर्व माल जप्त करण्याचा अधिकार कोंडमारी घालणाऱ्या राष्ट्रास परराष्ट्रव्यवहारनीतीचे कायद्यानें दिलेला आहे.

दर्यावर्दी लढाईसंबंधीं आणखी एक गोष्ट ध्यानांत ठेवण्याजोगी आहे, ती ही कीं, तिचें स्वरूप जमिनीवरील लढाईपेक्षां अधिक उग्रतर व तटस्थ राष्ट्रांच्या हक्कांवर अधिक आगळीक करणारें असतें. जमिनीवरील लढाईंत निव्वळ लुटालुटीचा व लष्करी लोकांखेरीज इतर लोकांस, त्यांनीं शस्त्र हातीं धरलें नसल्यास, कोणत्याही रीतीचा छळ करणें निषिद्ध मानलें जातें. पण दर्यावर्दी लढाईंत प्रतिपक्षाचें कोणतेंही जहाज व त्यावरील सर्व मालमत्ता (ती तटस्थ राष्ट्रांची असली तरी देखील) आणि माणसें अनुक्रमें जप्त व कैद करण्याचा अधिकार लढणाऱ्या राष्ट्रास आहे, असें मानतात. शत्रूचीं व्यापारीं लढाऊ जहाजें शरण आल्यावर जर तीं आपल्या बंदरांत नेणें अशक्य असेल तर त्यांवरील मनुष्यांचे जीव वांचवून तीं जहाजें सपशेल बुडविण्याचाही अधिकार लढणाऱ्या राष्ट्रास आहे. त्याचप्रमाणें लढाईचे सुरवातीस आपल्या बंदरांत असलेलीं शत्रूचीं सर्व जहाजें व मालमत्ता अडवून ठेवण्याचा व वाटल्यास जप्त करण्याचाही अधिकार त्यास आहे. शिवाय, लढाईचे कामीं प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें उपयोगी पडणाऱ्या वस्तूंचा तटस्थ राष्ट्रांनीं प्रतिपक्षांचे राष्ट्रांशीं व्यापार करूं नये, अशी द्वाही फिरविण्याचा अधिकार त्यास आहे. अशा तऱ्हेनें निषिद्ध केलेल्या वस्तु, म्हणजे दारूगोळा, जहाजें व शस्त्रास्त्रें करण्यास लागणारा कच्चा माल, खाण्याचें धान्य वगैरे होत (contrabands of war). जर तटस्थ राष्ट्रांच्या जहाजांत ह्या वस्तु शत्रूंस पोंचत्या करण्यासाठीं घेतल्या आहेत असा संशय आला, तर त्यांस अडवून त्यांची झडती घेण्याचा (Right of search) व तसा माल सांपडल्यास तो जप्त करण्याचा अधिकारही लढणाऱ्या राष्ट्रास आहे. मात्र झडतींत तसा माल सांपडला नाहीं तर क्षमा मागून अब्रुनुकसानीची भरपाई द्रव्यद्वारें करावी लागते.

दर्यावर्दी लढाईसंबंधीं राष्ट्रव्यवहारांत मान्य गणिलेला आणखी एक महत्त्वाचा निर्बंध ध्यानांत ठेविला पाहिजे; तो हा कीं, जरी खुल्या समुद्रावर सर्व राष्ट्रांची सामान्य मालकी आहे असें मानलें जातें, तरी प्रत्येक राष्ट्राचा खास कब्जा त्याच्या किनाऱ्यापासून तीन मैलपर्यंत समुद्रांत चालतो. तटस्थ राष्ट्राच्या किनाऱ्यावरील समुद्रांतील स्वामित्वाच्या ह्या सीमेंत, लढणाऱ्या राष्ट्राच्या जहाजांनीं लढाई करूं नये, असा निषेध आहे. लढणाऱ्या राष्ट्राचें लढाऊ जहाज तेथें आलें तर त्यानें अत्यवश्य असलेली दागदुजी करून आपल्या देशांतील नजीकच्या बंदरापर्यंत सफर करण्यास अवश्य इतकाच

कोळसा व दाणापाणी घेऊन त्वरित निघून जावें, व तें तसें निघून न गेल्यास तटस्थ राष्ट्रानें लढाई संपेपर्यंत त्यास कैद करून त्यांचीं शस्त्रास्त्रें जप्त करून ठेवावीं, असाही निर्बंध आहे. तसें न केल्यास तटस्थेचा भंग केला व विरुद्ध राष्ट्रांशीं उघड शत्रुत्व केलें असें समजलें जातें.

दर्यावर्दी युद्धासंबंधींच्या वर सांगितलेल्या, विनाशक प्रवात व नियम-निर्बंधांविषयींच्या हकीकतीवरून तें जात्याच जमिनीवरील युद्धापेक्षां कितीं तरी अधिक दारुण व प्राण आणि संपत्ति यांचा संहार करणारें आहे, हें सहज लक्षांत येतें. ही दारुणता, अलीकडील शस्त्रास्त्रादि युद्धसाधनांच्या विध्वंसकतेंत जी सैतानी प्रगति (सत्त्वगुणाच्या दृष्टीनें ही भयंकर पिछेहाट होय) झाली आहे, तिचे योगें कल्पनातीत रीतीनें वाढली आहे. नेपोलियन बोनापार्टच्या वेळेच्या एकोणिसाव्या शतकांतील पहिल्या पंधरा वर्षांच्या लढाईचे काळापर्यंत दर्यावरील लढाईचीं मुख्य साधनें जीं जहाजें तीं बहुतेक लांकडाचीं बांधलेलीं असत. तीं वाऱ्याच्या शक्तीनें शिडाच्या साह्यानें हांकारलीं जात. सर्वांत मोठीं गलबतें दोन अडीचशें फूट लांब असत, व त्यांचीं संख्या फार नसे. त्यांवर जुन्या तऱ्हेच्या, साधे गोल गोळे २-३ मैलपर्यंत फेंकणाऱ्या ५० ते १०० तोफा असत. त्यांच्याखालीं फ्रिगेट, स्लूप वगैरे लहान जहाजें असत. लढाई सुरू झाली म्हणजे अधिक बलवान् राष्ट्राचें आरमार प्रतिपक्षाच्या आरमाराची कोंडमारी करी व कांहीं भाग खुल्या समुद्रांत राहीं. फ्रिगेट, स्लूप वगैरे लहान जहाजें व्यापारी जहाजांचे मार्गे लागत व वसाहती व बेटें वगैरे कबजांत घेण्याचें काम करीत. तेव्हां नाविककलेंत फारशी प्रगति झाली नसल्याकारणानें, हीं कामें हळू हळू होत, व प्रत्येक लढाऊ जहाजास पुनः पुनः दागदुजी, दाणापाणी इत्यादिकांसाठीं बंदरावर यावें लागे. त्यांच्या मोहिमींचें क्षेत्रही फारसें मोठें नसे. मुख्य आरमारांची टक्कर वर्षांतून सुमारें एकदां घडून येई. लढाईचा मुख्य डावपेंच शत्रूच्या जहाजाशीं लगट करून तें आपल्या जहाजाच्या चोंचीनें फोडणें, किंवा त्यास आग लावणें, प्रसंगीं त्यावर चालून जाऊन त्याच्या खलाशांची कत्तल करणें असा असे.

पण हा सर्व प्रकार आतां अगदीं बदलून गेला आहे. नेपोलियनच्या वेळची लढाई संपल्यावर **१९ व्या शतकांतील अनेकविध प्रगति** झाली. त्यांतील पहिली महत्त्वाची गोष्ट, जहाजें इंजिनच्या द्वारें चालूं लागलीं, व नाविक-

कलेंत प्रगति झाल्यामुळें मोठमोठीं जहाजें बांधण्याचा प्रघात सुरू होऊन, त्यांस समुद्रांत महिनेच्या महिने काढतां येतील अशी सोय झाली, ही होय. अगदीं तळचा भाग (hull) खेरीज करून बाकीच्या भागावर लोहकवच चढविण्याची युक्ति निघाली, आणि ह्या कवचाची जाडी २ इंचांपासून आतां १२ इंचांपर्यंत येऊन पोंचली आहे.

आपआपलें आरमार वाढवावें अशा तऱ्हेची स्पर्धा सर्व युरोपियन राष्ट्रांत सुरू झाली, पण त्या बाबतींत इंग्लंडचें ट्राफलगारच्या लढाईनंतर स्थापित झालेलें अप्रतिहत आरमारी श्रेष्ठत्व कमी होत नाहीं, असें दिसून आलें. कारण इंग्लंडचीं लढाऊ जहाजें मुळांतच फारच अधिक संख्येचीं, आणि शिवाय नवीन जहाजें अधिक त्वरेनें बांधण्यापुरते त्यांचे कारखानेही अधिक. ही आपली श्रेष्ठता अद्यापपावेतों इंग्लंडनें कायम ठेविली आहे. परंतु इंग्लंडचें आरमार पूर्वी जें सर्व देशांच्या संकलित आरमाराहून वरिष्ठ होतें, तें आतां फक्त कोणत्याही दोन राष्ट्रांच्या आरमारांवर सरशी करण्यास समर्थ एवढ्याच श्रेष्ठतेचें राहिलें आहे. इंग्लंडच्या संख्येइतकीं मोठीं लढाऊ जहाजें आपणांस बांधतां येत नाहींत, तर त्यांचा विध्वंस करण्यासाठीं दुसऱ्या कांहीं युक्त्या शोधून काढण्याकडे त्याच्याशीं चुरस असलेल्या राष्ट्रांचें-विशेषतः फ्रान्सचें-लक्ष एकोणिसाव्या शतकाचे मध्यकालापासून लागलें आणि गेल्या १५-२० वर्षांत जर्मनीचेंही लागलें. ह्या युक्त्यांचे शोधांतीं टॉर्पेडो, माइन्स (खाणी) व सबमरीन (समुद्रांत बुडून चालणारीं व टॉर्पेडोचा मारा करणारीं) जहाजें अस्तित्वांत आलीं.

टॉर्पेडो म्हणजे एक लांबट व टोंकास निमुळती अशी, मागावरील धोंड्याच्या आकाराची, विध्वंसक अशी गनकॉटन नांवाच्या दारूचा मारा करणारी लहानशी, पाण्याच्या आंतून वाहणारी, तोंड मिटलेली नाव आहे, असें म्हटलें असतां चालेल. टॉर्पेडोचा उपयोग १८६९ सालीं मान्य केला गेला. त्या वेळीं त्याची लांबी सुमारें सात आठ फूट असून, त्याच्यांत ६०।७० पौंड गनकॉटनचा बार भरलेला असे; व त्याचा मारा १००० यार्डांपर्यंत होऊं शके. सांप्रतचे टॉर्पेडो २८-३० फूट लांबीचे व आठपासून दहा हजार यार्डांपर्यंत तीनशें पौंडांहून अधिक गनकॉटनचा मारा करणारे असूं शकतात; व त्यांस प्रत्येकीं पांचशेंपासून हजार पौंडांपर्यंत खर्च लागतो! टॉर्पेडो सोडणारी एक विशिष्ट जातीची तोफ टॉर्पेडो

टयूब ह्या नांवाची असते, तिच्या मुखाचा व्यास २१ इंचांपर्यंत असतो. टॉर्पेडोची रचना अशी असते कीं, तो आपल्या टयूबमधून बाहेर पडतांना त्यांतील इंजिन सुरू होतें व त्या इंजिनाच्या शक्तीनें तो पुढें जातो. एका फिरत्या चाकाच्या मार्गें (gyroscope) तो सरळ जातो. तो पुढें जात असतां पाण्याच्या प्रतिरोधानें त्याच्या मुखाशीं असलेलें एक चाक फिरून त्यानें तोंडाशीं बुचासारखा बसलेला स्क्रू निघून जातो व स्क्रूशीं संलग्न असलेली बत्तीवाली कांच मोकळी होते. टॉर्पेडोचा नेम बरोबर लागून, तो, नेम धरलेल्या जहाजावर आदळला कीं, बत्तीवाली कांच्च गनकॉटनवर आदळते, व भयंकर स्फोट होऊन मोठमोठीं लढाऊ जहाजें क्षणांत दुभंग होऊन, १५–२० मिनिटांचे आंत समुद्रतळीं जातात. अशा तऱ्हेचे १०–२० टॉर्पेडो बरोबर घेऊन ते सोडण्याचेंच तेवढें काम करणाऱ्या बोटी निघाल्या.

यानंतर हेंच काम करण्यासाठीं समुद्रांत वाटेल तेव्हां बुडून पाण्यांत प्रवास करणाऱ्या **सबमरीन** बोटी निघाल्या. यांचा आकार व्हेल माशासारखा असून दाबून कोंडलेल्या हवेच्या योगें त्यांनीं खालीं वर जाण्यायेण्याची व टॉर्पेडो सोडण्याची व्यवस्था केलेली असते. ह्या सबमरीन बोटी १८८९ मध्यें फ्रान्स देशानें बांधल्या. नंतर दुसऱ्या लहान राष्ट्रांनीं त्यांचें अनुकरण केलें. त्यांची कल्पना अशी होती कीं, ह्या दोन तऱ्हेच्या टॉर्पेडो बोटींचे योगें इंग्लंडचीं मोठीं लढाऊ जहाजें आपण अगदीं निरुपयोगी करून टाकूं; हा त्यांचा हेतु सिद्धीस गेला नाहीं. जंगी लढाया करण्यासाठीं मोठीं लोह-कवचवालीं जहाजें जरूर आहेतच; असें तज्ज्ञांच मत पडून तीं अधिकाधिक प्रचंड स्वरूपाचीं बांधण्याचा क्रम इंग्लंडनें व इतर मोठ्या राष्ट्रांनीं कायम ठेवलाच. मात्र टॉर्पेडो बोटी व सबमरीन बोटी व त्यांचा पाठलाग करून त्यांस बुडविण्याचें काम करणारीं नवीन लढाऊ जहाजें (डिस्ट्रायर) सर्व देशांनीं आपआपल्या सामर्थ्याप्रमाणें बांधण्याचा क्रम सुरू केला.

मोठमोठ्या लढाऊ जहाजांचें टॉर्पेडोपासून संरक्षण करण्यासाठीं दोन विशिष्ट युक्त्याही योजण्यांत आल्या आहेत. त्या ह्या:—

(१) जहाजासमोर सुमारें २५–३० फूट अंतरावर लोखंडी जाळ्याचें वेष्टण, पाण्यावर ५–७ व खालीं २५–३० फूट खोल असें पसरून ठेवितात.

लॉर्ड किचनेर.



लढाई खात्याचे मुख्य प्रधान.

वुइनस्टन चर्चिल.

इंग्रजी आरमार खात्याचे मुख्य प्रधान.

अंगावर आलेला टॉर्पेडो ह्या जाळ्यावर आदळून फुटतो व जहाजास इजा होत नाहीं.

(२) प्रचंड माऱ्याच्या तोफा सज्ज ठेवून लांबवर अत्यंत उज्ज्वल प्रकाशाच्या ज्योति (Search-ligets) एकसारख्या फिरत्या ठेवून, टॉर्पेडो बोट अथवा सबमरीन दृष्टीस पडली कीं, तीवर मोठा मारा करतात. याशिवाय आणखी नव्या नव्या युक्त्या शोधीत आहेतच. असो. सबमरीन बोटी इंग्लंडनें १९०० सालापासून बांधण्यास सुरुवात केली. सबमरीन बोटी प्रथमतः सुमारें १०० फूट लांब, १२ फूट रुंद, ४९० हार्सपॉवरच्या इंजिनाच्या, पाण्यांत दर तासास १०–१२ मैल जाणाऱ्या व पराकाष्ठेनें शेंदीडशें मैल प्रवास करणाऱ्या असत. अलीकडील सबमरीन बोटी आकारानें दुप्पट, एंजिनशक्ति चौपट असलेल्या, पाण्यांत तासास १८–२० मैल जाणाऱ्या, २ ते ९ हजार मैल प्रवास करूं शकणाऱ्या व पाण्याचे आंत दिवस दोन दिवस राहूं शकणाऱ्या झाल्या आहेत. सबमरीन बोटी पाण्यावर आल्यावर ४–५ फूटांपेक्षां अधिक वर येत नाहींत. यामुळें त्या जवळ जवळ अदृश्य असतात; पण त्यांच्या मध्यभागीं दूरची टेहळणी करण्यासाठीं एक १०–१५ फूट उंच मनोरा (पेरिस्कोप) असतो. त्यांत आसपासच्या भागाचें पूर्ण चित्र वठेल असें फिरत्या आरशाचें चक्र असतें. हा पेरिस्कोप म्हणजे सबमरीनचे डोळे होत. सबमरीन बोट पाण्यावर आली (नवी हवा भरून घेण्यासाठीं तिला तसें वेळोवेळीं करावेंच लागतें) कीं, ती प्रतिपक्षाच्या टेहळणी करणाऱ्या जहाजाचे नजरेस येऊं शकते. त्यांनीं त्वरा व साहस केलें तर पकडलेल्या सबमरीनचें आयुष्य संपतें.

टॉर्पेडोच्या जोडीला आणखी एक अत्यंत विध्वंसक भावंड दर्यावर्दी युद्धांत जन्मास आलें आहे. हें भावंड **पाण्यांतील सुरुंग** (mine) होय. हे सुरुंग दोन प्रकारचे असतात. एक विद्युत्प्रवाहानें शिलगणारे व दुसरे कोणत्याही जहाजाचा त्यांच्यावर आघात झाल्यावरोबर पेटणारे. पहिल्या तऱ्हेच्या सुरुंगाचा उपयोग देशांतील बंदराचे संरक्षणार्थ करितात. बंदराच्या तोंडांशीं त्याच्या पाठीमागें सुरुंग ठेवून त्यांचा बरोबर नकाशा काढलेला असतो, व तो हातांत घेऊन वाटाडी नांव (Pilot boat) सुरुंग टाळून स्नेही जहाजें आंत घेते. हे सुरुंग गोल आकाराचे असून, त पाण्याच्या सपाटीपासून नेमक्या अंतरावर पाण्याच्या आंत तरंगत

राहावे व हाल्हूं नयेत म्हणून त्यांचेखालीं नांगर टाकलेला असतो. दुसऱ्या तऱ्हेचे सुरुंग प्रथम शत्रूच्या आरमारापुढील रस्त्यांची नाकेबंदी करण्यासाठीं योजीत. आतां ते खुल्या समुद्रांत वाटेल तिकडे टाकण्याची राक्षसी रीति प्रचारांत येत आहे. ह्या सुरुंगाचे पुढें एक दांडी दक्षिणोत्तर आलेली असते, तिजवर कोणचेंही जहाज आदळलें कीं, ती एक वळसा घेऊन मुखाजवळील एक स्क्रू काढून टाकते, व टार्पेडोप्रमाणें सुरुंग शिलगून भयंकर स्फोट होतो. प्रतिपक्षानें खुल्या समुद्रांत सुरुंग टाकले असतां त्याविरुद्ध एकच उपाय योजितां येतो. तो हा कीं, लहान मासे धरणाऱ्या बोटी आपल्या मध्यंतरीं एक मोठें जाळें पसरून, समुद्रांतील विशिष्ट भाग शोधीत जातात, त्या जाळ्यांत सर्व सुरुंग सांपडतात व तेवढा रस्ता निर्भय होतो.

प्रकरण २० वें.

समुद्रयुद्धसंबंधीं नव्या सुधारणा.

इ. स० १९०५ सालीं, रुसो-जपानी युद्धांत ॲडमिरल टोगो ह्यांनीं सुशीमा येथें ॲडमिरल रोझडेस्ट व्हेन्सकी ह्यांच्या युरोपांतून आलेल्या आरमाराचा विध्वंस केला. त्या वेळेपर्यंतच्या मुख्य अशा दर्यावर्दी युद्धसामुग्रीचीं व नव्या युक्त्याप्रयुक्त्यांची यादी खालीं दिल्याप्रमाणें आहे:—

१ मोठीं लढाऊ जहाजें—सुमारें ५–६ इंचांचें लोहकवच; वजन १९ ते १६॥ हजार टन; लांबी–रुंदी व खोली अनुक्रमें ४५०, ८० व २७ फूटपर्यंत; एंजिनशक्ति १५ ते १६ हजार हार्सपावरची; गति तासास १८, २० मैल; तोफा १२ इंच व्यासाच्या; नळीच्या ४–५; व खालच्या दर्जाच्या २९ ते ४९; टार्पेडो ट्यूब १०–१५ इंच व्यासाच्या दोन चार; खलाशी ५०० ते ८००.

ह्यांचें काम मोठमोठ्या लढाया करावयाचें व स्वतःच्या किनाऱ्याचे संरक्षणार्थ सज्ज असावयाचें.

२ लहान मोठीं जहाजें—सुमारें २–३ इंचांचें लोहकवच; वजन ३ ते ४ हजार टन; लांबी-रुंदी व खोली अनुक्रमें १००–३५० ते५००-५५०

फूट: गति तासास १८ ते २९ मैल; तोफखाना ९ इंच व्यासाच्या नळीच्या २–४ तोफा व इतर २०–२५; आणि २ ते ९ टॉर्पेडो टयूब व खलाशी ३०० ते ७५०.

ह्यांचें काम शत्रूच्या दर्याविर्दी व्यापाराचा नाश करणें, स्वदेशी व्यापाराचें संरक्षण करणें, शत्रूच्या आरमाराची कोंडमारी करणें, स्वदेशी सैन्यानें भरलेलीं गलबतें नेमलेल्या ठिकाणीं पोंचाविणें, बेटें, वसाहती वगैरे काबीज करणें, बंदरांवर भडिमार करून खंडणी उपटणें वगैरे. (तोफखान्यांनीं वगैरे संरक्षण केलेल्या बंदरांस वेढा घातला असतां तीं शरण न आल्यासच त्यांवर क्रूझरांनीं भडिमार करावा असा नियम आहे, पण तो जर्मनीसारखीं आतताई राष्ट्रें पाळीत नाहींत. उदाहरणार्थ, मद्रासवरील एमडनचा भाडिमार).

३ डिस्ट्रॉयर बोटी—लोहकवचाचा अभाव; वजन ९०० ते १८०० टन; विस्तार २६६×२७×९ फूटपर्यंत; गति तासास ३०–३२ मैलपर्यंत; तोफखाना; दोन चार इंच व्यासाच्या नळीच्या २–४ तोफा; व २–४ टॉर्पेडो टयूब; खलाशी ५० ते १००.

ह्यांचें मुख्य काम टॉर्पेडो बोटी व सबमरीन बोटी यांची शिकार करणें हें होय. संधि सांपडल्यास मोठ्या लढाऊ जहाजांवर टॉर्पेडो टाकणें, व व्यापारी जहाजांवर हल्ला करणें, हेंही काम यांजकडे आहे. मोठया लढाऊ जहाजांमध्यें टक्कर होऊन जंगी लढाई व्हावयाच्या वेळीं, टेहळणी करणें, बातमी आणणें–नेणें, व मोठ्या जहाजावर चाल करून येणाऱ्या टॉर्पेडो व सबमरीन बोटींचा अवरोध करणें किंवा त्यांची खबर देणें, हें काम ह्या डिस्ट्रॉयर बोटींकडे व अंशतः क्रूझर जहाजांकडे येतें. डिस्ट्रॉयरांचे अंगीं विशेष गुण म्हणजे शीघ्रगति हा असावा लागतो. अर्थात् त्यांचा आकार लहान व त्यांवरील तोफा थोडया असतात.

४ टार्पेडो व सबमरीन बोटी—ह्यांचें वर्णन पूर्वी केलें आहे.

५ सुरुंग टाकणाऱ्या व सुरुंग पकडणाऱ्या बोटी:—ह्यापैकीं सुरुंग जाळ्यांत पकडणाऱ्या बोटींचें वर्णन पूर्वी केलेंच आहे. पहिल्या तऱ्हेच्या बोटींत सुरुंग भरून नेण्याचें कोठार असतें. तेथून लहानशा रुळावरून चालणाऱ्या गाड्या सुरुंग टोंकांशीं नेतात. हे सुरुंग समुद्रांत निश्चित ठिकाणीं टाकून नांगर घालून पक्क करण्याची विशिष्ट सामुग्री ह्या बोटींवर असते.

६ **गन बोटी**—ह्या बोटी उघड्या, लहान पण जलद गतीच्या असतात. ह्यांवर खालच्या दर्जाच्या दोन चार तोफा असून, त्यांचें मुख्य कार्य बंदरांमध्यें पोलिसचें काम करण्याचें असतें.

१९०५ सालच्या सुशीमा येथील रशियन-जपानी युद्धांतील लढाईचे पूर्वी टॉर्पेडो, सबमरीन व खाणी यांचें महत्त्व फारसें वाटत नव्हतें; कारण त्यांच्या विध्वंसक शक्तींत इतकी प्रगति झालेली नव्हती. विशेष मोठ्या लढाऊ जहाजांचें व त्यांवरील बारा इंच व्यासाच्या नळीच्या तोफांचें वजन सुमारें ५० टन असून, त्यांतील फुटणारा गोळा ८५० पौंडपर्यंत वजनाचा, व ३००० यार्डांपर्यंत २८ इंच रुंद लोखंडी कवच दुभंग करण्यास समर्थ असा असे. सुशीमाचे लढाईपर्यंत ब्लाकेड वगैरेचें काम क्रूझरकडे सोंपवून मोठीं जहाजें दर्याबाहेर पडत. दोन्ही आरमारें सारख्या शक्तींचीं असलीं, तर तीं बहुतकरून एकदा सामना करून, युद्धाचा निकाल करून घेण्याविषयीं आतुर असत. त्यावरून, नवीन मनूंतील दर्यावर्दी लढाया त्वरित, निर्वाणीच्या आणि एका पक्षाचा समूळ उच्छेद करून युद्ध लौकर निकालास आणणाऱ्या होतील, असा पुष्कळांचा अजमास होता. पण हीं सर्व अटकळ सांप्रतच्या प्रचंड युद्धांत चुकीची ठरत आहे, व प्रचंड आरमारवाल्या प्रबळ राष्ट्रांमधील दर्यावर्दी युद्ध जमिनीवरील युद्धापेक्षांही अधिक लांबणीचें होणार, व श्रेष्ठ आरमारासही यश संपादन करण्यास पुष्कळ झीज सोसावी लागून शांतपणें सावधपणा ठेवावा लागणार, हें सिद्ध होत आहे. ह्याचीं कारणें **सुशीमाचे लढाईनंतरच्या प्रगतींत** दिसून येतात. गेल्या दहा वर्षांतील ह्या विध्वंसक प्रगति खालीं दिल्या आहेत:—

(१) ड्रेडनॉट व सुपर ड्रेडनॉट नांवाच्या महाराक्षसी लढाऊ जहाजांचा अवतार.—इंग्लंडनें पहिली ड्रेडनाट १९०६ सालीं बांधली. तिचें वजन १८९०० टन; आकार ५२६×८०×३ फूट; १२ इंची १० तोफा; १२ पाउंड तोफा २४; व १८ इंची ४ टॉर्पेडो ट्यूब; शक्ति २३००० हार्सपॉवर; ताशीं २४ मैल जाणारी; ८०० खलाशी आंत असणारी; हिची किंमत २० लक्ष पौंड होती. १९१३ सालीं इंग्लंडनें क्वीन एलिजाबेथ वर्गाच्या ५ सुपर (वरिष्ठ) ड्रेडनॉटी बांधल्या. त्यांना खर्च ३० लक्ष पौंडांवर लागला. त्यांचें वजन २७५०० टन, आकार सुमारें ६९०×९० फूट; तोफा १५ इंच व्यासाच्या ८; १२-६ इंच.

व्यासाच्या १२; व टॉर्पेडो ट्यूब २१ इंच व्यासांच्या चार; हॉर्सपॉवर ९८०००; गति ताशीं २९ मैल; व त्यावर खलाशी १००० वर आहेत. १५ इंच व्यासाची तोफ १ टन वजनाचा कुलपी गोळा सोडून ७ मैल अंतरावरील जहाजाचें १०-१२ इंच रुंदीचें लोहकवच फोडूं शकतो. हा गोळा, आल्पस् पर्वताइतक्या इंचीचाही मध्यें एखादा अडथळा असल्यास तो ओलांडून २५ मैलपर्यंत जाऊं शकतो. १५ इंची तोफा फक्त ८-१० ब्रिटिश ड्रेटनॉटवर आहेत. जपान, अमेरिका व फ्रान्स ह्यांच्या कांहीं ड्रेटनॉटवर १४-९ इंच व्यासाच्या तोफा आहेत. जर्मनीच्या ड्रेडनॉटवर १३-६ इंचांपेक्षां अधिक व्यासाच्या तोफा नाहींत असें म्हणतात. ड्रेडनॉटवरील तोफांचीं अजस्र तोंडें जहाजांच्या मजल्यावर आलेलीं असतात. पण त्यांची सर्व यंत्रसामुग्री तळाशीं असून दुर्बिणी व तारायंत्र यांचे द्वारें सुरक्षित ठिकाणापासून त्यांचा नेम नियमित करतां येतो. ह्या सर्व तोफा एकदम आठहीं दिशांकडे किंवा वाटेल तेव्हां एकाच निशाणावर मारतां येतात.

(२) **बॅटल् क्रूझरचा अवतार.**—वर सांगितलें आहे कीं, सुशीमाचे लढाईपूर्वीं मोठीं लढाऊ जहाजें कमी गतीचीं असून शत्रूंच्या जहाजांचा पाठलाग करण्याचें काम क्रूझर, डिस्ट्रायर इत्यादि लहान जहाजांकडे असे. नवीन अवतीर्ण झालेल्या बॅटल् क्रूझरमध्यें ड्रेडनॉटचें सामर्थ्य, व क्रूझर व डिस्ट्रायर यांचें शीघ्रगामित्व यांचा संयोग करण्याची योजना आहे. इंग्लंडपाशीं असल्या त्वरितगति ड्रेडनॉट ८ आहेत. पैकीं १९११ सालीं बांधलेली क्वीन मेरी, २८८९० टन वजनाची, आकारानें ७२५×८७×३० फूट; हॉर्सपॉवर ७९०००, गति ताशीं २७ ते ३३ व प्रसंगीं ३९ मैल; तोफा १३-५ इंचाच्या ८; आणि इतर २०; व वर खलाशी ८००; अशी आहे. वजन कमी केल्याशिवाय शीघ्रगति साधत नाहीं, म्हणून ड्रेडनॉटच्या लोहकवचाची जाडी १२-१३ इंच, तर बॅटल्-क्रूझरची ९ इंच असते; आणिं त्यांवर १५ इंची तोफा नसतात; पण टॉर्पेडो ट्यूब मात्र भल्या जंगी असतात.

(३) **मॉनिटॉरचा अवतार**—ह्या बोटी अगदीं नवीन निघाल्या आहेत. त्यांना बोटी म्हणण्यापेक्षां २-४ प्रचंड तोफांचा पाण्यावर तरंगणारा प्लॅटफार्म म्हटलें तर अधिक योग्य होईल. ह्या बोटी लहान व उथळ

असतात. जमिनीवरील युद्धास दयातून मदत करण्यास ह्यांचा उपयोग फार होतो. अर्थात् ह्या लांबच्या पल्ल्यावर धाडतां येत नाहींत.

(४) **सुरक्षितता व संहारकता वाढविणाऱ्या कल्पना**—ह्या अनेक तऱ्हेच्या नव्या नव्या निघाल्या आहेत. चालत्या जहाजावर तें जेथें चालून येईल, तेथेंच बरोबर गोळा पडावा असा तोफांचा मारा करण्याची युक्ति निघाली आहे. मोठ्या तोफांतून मिनिटास ४–९ ते १० पर्यंत गोळे टाकतां येतात. मात्र दोन–चारशें गोळे टाकल्यावर नव्या १३–१५ इंची तोफांची नळी बिघडून जाते. जर्मनीच्या क्रूपच्या तोफा ओतीव लोखंडाच्या आहेत. त्या वरील रीतीनें क्षीणशक्ति झाल्यावर टाकून द्याव्या लागतात; पण त्या लौकर तयार करतां येतात. इंग्लंडच्या आर्मस्ट्रांगच्या तोफांतील नळीवर तारेचें वेष्टन खूप जाड असें गुंफिलेलें असतें. ह्या तोफा तयार करण्यास वेळ लागतो; पण ह्या लौकर बिघडत नाहींत व फक्त आंतील नळी बदलली म्हणजे नव्यासारख्या होतात. मोठ्या लढाऊ जहाजांचे तळ एकमेकांहून भिन्न अशा पाण्यास अभेद्य व प्रत्येक स्वतः तरंगूं शकेल, अशा विभागाचे करतात. तेणेंकरून कांहीं भाग फुटले तरी जहाज खालीं जात नाहीं. कोळसा खाणारीं पूर्वीचीं रेसिप्रोकेटिंग एंजिनें जाऊन, त्यांचे ऐवजीं पेट्रोलनें चालणारीं कर्बाईन एंजिनें प्रचारांत आलीं आहेत, व सर्व राष्ट्रांत पूर्वीपेक्षां निम्या वेळांत जहाजें तयार करण्यापुरती कारखान्यांत सुधारणा झाली आहे.

(५) **वायरलेस**—हवेंतून विजेच्या द्वारें बातम्या पाठविण्याची, बातम्या येण्याची वगैरे व्यवस्था लढाऊ जहाजावर आतां केली आहे. त्यामुळें जमिनीवरून देखील दर्यांतील जहाजांस संदेश पोचवितां येतात. ह्यामुळें व्यापारी जहाजांस विध्वंस करण्याच्या कृतीस खूपच साह्य मिळालें आहे.

(६) **विमानें**—जमिनीवरील लढाईप्रमाणें दर्यावरील लढाईंतही विमानांचा उपयोग करूं लागले आहेत. टेहळणी, शत्रूच्या जहाजाचें विशेषतः सबमरीनचें ठिकाण निश्चित करणें, प्रतिपक्षाच्या जहाजांवर बांब टाकणें इत्यादि कामगिरी यांचेकडे असते. इंग्लंडनें नवी सीप्लेन नांवाचीं विमानें काढलीं आहेत, त्यांचा विशेष गुण हा आहे कीं, तीं हवेंत उडतात व पाण्यावरही लाटाप्रमाणें तरंगूं शकतात. प्रत्येक मोठ्या लढाऊ जहाजावर अशीं विमानें ठेवण्याची व्यवस्था झालेली आहे. शिवाय प्रत्येक मोठ्या जहाजावर विमानें

फोडणाऱ्या तोफा ठेवलेल्या असतात. त्यांचें तोंड सरळ वर केलेलें; पण वाटेल त्या कोणावर फिरवून वर करतां येणारें असतें व त्यांतून उडणारा गोळा वर गेल्यावर फुटतो व असंख्य लहान गोळ्यांचा वरील विमानावर वर्षाव करितो.

(७) इतर साहित्यसंभार—अलीकडील आरमारें खुल्या समुद्रांत बाहेर पडलीं, तर त्यांचेबरोबर आनुषंगिक साहित्यसंभार अनेक तऱ्हेचा असतो. दारूगोळा, कोळसे किंवा पेट्रोल, दाणापाणी इत्यादि पुरविणारीं व्यापारी जहाजें, हॉस्पिटल जहाजें, समुद्रांतल्या समुद्रांत दारुजी करणारीं जहाजें व सुरुग टाकणारीं व सुरुंग जाळ्यांत पकडणारीं जहाजें त्यांचे समागमें असतात. ह्यामुळें सामर्थ्यवान् आरमार महिनेचे महिने दर्यात राहूं शकतें. पूर्वीप्रमाणें वारंवार त्यांस बंदरांत यावें लागत नाहीं.

इतक्या नानाविध नव्या कल्पनिकल्पना गेल्या दहा वर्षांत अमलांत आल्या आहेत. त्यामुळें दर्यावर्दी लढाई करण्याच्या रीतींत व डावपेंचांत अर्थात् प्रचंड फेरफार झाला आहे. शिवाय प्रचंड शक्तीच्या आरमारांमध्यें सांप्रतच्या युद्धाइतका दीर्घ व प्रचंड संग्राम गेल्या शंभर वर्षांत झालाच नाहीं, असें म्हटलें पाहिजे. जें नांव घेण्यासारखें युद्ध झालें, तें रशिया व जपान यांमध्यें; आणि तेंही दहा वर्षांपूर्वीं. तेव्हां अलीकडील पुष्कळ प्रगति झाल्या नव्हत्या.

प्रकरण २१ वें.

ऑस्ट्रिया-हंगेरी.

ऑस्ट्रियाचें राजघराणें.

ऑस्ट्रिया-हंगेरी या राष्ट्राच्या बादशहाचें नांव पहिला फ्रान्स जोसेफ असें असून त्याच्या वयास नुक्तीच ८४ चवऱ्याऐंशीं वर्षें पुरीं होतील. हा इसवी सन १८४८ त ऑस्ट्रियाचा बादशहा झाला व त्या नंतर १९ वर्षांनीं म्हणजे इ. स. १८६७ त हंगेरीचें राज्यपद याला प्राप्त झालें. याचा विवाह इ. स. १८५४ सालीं, बव्हेरियाचा डयूक मॅक्झिमिलिअन याची कन्या एलिझाबेथ हिच्याशीं झाला. ही राणी १८९८ त

मरण पावली. तिला दोन मुली असून त्या अनुक्रमें बव्हेरिया व ऑस्ट्रिया टस्कनी येथें दिल्या आहेत.

सर्व्हियन माथेफिरूकडून ज्याचा खून होऊन प्रस्तुतच्या महायुद्धास निमित्तमात्र कारण झालें, तो आर्च डयूक फ्रान्स फार्डिनांड हा वृद्ध जोसेफ बादशहाच्या नंतर या तख्ताचा अधिपति होणार होता. त्याचें वय ९१ वर्षांचें होतें. मात्र हा गादीचा हक्क एकट्या फार्डिनांडपुरताच होता. त्याच्या पुत्रपौत्रांचा या गादीवर हक्क नाहीं, असा त्याजकडून करार करून घेण्यांत आला होता. आर्च डयूक फर्डिनांड हा प्रस्तुतच्या बादशहाच्या धाकट्या भावाचा वडील मुलगा होय. त्याच्या पाठीमागल्या दोन बहिणी असून, त्यांचे विवाह झालेले आहेत.

हें राजघराणें सुमारें ७०० वर्षांचें जुनें असून, त्याचा पहिला पुरुष एक जर्मन कौंट होता, व याच पुरुषाला इ. स. १२७३ त रोमचें राजपद देण्यांत आलें होतें. या राजघराण्यास 'हॅब्सबर्ग-लोरेन' राजवंश असें म्हणतात. गादीवरील पुरुष, रोमन कॅथोलिक पंथाचा असावा लागतो. सध्याच्या बादशहाला ऑस्ट्रियाचा बादशहा व हंगेरीचा राजा म्हणतात. या दोन्ही देशांच्या तिजोरींतून मिळून, त्याला दरसाल खानगी खर्चासाठीं २,२६,००००० क्रौन (२४ क्रौन म्हणजे १ पौंड) मिळतात.

राज्यकारभार.

ऑस्ट्रिया-हंगेरीचा बादशहा जरी एक आहे; तथापि ऑस्ट्रिया आणि हंगेरी हीं दोन निरनिराळीं संस्थानें असून, त्यांचा कारभारही बहुतेक स्वतंत्र रीतीनेंच चालतो. प्रत्येकाची राज्यघटना निराळी, राज्यकारभाराचीं खातीं वेगळीं व स्वत:च्या नियमनासाठीं कायदे करण्याचा अधिकारही स्वतंत्र आहे. कांहीं थोडीं राज्यकारभाराचीं खातीं मात्र दोन्ही देशांचीं एकच आहेत. तीं खातीं म्हटलीं म्हणजे (१) परदेशांशीं चालणारीं राजकारणें; (२) लष्करी व आरमारी कारभार; आणि (३) या दोन बाबींची जमाबंदी हीं होत. उभय देशांचें हें संयुक्ततेचें नातें कायमचें असून, इ. स. १८६७ त उभय संस्थानांच्या राज्यसभांच्या अनुमतानें एक करारनामा होऊन तें मुकरर झालेलें आहे.

राजकीय बाबतींत हे दोन्ही देश जसे कायमचे बांधले गेले आहेत, अथवा संयुक्त झाले आहेत, तसे व्यापारी बाबतींत झालेले नाहींत. व्यापारी बाबतींत दोन्ही देशांचे व्यवहार एकमतानें चालतात हें खरें; पण या बाबतींतील करार प्रत्येक दहा वर्षांनीं पुनः मंजूर करून घ्यावे लागतात. या करारान्वयें उभय देशांतील जकाती (कस्टम) सारख्या असून, नाणीं, वजनें व मापें आणि देशांत तयार होणाऱ्या मालावरील कर हीं सर्व एक आहेत.

सन १९१३ सालीं दोन्ही देशांची मिळून जमाबंदी ४९,३४,००,३२२ क्रौन होती; व त्यापैकीं कस्टमचें उत्पन्न १९,७७,०४,१६९ हातें. खर्चाच्या बाबींपैकीं सर्वांत मोठी बाब सैन्याच्या खर्चाची आहे. सन १९१३ सालीं लष्करी खात्याकडे ३९,५९,६८,६१२ क्रौन, व आरमाराकडे ७,४२,५७,२१० क्रौन याप्रमाणें राष्ट्राच्या तिजोरींतील जमाबंदीचा खर्च झाला.

लष्कर व आरमार.

ऑस्ट्रिया-हंगारी हा देश यूरोपच्या मध्यभागीं आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. याच्या पश्चिमेस जर्मनीपैकीं बव्हेरिया प्रांत, कॅन्टन ऑफ सेंट गॅलन, कॅन्टन गॉबूडेन आणि इटली देश आहे. दक्षिणेस इटली, मांटिनिग्रो, तुर्कस्तान, सर्व्हिया आणि रूमानिया हे देश आहेत. पूर्वेस रूमानिया व रशिया, उत्तरेस रशिया, व प्रशिया व सॅक्सनी याप्रमाणें निरनिराळ्या देशांच्या भागांनीं हा देश चारी बाजूंनीं व्यापिलेला आहे. अशा रीतीनें भिन्न भिन्न देश या राष्ट्राच्या चौफेर वसलेले असल्यामुळें स्वसंरक्षणासाठीं या राष्ट्राला बरीच मोठी लष्करी व आरमारी फौज पदरीं बाळगावी लागली आहे.

या राष्ट्राच्या लष्कराचे दोन विभाग आहेत. यांपैकीं एक विभाग ऑस्ट्रिया व हंगारी या दोन देशांचा संयुक्त असून त्याशिवाय या देशांपैकीं प्रत्येकाचें स्वतंत्र सैन्य आहे. नवीन जोडलेले प्रांत म्हणजे बॉस्निया व हर्झगोविना यांत उभारलेलें सैन्य हें संयुक्त सैन्यापैकीं आहे. या संयुक्त सैन्यास 'कॉमन आर्मी' म्हणतात.

या राष्ट्रांतील सर्व रयतेनें लष्करी शिक्षण घेतलेंच पाहिजे, असा कायदा आहे. ह्या कायद्याच्या अंमलबजावणीपासून कोणत्याही जातीचे, वर्णाचे किंवा धर्माचे लोक वगळलेले नाहींत. या कायद्यामुळें नवीन जोडलेल्या प्रांतांतील मुसलमानांसही शिपाईगिरींत शिरावें लागलें आहे. येथील कायदा

असा आहे कीं, ज्यांचें वय १९ वर्षांहून अधिक आहे व ज्यांचे वयास ४२ वर्षें पुरीं झालेलीं नाहींत, अशा सर्व पुरुषांनीं लष्करांत दाखल झालें पाहिजे. संयुक्त सैन्यांत दरसाल सुमार दीड लक्ष लोकांची भरती करण्यांत येते. एकंदर राष्ट्राच्या पायदळ सैन्याचे १६ विभाग करण्यांत आलेले आहे.

घोडेस्वारांच्या कायम तुकड्या ६ असून (यांपैकीं ३ नेहमीं रशियन सरहद्दीवर ठेवलेल्या असतात) लढाईचे वेळीं ८ तुकड्या उभ्या करण्याची व्यवस्था आहे. पायदळाची प्रत्येक तुकडी ३४,००० ची व घोडेस्वारांची ४००० ची असते. एकंदर खडें सैन्य सुमारें ८,२०,००० आहे.

आरमाराची तयारी नेहमींच चांगली ठेवण्यांत येते. प्रतिवर्षीं जुनीं जहाजें रद्द करून नवीन जहाजें बांधण्याचें काम चालू असतें. आरमाराचें मुख्य ठिकाण आड्रिआटिक समुद्रांत 'पोला' हें आहे. याशिवाय डालमेटियाच्या किनाऱ्यावर आरमाराची बरींच ठिकाणें आहेत. आरमारांत ड्रेडनॉट ४, प्रीड्रेडनॉट १२, क्रूझर १२, टॉर्पेडो गनबोट ७, टॉर्पेडो बोटी ६२ आहेत. सन १९१३ सालीं आरमारांत अंमलदार ९०७, सुतार, लोहार, इंजिनिअर वगैरे १,५१३ व १५,५०० खलाशी होते. शिवाय थोडींशीं आकाशयानेंही फौजेंत आहेत.

व्यापार.

परदेशांतून या देशांत येणारा मुख्य माल म्हटला म्हणजे कापूस, कोळसा, तंबाखू, कॉफी, लोंकर, रेशीम, यंत्रें व कातडीं ह्या जिनसा होत. येथून बाहेर जाणाऱ्या मालापैकीं मुख्य जिनसा म्हटल्या म्हणजे साखर, लांकूड, कांचेच्या जिनसा, धातूंच्या जिनसा ह्या होत. सन १९१२ सालीं हिंदुस्थानांत या देशांतून १९,९३,१४,००० क्रौनांचा माल आला होता; व हिंदुस्थानांतून त्या देशांत ६,३४,३५,००० क्रौनांचा माल गेला होता.

लोकसंख्या.

ऑस्ट्रियांतील एकंदर लोकसंख्या २,८३,२४,२१० असून तिचे विभाग पुढीलप्रमाणें पाडतां येतील:—

जर्मन	९९,१०,२६६
बोहेमिअन, मोरेव्हिअन व स्लोव्हाक	६,४,३५,९८३
पॉलिश	४९,६७,९८४

रुथेनिअन	३५,१८,९८४
स्लोव्हेनी	१२,९२,९४०
सर्व्हियन व क्रोशियन	७,८३,३१४
इटालियन व लेडिन	७,६८,४२२
रुमानियन	२,७५,११५
मागीर	१०,९७४

याशिवाय कामकाजानिमित्त आलेले परकी लोक सन १९१० सालीं ५,८३,१२६ होते. सर्वांत जास्त प्रजा रोमनकॅथोलिक व त्याचे खालोखाल ग्रीककॅथोलिक आहेत.

हंगारीची लोकसंख्या २,०८,८६, ४८७ असून तिचे विभाग पुढील-प्रमाणें आहेतः—

मागीर	१,००,५०,५७५
जर्मन	२०,३७,४२५
स्लोव्हाक	१९,६७,९७०
रुमेनियन	२९,४९,०३२
रुथेनियन	४,७२,१८७
क्रोशियन	१८,३३,१६२
सर्व्हियन	११,०६,४७१

या सर्वांत रोमनकॅथोलिक जास्त असून ग्रीककॅथोलिकांचा नंबर दुसरा आहे.

प्रकरण २२ वें.

सर्व्हिया.

सर्व्हिया हा ऑस्ट्रिया-हंगारीचा दक्षिणेकडील एक लहानसा शेजारी आहे. याच्या उत्तरेस हंगारी, पश्चिमेस आस्ट्रियाहंगारीच्या राज्यापैकीं बोसनिया प्रांत, मांटेनिग्रो व आलबेनिया, दक्षिणेस ग्रीस व पूर्वेस बलगेरिया व रुमानिया देश आहेत. आड्रियाटिक समुद्र याच्या पश्चिमेकडील बाजूस आहे. पण तो समुद्र व हा देश यांच्यामध्यें आस्ट्रिया-हंगारीच्या राज्याचे बॉस्निया

व हर्जेगोविना हे प्रांत व त्याखालीं मांटेनिग्रो व आलबेनिया हीं स्वतंत्र संस्थानें असल्यामुळें स्वतःचें व्यापाराचें बंदर त्याला नाहीं. १९१२।१९१३ सालांत जें बाल्कनयुद्ध झालें त्या युद्धानें सर्व्हियाला थोडासा प्रांत मिळवून दिला व त्याची सरहद्द वाढविली. ही नवी सरहद्दच वर सांगितली आहे. बाल्कन युद्धाची इतिश्री ता. २९ जुलै १९१३ रोजीं बुकारेस्टच्या तहानें झाली. ह्या तहान्वयें सर्व्हियाला १९,२४१ चौरस मैल क्षेत्रफळाचा व १६,३६,२९१ लोकवस्तीचा नवा मुलूख मिळाला. हा सर्व मुलूख मिळून सर्व्हियाचें क्षेत्रफळ आज ३३,८९१ चौरस मैल आहे, व त्यांतील लोकसंख्या ४९,४७,९९२ आहे. बेलग्रेड हें या देशाचें राजधानीचें शहर होय. हें शहर हंगारीच्या सरहद्दीपासून अगदीं नजीक आहे. सन १९१० त या शहरीं ९०,८९० लोकवस्ती होती.

राजघराणें.

येथील राजघराण्याचा इतिहास बराच जुना व अनेक गंडांतरांचे अनुभव घेतघेत बनलेला आहे. आज ज्या घराण्याकडे या देशाचें राजपद आहे, त्याचा संस्थापक करजॉर्ज पेट्रोव्हिच नांवाचा होता. इ. स. १८०४ मध्यें त्यानें 'कमांडर-इन चीफ्' म्हणून सर्व्हियाचें आधिपत्य आपल्याकडे घेतलें. सध्याचा सर्व्हियाचा राजा पहिला पिटर हा करजॉर्जचा नातु होय. त्याचें वय ७० वर्षांचें आहे. याचा विवाह मांटेनिग्रोच्या राजघराण्यांतील कन्येशीं झाला होता. ही राणी इ. स. १८९० त मरण पावली. त्यानंतर पिटर राजानें पुन्हा विवाहाचा सोहाळा करून घेतला नाहीं. त्याला दोन मुलगे व एक मुलगी आहे. त्यांपैकीं थोरल्या मुलानें आपला गादीवरील हक्क आपल्या धाकट्या भावास-अलेक्झँडर यास-दिला आहे. याचें वय २६ वर्षांचें आहे. राजाची खानगीकडील नेमणूक १२ लक्ष दिनारांची (२५ दिनार=१ पौंड) आहे. सर्व्हिया हा स्वतंत्र देश आहे, असें इ. स. १८७८ च्या बर्लीनच्या तहानें ठरलें आहे.

राज्यकारभार.

येथील राज्यकारभार राजाच्या हातीं आहे. तो अष्टप्रधानांच्या मदतीनें कारभार चालवीत असतो, ह्या अष्टप्रधानांपैकीं कांहीं प्रधान राजा नेमतो; व कांहीं 'नॅशनल असेम्ब्ली' नांवाची लोकप्रतिनिधि सभा आहे तिच्याकडून

नेमण्यांत येतात. या सभेंत १६६ प्रतिनिधि असतात, व ते सर्व लोकांनीं निवडलेले असतात. ही निवडणूक दर चार वर्षांनीं होते. लोकप्रतिनिधि सभेंतील सर्व सभासद एकाच मताचे असतात असें नाहीं. त्यांच्यांतही पक्षभेद असतात. सध्यांच्या सभेंत १४२ रॅडिकल आणि प्रोग्रेसिव्ह, २२ नॅशनलिस्ट व २ सोशियालिस्ट आहेत.

लोक, धर्म व शिक्षण.

येथील लोकांना सर्व्हियन किंवा सर्ब म्हणतात. हे लोक मोठे उद्योगी आहेत. पुरुषांप्रमाणें बायकाही काम करितात; एवढेंच नव्हे तर लहान मुलांस देखील त्यांच्या चिमुकल्या हातांना झेपेल अशी कामें करावयास शिकवितात. बहुतेक वस्ती-शेंकडा ९० लोक खेड्यांत राहणारे आहेत; आणि ते बहुतेक शेतकरी आहेत. हे लोक शरीरानें मजबूत, पहाडी पाण्याचे, पूर्वजांचा अभिमान बाळगणारे व लढाईंत विलक्षण काटक आहेत. खडेटप्पे सोसण्याची व वाटेल तसा प्रसंग आला तरी त्याला न डगमगतां तोंड देण्याची वृत्ति कैक पिढ्यांपासून त्यांच्या रक्तांत मुरलेली आहे. यामुळें हा शेजारी जरी लहान आहे, तरी ऑस्ट्रियाला तो भारी वाटण्याजोगा आहे.

येथील राजघरणें जुन्या ग्रीक धर्माचें (ग्रीक आर्थोडॉक्स) आहे. व प्रजेंतही याच धर्माच्या अनुयायांचा भरणा सर्वांत अधिक आहे. सन १९१० सालीं सर्व्हियाची लोकसंख्या १९,११,७०१ होती. तिच्यापैकीं १८,८१,२२० इतके लोक ग्रीक आर्थोडॉक्सपंथाचे होते. गेल्या सालीं जो नवीन प्रांत मिळाला, त्यांत मात्र रोमन कॅथोलिक पंथाच्या लोकांचा भरणा फार आहे.

येथें प्राथमिक शिक्षण सक्तीचें असून तें सरकारी शाळांत मोफत देण्यांत येतें. सन १९१२ सालीं या शाळांचा खर्च ४२,२८,००२ दिनार होता. येथें लष्करी शिक्षण देणारीही एक शाळा सरकारनें स्थापिलेली आहे.

जमाबंदी.

सन १९११ सालीं या देशाचें जमाबंदीचें उत्पन्न ५१,१८,००० लक्ष होतें, व एकंदर खर्च ४७,०८,२४० पौंड झाला होता. गेल्या वर्षाच्या आरंभीं या देशाला २,६३,६२,२४० पौंड कर्ज होतें. हें कर्ज अलीकडे झालेलें आहे. इ. स. १८७६ पर्यंत या देशाला मुळींच कर्ज नव्हतें.

व्यापार व उद्योगधंदे.

येथील लोक बहुतेक सर्व शेतकरी आहेत, हें वर सांगितलेंच आहे. भणंग-भिकारी असे सर्व्हियन् रयतेंत मुळींच नाहींत. अगदीं गरीब मनुष्य असला तरी त्याची थोडीशी जमीन आहेच. साधारणतः बहुतेक लोकांच्या जमिनी १० एकरांपासून ३० एकरांपर्यंत आहेत. मक्याचें उत्पन्न सर्वांत मोठें असून त्याच्या खालोखाल गव्हांचें आहे. याशिवाय दुसरीं उत्पन्नें म्हटलीं म्हणजे जव, ओट, राय आणि बीटची साखर हीं होत. सन १९११ सालीं या देशांत ८२ लक्ष हंड्रेडवेट गहूं पिकला होता. बोरांचेंही पीक येथें फार येत असून बाहेरदेशीं त्यांचा व्यापार बराच मोठा चालतो. खाणींतील कोळसाही या देशांत बराच सांपडतो. दुसरे खाणींत सांपडणारे जिन्नस म्हणजे तांबें व सोनें हे होत. सन १९११ सालीं या देशांतून बाहेरदेशीं ४६,७६,६५४ पौंडांचा माल गेला; व जवळ जवळ तेवढ्याच किंमतीच्या मालाची आयात झाली. बाहेरून येणाऱ्या मुख्य जिनसा म्हटल्या म्हणजे सूत, कापसाचीं वस्त्रें, कातडीं, लोकरीचीं वस्त्रें, कागद, मीठ, रेशीम, यंत्रें, लोखंड व दारू ह्या होत. या देशांतून बाहेर जाणाऱ्या मालांत फळें, मका, गहूं, जव व मांस हे जिन्नस मुख्य आहेत. आमच्या देशाशीं या देशाचा व्यापार नाहीं. येथील मोठा व्यापार जर्मनी, आस्ट्रिया-हंगारी व तुर्कस्तान या देशांशीं चालतो.

या देशांतील रेलवेची एकंदर लांबी २,७४ मैल आहे. गेल्या वर्षाच्या मे महिन्यांत झालेल्या लंडनच्या तहानें आल्बेनियामधून आड्रियाटिक समुद्रापर्यंत सर्व्हियानें रेल्वेचा फांटा बांधावा असें ठरविण्यांत आलें आहे.

येथील मुख्य बँक म्हणजे नॅशनल बँक ऑफ् सर्व्हिया ही होय. तिचें भांडवल २ कोटी दिनाराचें आहे.

सैन्य.

येथील सर्व रयतेनें लष्करी शिक्षण घेतलें पाहिजे असा कायदा आहे. सरकारी फौजेचे तीन विभाग आहेत. त्यांस 'बॅन्स' म्हणतात. यांपैकीं पहिल्या विभागांत नेहमीं कामावर असणारी फौज येते. दुसरा विभाग 'रिझर्व' फौजेचा होय. तिसऱ्या विभागांत 'टेरिटोरियल' फौजेचा समावेश होतो. सन १९११ सालच्या अंदाजपत्रकाप्रमाणें येथील एकंदर फौजेची संख्या ३,९१,७४७ आहे. लढाईचे वेळीं याहून मोठें सैन्य राजाला उभारतां येतें. या देशाच्या सरहद्दीवर मजबूत किल्ले बांधलेले आहेत.

प्रकरण २३ वें.

बेल्जियम.

बेल्जियम देश अगदींच लहान आहे. आमच्या देशांतील उदेपुरसंस्थानाहूनही तो लहान आहे. जर्मनी त्याच्यापेक्षां केवढा तरी मोठा. अठरा बेल्जिअम एकत्र केले तर एक जर्मनी होईल. क्षेत्रफलाच्या मानानें येथील लोकसंख्या मात्र जरा जास्त आहे. बेल्जिअमचें क्षेत्रफल ११,३७३ चौरस मैल असून तेथील लोकसंख्या ७५,७१,३८७ आहे.

बेल्जियमच्या एका बाजूनें समुद्र व बाकी तीन बाजूंनीं जमीन आहे. पश्चिमेस उत्तरसमुद्र, उत्तरेस हालंड, पूर्वेस जर्मनी व दक्षिणेस फ्रान्स अशा याच्या चतुःसीमा आहेत. पश्चिमेच्या बाजूनें सुमारें ४२ मैल लांबीचा समुद्रकिनारा असून, तो उथळ आणि सपाट मैदानासारखा आहे. त्यामुळें समुद्राच्या हवेसाठीं बंगले बांधून राहण्यास हा किनारा फारच सोईचा आहे. बेल्जियममधील कांहीं ठिकाणें समुद्राचे सपाटीपासून २२३० फूट उंच आहेत. येथील जमीन सुपीक असून, बऱ्याच ठिकाणीं जमिनींत चॉक, चुनखडी, स्लेटीचा दगड व दगडी कोळसा सांपडतो. म्यूज आणि शील्ड ह्या दोन नद्या ह्या देशांतून वहात जातात. ह्याच्या कांठचा प्रदेश फारच सुंदर आहे. ह्यांपैकीं म्यूज नदीचे कांठीं दिनांत, नेमूर, हुए, सेरेंग व लीएज हीं शहरें असून शील्ड नदीचे कांठीं टुर्ने, घेंट, टरमाँड आणि ॲन्टवर्प हीं शहरें वसलेलीं आहेत. हीं शहरेंही सुंदर आहेत. (आतां होतीं म्हणणें योग्य होईल.) देशांत अनेक ठिकाणीं लहान लहान कालवेही बांधलेले आहेत.

पूर्वेतिहास.

इसवी सनाच्या पहिल्या शतकांत जुलीअस सीझरनें बेल्जियन गॉल प्रांतावर स्वारी केली होती. त्या वेळीं ह्या प्रांतांत २४ लहान लहान संस्थानें असून तीं एकमेकांपासून स्वतंत्र होतीं. त्यानंतर पांच शतकें हा प्रांत रोमन लोकांच्या ताब्यांत होता. पुढें तो फ्रेंचांच्या ताब्यांत गेला, आणि त्याचे विभाग पडले. त्यानंतर तो कांहीं काल स्पेनकडे, कांहीं काल स्वतंत्र व कांहीं काल हॉलंडकडे अशीं त्याचीं बरींच स्थित्यंतरें झालीं. शेवटीं इ० स० १८३० सालीं हा देश स्वतंत्र झाला; व त्याचे पुढील वर्षीं म्हणजे इ० स०

१८३१ त लंडन येथें तह होऊन ऑस्ट्रिया, रशिया, ग्रेटब्रिटन् व प्रशिया या देशांनीं बेल्जिअमचें स्वातंत्र्य कबूल केलें. पण या तहनाम्यावर सर्व राष्ट्रांच्या सह्या होण्यास आठ वर्षें लागलीं. शेवटीं तारीख १९ एप्रिल १८३९ रोजीं तहनामा पुरा होऊन युरोपांतील सर्व राष्ट्रांनीं बेल्जियम हें स्वतंत्र राज्य असल्याचें मान्य केलें.

राजघराणें.

येथील सध्याचे राजाचें नांव ऑल्बर्ट असें असून, त्यांचें वय ३९ वर्षांचें आहे. ऑल्बर्ट राजाचा विवाह १९०० सालीं बव्हेरियाची राजकन्या इलिजाबेथ इजशीं झाला असून, त्यांना दोन मुलगे व एक मुलगी आहे. ह्या राजघराण्याचे संबंध ऑस्ट्रिया व सॅक्सकोबर्गगोथा या घराण्यांशीं झालेले आहेत. राजाला खानगी खर्चासाठीं ३२ लक्ष फ्रँकची नेमणूक आहे.

राज्यकारभार.

येथील कारभार राजा, 'सिनेट' व प्रतिनिधिसभा ह्या त्रयीच्या अनुमतानें चालतो. कायदे करण्याचा अधिकारही एकट्या राजास नसून वरील त्रयीस आहे. सिनेटमध्यें १२० सभासद असतात. त्यांची नेमणूक आठ वर्षांची असते हे सिनेटर वयानें चाळीस वर्षांपेक्षां अधिक वयाचे असावे लागतात. सध्यांच्या प्रतिनिधिसभेंत १८६ सभासद आहेत. हे प्रतिनिधि वयानें २५ वर्षांपेक्षां मोठे असावे लागतात. सध्यांच्या सिनेटमध्यें कॅथोलिक ७०, लिबरल ३५, व स्पेशल डेमोक्रॅट १९ आहेत. त्याचप्रमाणें प्रतिनिधिसभेंत कॅथोलिक १०१, लिबरल ४४, सोशल डेमोक्रॅट ३९ व क्रिश्चन सोशियालिस्टर, याप्रमाणें प्रतिनिधि आहेत. राज्यकारभाराचीं खातीं ११ असून प्रत्येकावर मुख्याधिकारी एक प्रधान असतो.

लोक, धर्म व शिक्षण.

बेल्जियममध्यें ७५,७१,३८७ लोकवस्ती आहे, हें वर सांगितलेंच आहे. पुरुषांपेक्षां स्त्रियांची संख्या किंचित् अधिक आहे. या देशांत उद्योगधंद्यासाठीं राहणाऱ्या परकीय लोकांची संख्या सुमारें १॥ लक्ष आहे. त्यांत डच, फ्रेंच व जर्मन लोक अधिक आहेत.

येथील लोकांत, एकमेकांपासून भिन्न अशा दोन वंशांचे लोक दिसून येतात. यांपैकीं एका वंशांचे लोक काळे असून त्यांचे पूर्वज प्राचीन काळीं

युरोपांतील सांप्रतचें महायुद्ध.

बेलजिअमची पतिनिष्ठ राज्ञी एलिजाबेथ व तिचीं मुलें.



सैनिक वेषांत राजस्त्रिया–जर्मनीच्या केसरांची मुलगी व सून.

दक्षिणेकडून इकडे आले असावे, असा तर्क आहे. दुसरा वंश गोऱ्या लोकांचा. ह्यांचे वाडवडील केल्ट व जर्मन होत. ह्या केल्ट-जर्मन लोकांची वस्ती जुलिअस सीझरचे वेळीं या प्रांतांत फारशी नव्हती.

येथें मुख्यतः दोन भाषा चालतात. जवळ जवळ निम्मे लोक फ्लेमिश भाषा बोलणारे आहेत. दुसरी मुख्य भाषा फ्रेंच ही होय. ही भाषा सुमारें २८॥ लक्ष लोक बोलतात.

येथील लोकांत जास्त भरणा रोमन कॅथोलिक लोकांचा आहे. पण लोकांस धार्मिक स्वातंत्र्य पूर्ण आहे. कोणी कोणताही धर्म स्वीकारला तरी सरकार त्या बाबतींत कधीं हात घालीत नाहीं.

बेल्जियममध्यें चार युनिव्हर्सिट्या असून त्यांच्या ताब्यांत निरनिराळ्या शिक्षणशाखांस वाहिलेल्या अनेक शाळा आहेत. सन १९११ सालीं या देशांत वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें मिळून एकंदर २२४५ होतीं. त्यांपैकीं दैनिक पत्रें ११२, साप्ताहिक पत्रें १०६१ व १०७२ बाकीचीं होतीं.

येथील न्यायाधिशांच्या नेमणुका तहाहयात असतात.

जमाबंदी व व्यापार.

राज्याचें एकंदर उत्पन्न ७७,१५,१७ हजार फ्रँकांचें असून खर्च ८,९९,७९६ हजार फ्रँक आहे. राज्याला सुमारें २२ कोटी फ्रँकचें कर्ज आहे. हें कर्ज सार्वजनिक हिताच्या कामासाठीं काढण्यांत आलेलें आहे.

या देशांत उत्पन्न होणारे मुख्य जिन्नस म्हटले म्हणजे गहूं, जव, ओट, राय, बटाटे, बीट-साखर व तंबाखू हे होत. यांपैकीं ओट, राय आणि गहूं यांचें उत्पन्न मोठें आहे.

शेतीशिवाय इतर उद्योगधंदेही देशांत बरेच चालतात. बनावट रेशीम, मोटारगाड्या, कांच, लोखंड व पोलाद, जाळीचें कापड, तागाचें कापड, आणि मोजे ह्या जिनसा तयार करण्याचे येथें अनेक कारखाने आहेत. मच्छीमारीचा धंदाही बराच मोठा आहे.

सन १९१२ सालीं या देशांतून बाहेर प्रदेशीं १,५३,०७२ हजार पौंडांचा माल गेला; व बाहेरून या देशांत १,८३,३४९ हजार पौंडांचा माल आला. सन १९११ सालीं हिंदुस्थानांतून या देशांत २४,९९,५१,००० फ्रँकचा

माल गेला होता; व बेल्जियमघून आमच्या देशांत आलेल्या मालाची किंमत ४,०१,४९,००० फ्रँक होती. सर्वांत मोठा व्यापार जर्मनी, फ्रान्स, ग्रेट-ब्रिटन् या देशांचा आहे.

सैन्य.

बेल्जियमच्या नेहमीं तयार असणाऱ्या फौजेंत ५३,६०० लोक आहेत. पण लढाईचे वेळीं ३,५०,००० फौज उभी करतां येण्याजोगी आहे. सैन्यांत पायदळ व घोडेस्वार यांच्या पलटणींशिवाय सायक्लिस्ट लोकांची एक तुकडी आहे. याशिवाय घोड्यावरील तोफांच्या तुकड्या असून, विमानांतून युद्ध करणाऱ्या सैनिकांची एक मोठी कंपनी आहे. येथील शिपायांस 'मॉसर' बंदुका दिल्या आहेत. चालू सालच्या सैन्याचे खर्चासाठीं ४०,४३,८५० पौंडांच्या रकमेची मंजुरी मिळालेली होती. बेल्जमचें आरमार नाहीं.

वसाहत.

बेल्जियमचा पूर्वीचा राजा दुसरा लिओपोल्ड यानें आफ्रिकेंत एक संस्थान स्थापन केलें आहे. ही वसाहत आफ्रिकेचे मध्यभागीं असून तिचें नांव 'बेल्जिअम कांगो' असें आहे. ही वसाहत सन १८८२ त करण्यांत आली. येथील राज्यकारभार गव्हर्नर जनरल पाहतो.

ह्या वसाहतीचें क्षेत्रफळ ९,०९,६५४ मैल असून, लोकसंख्या दीड कोटी आहे. त्यांत युरोपियन फार थोडे म्हणजे अवघे ५,४६५ आहेत. मूळ रहिवासी यांचीच सर्व वस्ती आहे.

येथील फौजेंत १८,००० लोक असून ते सर्व कांगोच्या मूळ रहिवाशांपैकीं आहेत. सुमारें ४५० ऑफिसर आहेत, तेवढे मात्र युरोपियन आहेत.

उत्पन्नाचे जिन्नस म्हणजे रबर, एक जातीच्या ताडाचें तेल, कोको, कॉफी, तंबाखू आणि हस्तिदंत हे होत. येथील खाणींत सोनें व तांबें ही बरेंच सांपडतें. याशिवाय लोखंड, जस्त, मॅंग्निज व दगडी कोळसाही सांपडतो. सन १९१२ सालीं येथून सुमारें ३३२ लक्ष पौडांचा माल बाहेर गेला.

या प्रांतांत आगगाडीचे रस्ते बांधले असून बरींच तारऑफिसेंही आहेत. त्याशिवाय बिनतारेनें बातम्या पाठविण्याचींही कांहीं आफिसें आहेत.

प्रकरण २४ वें.

जर्मनी.

जर्मनी हा देश युरोपखंडाच्या बरोबर मध्यावर आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. ह्या देशानें युरोपखंडाच्या मध्यवर्ती प्रदेशांपैकीं उत्तर व पश्चिम बाजूचा प्रदेश व्यापिला असून, जर्मनीचा दोस्त जो आस्ट्रिया त्यानें त्या मध्यापासून दक्षिण व पूर्व या बाजूंकडील प्रदेशांत आपलें ठाणें वसविलें आहे. जर्मनांचा विस्तार आल्प्सपर्वतापासून उत्तरेकडील उत्तर समुद्र व बाल्टिक समुद्रापर्यंत आहे. इतिहासकार या देशाचे उत्तर जर्मनी व दक्षिण जर्मनी असे दोन भाग करितात; यांपैकीं उत्तर जर्मनी हा दक्षिण जर्मनीपेक्षां मोठा असून त्याचे पश्चिमेकडे हालंड व बेल्जियम हे देश व लक्झेंम्बर्गची डची व पूर्वेस रशिया व ऑस्ट्रिया–हंगारी हे देश आहेत. दक्षिण जर्मनीचे पूर्वेस व दक्षिणेस फ्रान्स, स्वित्झर्लंड व ऑस्ट्रिया–हंगारी हे देश आहेत. जर्मनीचे सरहद्दीची रचना पाहिली तर त्याची दोनतृतीयांश सरहद्द जमिनीनें वेष्टित असून फक्त उत्तरेच्या बाजूस सरहद्दीचा सुमारें एकतृतीयांश भाग समुद्रकिनारा आहे. युरोपांतील देशांत विस्ताराचे मानानें जर्मन देश तिसरा आहे. युरोपांतील सर्वांत मोठा देश म्हटला म्हणजे रशिया होय. त्याचे मानानें बाकीचे देश लहान आहेत. पण रशियानंतर क्षेत्रफळाच्या मानानें मोठा देश म्हणजे ऑस्ट्रिया–हंगारी हा होय. तिसरा जर्मनी, चौथा फ्रान्स व स्पेन.

प्रांतविस्तार आणि लोकसंख्या.

सध्याचा जर्मन देश हा निरनिराळीं २६ संस्थानें मिळून झालेला आहे. ह्या संपूर्ण देशाचें क्षेत्रफळ २,०८,७८० चौरसमैल असून त्यांतील लोकवस्ती सन १९१० चे खानेसुमारीप्रमाणें ६,४९,२५,९०३ आहे. जर्मनीचे २६ प्रांतांपैकीं सर्वांत मुख्य व वास्तविक जर्मन राज्याचा प्रदेश जो प्रशिया तोच देश सर्वांपेक्षां मोठा असून त्याचें क्षेत्रफळ १,३४,११६ म्हणजे एकंदर जर्मन देशाच्या दोनतृतीयांशाहून थोडें अधिक आहे. या मानानें या प्रांतांत लोकसंख्याही मोठी झणजे ४,०१,६५,२१९ आहे. जर्मनींतील दुसरा मोठा प्रांत झणजे बव्हेरिया. याचें क्षेत्रफळ २९,१९२ चौरसमैल व लोकसंख्या

६८,८७,२९१ आहे. बाकीच्या प्रांतांपैकीं इतिहासप्रसिद्ध प्रांत म्हटले म्हणजे वर्टेंबर्ग, बेडन, सॅक्सनी, मॅक्लेन्बर्ग, हेसे, ओल्डेन्बर्ग, ब्रन्सविक, सॅक्सकोबर्ग गोथा, हॅम्बर्ग, लुबेक व बेमेन व अल्सेस लॉरेन हे होत. यांपैकीं हॅम्बर्ग, लुबेक व ब्रेमेन ह्या प्रांतांत लोकवस्ती फार दाट आहे. अल्सेस लॉरेनचें क्षेत्रफळ ५६०४ चौरसमैल असून तेथील लोकसंख्या १८,७४,०१४ आहे. इतर देशांतून नाना व्यवसायांनिमित्त जर्मनींत येऊन राहिलेल्या लोकांचीही वस्ती बरीच म्हणजे सुमारें साडेबारा लक्ष आहे.

जर्मनींत मुख्य भाषा जरी जर्मन हीच आहे, तथापि दुसऱ्याही बऱ्याच भाषा बोलण्यांत येतात. त्यांतील मुख्य म्हटल्या म्हणजे पोलिश, फ्रेंच, मासूरियन, डॉनिश, लिथ्यूनिअन, कासूबियन, व वेंडिश ह्या होत.

जर्मन लोकांचा इतिहास बराच जुना आहे. ख्रिस्तीशकाचे सुरुवातीस जर्मन लोकांची वस्ती जर्मनीचे उत्तर भागांतच होती. त्यानंतर ते मध्य जर्मनींत वसाहत करून राहिलेल्या केल्टिक लोकांच्या प्रांतांत शिरले. पुढें त्यांनीं आल्प्स पर्वताचे पायथ्याजवळचा प्रदेश व आल्प्स पर्वत यांचा कबजा मिळविला. या लोकांचें केल्टिक रक्ताशीं झालेलें मिश्रण दाक्षिण जर्मनींत अद्याप दृष्टीस पडतें. ह्या मिश्र रक्तांच्या लोकांचा वर्ण किंचित काळसर व त्यांचे डोळ्यांतही काळसरपणाची झांक दिसून येते. उत्तर जर्मनींतील लोकांचा वर्ण गोरा असून त्यांचे केंस पिंगट व डोळे घारे असतात. प्राचीन काळीं लोक एकाच जागीं कायमची वसाहत करून फार करून राहत नसत. ज्या दिशेकडे मोर्चा वळेल त्या प्रांतांत ते जात व तेथें त्यांची नवी वसाहत होत असे. याप्रमाणें मध्य युरोपाचा पूर्वभाग सोडून जर्मन लोक जेव्हां दुसरीकडे गेले, तेव्हां स्लॅव्होनिक लोकांच्या टोळ्यांनीं पूर्वेकडून येऊन उत्तर जर्मनींत वसाहत केली. ह्या लोकांस जर्मन लोक 'वेन्द' म्हणत. याच सुमारास लिथूनियन शाखेशीं अत्यंत साम्य असलेले लोक पूर्वेकडून आले व त्यांनीं पूर्व प्रशियांत आपली वसाहत केली. ह्यांचे मुख्य तीन भेद होते. एक प्रशियन; ह्यांची मूळ भाषा इ. स. १७०० च्या सुमारास गुप्त झाली. दुसरा लेटस् व तिसरा लिथूनियन. ह्यांनीं मात्र आपली प्राचीन भाषा अद्याप जिवंत ठेविली आहे. ह्या भाषेचें पुष्कळ बाबतींत आपल्या संस्कृतभाषेशीं साम्य आहे असें जर्मन पंडित म्हणतात. असो. पुढें मध्ययुगाचे उत्तरार्धांत जर्मन लोकांनीं पुन्हा आपल्या पूर्वेकडील प्रदेशाचा तावा मिळविला. पण तेथील स्लेव्ह

लोकांना त्यांनीं हांकून दिलें नाहीं. हळू हळू त्या लोकांत जर्मन लोकांनीं आपली भाषा व आपल्या रीतिभाती यांचा इतका प्रसार केला कीं, ते मूळचे स्लेव्ह होते याच्या खुणा देखील फारशा राहिल्या नाहींत. जर्मन देशांतील सध्याच्या लोकवस्तीचे खालीलप्रमाणें मुख्य शाखाभेद करितां येतील:—(१) स्वेबियन, (२) बव्हेरियन, (३) फ्रँक्स, (४) पॅलेटाइन्स, (५) हेसिअन (६) थुरिंजिअन्स, (७) सॅक्सन्स, व (८) फ्रिजियन्स.

जर्मनीला ' धर्मसुधारणेचा पाळणा ' असें म्हणतात. प्रॉटेस्टंट व रोमन कॅथोलिक लोकांतील वाद प्रथम येथेंच उपस्थित झाला. येथील सर्व लोक एकाच धर्मपंथाचे नसून प्रॉटेस्टंट व रोमन कॅथोलिक हे दोन्ही पंथ अद्यापि येथें मोठ्या प्रमाणांत आहेत. एकंदर लोकसंख्येपैकीं शेंकडा ६१ लोक प्रॉटेस्टंट असून शेंकडा ३६ कॅथोलिक आहेत. बाकीच्या लोकांत ज्यू लोकांचें प्रमाण शेंकडा १ आहे. रोमन कॅथोलिकांची मोठी वस्ती अल्सेस लॉरेन, बव्हेरिया व बेडन या प्रांतांत आहे. ज्यू लोकांची वस्तीही इतर प्रांतांपेक्षां अल्सेसमध्यें जास्त आहे.

प्रकरण २५ वें.

जर्मनी. (पुढें चालू.)

राजघराणें.

जर्मनसाम्राज्याचे अधिपति कैसर दुसरे विलियम यांचा जन्म इ. स. १८९९ सालच्या जानेवारी महिन्याचे सत्ताविसावे तारखेस झाला, व त्यांना जर्मनीचें बादशाही पद ता. १९ जून सन १८८८ रोजीं मिळालें. यांना "जर्मनीचे बादशहा व प्रशियाचे राजे" असें म्हणतात. जर्मन साम्राज्याची नवीन घटना झाल्यानंतरचे हे तिसरे बादशहा होत.

कैसर दुसर विलियम यांचा विवाह श्लेस्विग—हॉल्स्टीन—सांडर्बर्ग—ऑगस्टेनबर्गची राजकन्या व्हिक्टोरिया हिच्याशीं ता. २७ फेब्रुवारी १८८१ इसवी रोजीं झाला. लग्नसमयीं वधूचें वय २३ वर्षांचे होतें. कैसर विलियम यांना एकंदर ७ मुलें आहेत. यांपैकीं पहिले सहा मुलगे व सातवी मुलगी आहे. हिचा विवाह गेल्या वर्षाचे मे महिन्यांत फार मोठ्या थाटामाटानें झाला.

कैसरचे वडील चिरंजीव फ्रेडरिक विलियम हे जर्मनीचे युवराज असून वडिलांचे मागून गादीवर त्यांचाच हक्क आहे. त्यांचें वय ३२ वर्षांचें असून त्यांचें लग्न होऊन नऊ वर्षें झालीं. त्यांची पत्नी त्यांच्याहून चार वर्षांनीं लहान आहे. यांना तीन मुलगे आहेत. कैसरचा सर्वांत धाकटा मुलगा २३ वर्षांचा आहे.

कैसर विलियम यांच्या सर्व मुलांचीं नांवें येणेंप्रमाणें:—१ प्रिन्स फ्रेडरिक विलियम (युवराज, वय ३२). २ प्रिन्स विलियम इटेल फ्रेडरिक (वय ३१). ३ प्रिन्स ॲडलबर्ट (वय ३०). ४ प्रिन्स ऑगस्ट विलियम (वय २७). ५ प्रिन्स ऑस्कर (वय २६). ६ प्रिन्स जोचिम (वय २३). राजकन्या व्हिक्टोरिया लुई (वय २४ वर्षें)

कैसर विलियम यांना तीन बहिणी व एक भाऊ आहे. यांपैकीं एक बहीण ग्रीसच्या राजाला दिली आहे. कैसर विलियम यांच्या राजघराण्याला 'होहेनझोलर्न' असें म्हणतात. हें घराणें सुमारें एक हजार वर्षांचें जुनें आहे.

पूर्वेतिहास.

सध्यांचें जर्मन राज्य हें अनेक स्थित्यंतरें व अनेक उलथापालथी होऊन बनलें आहे. यांतील ईशान्येकडील प्रदेश यांत पूर्वी नव्हता; तो मागाहून जोडला गेला. पूर्वीच्या जर्मन राज्याचा विस्तार बराच मोठा होता. स्वित्झरलंड, बेल्जियम व नेदरलंद हे देश पूर्वी त्याच राज्यांत मोडत असत. मागाहून ते निराळे झाले. हे देश जर्मन राज्यांतून गेल्यावर बाकी राहिलेल्या राज्याचे शतशः तुकडे झाले. व त्यांची एकसत्तात्मकता नाहींशी झाली. सगळीं लहान स्वतंत्र संस्थानें बनलीं. यांपैकीं दोन संस्थानेंच काय तीं पुढें विशेष महत्त्वाला चढलीं, तीं संस्थानें म्हणजे हॅप्सबर्ग घराण्याचें वव्हेरिया संस्थान व होहेनझोलर्न घराण्याचें ब्रॅन्डेनबर्ग संस्थान, ह्या ब्रॅन्डेनबर्गच्या राज्याचा पंधराव्या शतकानंतर विस्तार होत होत त्यानें प्रशिया देश व्यापिला.

पुढें १८०६ सालीं नेपोलियननें जुन्या जर्मन राज्याची इतिश्री केली. त्यानंतर जुन्या राज्यापैकीं ३९ संस्थानें (मागाहून यांतून ४ गळालीं) जर्मन कॉन्फिडरेशन म्हणून एक संघ बनवून कांहीं काळ राहिलीं होतीं, पण हा संघ मजबूत नसल्यामुळें सन १८६६ मध्यें झालेल्या लढाईंत त्याची समाप्ति झाली. ही १८६६ ची लढाई प्रशिया व ऑस्ट्रिया यांमधील भांडणामुळें उपस्थित झाली. या भांडणाचें कारण दोघांनाही 'कॉन्फिडरेशन' चें प्रमुखपण पाहिजे होतें, हें होय. लढाईचा शेवट प्रशियातर्फे होऊन ऑस्ट्रिया

जर्मनराज्यांतून कायमचा बाहेर पडला. अशा प्रकारें नवीन जर्मन राष्ट्राची संघटना होण्यास मार्ग मोकळा होऊन त्याचें प्रमुखपण प्रशियास मिळालें. यानंतर लवकरच म्हणजे इ. स. १८७० सालीं सुप्रसिद्ध फ्रान्को-जर्मन लढाई झाली. या लढाईंत सर्व जर्मन संस्थानांनीं एकत्र होऊन फ्रेंचांचा पराभव केला.

राज्यकारभार.

सध्यांचें जर्मन राष्ट्र हें सव्वीस संस्थानाचा संघ (confederation) मिळून झालेलें आहे, यांपैकीं प्रत्येक संस्थाचा अधिपति वेगवेगळा असून तो आपल्या संस्थानाचा कारभार स्वतंत्र रीतीनें चालवितो. मात्र राष्ट्रसंबंधी बाबींत सर्व संस्थानें मध्यवर्ती जी प्रशियाची सत्ता, तिच्या आज्ञेंत वागतात.

जर्मन राष्ट्राची नवी संघटना ता. १६ एप्रिल १८७१ पासून अमलांत आली आहे या संघटनेच्या अन्वयें जर्मनराष्ट्राचे संरक्षणार्थ व जर्मनलोकांचे हितास्तव सर्व जर्मन-संस्थानाचा एक शाश्वत संघ बनला जाहे. तसेंच या संघटनेनें राष्ट्राच्या लष्करी व राजकीय बाबींचा कारभार प्रशियाचे राजाकडे सोंपविला असून, त्यास ' कैसर ' ही सार्वभौमनिदर्शक महापदवी दिली आहे. या संघटनेंतील दुसऱ्या कलमान्वयें कैसर यास परराष्ट्रांबरोबर लढाई करण्याचा, स्नेह करण्याचा, त्याचप्रमाणें दुसऱ्या राष्ट्राशीं तह करण्याचा व त्याचे वकील आपल्या दरबारीं ठेवण्याचा अधिकार आहे. मात्र लढाई करावयाची ती स्वराष्ट्रसंरक्षणार्थ असली पाहिजे.ती तशी नसेल तर लढाई करण्यासाठीं कैसर यांस राज्यव्यवहारनियामक संस्थेची परवानगी विचारावी लागते.

जर्मनराष्ट्राच्या राज्यव्यवहाराचें नियमन करणाऱ्या दोन संस्था आहेत. त्या बंडस्राथ व रिचस्टॅग ह्या होत. ह्यांपैकीं बंडस्राथमध्यें ६१ सभासद असून ते सर्व जर्मन संस्थानांकडून आलेले प्रतिनिधि असतात. यांची नेमणूक एका बैठकीपुरतीच असते. रिचस्टॅगमध्यें ३९७ सभासद असून, ते सर्व राज्यांतून निवडून आलेले असतात. त्यांची मुदत पांच वर्षांची असते. सध्यांचे रिचस्टॅग सभेंत निरनिराळ्या पक्षांचे पुढीलप्रमाणें सभासद आहेत:—

सोशियालिस्ट	११२	सेंटर पार्टी	८९
नॅशनल लिबरल्स	४७	कॉन्सर्व्हेटिव्ह	४२
रॅडिकल	४४	पोल	१८
फ्री कॉन्सर्व्हेटिव्ह	१३	इकॉनॉमिक युनियन	८
इतर	२१		

वरील दोन्ही संस्था जे कायदे मंजूर करील, त्यांत हात घालण्याचा अधिकार कैसर यांस नाहीं.

बंडस्राथ व रिचस्टॅग यांच्या वर्षांतून एक वेळा बैठकी होतात, व त्या बैठकी कैसर भरवीत असतो. राज्यासंबंधीं सर्व कायदे बंडस्राथ व रिचस्टॅग या सभांकडून मताधिक्यानें मंजूर व्हावे लागतात. बंडस्राथचा अध्यक्ष राज्याचा चान्सेलर हा असतो. राष्ट्राचे नवीन संघटनेनंतर या संस्थेचे जे पांच अध्यक्ष झाले, त्यांचीं नांवें येणेंप्रमाणें:—१ प्रिन्स बिस्मार्क (सन १८७१–१८९०); २ कौंट कॅप्रिव्ही (सन १८९०–१८९४); ३ प्रिन्स होहेन लोहे (सन १८९४–१९०४); ४ प्रिन्स बूलो (सन १९०४–१९०९); व ५ डॉ० बेथमन हॉलवेग (सन १९०९ पासून) रिचस्टॅगचा अध्यक्ष प्रतिनिधींकडून निवडला जातो. बंडस्राथ व रिचरस्टॅग यांनीं मंजूर केलेले कायदे अमलांत येण्यास ते कैसरकडून जाहीर व्हावे लागतात. व या अंमलबजावणीच्या हुकुमावर कैसर यांजबरोबर राज्याच्या चान्सलरचीही सही व्हावी लागते रिचरस्टॅगमधील कामकाज चालू असतां बंडस्राथच्या सभासदांस हजर राहण्याचा अधिकार असतो.

सध्यां जर्मन राज्याच्या निरनिराळ्या खात्यांवर जे मुख्य अधिकारी अथवा मंत्री आहेत, त्यांचीं नांवें खालीं दिलीं आहेत:—

१ चान्सेलर ऑफ धी एम्पायर–डॉ. बेथमन हॉलवेग.

२ परराष्ट्रव्यवहाराचे मंत्री–हर व्हॉन जागो.

३ इंपीरियल होम ऑफिस व चान्सलेरचे प्रतिनिधि - हर डेलब्रूक.

४ आरमारखात्याचे मंत्री–हर व्हॉन टरपिझ. आरमाराचे कमांडर–इन–चीफ–हेन्री, प्रिन्स ऑफ प्रशिया.

५ न्यायमंत्री–डॉ. लिस्को.

६ पोतनीस–हरवूडन्ह.

७ टपालखात्याचे मंत्री–हराक्रिट्के.

८ वसाहतींचे मंत्री–डॉ० सोल्फ.

जर्मनराज्यांतील कोणत्या संस्थानांचे किती प्रतिनिधि बंडस्राथ व रिचस्टॅग या सभांत आहेत, हें खालील कोष्टकावरून लक्षांत येईल, व कोणत्या संस्थानचं हातीं जास्त सत्ता आहे, हेंही त्यावरून दिसून येईल:—

संस्थानाचें नांव.	बंडस्राथमधील सभासद.	रिचस्टॅगमधील सभासद.
१ प्रशिया	१७	२३६
२ बव्हेरिया	६	४८
३ सॅक्सनी	४	२३
४ वर्टेम्बर्ग	४	१७
५ ग्रॅन्ड-डची-ऑफ बेडन	३	१४
६ ,, ,, हेसे	३	९
७ ,, ,, मॅक्लेन्बर्ग श्वेरीन	२	६
८ ,, ,, सॅक्सनी	१	३
९ ,, ,, मॅक्लेन्बर्ग स्टार्लिट्झ....	१	१
१० ,, ,, ओल्डेन्बर्ग....	१	३
११ डची ऑफ ब्रन्स्विक्	२	२
१२ ,, ,, सॅक्स मिनिंजन	१	१
१३ ,, ,, सॅक्स आल्टेनबर्ग	१	१
१४ ,, ,, सॅक्सकोबर्ग गोथा....	१	२
१५ ,, ,, ॲन्हल्ट	१	१
१६ प्रिन्सिपालिटि ऑफ श्वार्झबर्ग-- सॉडर्स हॉसेन....	१	१
१७ ,, ,, श्वार्झबर्ग रुडोल्स्टड	१	१
१८ ,, ,, वॉल्डेक	१	१
१९ ,, ,, खस आल्टेरर लिनी	१	१
२० ,, ,, खस जूंजरर लिनी	१	१
२१ ,, ,, श्वाम्बर्ग लिपे	१	१
२२ ,, ,, लिपे	१	१
२३ फ्री टौन ऑफ लुबेक....	३	१
२४ ,, ,, ,, ब्रेमेन	१	१
२५ ,, ,, ,, हम्बर्ग	१	३
२६ आल्सेस लोरेन	३	१५

प्रकरण २६ वें.

फ्रान्स.

सन १८७० सालापासून येथील प्रजासत्ताक राज्याच्या कारकिर्दीस प्रारंभ होतो. याची घटना १६ जुलै १८७५ रोजीं झाली. पुढें त्यांत वेळोवेळीं फेरफार झाले आहेत. कायदे करण्याचा अधिकार चेंबर ऑफ डेप्युटीज आणि सीनेट यांस असून त्यांची अम्मलबजावणी प्रेसिडेंट व मंत्री-मंडळ यांजकडून होते. प्रेसिडेंटची निवडणूक कांग्रेसमधील सीनेट व चेंबर ऑफ डेप्युटी यांजकडून मताधिक्यानें होते व ती ७ वर्षेंपर्यंत चालते. सध्यांच्या प्रेसिडेंटचें नांव रेमेंड पाईंकरे असें असून त्यांचा जन्म १८५८ सालीं झाला, व अध्यक्षाचे जागेसाठीं निवडणूक १७ जानेवारी १९१३ रोजीं झाली. सध्यांच्या सीनेटमध्यें ३०० सभासद आहेत.

राज्यकारभाराच्या सोईसाठीं फ्रान्सचे ८७ परगणे केले आहेत. १८८१ सालापासून अलजेरियामधील तीन परगणेही फ्रान्स देशाचेच भाग म्हणून गणले जातात.

फ्रान्सचें क्षेत्रफळ २ लक्ष ७ हजार ९४ मैल असून लोक संख्या ३९६०१५०९ आहे. राजधानीचें शहर पारीस. यांत वस्ती २८ लक्ष ८८ हजार ११० आहे. येथें राजकीय धर्म म्हणून कोणताही नाहीं.

फ्रान्सचें गेल्या वर्षाचें उत्पन्न १८४७२२०० पौंड होतें व खर्च १९२९८१०० आहे. या देशांत अनेक तऱ्हेचे धंदे चालतात व गव्हांचीं शेतीही बरीच आहे.

वसाहती.

फ्रान्सच्या एकंदर वसाहतींचें क्षेत्रफळ ४३ लक्ष चौरसमैल असून त्यांत वस्ती सुमारें ४ कोटी १६ लक्ष आहे. या वसाहतींपैकीं अल्जेरिया व ट्युनिस हे फ्रान्सचे परगणे गणले जातात म्हणून वर सांगितलेंच आहे. बाकीच्या प्रांतांचा कारभार स्वतंत्र खात्याकडून चालतो. यांपैकीं बहुतेकांत स्वराज्याच्या धर्तीची राज्यपद्धति असून निवडून दिलेल्या सभासदांचीं कौन्सिलें आहेत व तीं गव्हर्नरास मदत करितात. एशियाखंडांत हिंदुस्थान, अनाम,

कांबोडिया, कोचीन चायना, टोकिंग आणि लेओस या ठिकाणीं वसाहती असून त्यांचें क्षेत्रफळ ३,१०,१७६ चौरसमैल व लोकसंख्या १,४७,७३,००० आह.

आफ्रिकेंत अलजेरिया, साहारा, टयूनिस, सेनेगाल, अपर सेनेगाल आणि नायगर, गायना, आयव्हरी कोस्ट, डॅहोमी, मॉरिटेनिया, कांगो, रीयूनियन, माडागास्कर, मायोटी आणि सोमाली कोस्ट येथें वसाहती असून त्यांचें क्षेत्रफळ ४१,८४,४०१ चौरसमैल व लोकसंख्या २,५६,८१,२४३ आहे.

अमेरिकेंत सेंट पीरटे व मिकेलीन ग्वाडिळू, मार्टिनी, व ग्वायना या प्रांतांत वसाहती असून त्यांचें क्षेत्रफळ ३५२२२ चौरस मैल व लोकसंख्या ४५०,९०० आहे. ओशियानियांत, न्यू केलोडोनियूट, हिटी वगैरे ठिकाणीं वसाहती असून त्यांचें क्षेत्रफळ ८७४४ चौरसमैल व लोकसंख्या ८११०० आहे.

प्रकरण २७ वें.

रशिया.

येथील बादशहाचें नांव दुसरे निकोलस असें असून त्यांस झार म्हणतात. त्यांचा जन्म १८६८ सालीं झाला. व विवाह १८९४ सालांत हेसेचे ग्रँड ड्यूक यांची कन्या अलेकझांड्रा इजशीं झाला. तिचें वय ४२ वर्षांचें आहे. यांस ४ कन्या व एक पुत्र आहे. राजकुटुंब बरेंच मोठें आहे.

सर्व राज्याच्या राज्यकारभाराचे मुख्य नियंते झार हेच आहेत व त्यांची हुकमत अनियंत्रित आहे. १९०५ सालीं राज्यकारभारांत लोकप्रतिनिधिक तत्त्वाचा अंशतः प्रवेश होऊन गोसुडार्स्टव्हेनाया डयूमा नांवाची सभा स्थापन झाली. सध्यांचे झार हे या सभेच्या उत्कर्षास अनुकूल आहेत. सध्यांच्या डयूमांत सभासदांची नेमणूक पांच वर्षांची आहे. डयूमामधील सभासदांस सभेचें काम चालूं असतां रोज १० रुबल भत्ता मिळतो. व वर्षांतून एकदां सेंटपीटर्सबर्गला जाण्यायेण्याचा खर्च मिळतो. विद्यार्थी, सैनिक, गव्हर्नर आणि पोलिस कामदार यांस डयूमा

प्रकरण २८ वें.

इतर देश.

आल्बेनिया.

हा प्रदेश डोंगराळ असून एड्रिॲटिक समुद्राच्या पूर्व किनाऱ्यावर वसला आहे. पूर्वी हा तुर्कस्तानच्या राज्याचा भाग होता. येथील लोक तामसी स्वभावाचे असून आपले शेजारी सर्व्हियन्स व मॉंटिनीग्रियन्स यांच्या संबंधाचा द्वेष त्यांच्यांत जणुं काय हाडामासीं खिळल्यासारखा आहे. येथील राजाचें नांव पहिला विल्यम असें असून त्याचा जन्म २१ मार्च १८७६ त झाला. त्यास एक मुलगा व एक मुलगी आहे.

ता. २८ नवंबर १९१२ रोजीं आल्बेनियाचें स्वातंत्र्य जाहीर करण्यांत आलें. व त्यानंतर कांहीं दिवसांनीं भरलेल्या लंडन कॉन्फरन्सनें अलबेनियाच्या स्वतंत्र राज्याचा दर्जा कबूल केला. अलबेनियन लोकांचे दोन भाग आहेत. त्यांपैकीं घेग हे उत्तरेकडील प्रांतांत राहतात.

याचें क्षेत्रफळ सुमारें ११ हजार ५०० मैल आहे. व वस्ती ८ लक्ष असावी. राजधानीचें शहर डुरॅझो. आल्बेनियन लोकांपैकीं दोनतृतीयांश मुसलमान आहेत.

बल्गेरिया.

येथील राजाचें नांव फर्डिनांड असें असून त्याचा जन्म २६ फेब्रुवारी १८६१ रोजीं झाला. त्यास झार असें म्हणतात. त्यास दोन मुलगे व २ मुली आहेत.

ता. ३० सप्टेंबर १९१२ रोजीं बल्गेरियानें सर्व्हिया, ग्रीस आणि मांटेनीग्रो यांच्याशीं मिळून तुर्कस्तानाबरोबर युद्ध सुरू केलें. त्या युद्धाची समाप्ति ता. ३० मे १९१३ रोजीं लंडन येथें झालेल्या तहानें झाली. याच लढाईस बाल्कन युद्ध असें म्हणतात.

राज्यकारभार एका सभेकडून चालतो. त्या सभेस राष्ट्रीयसभा किंवा सोब्रांजी असें म्हणतात. या सभेंत निरनिराळ्या मताचे व पक्षाचे सभासद

असतात. अंमलबजावणी करण्याकरितां अष्टप्रधानांचें एक मंडळ असतें. त्यांची नेमणूक राजा करितो.

या देशाचें क्षेत्रफळ ४१ हजार ३०५ मैल असून वस्ती ४७ लक्ष ५२ हजार ९५७ आहे. जमाबंदीचें उत्पन्न १९१३ सालीं ५७ लक्ष ६९ हजार ३४४ पौंडांचें व वार्षिक खर्च ४७ लक्ष ३२ हजार ८३१ पौंड होत. राज्यास सुमारें १॥ कोटींचें कर्ज आहे.

येथील पांचसप्तमांश लोक शेतीचा धंदा करणारे आहेत. त्यांची एक पासून ६ एकराचीं स्वतःच्या मालकीचीं शेतें आहेत. सर्वांत गव्हाचें पीक मोठें असून मका, ओट, जव आणि रॉय यांचेंही उत्पन्न बरेंच आहे.

१९१२ सालीं पर देशांतून ९ लक्ष पौंडांचा माल या देशांत आयात झाला व २२ लक्षांचा या देशांतून परदेशीं गेला. एकंदर रेलवेची लांबी १३–१४ शें मैल आहे.

प्रकरण २९ वें.

व्यापाराचें जाळें.

सध्यांच्या युगांत आगगाडया व आगबोटी यांचा प्रसार पृथ्वीचे पाठीवर जसजसा अधिकाधिक वाढत चालला आहे, तसतसा देशोदेशींचा व्यापारही वाढत चालला असून बहुतेक देश पुष्कळ गोष्टींत एकमेकांवर अवलंबून राहणारे असे झाले आहेत. युरोपांतील युद्धाचा परिणाम अत्यल्प अवधींत सर्व जगावर झाला यांचें कारण हा व्यापारसंबंधीं परस्परावलंबीपणाच होय. जगांतील व्यापाराचें व दर दिवस चाललेल्या जगाच्या बाजारांतील घडामोडींचें जो अध्ययन करील त्यास पृथ्वीच्या पाठीवरील व्यापाराचें जाळें विलक्षण गुंतागुतीचें होत चाललें आहे, ह्या गुंतागुतीमुळें लोकांच्या सांपत्तिक स्थितीवर इष्टानिष्ट परिणाम होत आहेत, गरीब व मध्यम स्थितींतील लोकांच्या पोटापाण्याचा प्रश्न आजच्याहून उद्या अधिक बिकट होत चालला आहे, व लोकांच्या सुखासमाधानाच्या आळ्यांतील ओलावा शोषून घेणारे दुसरेही अनेक प्रश्न दत्त म्हणून उभे राहूं लागले आहेत, असें आढळून आल्यावांचून

राहावयाचें नाहीं. असो. प्रस्तुत प्रसंगीं या गोष्टीशीं आपल्यास कांहीं कर्तव्य नसल्यामुळें व्यापाराच्या जाळ्यांत आजच्या मितीस कोणता देश केवढा वांटेकरी आहे हें आपण समजून घेऊं.

सध्यांचे युद्धानें सर्व देशांचे बाजारांत जसा भूकंप केला तसा भूकप पूर्वी कधीं झाल्याचें ज्ञात इतिहासांत लिहिलेलें नाहीं. या भूकंपानें कैक बाजार जमीनदोस्त केले आहेत, कितीएक ढांसळून पाडले आहेत व कित्येकांची मोडतोड केली आहे. सुज्ञ दूरदर्शी आंग्लभूमिभूषण मुत्सद्दी सर एडवर्ड ग्रे यांनीं हें पुढील भविष्य चित्रपटावर रंगविल्यासारखें पाहून शस्त्रांस्त्राचा खण-खणाट होतां येईल तेवढा कमी करावा, तोफा डागण्यास पुढें सरलेले हात मागें खेंचून घ्यावे म्हणून शिकस्तीचे प्रयत्न केले, हें त्यांचा जो पत्र व्यवहार प्रसिद्ध झाला त्यांत स्पष्टपणें दिसतें. ता. २३ जुलै १९१४ रोजीं सर एडवर्ड ग्रे यांनीं ऑस्ट्रियाची राजधानी व्हिएन्ना येथें असणारे ब्रिटिश वकील सर मॉरिस बुन्सेन यांस एक यादी लिहिली, त्या यादींत ते म्हणतातः—

"The posible consequences of the present situation were terrible. If as many as four Great Powers of Europe–let us say Austria, France Russia and Germany–were engaged in war, it seemed to me that it must involve the expenditure of so vast a sum of money, and such an interference with trade, that a war would be accompanied or followed by a complete collapse of European credit and industry. In these days in Great Industrial States, this would mean a state of things worse than that of 1848, and, irrespective of who were victors in the war, many things might be completely swept away."

फक्त ऑस्ट्रिया, फ्रान्स, रशिया व जर्मनी हें चारच देश बंदुका शिलगावून एकमेकांचे जिवावर उठल्यास महा अनर्थ होऊन कैक गोष्टी नामशेष होतील, असें सर एडवर्ड ग्रे म्हणतात. मग ह्या युद्धांत ग्रेट ब्रिटन, जपान इत्यादि मोठ्या पंक्तींतले देश सामील झाले आहेत तेव्हां अनर्थाचा पार कोठवर शोधावा? त्यांतल्या त्यांत आम्हां हिंदुस्थानांतील लोकांस समाधान एवढेंच कीं, आमच्या राज्यकर्त्यांनीं आमच्या देशावर युद्धाचे परिणाम होतां होईल तों कमी होऊं देण्याच्या तजविजी चालविल्या असून त्यामुळें इतरांहून आम्ही सांप्रतचे युद्धापत्तीनें कमी ग्रस्त झालेले आहोंत.

युरोपांतील सांप्रतचें महायुद्ध.

घोडेस्वाराच्या पोषाकांत रशियाची साम्राज्ञी.

लढाई आणि स्त्रिया.

इंग्लंडांतील थोर घराण्यांतील या स्त्रिया सध्याच्या लढाईच्या प्रसंगीं मानवजातीच्या दुःखांचा उपशम करण्याचे आपआपल्या परीनें मनापासून प्रयत्न करीत आहेत.

असो. आतां आपण कोणत्या देशांत मुख्य मुख्य कसल्या मालाची निपज होते हें पाहूं. त्यावरून वाचकांस युद्धानें निमंत्रिलेल्या विपत्तिमहाराक्षसीच्या महोग्रध्यानाची साधारण कल्पना करितां येईल.

आफ्रिका.

देश	माल	संख्या
गोल्ड कोस्ट	कोको	३५००० टन
साउथ आफ्रिका	लोकर	११,२०,००,००० रत्तल
वेस्ट आफ्रिका	रबर	१५,००० टन
ट्रान्सवाल	सोनें	८२,५०,००० औंस

आल्जेरिया.

मद्य	...	...	...	...	२०,००,००,००० ग्यालन

आर्जेंटिना.

गहूं	...	...	...	...	२ कोटी १० लक्ष क्वार्टर
मेझ (मका)...		...	...	...	३ कोटी २० लक्ष ,,
लोकर	...	...	...	...	४१,५०,००,००० रत्तल

आस्ट्रेलेशिया.

लोकर	...	...	...	...	८४,००,००,००० रत्तल
सोनें	...	...	...	...	२९,००,००० औंस
तांबें	...	...	...	...	४२००० टन
रुपें	...	...	...	...	१,७०,००,००० औंस

आस्ट्रिया हंगारी.

गहूं	...	...	...	...	२ कोटी ३० लक्ष क्वार्टर्स
जव	...	...	...	...	९० लक्ष क्वॉर्टर
मका	...	...	...	...	२ कोटी १५ लक्ष क्वॉर्टर
राय	...	...	...	...	२ कोटी ५ लक्ष ,,
ओट	...	...	...	...	९ कोटी ५० लक्ष ,,
हॉप्स	...	...	...	...	२ कोटी ३० लक्ष ,,
बीटसाखर		...	...	...	११,५४,००० टन
बीरदारु	...	...	...	...	५६,५०,००,००० ग्यालन
तंबाखू	...	...	...	...	१८,४०,००,००० रत्तल

बेल्जियम.

बीटसाखर	...	...	...	...	३,४०,००० टन
जस्त...	...	...	...	...	१,८१,८८० ,,

मेक्सिको.

सोनें	...	...	...	१४,२०,००८ आस
रुपें	...	...	...	८ कोटी ८० लक्ष औंस
तांबें	...	...	...	६१ हजार टन
शिसें	...	...	...	१,२१,५०० टन

नेदरलंड.

बीट साखर	...	...	...	२,५१,५०० टन

ईस्ट इंडिज.

तंबाखु	...	...	...	१२ कोटी ८६ लक्ष रत्तल
कथील	...	...	...	१२,६०० टन
पेट्रोलिअम	...	...	...	१ कोटी ११ लक्ष पिंपें (बॅरल)

रुमानिया.

मका	...	...	...	१ कोटी ३. लक्ष क्वॉर्टर
पेट्रोलियम	...	...	...	९७,२३,००० बॅरल

रशिया.

गहूं	...	...	...	९ कोटी क्वार्टर
जव	...	...	...	५ कोटी ५५ लक्ष क्वार्टर
ओट	...	...	...	११ कोटी २० लक्ष क्वार्टर
राय ...	...	...	...	१ कोटी २१ लक्ष क्वार्टर
हॉप ...	...	...	...	१ „ ५ „ „
बीट साखर	...	...	...	२१ लक्ष टन
दारू	...	...	...	१०. कोटी गॅलन
तंबाखु	...	...	...	२० कोटी रत्तल
कापूस	...	...	...	२० लक्ष गठ्ठे
लोकर	...	...	...	३८ कोटी रत्तल
सोनें	...	...	...	१२ लक्ष औंस
पेट्रोलियम	...	...	...	७,०३,४०,००० पिंपें

स्पेन.

दारू	...	...	...	३७ कोटी गॅलन
शिसें	...	...	...	१,६२,२५० टन

तुर्कस्तान.

रेशीम	...	...	...	५० लक्ष टन

युनायटेड किंग्डम (इंग्लंड इ०).

ओट	...	...	...	१ कोटी २० लक्ष क्वार्टर
हॉप	...	...	...	३ „ ६७ „ „
बीर	...	...	...	१ अब्ज ३० कोटी गॅलन
ॲल्युमिनियम	...	...	...	७,१८० टन

लोखंड	१,५५,२०,००० टन
लोखंडी कांबी	९७,२०,००० टन
पोलाद	६५,००,००० टन
दगडी कोळसा...	२७,१९,००,००० टन
लोकर	१४,५०,००,००० रत्तल

युनायटेड स्टेटस्.

गहूं	८ कोटी ७० लक्ष क्वार्टर
जव...	२ ,, ८० ,, ,,
ओट	१४ ,, १० ,, ,,
मका	३७ ,, ———— ,,
राय	४ ,, २० ,,
हॉप	४ ,, रत्तल
साखर (उसाचा)	३,२४,००० टन
,, (बीटची)	५,४१,००० टन
बीर	१ अब्ज ६५ कोटी गॅलन
तंबाखू	१ ,, ११ ,, ३४लक्ष र.
कापूस	१,४८,८५,०००गठ्ठे
लोकर	३२ कोटी २० लक्ष रत्तल
सोनें	४७. लक्ष औंस
रुपें	५ कोटी ८० लक्ष औंस
ॲल्युमिनियम	२०,६०० टन
तांबें	४,८३,७५० टन
शिसें	३,५८,००० टन
जस्त	२,४१,०००
लोखंड	४ कोटी १० लक्ष टन
,, कांब	२,३६,५०,००० टन
पोलाद	२ कोटी ३७ लक्ष टन
दगडी कोळसा...	४४,३०,२५,००० टन
पेट्रोलियम	२०,९५,६०,००० बॅरल

ग्रेटब्रिटनला लागणारा गहूं किती व कोठून येतो, त्याचा तपशील:—

	गहूं क्वॉर्टर	पीठ क्वॉर्टर
ब्रिटिशसाम्राज्य	५ कोटी ७ लक्ष	४५ लक्ष
युनायटेड स्टेटस्	३ ,, ४१ ,,	६२ लक्ष
आर्जेंटिना	१ ,, ४८ ,,	२ लक्ष
रशिया	५० ,,	११ लक्ष
इतर देश	१३ ,,	
	एकूण १० कोटी ५९ लक्ष,	१ कोटी २० लक्ष

१५ नेदरलंड	...	...	...	...	...	३	,,	०	,, ,,
१६ स्वित्झरलंड	...	...	...	...	...	२	,,	६०	,, ,,
१७ इटली	...	...	...	...	...	२	,,	०	,, ,,
१८ डेन्मार्क	...	...	...	...	...	१	,,	२७	,, ,,
१९ स्वीडन	...	...	...	...	...	१	,,	०	,, ,,
२० नार्व	...	...	...	...	...	०	,,	७०	,, ,,
२१ तुर्क राज्य	...	...	...	...	...	०	,,	५६	,, ,,
२२ स्पेन	...	...	...		...	०	,,	५६	,, ,,
२३ पोर्तुगाल	...	...	...	...	...	०	,,	२०	,, ,,
२४ रुमानिया	...	...	...	...	...	०	,,	६६	,, ,,
२५ बल्गेरिया	...	...	...	...	...	०	,,	१५	,, ,,
२६ ग्रीस	...	...	...	...	...	०	,,	१०	,, ,,
२७ नेदरलंड-इ. इंडीज		...	...	...	...	०	,,	४०	,, ,,
२८ मेक्सिको	...	...	...	...	...	०	,,	२०	,, ,,
२९ चीन	...	...	...	...	...	०	,,	४५	,, ,,
३० ईजिप्त	...	...	...	...	...	०	,,	२०	,, ,,
३१ क्यूबा	...	...	...	...	...	०	,,	१५	,, ,,
३२ आफ्रिका	...	...	...	...	...	०	,,	२५	,, ,,
३३ वरच्यांत आलेले नाहींत असे जर्मनीच्या शत्रूचे प्रांत					...	०	,,	३	,, ,,

जर्मनीचा माल हिंदुस्थानांत पुष्कळ खपतो. व गेल्या तीन वर्षांत हा जर्मन मालाचा खप सुमारें १० लक्ष पौंडांनीं जास्त वाढला आहे हिंदुस्थानांत जर्मनीचा जो माल येतो त्यापैकीं मुख्य बाबींचीं नांवें व किंमती खालीं दिल्या आहेत:-

वस्तूचें नांव	१९११-१२ सालांत आलेल्या मालाची किंमत पौंड.	१९१२-१३ सालांत आलेल्या मालाची किंमत पौं.
धातूंचे पदार्थ	१५,७१,०००	१७,९५,०००
लोकरींचीं वस्त्रें	७,४७,००८	६,३३,०००
रंग वगैरे	५,४९,०००	६,८०,०००
लोखंडी सामान	३,७८,०००	४,२७,०००
यंत्रें व गिरणीचें सामान	२,१५,०००	१,९८,०००
कापसाचीं वस्त्रें वगैरे	४,५५,०००	६,७४,०००
कांच व कांच समान	१,२१ ०००	९,७२,०००
फीत, सुताच्या गुंड्या, सुया, दोरे,	१,७७०००	१,४६,०००
मद्यें	१,२२,०००	१,५३,०००
तेलें	१,११,०००	१,८६,०००
कागद व जाड बोड	१,३७,०००	१,६४,०००
रेशमी वस्त्रें वगैरे	८१,०००	१,१७,०००
एकूण	४६,६४,०००	५३,४५,०००

प्रकरण ३१ वें.

सरकारी प्रेसनोट.

सध्यांप्रतच्या महायुद्धासंबंधानें लोकांच्या माहितीकरितां आमच्या सरकारानें एक प्रेसनोट प्रसिद्ध केली आहे. तिच्यांत युद्धाचे आरंभींच्या गोष्टी व माहिती थोडक्यांत एकत्र दिली आहे. ती माहिती अशी:—

युद्धाचें कारण.

आस्ट्रिया-हंगेरी व सर्व्हिया यांच्या दरम्यान मूळ भांडण. आस्ट्रिया देशाच्या युवराजाचा आस्ट्रियाच्या प्रजेपैकीं एकानें केलेल्या खुनाच्या कामीं सर्व्हियाचें अंग असल्याचा आरोप. सर्व्हियानें तपास करण्यासाठीं आस्ट्रियाच्या सर्व वाजवी मागण्या कबूल केल्या. आस्ट्रियानें त्याचें म्हणणें ऐकून घेण्याचें नाकारिलें व बहुतेक लागलेंच युद्ध जाहिर केलें. जर्मन बादशहा आस्ट्रियाचा परम दोस्त असल्याकारणानें त्यालाही पहिल्यापासून आस्ट्रियाचे सर्व बेत माहीत होते. सर्व्हिया बलाढय राष्ट्र होऊं नये, अशी आस्ट्रिया व जर्मनीची इच्छा होती. सर्व्हियन व रशियन हे एकाच हाडामांसाचे असून रशियानें त्यांचें आजपर्यंत संरक्षण केलें आहे. आस्ट्रियानें सर्व्हियास चिरडलेलें आपणास पहावणार नाहीं, असें रशियानें जर्मनीस सांगितलें. भांडण शांतरीतीनें मिटविण्यासाठीं इंग्लंडानें आपली शिकस्त केली; परंतु जर्मनीनें व आस्ट्रियानें रशियाविरुद्ध लवकरच युद्ध जाहिर केलें. फ्रान्स मित्रत्वाच्या तहानें रशियाबरोबर बांधला गेला होता. फ्रान्स रशियाला साह्य करील अशी भीति वाटली; म्हणून जर्मनीनें फ्रान्सच्या सरहद्दीवर सैन्य जमविलें, व बेल्जमचें सदरील भांडणांत बिलकुल अंग नव्हतें तथापि बेल्जमांत जर्मनीनें त्वरित सैन्य पाठविलें व फ्रान्सविरुद्ध युद्ध जाहिर केलें. इटली जरी जर्मनी व आस्ट्रिया यांचा दोस्त होता तरी सदरहू युद्ध जाणून बुजून कुरापत काढून सुरू केलें आहे, या कारणानें आपल्या दोस्तांस मिळण्याचें त्यानें नाकारिलें. इंग्लंडचा फ्रान्स-बरोबर मित्रत्वाचा लेखी तह झालेला नव्हता, परंतु फ्रान्सवर कोणी कारण नसतां चाल करून येईल तर त्याला मदत करण्याचें फक्त ठरलेलें होतें.

जर्मनीचा जय होईल तर आपण फ्रेंच मुलूख घेणार नाहीं असें वचन द्या, असें इंग्लंडनें जर्मनीस कळविलें. युरोपांतील फ्रेंचांचा मुलूख कायमचा घेणार नाहीं असें जर्मनीनें वचन दिलें; परंतु फ्रेंचांच्या वसाहतींबद्दल कोणतेंही अभिवचन देण्याचें त्यानें नाकारिलें. इंग्लंडनें आपल्या आरमाराच्या साह्यानें फ्रेंचांचे किनारे व जहाजांच्या वसाहती यांचें रक्षण करण्याचें फ्रान्सला वचन दिलें. हालंड व बेल्जम यांवर चाल करून जाणार नाहीं, असें वचन देखील इंग्लंडनें जर्मनीजवळ मागितलें. जर्मनीनें हालंडपुरतें अभिवचन दिलें, परंतु इंग्लंड व जर्मनी या दोवांनीं पूर्वी बेल्जमच्या स्वातंत्र्याची हमी घेतली होती, तरी जर्मनीनें बेल्जमसंबंधानें अभिवचन दिलें नाहीं. फ्रान्सवर हल्ला करून त्याचा त्वरित पराभव करणें जरूरीचें आहे, आणि ज्याअर्थी तटबंदी केलेल्या फ्रेंचांच्या सरहद्दींतून जाऊन हल्ला करण्यांत बहुत वेळ व्यर्थ जाईल, त्याअर्थी बेल्जममधून हल्ला करणें भाग आहे, असें जर्मनीनें इंग्लिश वकिलास स्पष्ट सांगितलें. त्याचप्रमाणें जर्मनीनें ताबडोब केलें. बेल्जम देश लहान व कमजोर आहे, तरी त्यानें शौर्यानें प्रतिबंध केला व बेल्जमच्या राजानें आमच्या बादशहांची मदत मागितली. बादशहांनीं साह्य करण्याचें वचन दिलें. जर्मनीनें जरी बेल्जमचें स्वातंत्र्य राखण्याचें वचन स्वार्थबुद्धीनें मोडलें, तरी इंग्लंडनें तें वचन स्वार्थबुद्धीनें मोडण्याचें नाकारलें व बादशहांनीं जर्मनीविरुद्ध युद्ध जाहिर केलें. आणि ही गोष्ट इंग्लंडांतील सर्व लोकांस व अखिल साम्राज्यांतील लोकांस पसंत पडली. त्यानंतर लवकरच जर्मनीचा दोस्त आस्ट्रिया याचेविरुद्ध देखील युद्ध जाहिर करण्यांत आलें.

आस्ट्रिया व सर्व्हिया यांच्या भांडणांत इंग्लंडचा कांहीं संबंध नव्हता. इंग्लंडचे दोस्त जे फ्रेंच त्यांना त्यांचे संकटसमयीं सोडून देण्याची इंग्लंडची इच्छा नसल्यामुळें आणि जर्मनीच्या जुलुमी लष्करी सत्तेनें लहान लहान राष्ट्रें चुरडून जाणें बरें न वाटल्यामुळें इंग्लंडास युद्धांत पडावें लागलें. ब्रिटिश साम्राज्य नेहमीं स्वातंत्र्याचा वाली असून बढाईखोराविरुद्ध आहे. फ्रेंचांचा बलाढ्य राजा नेपोलियन यानें युरोपावर लष्करी सत्ता मिळविण्यासाठीं जेव्हां प्रयत्न केला, तेव्हां हल्लींप्रमाणेंच शंभर वर्षांपूर्वी इंग्लंडानें त्यास प्रतिबंध केला होता. सन १८१५मध्यें सरतेशेवटीं त्याचा वाटर्लू येथें पुरा पाडाव झाला, आणि त्याला सेंट हेलीना बेटांत कैदी करून पाठविला व तेथें तो मरेपर्यंत होता.

युद्ध व हिंदुस्थान.

युरोपांतून हिंदुस्थानास फक्त जलमार्गानें येतां येतें; रेल्वेनें येतां येत नाहीं. खुष्कीनें हिंदुस्थानावर जर्मनीनें हल्ला करणें अगदीं अशक्य आहे. इंग्लंडहून मुंबईस कनालच्या मार्गानें मेल येण्यास २० दिवस लागतात. समुद्रावरून हिंदुस्थानावर हल्ला होणें अशक्य आहे; कारण इंग्लंडचें आरमारामुळें समुद्रावर प्रभुत्व आहे. जर्मनीचीं अद्याप पकडण्यांत आलीं नाहींत अशीं थोडीं क्रूझरें इकडे आहेत, तीं इंग्लिशांचीं निःशस्त्र व्यापारीं जहाजें वरील नावाडी उतरून घेऊन बुडवीत आहेत. 'एम्डेन' एके दिवशीं रात्रीं मद्रासेससुद्धां गेलें आणि त्यानें त्या शहरावर तोफा मारल्या. त्यानें फारच थोडी नुकसानी केली. फक्त ३–४ मनुष्यें मेलीं, आणि मद्रास येथील तोफांचा भडिमार सुरू होतांच ' एम्डेन ' पळून गेलें. तें क्रूझर मद्रासेस फक्त पंधरा मिनिटें होतें. आमच्याजवळ तोफा होत्या हें त्यास माहित नसावें असें दिसतें लढाई करण्याचा त्याचा हेतु नसून व्यापारास अडथळा करण्याचा हेतु होता. त्यानें लढाऊ जहाजावर हल्ला केलेला नाहीं व बुडविलेलें नाहीं. फक्त निःशस्त्र जहाजें बुडविलीं आहेत. शेवटीं त्याचा कोको बेटाजवळ सिडने जहाजानें अंत केला. इंग्लिशांच्या लढाऊ जहाजांनीं जर्मनीचीं पुष्कळच व्यापारी जहाजें पकडलीं आहेत. एका क्रूझरानें एकट्यानेंच नऊ जहाजें पकडलीं. जर्मन लोक जीं जहाजें पकडतात, तीं त्यांस बुडवावीं लागतात. आम्हीं तीं तशींच ठेवून त्यांचा उपयोग करून घेतों. कारण आमचीं पुष्कळ बंदरें आहेत व तेथें आम्हांस तीं नेतां येतात. ह्याप्रमाणें इंग्लिशांच्या आरमारास कोठेंही जातां येतें त्यांस जेथें कोळसा व अन्नसामुग्री मिळेल, अशीं त्यांचीं बंदरें सर्व जगभर आहेत. मुंबईसारखीं ब्रिटिशांचीं सर्व मुख्य बंदरें मोठ्या तोफांनीं व सर्चलाइटांनीं संरक्षित आहेत. जर्मनीचीं फारच थोडीं बंदरें आहेत. टोगोलँड, आणि जर्मन पश्चिम अफ्रिकेची राजधानी हीं काबीज करण्यांत आलीं आहेत. चिनांतील कियाचौवर जपाननें स्वारी करून तें घेतलें. जीं थोडीं जर्मनांचीं जहाजें मोकळीं आहेत, त्यांना लवकरच कोळसा व अन्नसामुग्री मिळण्यासारख्या जागा मुळींच राहणार नाहींत. बैल जसा अन्नपाण्याशिवाय पुष्कळ दिवस गाडी ओढूं शकत नाहीं; त्याप्रमाणें आगबोटी कोळशाशिवाय पुष्कळ वेळपर्यंत चालूं शकणार नाहींत. पाणबुड्या बोटी,

आकाशयानें, विमानेंसुद्धां त्यापेक्षां अधिक परावलंबी असतात. त्यांस तेल, पेट्रोल व ग्यास मिळेल असे डिपो जवळच असावे लागतात. अशा वाहनांनीं यूरोपांतून हिंदुस्थानांत येणें अगदीं अशक्य आहे.

आरमारी परिस्थिति.

कीलच्या कालव्यांतून लढाऊ जहाजें उत्तर समुद्रांतून बाल्टिक समुद्रांत व परत बाल्टिक समुद्रांतून उत्तर समुद्रांत जाऊं शकतात. ह्या कालव्यास दोन्हीं टोकांशीं मजबूत तटबंदी केलेली आहे. जर्मनीचा समुद्रकिनारा फार लहान असून, त्याला बंदरांची फार उणीव आहे. मोठीं जहाजें आंत येऊं शकत नाहींत. वुइलहेम्सहॅव्हन हें कृत्रिम बंदर आहे, यामुळें ब्रिटिश आरमारास जर्मनीच्या किनाऱ्यावर हल्ला करतां येत नाहीं; परंतु जर्मनीचें आरमार कुचकामाचें आहे, त्याची बाहेर येण्याची छाती नाहीं. युद्ध सुरू झाल्यापासून एका आठवड्यांत आम्ही तोफा, घोडे, अंब्युलन्स इत्यादिकांसह दीड लाख मोहिमेवर पाठविलेली फौज आरमारखात्याच्या संरक्षणाखालीं किती सहजरीतीनें जमिनीवर उतरली. तसेंच नार्वे, डेन्मार्क, हालंडांतील फ्लशिंग व बेल्जमांतील आस्टेंड येथें जहाजें अव्याहत जात येत आहेत. फौजा खचून भरून सुमारें ७० जहाजें पूर्वीच हिंदुस्थानांतून पाठवून दिलीं. तीं फ्रान्सांत मार्सेल्स येथें सुखरूप पोंचलीं आहेत. परंतु जलमार्गानें सैन्य पाठविणें जर्मनीला शक्य नाहीं; कारण आमचें आरमार त्यांच्या जहाजांचा ताबडतोब नाश करील. डोव्हरची सामुद्रधुनी फक्त २० मैल रुंद आहे. तींतून जाणाऱ्या कोणत्याही जहाजास आम्ही प्रतिबंध करूं शकतों. जर्मनीनें आजपर्यंत जर आमच्या आरमाराचें नुकसान केलें असेल, तर तें फक्त तरते सुरुंग टाकून व एक दोनदा पाणबुडया बोटींनें हल्ला करून केलें. जर्मनीचीं जहाजें बाहेर पडावीं म्हणून जेव्हां आमचीं जहाजें जर्मनीच्या किनाऱ्याजवळ जातात व त्यांच्यावर हल्ला करतात, तेव्हां सुरुंगानें तीं केव्हां केव्हां फुटून जाणें हें अपरिहार्य आहे. आमच्या खलाशी लोकांचें मोठें कौशल्य व धाडस यांमुळें **अजमासापेक्षां पुष्कळ कमी बेळां** असें घडून आलें; परंतु जर्मनीचीं पुष्कळ जहाजें बुडालीं. आमच्याजवळ इतकीं लढाऊ जहाजें आहेत कीं, प्रसंग पडल्यास तीं जर्मनांपेक्षांही अधिक खचीं घालणें आम्हांस परवडेल. आपलें एकही जहाज न दगावतां ब्रिटिशांनीं

जर्मनीचीं पांच लढाऊ जहाजें बुडविलीं. समुद्र जहाजरहित करण्यास व जाळयांत मासा पकडावा त्याप्रमाणें सुरुंग काढून टाकण्यास ब्रिटिश आरमाराजवळ खास बोटी आहेत. त्या देखील कित्येक ठिकाणीं सुरुंग घालीत आहेत, म्हणून जर्मनीचें आरमार बाहेर पडण्याचा प्रयत्न करील तर त्याचीं बरींच जहाजें फुटून जाण्याचा संभव आहे. जगांतील सर्व आरमारांपेक्षां ब्रिटिशांचें आरमार अत्यंत बलाढ्य आहे; जर्मनीच्या आरमारापेक्षां तें अधिक बलवान् असून ब्रिटन् नवीन जहाजें अधिक लवकर बांधू शकतें. जर्मनीच्या व ऑस्ट्रियाच्या आरमारांपेक्षां ब्रिटिश, फ्रेंच व रशियन आरमारें दुपटीनें मोठीं आहेत. जर्मनीच्या व ऑस्ट्रियाच्या आरमारांस कांहीं कारितां येणार नाहीं. जर्मनीच्या आरमाराची हालचाल बंद आहे; व जर्मनीचा समुद्रावरील सर्व व्यापार बंद झाला आहे. सर्व जगभर जर्मन बोटी पकडण्यांत आल्या आहेत. उदाहरणार्थ, रेन्फेल्स व वार्टम या बोटी मुंबईस पकडल्या आहेत. जर्मन बोटींना जर्मनीस अन्न व सामुग्री नेतां येत नाहीं, यामुळें जर्मनीचें मोठें नुकसान होत असून त्यांस फार त्रास होत आहे. परंतु ब्रिटिशांचा समुद्रावरील व्यापार बहुतेक पूर्वीप्रमाणेंच चालू आहे. ऑस्ट्रियास समुद्रांत येण्यास फक्त मार्ग उत्तर ऑड्रिआटिकांत आहे. फ्रेंच व ब्रिटिश आरमारें ऑड्रिआटिक समुद्रांतून शत्रूंस हांकून देत आहेत, व ऑस्ट्रियाचीं बेटें व ऑस्ट्रिया देश ह्यांवर तोफांचा भडिमार करून तीं हस्तगत करीत आहेत. युद्ध सुरू होण्यापूर्वी मुंबईहून सुटलेल्या 'मेरियनबाड' नांवाच्या मोठ्या ऑस्ट्रियन आगबोटीनें ट्रीस्टला जाण्याचा प्रयत्न केला, परंतु ती पकडली गेली.

युद्धांत सामील झालेल्या राष्ट्रांचें सामर्थ्य.

इंग्लंडशिवाय युरोपखंडांतील सर्व राष्ट्रांत सक्तीच्या लष्करी शिक्षणाची पद्धत आहे. तीबरहुकूम सर्व पुरुषांना विवक्षित मुदतीपर्यंत सैन्यांत नोकरी करावी लागते; व युद्धाचे वेळीं त्यांस मोहिमेवर लढण्याकरितां बोलावण्यांत येतें. म्हणून एकदा सैन्याची जमवाजमव केली म्हणजे तरुण मुलगे व वृद्ध पुरुष ह्यांच्याशिवाय राखून ठेवलेलें असें सैन्य नसतें. पण इंग्लंडांत लष्करांत नोकरी करणें ऐच्छिक आहे. शांततेच्या कालांत आमचें रेग्युलर सैन्य फारच थोडें असतें, पण राखून ठेवलेलें सैन्य व मुबलक व्हालंटीयर्स आम्हापाशीं असतात. दोन आठवड्यांच्या अवधींत आम्हीं राखून ठेविलेलें सैन्य व्हालंटी-

यर्स शिवाय करून १ लाख नवी रेग्युलर फौज उभी केली. हिंदुस्थानांत आमच्याजवळ उत्कृष्ट सैन्य आहे. व कानडा, न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया व दक्षिण आफ्रिका इत्यादि देशांतून हजारों तयार सैनिक व व्हालंटियर्स आम्हांस जमवितां येतील. या युद्धांत हिंदी सैन्य भाग घेत आहे. शांततेच्या काळांत ब्रिटिश रेग्युलर सैन्य २$\frac{1}{2}$ लाखांवर असतें. या सैन्यांत पुष्कळ दिवस नोकरी केलेलें व उत्तमरीतीनें शिकून तयार झालेलें व शिस्त असलेले लोक आहेत. त्यापैकीं कांहीं ब्रिटिश वसाहतींत व मुलुखांत ठेविले आहेत. परंतु खुद्द इंग्लंडांत १$\frac{1}{2}$ लाखापेक्षां जास्त सैन्य बाहेरील कामगिरीकरितां नेहमीं तयार ठेविलेलें असतें. जर्मनलोकांविरुद्ध सध्यां लढत आहे तेंच मोहिमेवरील सैन्य होय. लॉर्ड किचनेर यांनीं रेग्युलर सैन्यासाठीं आणखीं ९ लाख लोक पूर्वीच जमविले आहेत. त्यांस शिक्षण मिळत आहे; व थोडयाच अवधींत ते शत्रूबरोबर लढण्यास तयार होतील. जरूर पडल्यास आणखीही सैन्य ठेवण्याची ते व्यवस्था करतील. टेरिटोरियल अथवा व्हालंटियर सैन्य (मुख्यतः इंग्लंडच्या संरक्षणाकरितां) या सैन्यांत ३ लाखांवर लोक आहेत. पुष्कळ लोकांनीं बाहेर कामागिरीकरितां आपली इच्छा दाखविली आहे. सैन्याची भरती जोरांत चालू आहे. ज्यांनीं रेग्युलर सैन्यांत आपली नोकरीची मुदत पुरी केली आहे, अशा प्रकारचे लोक आर्मी-रिझर्व्हमध्यें आहेत. परंतु जरूर पडेल तेव्हां पुनः नोकरी करण्यास त्यांची तयारी आहे. हे जवळ जवळ १$\frac{1}{2}$ लाख आहेत. टेरिटोरियल्स व्हालंटीयर्सचें अशाच प्रकारचें राखून ठेवलेलें सैन्य आहे, त्यास स्पेशल रिझर्व्ह असें म्हणतात. ज्यांस लष्करी शिक्षण मिळालेलें असतें व जे निकडीच्या प्रसंगीं नोकरी करण्यास तयार असतात, अशा लोकांची नॅशनल रिझर्व्ह नांवाची बिनसरकारी संस्था देखील आहे. सरकार त्यांस पैशांची मदत करिते. त्यामध्यें तीन वर्ग आहेः—(१) रणांगणावर लढण्यास योग्य असलेला. (२) किल्ल्याच्या संरक्षणाचें व व्यवस्थेचें काम करण्यास योग्य असलेला. (३) व्यवस्थेच्या कामीं, सैन्यांत भरती करण्याच्या कामीं वगैरे ज्यांस मदत करतां येईल अशा दर्जाचे आनररी लोकांचा. ही संस्था बाल्यावस्थेंत आहे. ह्या संस्थेच्या पटावर अर्डाच वर्षांमागें लाख लोक होते. आतां ही संख्या पुष्कळ वाढली आहे. १९११ मध्यें युनायटेड किंग्डमची लोकसंख्या साडेचार कोटींवर होती, त्यामुळें भरतीसाठीं घेतां येतील असे पुष्कळ

लोक आमच्याजवळ आहेत. वसाहतींतही आणखी पुष्कळ लोक आहेत. उदाहरणार्थ, कानडा एक लाख सैन्य पाठवीत आहे. त्यांपैकीं कांहीं इंग्लंडास येऊन पोंहोंचलेंही आहे. ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंडमधून देखील सैन्यें येत आहेत. हिंदुस्थानांत पुष्कळ शूर शिपाई आहेत. बादशहांकरितां लढण्यास फ्रान्स देशांत त्यांपैकीं पुष्कळ हिंदी सैन्य उतरून चुकलें आहे. युद्धावर जाण्यासाठीं ज्यांची निवड झाली नाहीं असेच हिंदी सैनिक मात्र कमनशीबी आहेत. प्रथमतः जेव्हां हिंदी सैन्य फ्रान्स देशांत उतरलें, तेव्हां त्यांचें अंतःकरणपूर्वक स्वागत करण्यांत आलें, व त्यांच्यावर पुष्पवृष्टि करण्यांत आली. अशाप्रकारें नवीन दमाचें सैन्य आम्ही शत्रूंवर सारखें पाठविण्यास समर्थ आहों. व झालेलें नुकसान आम्ही भरून काढूं; इतकेंच नव्हे तर आम्हास खरोखरच सैन्याची वाढ करितां येईल. आम्हांस नवीन दमाचें सैन्य तयार मिळूं शकेल, परंतु शत्रूंच्या सैन्याची युद्ध व रोग ह्यांमुळें वाताहात होत आहे, व लढाईंत मारले गेलेल्या व जखमी झालेल्या त्यांच्या सैनिकांची जागा भरून काढण्यास त्यांच्याकडे नवीन सैन्य नाहीं; म्हणून आम्ही शत्रूंचा पराजय लवकर केला नाहीं, किंबहुना आम्हीं हटलों तरी हरकत नाहीं. जितका वेळ जास्त जाईल तितकें आम्हांस फायदेशीर आहे; आणि आज नाहीं उद्यां आमचा जय हा झालाच पाहिजे.

युद्धांत गुंतलेल्या राष्ट्रांच्या सैन्याचा अंदाज.

[टीपः—परराष्ट्राबद्दल दिलेले आंकडे सरकारी नाहींत; कारण युद्धांत गुंतणाऱ्या एकंदर सैन्याचा आंकडा प्रसिद्ध झाला नाहीं, बहुतेक बाबतींत दिलेले आंकडे कमाल अंदाजाचे आहेत.]

(टाइम्स ऑफ इंडिया, १३ आगष्ट १९१४)

दोस्त राष्ट्र.

रशिया—

शांततेच्या कालांतील सैन्य १२ लाख सर्वप्रकारचें
राखून ठेवलेलें सैन्य धरून युद्धाच्या वेळचें सैन्य .... ४९लाख.

फ्रान्स—

शांततेच्या कालांत .... ७$\frac{1}{4}$,,
युद्ध'चे कालांत .... ४० ,,

बेल्जम—

शांततेच्या कालांत.... .... ,,
युद्धाचे ,, ... ३ ,,

सर्व्हिया—

शांततेच्या कालांत.... .... $\frac{१}{२}$,,
युद्धाचे ,, ... ३ ,,

मॉंटिनिग्रो—

शांततेच्या कालांत .... ३ हजार.
युद्धाचे ,, ... ३० हजार

जपान—

शांततेच्या कालांत .... २$\frac{१}{४}$ लाख.
युद्धाचे ,, ... २० ,,

शत्रु.

जर्मनी—

शांततेच्या कालात .... ८ लाख.
युद्धाचे ,, ... ५२ ,,

ऑस्ट्रिया-हंगेरी—

शांततेच्या कालांत .... ४ लाख.
युद्धाचे ,, ... २५ ,,
टर्की .... ५ ,,

(बरेंचसें ऑस्ट्रियन सैन्य स्लाव्ह असून जवळ जवळ सर्व्हियन आहे. व तें सर्व्हियन लोकांविरुद्ध लढण्यास नाकारण्याचा संभव आहे.)

सर्व मिळून (वेळोवेळीं वाढवितां येण्यासारखें ब्रिटिश सैन्य व जपानचें सैन्य सोडून).

दोस्त राष्ट्रांचें युद्धाच्या वेळचें सैन्य .... ९१ लाख.
शत्रूचें ,, ,, ,, ... ८५ ,,

आधुनिक तोफांचा मारा.—आधुनिक तोफांचे निरनिराळ्या तऱ्हेचे मार व सैन्य आणि किल्ले यांवर त्यांचा परिणाम.

युरोपांतील सांप्रतचें महायुद्ध.



तुर्कस्तानानें विकत घेतलेलें जर्मन क्रूझर गोबन



भूमध्या उपसागरांत व आरबी समुद्रांत संचेपणा करणारे 'एम्डन' हे

तटस्थ राष्ट्रांचें युद्धाच्या वेळचें सैन्य—

इटली	....	....	....	२० लाख.
हालंड	....	....	....	१$\frac{3}{4}$,,
बलगेरिया	....	....	....	५$\frac{1}{2}$,,
ग्रीस	....	....	....	२ ,,
रोमानिया	....	..	....	७ ,,

आरमारें.

दोस्त राष्ट्रें.

इंग्लंड—

युद्धाच्या वेळचें आरमारी सैन्य. .... २ लाखांवर.

फ्रान्स—

युद्धाच्या वेळचें आरमारी सैन्य. .... १$\frac{1}{3}$ लाखांवर.

जपान—

युद्धाच्या वेळचें आरमारी सैन्य .... १ लाखांवर.

रशिया—

शांततेच्या वेळचें आरमारी सैन्य .... $\frac{1}{2}$ लाखांवर.
युद्धाच्या वेळचें आरमारी सैन्य .... माहित नाहीं.

शत्रु.

जर्मनी—

युद्धाच्या वेळचें आरमारी सैन्य १$\frac{1}{2}$ लाख.

आस्ट्रिया—

युद्धाच्या वेळचें आरमारी सैन्य. $\frac{1}{3}$,,

टीप:—इंग्लिश सैन्याच्या २ लाखांपैकीं फक्त ६३,००० रिझर्व आहेत; परंतु जर्मन सैन्याच्या १$\frac{1}{2}$ लाखांपैकीं ८०,००० रिझर्व्ह आहेत. फक्त एकट्या इंग्लंडचें सैन्य व लढाऊ जहाजें, जर्मनी व आस्ट्रिया ह्या दोघांच्या

सैन्यापेक्षां व जहाजांपेक्षां अधिक आहेत. इंग्लिश आंकड्यांमध्यें वसाहतींचे आंकडे धरलेले नाहींत.

इटली—

युद्धाच्या वेळचें आरमारी सैन्य. .... $\frac{3}{4}$ लाख.

पैकीं ४०,००० रिझर्व्ह आहेत.

प्रकरण ३२ वें.

तुर्कस्तानाशीं युद्ध उपस्थित होण्याचें कारण.

खालील माहिती सरकारमार्फत प्रसिद्ध झाली आहे:—

ओडेसा येथील ब्रिटिश कान्सल जनरल यांजकडून तारीख २९ आक्टोबरच्या तारेनें खालीं लिहिल्याप्रमाणें खबर आली आहे. दोन तीन टार्पेडो बोटींनीं आज सकाळीं पहाटेपूर्वी ह्या बंदरावर हल्ला केला व बंदरांत असलेली रशियन गनबोट " डोनेट्झ " बुडविली. खलाशांपैकीं कांहीं मेले व कांहीं जखमी झाले. रशियन वाफेचीं जहाजें " व्हिटिआझ, " " व " व्हान्याव " यांची खराबी झाली आहे. फ्रेंच जहाज " पोर्तुगाल " याची खराबी झाली आहे. त्याच्या खलाशांपैकीं दोन मेले व दोन जखमी झाले. शहरावर ज्यास्त गोळे सोडण्यांत येऊन त्यांच्यामुळें साखरेच्या कारखान्याची खराबी झाली, व थोडीशी प्राणहानि झाली. ओडेसा येथील गव्हर्नर म्हणतात कीं, हल्ला करणारीं जहाजें तुर्कस्थानचीं होतीं.

अशीही खबर मिळाली आहे कीं, कान्स्टांटिनोपल येथें बंदरांत असलेलें रशियन स्थायी जहाज बुडविलें गेलें व थिओडोसियावर जलमार्गानें हल्ला करण्यांत आला. राशियावरील हे हल्ले, लढाई जाहीर केल्याशिवाय व यत्किंचित्ही चिथावणी किंवा निमित्तावांचून करण्यांत आले आहेत. ज्याअर्थी ग्रेटब्रिटनच्या मित्रराज्याविरुद्ध केलेल्या सदर्हू लढाईच्या कृत्यांचा ब्रिटिश व तुर्की सरकारांतील संबंधावर गंभीर परिणाम होण्याचा संभव आहे; त्याअर्थी जर्मनीच्या चिथावणीवरून तुर्की सरकारानें जें आगळीक करण्याचें धोरण

एकसारखें ठेविलें आहे, आणि वर सांगितलेल्या कृत्यांत ज्याची परमावधि झाली आहे, तें दर्शाविणारी खालील हकीकत हिंदुस्थानांतील राजे व रयत यांस विलंब न लावितां कळविणें इष्ट आहे, असें आलीजा व्हाइसराय साहेब यांस वाटतें.

जर्मन लढाऊ गलबतें 'गीबेन' आणि 'ब्रेसलॉ' यांच्यासंबंधानें तुर्की सरकारानें स्वीकारलेल्या धोरणामुळें लंडन, पारिस आणि पेट्रोग्राड येथें मोठी चिंता उत्पन्न झाली आहे. हीं गलबतें भूमध्यसमुद्रांतील फ्रेंच व ब्रिटिश आरमारापासून पळून जाऊन त्यांनीं डार्डनेल्सच्या सामुद्रधुनीचा आश्रय धरिला. तीं गलबतें तेथें असतांना, राष्ट्रांराष्ट्रांतील कायद्यान्वयें व तुर्की सरकारच्या तहांबरहुकूम, तुर्की सरकारनें लढाई संपेतोंपर्यंत तीं गलबतें धरून ठेऊन त्यांवरील खलाशांस स्वदेशीं पाठवून द्यावयास पाहिजे होतें, किंवा २४ तास होतांच त्यांना खुल्या समुद्राकडे परत जाण्यास भाग पाडलें पाहिजे होतें.

असें न करितां त्या गलबतांना आश्रय धरून राहूं दिलें; आणि फ्रेंच गलबतांवर लढाईचे हक्क चालवूं दिले; आणि नंतर एकाएकीं असें जाहीर करण्यांत आलें कीं, तुर्की सरकारानें तीं विकत घेतलीं आहेत. शिवाय तुर्की सरकारानें त्यांवरील जर्मन खलाशी त्यावरच राहूं दिले, आणि तुर्की आरमाराचा वरिष्ठ अधिकार ज्या ब्रिटिश आड्मिरलकडे होता त्यास काढून टाकण्यांत आलें.

त्याच वेळीं डार्डनल्सच्या मार्गांत पाणसुरुंग लावून ठेवण्यांत आले; आणि त्या जलप्रदेशांत असलेलीं किंवा काळ्या समुद्रांतून येत असलेलीं सर्व ब्रिटिश व्यापारी गलबतें थांबविण्यांत आलीं. असें करण्याचें कारण पहिल्यानें असें पुढें करण्यांत आलें कीं, त्या गलबतांतील माल, तुर्कीसरकार आपलें सैन्य गोळा करीत असल्यामुळें, त्या सैन्यासाठीं पाहिजे आहे; व मागाहून असें कारण सांगण्यांत आलें कीं, पाण्यांत सुरुंग लाविलेले असल्यामुळें, तेथें गलबतें चालविणें धोक्याचें आहे. ह्या रीतीनें तुर्कीसरकारासारख्या एका तटस्थ राष्ट्रानें ग्रेटब्रिटनच्या व्यापारास नाहक अडथळा करून, माल पाठविणारांचें जबर नुकसान केलें एवढेंच नव्हें; तर त्यामुळें त्या वेळीं काळ्या समुद्रांत असलेल्या सगळ्याच ६०–७० ब्रिटिश गलबतांचा व्यापार बंद

पडला; कारण त्यांस भूमध्यसमुद्रांत जाणें अशक्य झालें एवढेंच नाहीं, तर 'गीबेन' आणि 'ब्रेसलॉ' ह्यांना काळ्या समुद्रांत शिरून, तेथें गोळा झालेल्या सर्व जहाजांचा नाश करण्यास कोणताच अडथळा राहिला नाहीं. राष्ट्रांराष्ट्रांतील तहनामे झुगारून देऊन, डार्डनेल्सची सामुद्रधुनी आतां बंद करण्यांत आली आहे.

विशेष चिंतेचें दुसरें एक कारण म्हटलें म्हणजे, बगदाद येथील आणि मेसोपोटेमियांतील जबाबदार तुर्की अधिकाऱ्यांचें ब्रिटिश प्रजेशीं शत्रुत्वाचें वर्तन व ग्रेट ब्रिटन व त्यांचीं मित्रराज्यें यांविरुद्ध तेथील लोकांची तुर्की अधिकारीवर्गाकडून चिथवणूक, हें होय. इतकी चिथवणूक झाली असूनही इंग्रजसरकाराकडून असें कळविण्यांत आलें कीं, 'गीबन' व 'ब्रेसलॉ'-वर जर्मन खलाशांच्या ऐवजीं तुर्की खलाशी ठेविल्यास आणि ब्रिटिश व्यापारी जहाजांस अडथळा न झाल्यास व तुर्की सरकारानें तटस्थराष्ट्राचे धर्म इमानें इतबारें पाळल्यास सदरील सर्व बेकायदेशीर व शत्रुत्वसूचक कृत्यांकडे लक्ष दिलें जाणार नाहीं; एवढेंच नव्हे, तर तुर्की साम्राज्याचें स्वातंत्र्य आणि त्याचा अखंडपणा मनोभावेंकरून कायम राखण्याबद्दल ग्रेटब्रिटनकडून प्रतिज्ञापूर्वक लेखी हमी देण्यांत येईल.

आणखी असेंही आश्वासन देण्यांत आलें कीं, लढाई संपल्यावर तह होते वेळीं, तुर्की राज्याच्या स्वातंत्र्यास व अखंडपणास बाध आणणारी कोणतीच अट ग्रेट ब्रिटन मंजूर होऊं देणार नाहीं, आणि तुर्की राज्यास फायदेशीर अशा पैशासंबंधाच्या अटी मिळवून देण्यांत येतील.

हीं आश्वासनें दिल्यानंतरही ग्रेटब्रिटनशीं तुर्कीसरकारचें वर्तन अधिकाधिक वैमनस्य वाढविणारें असेंच होत गेलें. इंग्रज सरकारास सिरिमामध्यें करण्यांत येत असलेल्या लष्करी तयारीच्या बातम्या मिळाल्या. ह्या तयारीचा उद्देश इजिप्तवर स्वारी करण्यास सुलभ जावें एवढाच असावा. शिवाय ईजिप्तच्या सरहद्दीवरील मुलुखांतील बदुइन आरब लोकांमध्यें तुर्क आणि जर्मन हेरांनीं गडबड चालविली असल्याबद्दलही सरकारला बातम्या मिळाल्या. मोसल आणि दमास्कस येथील सैन्यें गोळा झाल्यापासून त्यांतील तुकड्या अकबा व गाझाकडून ईजिप्त व सुएझ कनालवर स्वारी करण्याच्या उद्देशानें दक्षिणेकडे एकसारख्या पाठविण्यांत येत आहेत. या साहसांस मदत करण्या-

साठीं बदुईन आरबांच्या बऱ्याच मोठ्या टोळीस बोलावून त्यांना शस्त्रें देण्यांत आलीं आहेत. लष्कर नेण्याचीं साधनें गोळा करण्यांत आलीं असून इजिप्तच्या सरहद्दीपर्यंत रस्ते तयार करण्यांत आले आहेत. जलमार्गानें होणाऱ्या हल्ल्यापासून सैन्याचें रक्षण व्हावें म्हणून अकबच्या आखातांत ठेवण्यासाठीं पाणसुरुंग पाठविण्यांत आले आहेत. आणि ख्रिस्ती लोकांविरुद्ध मुसलमानांचीं मनें चिथविण्यासंबंधानें ज्याची इतकी ख्याती आहे, त्या प्रसिद्ध शेख अझीच शाविशनें मुसलमान लोकांना ग्रेटबिटनच्या विरुद्ध लढण्यास चिथविणारा एक फंदफितुरी लेख प्रसिद्ध करून तो सर्व सिरिया प्रांतांत, आणि बहुतकरून हिंदुस्थानांतही वांटला आहे. असेंही ऐकण्यांत आहे कीं, केरो शहरांत ईजिप्तमधील ब्रिटिशअधिकाराविरुद्ध कृष्णकारस्थानें करण्यांत जो इतका वेळ गुंतलेला होता; आणि जो हल्लीं कॉन्स्टान्टिनोपल येथील जर्मनवकीलाचा दुय्यम आहे, तो डाक्टर प्रुफर सिरिया प्रांतांत तेथील लोकांना यां लढाईंत पडण्यास चिथविण्याच्या कामांत गुंतला आहे. ह्याच प्रकारचीं कृष्णकारस्थानें अन्यत्रही सुरू करण्यांत आलीं असून हिंदुस्थानच्या मुसलमान लोकांस ब्रिटिश सरकारच्या विरुद्ध चिथविण्याच्या हेतूनें तुर्की हेर हिंदुस्थानांत पाठविण्यांत आले असल्याबद्दल ही वातमी लागली. ह्या कारस्थानाचा प्रसार किती झालेला आहे, त्याचें एक ढळढळीत उदाहरण अलेक्झांड्रिया सिटि-पोलीसमधील एका जर्मन नोकराचें आहे. हा मनुष्य आपणास लष्करी नोकरी माफ झाली आहे, असें सांगून नुकताच रजेवरून कॉन्स्टान्टिनोपलच्या मार्गानें परत आला होता. बोटींतून उतरतांना त्याला संशयावरून पकडलें; तेव्हां त्याच्याजवळ सुवेझच्या कालव्याचा एक सविस्तर नकाशा, टोपींत लपविलेला नंबर दिलेल्या सांकेतिक संदेशांचा एक कागद व दुसरी लबाडी शाबीत करणारीं पत्रें मिळालीं. त्याशिवाय त्यानें बोटीच्या एका खलाशाजवळ डिनामैट किंवा नैट्रोग्लिसरीन उडविण्याच्या फटाक्यांच्या दोन पेट्याही ठेविल्या होत्या. आणखी एक गोष्ट अशी कीं, जर्मन लष्करी व आरमारी अंमलदारांचा व शिपायांचा एकसारखा वाढता प्रवाह सर्व प्रकारच्या युद्धसामुग्रीसहवर्तमान, कान्स्टान्टिनोपलमध्यें येत चाललेला असून, तें शहर वास्तविक जर्मन लोकांचें एक मुख्य लष्करी ठाणेंच बनलें आहे. जर्मन अंमलदार तुर्कीराज्याच्या कोनाकोपऱ्यांत प्रवेश करून, तेथील रहिवाशां-

धिकारी असतो. सैन्याचा सर्व कारभार 'आर्मी कौन्सिल' नामक संस्था पाहते. या कौन्सिलांत चार लष्कराचे व तीन सिव्हिलियन प्रतिनिधि असतात, व त्यांत 'सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर वॉर' हा मुख्य असतो. त्याची नेमणूक तत्कालीन विद्यमान् अधिकारी पक्षाकडून होते. बहुधा 'वॉर सेक्रेटरी' हा सिव्हिलियन असतो; पण सांप्रतचे प्रसंगीं फिल्ड मार्शल अर्ल किचनेर यांची नेमणूक या जबाबदारीचे जागेवर करण्यांत आली आहे. अर्थात् ब्रिटिश सेनेचे आजचे मुख्य कारभारी तेच आहेत, असें म्हणावयास हरकत नाहीं.

वर सांगितलेल्या 'आर्मी कौन्सिलांती' ल प्रत्येक सभासदाचें खातें वेगवेगळें असून, सैन्याच्या कारभारापैकीं कांहीं बाबींच्या व्यवस्थेस तोच जबाबदार असतो. या सभासदाचे हाताखालीं 'चीफ ऑफ स्टाफ' नामें अधिकारी असतो, त्याचेवर अनेक प्रकारची कामगिरी सोंपविलेली असते. 'पार्लमेंटरी अंडर सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर वॉर' यांजकडे मुख्यतः 'टेरिटोरियल' फौजेची व्यवस्था सोंपविलेली असते.

ब्रिटिश सैन्याचे 'फील्ड मार्शल' ही बहुमानाची पदवी दहा जणांस आहे. सर्वांत अलीकडील 'फील्ड मार्शल' सर जॉन फ्रेंच हे होते ज्यांच्याशीं आज इंग्लंडास युद्ध करावें लागत आहे अशा शत्रु-राजांपैकीं जर्मनीचे बादशहा व आस्ट्रियाचे बादशहा यांस ब्रिटिश सैन्याचे फिल्ड मार्शल हा किताब बहुमानपुरःसर दिलेला होता.

ब्रिटिश सैन्यांतील मुख्य अधिकाऱ्यांचा दर्जा व हुद्दे खालीं दिल्याप्रमाणें आहेत:—

(१) **फील्ड मार्शल**—ब्रिटिश सेनेंतील सर्वांत श्रेष्ठ अधिकारी. अधिकार 'जनरल'चा.

(२) **जनरल**—सेनापति (कमांडर-इन-चीफ) उ० हिंदुस्थानांतील कमांडर-इन-चीफ.

(३) **लेफ्टनन्ट जनरल**—लढाईचे वेळीं डिव्हिजनवरील अधिकारी.

(४) **मेजर जनरल**—लढाईचे वेळीं ब्रिगेड अगर डिव्हिजनवरील अधिकारी.

(५) **ब्रिगेडियर जनरल**—ब्रिगेडवर अधिकार चालविण्यासाठीं कर्नलास दिलेला हुद्दा.

(६) **कर्नल**—रेजिमेंट (पलटण) मधील सर्वांत मोठा अधिकारी.

(७) **लेफ्टनन्ट कर्नल**—याजकडे घोडेस्वारांच्या रेजिमेंटचा अधिकार असतो.

(८) **मेजर.**

(९) **कॅप्टन.**

(१०) **लेफ्टनन्ट.**

(११) **सेकंड लेफ्टनन्ट.**

ब्रिटिश फौजेंत 'ली–एन्फील्ड रायफल' नांवाच्या बंदुका, वजन ९$\frac{१}{४}$ रत्तल, मारा २८०० यार्डांचा व दहा बारी आहेत. व तोफा १८ पौंडरच्या (फील्ड गन्स) आहेत.

लढाईवर गेलेल्या ब्रिटिश सैनिकास (सोल्जरास) दररोज प्रत्येकीं किती आहार देण्यांत येतो याची ठोकळमानाची एक यादी एके जागीं दिली आहे ती अशी:—

ताजें मांस (बीफ)	....	....	....	....	१ रत्तल
बिस्किटें	....	....	....	....	१ रत्तल
साखर	....	....	....	....	२$\frac{१}{२}$ औंस
जॅम	....	....	....	....	९ औंस
ओटमील	....	....	....	....	२ औंस
मलई	....	....	....	....	२ औंस
बेकन (मांस)	....	....	....	....	२ औंस
भाजी	....	....	....	....	८ औंस

फ्रेंच सेना.

फ्रेंच सेनेचे मुख्य तीन विभाग आहेत ते असे:—

(१) होम (मेट्रापॉलिटन्)

(२) कलोनियल (फ्रान्समध्येंच असणारें)

(३) कलोनियल (वसाहतींत असणारें)

यापैकीं पहिल्या विभागांतील नोकरी सक्तीची आहे. दुसऱ्या विभागांतील मुख्यत्वें स्वखुशीची (व्हालंटरी); तिसऱ्यांतीलही स्वखुशीचीच खरी पण

सरकारास गरज लागेल तेव्हां या विभागांतील फौजेनें चाकरीवर रुजू झालें पाहिजे असा निर्बंध आहे.

नेहमीं तयार सैन्याची विभागणी पुढीलप्रमाणें:—

फ्रान्समध्यें	९१७,९६३
आल्जरियांत	९६,७००
ट्यूनीसमध्यें	१८,२००
(ह्यांत दोन तृतीयांश तद्देशीय आहेत.)	
जेन्डार्मरी	२९०००
फ्रान्समधील कलोनियल फौज	२८०००
वसाहतींतील फौज (अर्धी तद्देशीय आहे.)	१३०,०००

रणांगणांत उभी करतां येणाऱ्या फौजेची रचना:—

पहिली ओळ....	७५०,०००
दुसरी ओळ	५००,०००
डिपोंत रिझर्व्ह	६५०,०००
रिझर्व्ह	५००,०००
टेरिटोरियल फौज	५५०,१००
,, रिझर्व्ह	७१०,०००

फ्रान्सला लढाईचे वेळीं उभें करितां येईल, अशा सैन्याचा अंदाज ४०,००,०८० आहे.

फ्रान्सांत लष्करी नोकरी सक्तीची आहे. धडधाकड शरीराच्या प्रत्येक पुरुषानें लष्करांत चाकरीस हजर झालेंच पाहिजे, असा कायदा आहे. वयोमर्यादा २० पासून ४८ वर्षांपर्यंतची आहे.

लढाईचे वेळीं प्रत्येक तुकडींत (आर्मीकोर) अजमासें ३५,००० सैनिकांचा व घोडेस्वारांचे तुकडींत ४,७०० स्वारांचा समावेश होतो.

बंदुक 'ली बेल' नांवाची. हिचें वजन ९ $\frac{१}{४}$ रत्तल असून, मारा २२०० यार्डांचा व तिच्यांत एकदम ८ बार भरतां येतात.

फ्रान्सच्या रणमैदानांतील तोफा सर्वांत उत्कृष्ट व पहिल्या प्रतीच्या आहेत असें म्हणतात. तिच्या माऱ्याचा टप्पा फार लांबचा असून, ती फारच लक्कर डागतां येते.

रशियन सेना.

रशियाच्या सेनेचे तीन स्वतंत्र भाग आहेत, ते असेः—

(१) युरोपांतील फौज
(२) कॉकेशियन फौज } एकूण १६,००,०००
(३) एशियांतील फौज

हीं तीन निरनिराळीं स्वतंत्र सैन्यें आहेत, असें म्हणावयास हरकत नाहीं. त्यांची विभागणी पुढीलप्रमाणें केलेली आहेः—

युरोपच्या पश्चिम सरहद्दीवर—

फील्ड फौज व दुसरी ओळ	....	अजमासें १२,००,०००
कॉकेशियन फौज	....	२,१०,०००
तुर्कस्तान व ट्रान्सकास्पियन फौज	....	६०,०००
पश्चिम सैबेरियन	....	१,८०,०००
पूर्व सैबेरियन	....	२,७९,०००

जपानशीं रशियाचा जो इतिहासप्रसिद्ध युद्धप्रसंग झाला, त्यांत चांगलाच धडा घेऊन रशियानें आपल्या सैन्यांत फार सुधारणा केली आहे. युरोपांतील रशिया, कॉकेशस, सैबेरिया व जपानच्या जवळील प्रांत अशी चारी ठिकाणीं त्यानें सैन्याची विभागणी व ठाणीं केलीं असून सैन्याची जमवाजमव होण्यांत पूर्वीसारखी कंटाळवाणी दिरंगाई न होईल अशीही तजवीज केली आहे.

शांततेच्या वेळच्या रशियन सैन्याची संख्या खालीं लिहिल्याप्रमाणें आहेः—

	युरोप व कॉकेशस	एशियांतील रशिया.
पायदळ	६,२७,०००	.... ८३,०००
घोडेस्वार....	१,१६,०००	.... १४,०००
तोफखाना	१,३८,०००	.... १५,०००
इंजिनियर	३४,०००	.... ८,०००
इतर	३४,०००	.... ५,०००
एकूण	९,४९,०००	१,२४,०००

लढाईचे वेळीं उभारतां येण्यासारखें सैन्यः—

अंमलदार	.... ९६,५००
सैनिक	.... २८,१५,०००

याशिवाय रिझर्व्ह १०,६४,०००, सरहद्दीवरील पलटणींतील ४१,००० व कोसॅक १,५०,०००: आहेत.

रशियांतील लष्करी शिक्षण घेऊन तयार झालेल्या व लढाईचे वेळीं सज्ज होणाऱ्या लोकांची संख्या अजमासें ५४,००,००० आहे.

येथें लष्करी शिक्षण सक्तीचें असून वयाची मर्यादा २१ पासून ४३ पर्यंत आहे. या सैन्यांतील कोसॅक शिपाई लढाईस फार चांगले आहेत.

या सैन्यांतील शिपायांजवळ असलेली 'नॅगान्ट' नामक बंदुक ९ रत्तल वजनाची, २००० यार्डाच्या माऱ्यांची व पांच बारी आहे. तोफा १९०२ सालांतल्या, १३½ रत्तल गोळेवाल्या पण कामास जलद अशा आहेत.

बेलिजयमची सेना.

शांततेच्या वेळचें सैन्यः—

अंमलदार	....	....	....	....	३,९४०
सैनिक	....	....	....	....	४३,६२६

लढाईच्या वेळचें सैन्य रणमैदानावरील १,७०,००० किल्ल्याच्या रखवाली-साठीं ठेविलेलें १,३०,००० व 'गार्ड सिव्हिक' ५०,००० याप्रमाणें आहे.

लष्करी नोकरी सक्तीची आहे, पण लोक स्वखुशीनें सैन्यांत दाखल होतात.

बंदुका 'मॉसर' जातीच्या, वजन ८ रत्तल, मारा २००० यार्डांचा व पांच बारी अशा आहेत. तोफा जलद काम करणाऱ्या 'क्रूप' जातीच्या आहेत.

सर्व्हियाचें सैन्य.

सैन्याचे तीन भाग आहेतः (१) खर्डे सैन्य; (२) रिझर्व्ह; (३) टेरिटोरियल. लढाईच्या वेळचें सैन्य २,७०,०००; व रिझर्व्ह ९९,०००.

बंदुका 'मॉसर;' तोफा 'स्नायडर कॅनट'.

लष्करी नोकरी सक्तीची असून, त्यासंबंधाची वयोमर्यादा १८ पासून ५० वर्षांपर्यंतची आहे.

जपानचें सैन्य.

शांततेच्या वेळचें सैन्य	२,८०,०००.
लढाईच्या वेळचें सैन्य	१४,००,०००.

जर्मन सेना.

सांप्रतच्या महायुद्धांत जर्मनीनें किती लोक लढावयास तयार केले आहेत, त्याविषयीं निश्चित असा आंकडा प्रसिद्ध झालेल्या माहितींत कोठेंही आढळत नाहीं. 'धी मँचेस्टर गार्डियन हिस्टरी ऑफ् धी वॉर' नामक ग्रंथांतील एक लेखक म्हणतो कीं, जर्मनीस लढाईचे कामास जास्तींत जास्ती ७०,००,००० माणसें उभीं करितां येतील. यांपैकीं ज्यांना कांहीं काळ तरी एकसारखें लष्करी शिक्षण मिळालें आहे, अशांची संख्या ४० लाख व ५० लाख यांचे दरम्यान असावी.

जर्मनीच्या सैन्याचे चार भाग आहेत ते असेः—प्रुशियन, बव्हेरियन, सॅक्सन आणि वर्टेम्बर्ग. यांपैकीं प्रशियाचें सैन्य प्रमुख होय. कारण सैन्याच्या एकंदर २५ पलटणी (कोर) पैकीं बव्हेरियाच्या ३, सॅक्सनीच्या २, आणि वर्टेंबर्गची १ असून बाकीच्या प्रशियाच्या आहेत.

जर्मनींत लष्करी नोकरी सक्तीची आहे. सतरापासून पंचेचाळीस वर्षांचे वयाचे आंतील सर्व पुरुषांनीं लष्करांत नोकरीस पाहिजे असा कायदा आहे. या नोकरीचे दोन भाग असतात. एक २० पासून ३९ वर्षांच्या उमरीपर्यंतचा. या वयापर्यंतचे सैनिक 'लॅन्डवेन्ह' नामक दळांत मोडतात. लॅन्डवेन्हच्या मागें सैन्याची दुसरी ओळ असते तिला 'लॅन्डस्टर्म' म्हणतात. या दळांतील सैनिक ३९ पासून ४५ वर्षांच्या पर्यंत ज्यांचें वय आहे, असे असतात. 'लॅन्डस्टर्म' मधील लोकांस अगदीं निकराचा प्रसंग उपस्थित झाल्यासच लढाईवर पाठवितात. कारण या दळांतील लोक बहुतेक कुटुंबांतील कर्ते पुरुष असून त्यांनीं लष्करी शिक्षण घेऊन बराच काळ लोटलेला असतो. त्यामुळें या वयांत लढाईवर जाणें म्हणजे त्यांस फार दगदग होते.

शांततेच्या वेळच्या जर्मनीच्या २५ पलटणींचे प्रत्येकीं दोन विभाग असून त्यांची एकंदर संख्या पुढें दिल्याप्रमाणें आहेः—

अंमलदार	१,४९,०००
प्रायव्हेटस् (सैनिक)	६,६१,०००
इतर	२८,०००
	८,३९,०००

सन १९१३ सालच्या सरकारी मंजुरीप्रमाणें खडें सैन्य खालीं दिल्याप्रमाणें ठेवण्याचें ठरलें होतें:—

	अंमलदार.	सैनिक.	घोडे.
पायदळ, पलटणी २१७	१६,५७८	४,७१,७९६	४८२१
रायफल्स (जाँगर) १८ तुकड्या	६२०	१९,१३४	३५२
मशीन गन, २६ तुकड्या	१३४	२,२९४	९२९
प्रांतांचे ठाण्यावरील, ३१७ ठाणीं	१,०६७	६,५९३	....
घोडेस्वार, ११० पलटणी	३,६९६	८२,००७	८०,२४८
घोड्यांवरील तोफखाना, १०० पलटणी	४,६९२	८६,७७७	५७,३३९
पायदळ तोफखाना, २४ पलटणी,	१,४६९	३३,२३०	३,३९७
पायोनियर्स ३९ तुकडया	१,०४६	२२,९९९	६९०
रेल्वे, तारखातें वगैरे	९३५	१८,००६	२,४३३
ट्रेन, २५ तुकडया	६३१	१०,९६१	७,५६१
लहान किरकोळ तुकडया	७८५	२,०४०	....
इतर	३,६९१	१,६६०	....
एकूण	३९,३०४	७,५३,४९७	१,५७,७३०

लढाईसाठीं उभारलेल्या सैन्यांतील पलटणींची वर्गवारी एके ठिकाणीं दिली आहे, ती अशी:—

घोडेस्वारांच्या पलटणी	५५५
घोडयांवरील तोफखान्याच्या तुकडया	६३३
,, ,, मोठ्या ,, ...	२२६
पायदळ पलटणी	६९१
पायोनियर पलटणी	४६

याच लेखकाचे मताप्रमाणें एकंदर उभारलेल्या सैन्याची संख्या अजमासें ४३,७०,००० असून, त्यांत 'लँन्डवेन्ह' १८,००,००० व 'लँन्डस्टर्म' ८,००,००० आहेत. पण यांत उत्तम रीतीनें शिकवून तयार केलेल्या पहिल्या ओळींतील सैन्याची संख्या १९,००,००० हून जास्त नसावी.

जर्मन सैन्याचा मुख्याधिपति कैसर हा होय. त्यास 'जनरल इन चीफ' असें म्हणतात. त्याचे हाताखालीं मुख्य लष्करी कचेरी, लष्करी प्रधानमंडळ,

पुष्कळ ए. डी. सी. व जनरल, व दुसरे बरेच अंमलदार सैन्याची व्यवस्था पहाण्यासाठीं असतात.

प्रत्यक्ष सैन्यांतील मुख्याधिपतीस 'फील्ड मार्शल्स जनरल' अशी संज्ञा असून त्यांवरील मुख्याधिकारीपणाचा बहुमान प्रिन्स ऑल्बर्ट ऑफ् प्रशिया यांस दिलेला आहे. याशिवाय देशोदेशींची पहाणी करणारीं व नकाशे तयार करणारीं वगैरे अनेक खातीं आहेत. व त्यांची व्यवस्था उत्तम तऱ्हेनें ठेवण्यांत येत असते. याशिवाय अनेक लहान लहान खातीं तयार करून त्यांजकडे लढाईचे प्रसंगीं जरूर अशीं वेगवेगळीं कामें सोंपविलेलीं आहेत. अशाप्रकारें सर्व सैन्यास शक्य तितकी पद्धति व शिस्त लावून सर्व हालचाल ज्याप्रमाणें यंत्रानें व्हावी तशी बनवून टाकली आहे.

एका जर्मन 'आर्मी कोर' मध्यें माणसें ४०,०००, घोडे १४,००० व वाहनें २,४०० असतात. यापैकीं बरेच लोक 'कामिसरियेट' वगैरे खात्याच्या कामावरचे असतात, ते वगळतां केवळ युद्धोपयोगी अशांची प्रत्येक आर्मीकोरमधील संख्या:—

२५,००० पायदळ, १२०० घोडेस्वार, व १२६ तोफा.

जर्मन सैन्यांतील बंदुका 'मॉसर' जातीच्या असून, वजन ८ रत्तल, मारा २२०० यार्डांचा व पांचबारी आहेत. तोफा १५ रत्तली गोळेवाल्या, क्रूपच्या, जुन्या पद्धतीच्या, पण पुष्कळ आहेत. यांशिवाय लीएज व नेमरचे बळकट किल्ले पाडण्यास लावलेल्या १६ इंची 'सीजगन' तोफा जर्मनीपाशीं असून अशा तोफा आजपर्यंत तयार झाल्या नव्हत्या असें म्हणतात. यांतून सोडलेला गोळा ८।९ मैल अंतरापर्यंत जातो.

जर्मनीपाशीं युद्धाचे आरंभीं ४,१०० तोफा होत्या.

ऑस्ट्रियन सेना.

ऑस्ट्रियानें लढाईसाठीं किती सैन्य तयार केलें आहे, याविषयीं निरनिराळ्या लेखकांनीं निरनिराळे अंदाज केले आहेत. 'मॅन्चेस्टर गार्डियन हिस्टरी ऑफ् धी वॉर' यांतील लेखकाचे मतें, पांच कोटी लोकवस्तीचा ऑस्ट्रिया, जवळ जवळ जर्मनीच्या इतकें सैन्य उभारूं शकेल असा अंदाज बांधणें असंभवनीय नाहीं. मग तें सैन्य लढण्यास कसेंही असो. त्याचे हातून कांहीं पराक्रम होवो अगर तें शत्रूस पाठ दाखवून पळून जावो.

येथें लष्करी नोकरी सक्तीची असून त्यासंबंधाची वयोमर्यादा २१ वर्षांपासून ४२ वर्षांपर्यंतची आहे.

ऑस्ट्रियन राष्ट्रीय सेनेंत ऑस्ट्रिया व हंगारी या दोन्ही देशांतील सेनेचा समावेश होतो. या सेनेची संख्या खालीं दिल्याप्रमाणें.

शांततेच्या वेळीं	३,९६,०००.
लढाईचे वेळीं	२५,००,०००.
तोफा	२,०००.

कांहींचे मतें लढाईचे वेळची ऑस्ट्रियाचे सैन्याची संख्या ३५ लाख भरली पाहिजे. ऑस्ट्रियाच्या प्रत्येक 'आर्मी कोर'मध्यें ३४०००, व घोडेस्वारांचे तुकडींत ४००० लोक असतात.

बंदुका 'मॅन्लीचर' जातीच्या, वजन ८– रत्तल, मारा २१०० यार्ड व पांच बारी अशा आहेत.

तोफा १४½ रत्तली गोळेवाल्या आहेत.

तुर्की सेना.

येथें लष्करी नोकरी सक्तीची आहे.

शांततेच्या वेळचें सैन्य १,२०,०००.

लढाईच्या वेळचें सैन्य, (अंदाज) ७,५०,०००.

यांच्या सैन्यास शिकविण्याचे वगैरे कामीं जर्मनीनें मदत केली असून, त्यांस आपल्यासारख्या कांहीं तोफाही दिल्या आहेत असें म्हणतात.

इटालियन सेना.

येथें लष्करी नोकरी सक्तीची आहे. ती २० वर्षांपासून सुरू होते व ४० वर्षांपर्यंत असते.

सैन्याचे तीन विभाग आहेत. (१) कायमचें सैन्य; (२) कायमचें सैन्य पण सैनिकाचे रजेस मर्यादा नाहीं; व (३) टेरिटोरियल.

शांततेच्या वेळचें सैन्य ४,१०,०००.

लढाईच्या वेळचें सैन्य ३२,००,०००.

आर्मी कोर १०,००० चें असतें.

बंदुका 'मॅन्लीचर–कॅरकानो' जातीच्या.

बेलजम देशांतील प्रेक्षणीय इमारती.



घेंट येथील सेंट निकोलसचें मंदिर.



घेंट येथील कार्पोरेशनची इमारत.

बेलजम देशांतील प्रेक्षणीय इमारती.

ब्रुसेल्स येथील न्यायमंदिर.

अँटपर्वचा लांबून दिसणारा देखावा.

बल्गेरियन सेना.

शांततेच्या वेळचें सैन्य:—

अंमलदार ३,९००.

सैनिक ६२,०००.

लढाईच्या वेळचें सैन्य (अंदाज) ३,४०,०००.

१९१२ सालच्या तुर्कस्तानबरोबरच्या युद्धांत बल्गेरियानें ३ लाख लोकांची पहिली ओळ उभी केली होती.

हॉलंड.

सैन्य १,२९,००० . ' कॉन्स्क्रिप्शन ' पद्धतीनें सैन्याची भरती करण्याची पद्धत आहे.

मांटिनिग्रो.

लष्करी नोकरी सक्तीची असून, त्याची वयोमर्यादा १८ पासून ६२ वर्षांची आहे.

लढाईच्या वेळचें सैन्य ४०,०००.

या देशांत घोडेस्वारांची तुकडी नाहीं.

रुमेनिया.

शांततेच्या वेळचें सैन्य ९८,५००.

लढाईच्या वेळचें सैन्य ४,२०,०००.

येथील सैन्य चांगलें तरबेज असून त्यांत घोडेस्वार व तोफाही आहेत. बंदुक ' मॅनलिचर '; तोफा ' क्रूप ' च्या, नव्या जलद काम करणाऱ्या.

प्रकरण ३५ वें.

राष्ट्रांचें आरमार.

ग्रेटब्रिटन.

आरमारांत सामर्थ्य व संख्या या दोन्हीं दृष्टींनीं सर्वांत पहिला नंबर ग्रेटब्रिटनचा आहे. त्यांचीं निरनिराळ्या सर्व जातींचीं मिळून लढाईंचे कामास उपयोगीं अशीं ७२८ जहाजें आहेत. याशिवाय कांहीं नवीन प्रचंड लढाऊ जहाजें बांधण्याचें काम चालू आहे. यांपैकीं मोठ्या जहाजांचीं वर्गवारी येणेंप्रमाणें:—

वर्ग	तयार	बांधीत आहेत.
लढाऊ जहाज (बॅटलशिप)	५५	११
बॅटल क्रूझर	७	३
कवच चढविलेलीं क्रूझर	३४	०
संरक्षित क्रूझर नं. १	१७	०
,, ,, लाइट	८	०
,, ,, नं. २	४०	७
,, ,, नं. ३	१६	०
साधीं ,,	५	२
स्काउट	८	०
टार्पेडो जहाजें	२८	१
डिस्ट्रायर (फोडणारीं)	१९१	३८
टार्पेडो बोटी	१०९	०
सबमरीन्स	६४	१२
	५८२	८४

याशिवाय समुद्रांत सुरुंग घालणारीं, सुरुंग फोडणारीं, दुरुस्तीचीं कामें करणारीं वगैरे लहान लहान जहाजें पुष्कळ आहेत.

नवीन बांधण्याचें काम चालू असलेल्या जहाजांपैकीं मोठ्या जहाजांचीं नांवें वगैरे येणेंप्रमाणें:—

नांव	किती टनाचीं?	तोफा.	खलाशी	गति (नॉट)
क्विन इलिजाबेथ	२७,५००	१५ इंची ८; ६ इंची १६	९००	२५
बन्हॅम	,,	,,	,,	,,
व्हॉलियंट	,,	,,	,,	,,
वॉरस्पाईट	,,	,,	,,	,,

या नवीन बांधल्या जाणाऱ्या जहाजांस 'सुपर ड्रेडनॉट' असें नांव ठेवण्यांत आलें असून त्यांचे वर्गास 'क्विन इलिजाबेथ' असें नांव देण्यांत आलें आहे. यावरील १९ इंची तोफा १९९० रत्तलांचा गोळा सोडणाऱ्या घडविल्या आहेत. लढाईस तयार असलेल्या जहाजांपैकीं मुख्य जहाजांची ठोकळ माहिती खालीं दिली आहे:—

ड्रेडनॉटस्.

नांव.	वजन.	तोफा.		खलाशी.	गति.
				(दर तासास नाटस्).	
आयर्न डयूक वर्ग					
आयर्न डयूक	२५,०००	१३,५ इंची	१०+६ इंची १६	९००	२२ ५
बेनबो	,,	,,		,,	,,
एम्परर ऑफ इंडिया	,,	,,		,,	,,
मार्लबरो	,,	,,		,,	,,
किंग जॉर्ज धी फिफ्थ वर्ग					
किंग जॉर्ज धी फिफ्थ	२४,०००	१३-५इंची	१०+४इंची१६	९००	२१
सेंचुरियन	,,	,,		,,	,,
अजॅक्स	,,	,,		,,	,,
ऑडेशिअस	,,	,,		,,	,,
ओरायन वर्ग					
ओरायन	२२,५००	१३-५इंची	१०+४इंची १६	८००	
थंडरर	,,	,,		,,	,,
मॉनर्क	,,	,,		,,	,,
कॉंकरर		,,		,,	,,
(इतर)					
कलोसस	२०,०००	१२ इंची	१०+४इंची १६	८००	२१
हर्क्युलिस	,,	,,		,,	,,
नेपचून	१९,९००	,,		,,	,,
सेंट व्हिन्सेंट	१९,२५०	१२ इंची	१०+४इंची १८	७२४	२२
कॉलिंगवुड	,,	,,		,,	
व्हॉन्गार्ड	,,	,,		,,	,,
बेलेरोफोन	१८,६००	१२ इंची	१०+४ इंची १६	८७०	२१½
टेमेरेर	,,	,,		,,	,,
सुपर्ब	,,	,,		,,	,,
ड्रेडनॉट	१७,९००	१२ इंची	१०		

बॅटलशिप्स.

लॉर्ड नेल्सन	१६,५००	१२ इंची	४+९·२ इंची	१०	७४७	१८½
ॲगमेमॅन	,,	,,		,,	,,
किंग एडवर्ड थी सेव्हन्थ	१६,३५०	१२ इंची	४+९·२ इंची	४+६ इंची	१०,७८०	,,
डोमिनियन	,,	,,		,,	,,
कॉमनवेल्थ	,,	,,		,,	,,
झालॅन्डीया	,,	,,		,,	,,
हिंदुस्तान	,,	,,		,,	,,
हिबर्निव	,,	,,		,,	,,
ब्रिटानिया	,,	,,		,,	,,
आफ्रिका	,,	,,		,,	,,
फॉर्मिडेबल	१५,०००	१२ इंची	४+६ इंची	१२	७६०	१८
इन्व्हिंसिबल	,,	,,		,,	,,
इरेसिस्टिबल	,,	,,		,,	,,
बुलवर्क	,,	,,		,,	,,
लंडन	,,	,,		,,	,,
व्हेलरपल	,,	,,		,,	,,
किन	,,	,,		,,	,,
प्रिन्स ऑफ् वेल्स	,,	,,		,,	,,
मॅजेस्टिक	१४,९००	१२ इंची	४+६ इंची	१२	७५०	१८
मॅग्निफिसन्ट	,,	,,		,,	,,
प्रिन्स जॉर्ज	,,	,,		,,	,,
व्हिक्टोरियस	,,	,,		,,	,,
ज्युपिटर	,,	,,		,,	,,
माघ	,,	,,		,,	,,
हॅनिबॉल	,,	,,		,,	,,
ओशर	,,	,,		,,	,,
इलस्ट्रीअस	,,	,,		,,	,,
डंकन	१४,०००	१२ इंची	४+६ इंची	१२	७५०	१८
आल्बेमार्ले	,,	,,		,,	,,
रॅलेज	,,	,,		,,	,,
एक्समौथ	,,	,,		,,	,,
कॉर्नवॉलिस	,,	,,		,,	,,

कॅनो पस	१२,१५०	१२ इंची	४+६ इंची	१२	७००	१८½
गोल्यिू ठअॅथ	,,	,,		,,	,,
ओश्ररीान	,,	,,		,,	,,
आल्मीचीयन	,,	,,		,,	,,
व्हेन्गार्डजन्स	,,	,,		,,	,,
रलोवीरी	,,	,,		,,	,,
स्टि ीं ाफ्टशुअर	११,८००	१० इंची	४+७-५ इंची	१४	७००	१९½
टा गा यम्फ	११,९८५	,,		,,	,,
ग्रो ए					

बॅटल क्रूझर्स.

कॅन मेरी	२७,०००	१३-५ इंची	८ + ४ इंची	१६	१,०००	३५-७
ायगर	,,	,,		,,	,,
ॉयन	२६,३५०	१३-५ इंची	८ + ४ इंची	१६	९८०	३१½
मेन्सेस रॉयल	,,	,,		,,	,,
ॉस्ट्रेलिया	१८,८००	१२ इंची	८ + ४ इंची	१६	७८०	२८
ूझिलांड	,,	,,		,,	,,
न्डिफटिगेबल	१८,७५०	,,		७५०	२९
न्डॉमिटेबल	१७,२५०	,,		,,	२८-७
न्फ्लेक्सिबल	,,	,,		,,	२७
न्व्हिन्सिबल	,,	,,		,,	,,

ए कंदर ब्रिटिश आरमारावरील लोकांची संख्या १,५१,००० असून त्याशिवाय १०,००० नेव्हल रिझर्व्हिस्ट आहेत, त्यांस चाकरीवर हजर होण्याचे हुकूम झाले आहेत.

मोठ्या लढाऊ जहाजांची रचना.

ड्रेडनॉट.

ड्रेडनॉट वर्गापैकीं 'आयर्न डयूक' हें सर्वांत मोठें जहाज होय. हें अगदीं नवें व नव्या सुधारणा करून बांधलें आहे. याजवर ब्रिटिश आरमाराचे **कमांडर इन चीफ सर जॉन जेलिका** यांचें निशाण आहे.

या वर्गापैकीं आणखी तीन जहाजें याच नमुन्यावर बांधलीं आहेत त्यांचा उल्लेख वरील यादींत आलाच आहे. आयर्न डयूक हें जहाज १३ आक्टोबर १९१२ रोजीं प्रथम समुद्रांत चालू झालें.

या जहाजांतील विशेष गोष्टी म्हटल्या म्हणजे आकाशांतून संचार
णाऱ्या विमानांवर वगैरे हल्ला करण्यासाठीं यावर चार मोठ्या तो
तोंडें करून ठेविल्या आहेत. या तोफांतून दर मिनिटास १२ पासून
गोळे सोडतां येतात व त्यांचा नेम १०,००० फूट उंचीपर्यंत ल
त्याचप्रमाणें याच्या खालच्या भागांत टार्पेडो फोडणाऱ्या तोफांची
केली आहे. ह्या तोफा ६ इंची बारा आहेत. ह्याच्यावरील १३-५ इंची
मध्य भागीं बुरुजासारखी रचना करून त्यांत मांडल्या असून त्या सर्व
दम चौफेर डागतां येतात. या जहाजाचा आकार व ह्यावरील सा
येणेंप्रमाणें:—

नेहमींचें वजन...	...	...	...	...	...	२५,००० टन.
भरपूर वजन ...	...	...	...	...	...	२६,४०० टन.
लांबी ...	...	...	...	...	...	६२० फूट.
रुंदी... ...	...	...	...	...	...	८९½ फूट.
अगदीं कमी खोली	...	...	...	...	...	२७½ फूट.
तोफा १०-१३-५ इंची (१४०० रतली गोळ्याच्या)						
,, १२ ६ इंची						
,, ४ ३ रतली						
टार्पेडो ट्यूब (२१ इंची)		...	...	...	...	४
कवच १२ इंची पट्टा मध्यभागीं						
४ ,, ,, नाळीस						
४ ,, ,, मागील बाजूस						
१० ,, ,, बुरुजास						
१०·७ ,, ,, बाजूच्या वर						
इंजिनें, टर्बाइन २०,००० हॉर्स पॉवरचीं						
गति... ...	...	...	...	...	...	२१ नॉट.
कोळसा नेहमींचे वेळीं	...	...	...	...	...	१,००० टन.
,, जास्तींत जास्ती	...	...	...	...	..	२,७०० टन.
तेल	...	...	...	...	...	१,००० टन.

किंमत अजमासें १२,५०,००० पौंड.

बॅटल क्रूझर.

'न्यू झिलांड' हें बॅटलक्रुझर १९११ त तयार झालें. त्याचा आकार व त्यावरील सामुग्रीः—

नेहमींचें वजन	१८,७५० टन.
खलाशी	८००
लांबी	५७८ फूट.
रुंदी	८९½ फूट.
अगदीं कमी खोली	.
तोफा, १२ इंची ८, ४ इंची १६	
टार्पेडो टयूब २१ इंची	३

कवच.

८ इंची पट्टा (मध्यभागीं)
४ इंची ,, (टोंकांस)
३ इंची डेकला
७ इंची डेकच्या खालच्या भागास
१० इंची बुरुजास
६ इंची बुरुजाचे तळास

यंत्रें, टर्बाइन, ४ स्क्रूची, हॉर्स पॉवर	४३,०००
गति दर तासास	२५ नॉट
कोळसा, नेहमीं	१००० टन
जास्तींत जास्ती	२,५०० टन

आरमारावरील अंमलदार व त्यांचे पगार.

	साल पौंड.
१ ॲडमिरल ऑफ धि फ्लीट	२,१९०
२ ॲडमिरल	१८२५
३ व्हाइस ॲडमिरल	१,४६०
४ रिअर ॲडमिरल...	१,०९५
५ कमोडोर	१०९५
६ कॅप्टन ऑफ धी फ्लीट	१,०९५
७ कॅप्टन	४१५—६०२
८ कमांडर	४०१
९ लेफ्टनंट	१८२—२९२
१० सब् लेफ्टनंट	९१
११ मिड शिपमन	३२
१२ एन्जीनियर रीअर ॲडमिरल	१०९५

१३ एन्जीनियर कॅप्टन	...	...	...	...	६३८—७३०
१४ ,, लेप्टनंट	...	...	...	...	१८२—३६५
१५ ,, सब लेफ्टनंट	...	...	...	...	१३६
१६ फ्लीट सर्जन	...	...	...	...	४९१—६५७
१७ स्टाफ...	...	...	...	...	३६५—४३८
१८ सर्जन	...	...	...	...	२५५—३१०
१९ पेमास्टर	...	...	...	...	२७४—६०२
२० वॉरंट ऑफिसर	...	...	...	...	१८३—२१९
२१ गोलंदाज, सुतार	...	...	...	...	१००—१६४
२२ खलाशी	...	...	...	...	२३—३६

ब्रिटिश आरमारास १९१३–१९१४ सालीं ४,३३,३१,४०० पौंड खर्च झाला. याशिवाय याच खात्यांपैकीं पेन्शन वगैरे बाबींस झालेल्या खर्चाची रक्कम २९,७६,००० पौंड होती.

या आरमारास एका वर्षास २५ लक्ष पौंडांचा कोळसा लागतो.

वरील जहाजांशिवाय आरमार खात्यानें बरींच व्यापारी जहाजें त्यांच्या मालकांकडून लढाईचे कामासाठीं मागून घेतलीं असून त्यांस क्रूझरांचें स्वरूप दिलें आहे. यापैकीं एक ४७,००० टनांचें, व दोन ३१,००० टनांचीं आहेत व त्यांची गति तासास २३ व २६ नाटस् आहे.

फ्रान्स.

फ्रान्सच्या आरमारांतील जहाजांची संख्या:—

	संख्या	टन	तोफा
ड्रेडनॉट	४	२३,४६७	१२ इंची १२+५-५ इंची २२
बॅटलशिप्स	१५	१८,००० पासून ११,२६० पर्यंत	१२ इंची ४+९-४ इंचांपासून ५·५ इंचांपर्यंतच्या ६०.
,,	६	१२,२०५ पासून ८,९४८ पर्यंत	१२ इंची २+१०·८ इंचापासून ५·५ इंचाच्या ५७.
क्रूझर	२८	१४,०००ते४,०००	७-६ इंचांपासून ४ इंचांपर्यंत १९८.
दुय्यम)	४	४,७५० ते २,३५०	
डिस्ट्रायर	८१		
टार्पेडो बोटी	१८७		
सबमरीन्स	६७		

याशिवाय ८ मोठ्या ड्रेडनॉटस्, ३ डिस्ट्रायर व ९ सबमरीन बांधण्याच काम चालू आहे.

या जहाजांवर अंमलदार व इतर मिळून मेहमीं एकंदर २५,९०० लोक असतात. याशिवाय आरमारांत उपयोगीं असे राखून ठेविलेलें सैन्य बरेंच आहे. एकंदर संख्या १,१४,०००.

रशिया.

रुसोजपानी युद्धानंतर रशियानें आपल्या आरमाराची रचना अगदीं नवीनच केली आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं.

सध्यां रशियन आरमाराचे दोन काफिले आहेत. एक काळ्या समुद्रांत व दुसरा बाल्टिक समुद्रांत. त्यांतील जह जांची संख्या येणेंप्रमाणें:—

	तयार	बांधीत आहेत (१९१४ त)
बॅटल शिप्स	९	७
,, क्रूझर	०	४
कवचवाली क्रूझर	६	०
क्रूझर (इतर)	८	८
डिस्ट्रायर	१६	४५
टार्पेडो बोटी	२६	०
सबमरीन	२६	१९
	१७१	८३

या जहाजांवर अंमलदार व इतर मिळून ५१,९०० माणसें असून १९१३–१९१४ सालचा खर्च २½ कोटी पौंड होता.

बाल्टिक काफिल्याचें मुख्य ठाणें क्रॉन्स्टड हें आहे. त्याचा बंदोबस्त चांगला आहे. रशियाच्या सरकारी गोदी पुढील ठिकाणीं आहेत:—

नेव्हस्की, पेट्रोग्राड, क्रॉनस्टड, लिबो, रिव्हील, सेव्हॅस्टोपोल, निकोलीव्ह, व्हलडीव्होस्टोक.

वरील काफिल्याशिवाय जुन्या टार्पेडो बोटी वगैरे पुष्कळ आहेत. कास्पिन समुद्रांतही एक लहानसा काफिला आहे.

जपान.

	संख्या	टन वजन	तोफा
बॅटलशिप्स	१५	१० हजारपासून २० हजार टन पर्यंत	१२ इंची ४+६ इंची १० ते १४
बॅटल क्रूझर्स	६	२० पासून २४ हजार टन	१२ इंची ४ + ७ इंची १२ ते १४ ६ इंची १२ किंवा ८ इंची ८
आर्मर्ड क्रुझर्स	९	३ पासून १० हजार टन.	
लाइट क्रूझर्स	१९	... ...	
डिस्ट्रॉयर्स	६	... ...	
टार्पेडो बोटी	५०	... ...	
सबमरीन	१५	... ...	

'फूसू' वर्गापैकीं चार नवीं जहाजें बांधण्याचें काम चालू आहे. त्यांवर १९ इंची १० व सहा इंची १६ तोफा आहेत.

प्रकरण ३५ वें.

राष्ट्रांचीं आरमारें-पुढें चालू.

जर्मनी.

इ. स. १८७०।७१ सालीं झालेल्या फ्रॅन्कोजर्मन युद्धानंतर जर्मनीस आपलें आरमार असावें असें वाटूं लागलें. पण या मनोरथास खरें मूर्त स्वरूप ता. ३० मार्च १८८९ रोजीं आलें. त्या वेळेपासून आतांपर्यंत लोटलेल्या पंचवीस वर्षांचे अवधींत जर्मनीनें आपल्या आरमाराची विस्तीर्ण प्रमाणावर वाढ केली आहे.

जर्मनींत जी खलाशी लोकांची वस्ती आहे, त्या कुटुंबांतील मंडळीनें आरमारांत चाकरीस आलें पाहिजे अशी सक्ती आहे. याशिवाय स्वखुषीनें आरमारांतील कामगिरी पतकरलेलेही बरेच लोक आहेत. या खात्यांत आज सुमारें ७३,००० पासून ८०,००० पर्यंत लोक आहेत, असा अंदाज आहे. याशिवाय राखून ठेविलेले लोक सुमारें १,१०,००० आहेत.

शांततेच्या वेळीं जर्मन आरमाराचे दोन काफीले असतात, यापैकीं एकाचें ठाणें बाल्टिक समुद्रांत व दुसऱ्याचें उत्तर समुद्रांत असतें. कील व विल्हेमशेव्हन हीं दोन मुख्य ठाणीं असून डॅन्झीग, कुक्सहॅव्हन, सॉन्डेन्बर्ग, जीस्टेमुंड, फ्रेडरिकसॉर्ट व हेलिगोलॅन्ड ही दुसरीं ठाणीं आहेत.

जर्मन आरमारांतील जहाजांची संख्या येणेंप्रमाणें:--

	तयार.	बांधीत आहेन.
ब्रॅटलशिप्स	.... ३३	७
बॅटल क्रूझर्स	.... ३	३
आर्मर्ड क्रुझर्स	.... ९	—
सेकंडक्लास क्रूझर्स	.... ३०	४
थर्डक्लास क्रूझर्स	.... ११	—
साधीं क्रूझर्स ...	.... ४	—
डिस्ट्रॉयर्स ...	....१२३	९
टार्पेडो बोटी	.... ८०	—
सबमरीन	... २३	१५
	३१६	३८

वरील आंकडा नक्की नाहीं. याशिवाय आणखी कांहीं जहाजें असावीं असा अंदाज आहे. गेल्या कांहीं वर्षांपासून या बाबतींतील माहिती जर्मनीनें गुप्त ठेविली आहे. जर्मनीच्या कांहीं मोठ्या जहाजांवरील तोफा वगैरे येणेंप्रमाणें:--

नांव.	वजन टन.	गति नॉटस्	तोफा.
मार्कग्राफ ग्रोसर क्रफर्स्ट विलीयम कनिंग क्रौन प्रिन्स	२६,०००	२३	१२ इंची १०+५-९इंची१४+ ३-४ इंची१२+टार्पेडो टयूब ५
कनिंग आलबर्ट कैसरीन एफ्. डर ग्रॉसे कैसर पी. रीजंट लटपोल्ड	२४,३१२	२१	१२ इंची१०+५-९ इंची१२+ ३-४ इंची १४+टार्पेडो टयूब ६
हेलगोलॅन्ड ओल्डेनबर्ग आश्ट्राफ्रिचलॅन्ड न्युरिन्जेन	२२,४३५	२०-५	१२ इंची १२+५-९ इंची १४+ ३-४ इंची १४+ टार्पेडो टयूब ६
नॅसो पोसेन व्हीनलन्ड वेस्टफेलन	१८,२००	१९	११ इंची १२+५-९ इंची १२+ ३-४ इंची १६+ टार्पेडो टयूब ६

याशिवाय तीन प्रचंड जहाजें बांधण्याचें काम चालू आहे; तीं:—

१ एर्साटझ ब्रॅन्डेनबर्ग २ एर्साटझ् वर्थ ३ (नांव माहीत नाहीं)	२७,२००	२३	१५ इंची १०; ५-९ इंची १६

जर्मनीच्या आरमारावरील सर्वांत मुख्य अधिकारी कैसर दुसरे विलियम हे होत. त्यांचा किताब 'ॲडमिरल इन-चीफ' असा आहे. त्यांचे हाताखालीं आरमार-खात्याचा कारभार पाहणारें एक मंत्रिमंडळ आहे. जर्मन-आरमारांतील जहाजांच्या निरनिराळ्या टोळ्या केल्या आहेत.

ऑस्ट्रिया.

अलीकडील कांहीं वर्षांत ऑस्ट्रियानें आपल्या आरमाराची बरीच वाढ केली आहे. १९१२ सालीं ऑस्ट्रियानें ३० लक्ष पौंडांहून जास्त रक्कम या कामाकडे खर्च केली, व गेल्या सालच्या अंदाजपत्रकांत खास कायमच्या नोकरीवरील १९,०९१ लोकांची तरतूद केली होती.

सन १९१२ सालच्या अखेरीस ऑस्ट्रियाचें आरमार खालीं दिल्याप्रमाणें होतें:—

	तयार	बांधीत होते	
ड्रेडनॉट	२	२	या पैकीं मोठ्या जहाजांवर सर्वांत मोठ्या तोफा १२ इंची आहेत.
प्री ड्रेडनॉ	१२	०	
आर्मर्ड क्रूझर		०	
क्रूझर	७	२	
टार्पेडो गनबोटी	७	०	
डिस्ट्रॉयर	१५	३	
टार्पेडो बोटी	५४	९	
सबमरीन	६	माहीत नाहीं.	

याशिवाय कांहीं लहान बोटी आहेत.

इटली.

ड्रेडनॉट	...	....	... ४
प्री ड्रेडनॉट	....	...	.... ८
आर्मर्ड क्रूझर	....	....	.... ९
प्रोटेक्टेड क्रूझर	....	....	.... १३
टार्पेडो गनबोट	....	...	.... १०

डिस्ट्रॉयर ...	....	.... ३५
टार्पेडो बोट	....	... ८६
सबमरीन	....	.... २५
		१९०

या आरमारांत सर्वांत मोठ्या तोफा १२ इंची आहेत.

युनायटेट स्टेटस्.

	तयार	बांधीत होते.
बॅटलशिप्स	३०	६
क्रूझर	१७	....
लाइट क्रूझर ...	१८	....
टार्पेडो व्हेसल	२	२
डिस्ट्रॉयर	५२	९
टार्पेडो बोटी	२१	....
सबमरीन	२९	२१

तुर्कस्तान.

१९१० चे अंदाजाप्रमाणें:—

बॅटलशिप्स....	....	....	....	३
प्रोटेक्टेड क्रूझर	....	....	....	२
टार्पेडो गनबोटी	....	....	....	८
,, बोटी	....	....	....	१४

डार्डानेल्सच्या सामुद्रधुनींत पळून गेलेलीं गीबेन व ब्रेसलॉ हीं जर्मन जहाजें तुर्कस्तानानें विकत घेतलीं आहेत.

बल्गेरिया.

या देशाचें लहानसें आरमार असून त्यांत एक गनबोट व कांहीं थोड्या वाफेनें चालणाऱ्या बोटी आहेत.

रुमानिया.

या देशाचें आरमार काळा समुद्र व डान्यूब नदी यांमध्यें असून त्यांत सुमारें ३० जहाजें आहेत. इटली त्यांच्यासाठीं ४ डिस्ट्रायर बांधीत आहे.

प्रकरण ३६ वें.

लढाईंतील मुख्य स्थलांचा कोश.

अँटवर्प:—बेलजममधील एक शहर. यूरोपांतील अत्यंत मजबूत किल्ले येथें बांधिले आहेत. हें शेल्ड नदीच्या कांठीं पूर्व किनाऱ्यावर असून ब्रूसेल्सच्या उत्तरेस २८ मैलांवर आहे. बेलजम देशाचें दारू गोळा ठेवण्याचें हें मुख्य ठिकाण असून लढाईच्या वेळीं स्थलांतर करण्यास उपयोगीं पडावें अशा रीतीनें हें बांधिलेलें आहे. हालंड व मासनदी यांच्याशीं मोठें कालवे बांधून हें शहर जोडलेलें आहे. वस्ती १० लक्ष ४ हजार ९०९ आहे.

अँर्लान:—बेलजिअन-लग्झेंबर्गची राजधानी. ही लग्झेंबर्गच्या डचीपासून पश्चिम दिशेस रेलवेनें सोळा मैल आहे.

आलसेस लॉरेन:—याचें क्षेत्रफळ ५ हजार ६०३ चौरस मैल असून इ. स. १८७० सालीं झालेल्या लढाईंत जर्मनीनें फ्रान्सकडून हा प्रांत व २० कोटी पौंडांची खंडणी घेतली. सध्यां या प्रांताची सर्व व्यवस्था बादशाही जर्मन सरकारकडून पाहण्यांत येते. येथील लोकमत फ्रान्सला नेहमीं अनुकूल असल्यामुळें हा प्रांत घेण्यांत त्या वेळचे जर्मन चॅन्सिलर बिस्मार्क यांनीं दूरदर्शीपणा ठेविला नाहीं असें कित्येकांचें म्हणणें आहे. या प्रांताच्या सरहद्दीवर फारच मजबूत अशा किल्ल्यांची रांग बांधिली आहे. एकंदर प्रांत चांगल्या उत्पन्नाचा असून येथें इमारतीचें लांकूड पुष्कळ निपजतें. खनिज वस्तूंची समृद्धि आहे. व पुष्कळ उद्योगधंदेही चालतात. स्ट्रॅसबर्ग हें राजधानीचें शहर असून, मूलहासेन, मेट्झ आणि कॉलन हीं दुसरीं मुख्य शहरें होत. लोकसंख्या १८ लक्ष ७४ हजार १४ आहे.

आमीन्स:—फ्रान्समधील शहर. येथें जुन्या गोथिक पद्धतीचें भव्य देऊळ आहे. येथून बारा रस्ते निघतात. १८०२ सालीं इंग्लंड, फ्रान्स, हालंड आणि स्पेन यांच्यामध्यें या ठिकाणीं तह झाला. १८७० मध्यें येथें फ्रँको-प्राशियन लढाई झाली. यूरोपांतील पहिल्या धर्मयुद्धाचा उपदेशक पीटर धी हर्मिट्झ याचें हें जन्मस्थान होय.

आर्डिनिस:—बेलजमच्या दक्षिण सरहद्दीजवळ व फ्रान्सच्या ईशान्य दिशेस लग्झेंबर्गच्या शेजारीं हा प्रांत असून तो अरण्यें व डोंगर यांनीं भरलेला आहे. फ्रेंचांचें, युद्धाचे वेळीं संरक्षणास उपयोगीं पडणारें असें हें महत्त्वाचें ठाणें आहे. क्षेत्रफळ २,०२० चौरसमैल. येथील खोरीं फार सुपीक आहेत.

आर्गोनीस:—फ्रान्सच्या ईशान्येकडील डोंगराच्या दोन रांगा. या ग्यूज नदीच्या दोन्ही तीरांवर आहेत. यांपैकीं पश्चिमेकडील रांग ही लहानशी पण एकसारखी असून स्वसंरक्षणाच्या कामीं फार उपयोगी आहे. यांतून मध्यें अरुंद अशा

वाटा आहेत. यांपैकीं एकींतून पारीसपासून व्हर्डूनच्या किल्ल्यापर्यंत आगगाडीचा फांटा नेला आहे.

ऑस्टेंड:—लंडन व युरोप खंड यांच्यामधील रहदारीच्या मार्गांपैकीं हें एक मुख्य ठिकाण आहे, व युरोपीयन लोकांनीं येथें समुद्राची हवा खाण्यासाठीं रमणीय आरामस्थानें बांधिलीं आहेत. नार्थ फोरलँड पासून ६० मैल.

उर्थी:— बेलजममधील ही नदी लग्झेंबर्ग व लिहाज या प्रांतांतून वाहत जाऊन सुमारें ८० मैलानंतर म्यूजला मिळते.

एक्स-ला-चापेल—हें शहर व्हेनिस प्रशियांत असून प्रशियाच्या सरहद्दीवर आहे. कोलोनपासून रेलवेनें ४४ मैल. बेलगो-व्हेनिश रेलवेचें मुख्य स्टेशन. ही रेलवे अँटवर्प, ऑस्टेंड व कोलोन येथें गेली आहे. वस्ती २ लक्ष.

एल्ब:—जर्मनींतील एक मुख्य नदी. ही कुक्सहॅव्हन येथें जर्मनसमुद्रास मिळते. लांबी ७०० मैल. हिच्या कांठीं ड्रेसडेन, टोर्गो, व्हिटेंबर्ग, मॅगडेबंर्ग आणि हँबर्ग हीं शहरें आहे.

एपिनॉल:—फ्रेंचांच्या व्हासजेस प्रांताची राजधानी. पारीसपासून १९० मैल. या ठिकाणीं किल्ला आहे. याच किल्ल्यांच्या रांगेंत टूल आणि व्हर्डून येथील किल्ले येतात.

केडीज:—स्पेनमध्यें. १५८७ त ड्रेकनें स्पॅनिश आरमाराचा येथें नाश केला. १८१० ते १२ या वर्षीं फ्रेंचांनीं याचा कोंडमारा केला होता.

कॅलेः—फ्रान्सांत. तिसऱ्या एडवर्डनें १३४६ मध्यें यास वेढा घातला होता. तें १५५८ मध्यें फ्रेंचांनीं पुन्हा घेतलें.

क्यांब्राय:—फ्रान्सांत. १५०८ मध्यें ऑस्ट्रिया, फ्रान्स, स्पेन आणि पाप यांच व्हेनिसविरुद्ध येथें संघ झाला.

क्यास्टिलेना:—फ्रान्सांत. १०० वर्षांच्या युद्धांतील शेवटची लढाई येथें झाली.

क्यॉटेरो:—आड्रिआटिक समुद्राच्या कांठीं डाल्मिशिया प्रांतांतील आस्ट्रिया-हंगारीचें बंदर. यास मजबूत तटबंदी केली असून मागें निमुळत्या पाषाणांची भिंत बांधिली आहे. ता. १ सप्टेंबर रोजीं फ्रेंच आरमारांनीं यावर हल्ला केला. वस्ती ६ हजार.

कॉब्लेंज:—प्रशियांत. व्हाईन नदीच्या कांठीं कलोनपासून ४९ मैलांवर. कांहीं काळपर्यंत जर्मन सैन्याची मुख्य छावणी या ठिकाणीं होती. याची तटबंदी फार मजबूत असून याच्या समोर व्हाईन नदीच्या कांठीं फार उंच जागेवर ए-हेन-ब्रेड-स्टिन नामक अति मजबूत किल्ला बांधिलेला आहे.

कोर्टेंबर्ग:—बेलजममध्यें. ब्रूसेल्स व लुव्हेन यांच्या दरम्यान हें शहर असून बेलजम-सैन्यानें एका जर्मन पलटणीच्या येथें पराभव केला.

क्रॅको:--ग्यालीशियांत. आस्ट्रिया-हंगारीचेंएक शहर. व्हिश्चुला नदीच्या डाव्या किनाऱ्यावर हें शहर वसलें असून येथून वॉरसा १५८ मैल आहे. १७ व्या शतकापर्यंत ही पोलंडची राजधानी होती. त्यानंतर ती वॉरसाला नेली. पुढें दिडशें वर्षें येथेंच राज्याभिषेक समारंभ झाले. स्वतंत्र पोलंडचा शेवटचा तुकडा जें क्रॅकोचें रिपब्लिक त्याची १८१५ ते १८४६ पर्यंत ही राजधानी होती. वस्ती ९१३२३.

कलोन:--जर्मनींत. येथील मंदिर प्रख्यात आहे.

कॉपीन:-- फ्रान्सांत. १४३० मध्यें जोन ऑफ आर्कला येथें कैद केली.

कान्टांटिनोपल:--तुर्कस्तानची राजधानी. इ. स. ३९५ पासून हें राजधानीचें शहर आहे. येथें बरेच युद्धप्रसंग झाले.

कोपेन हेगन::--डेनमार्कची राजधानी. पार्कर आणि नेलसन यांनीं १८०१ मध्यें समुद्रयुद्धांत येथें जय मिळविला. १८०० त इंग्लिशांनीं यावर तोफांचा भडिमार केला.

कॉर्सिका:--भूमध्यसमुद्रांतील एक बेट.

कोर्टरॉय:--बेलजममध्यें.

क्रेसी:--फ्रान्सांत. १३४६ मध्यें येथें लढाई झाली.

क्रिमिया:- रशियांत. १८५४-५५ मध्यें प्रसिद्ध युद्ध झालें.

कौचौ:--चिनांतील जर्मनीचें बंदर. हें १८९८ मध्यें जपान व इतर राष्ट्रांनीं हरकत घेतली असतांही चीनपासून जर्मनीनें घेतलें. सदरहू सालाच्या कांहीं दिवस पूर्वी दोन जर्मन मिशनऱ्यांचा येथें खून झाला होता. त्याची भरपाई म्हणन कैसरनें हें बंदर हिसकून घेतलें होतें. अशा रीतीनें जर्मनीनें चीनांत आपला पाय शिरकविलेला पाहून रशिया व ग्रेट ब्रिटन यांनीं चिनांत बंदरें मिळविण्याचा प्रयत्न केला, व त्याप्रमाणें पोर्ट आर्थर व वै-है-वै हीं दोन बंदरें अनुक्रमें त्यांनीं मिळविलीं. त्यांपैकीं पोर्ट आर्थरचा निकाल सुप्रसिद्ध रूसो-जपानी युद्ध होऊन कायमचा लागला. पोर्ट आर्थरच्या देवघेवींत जर्मनीनेंही थोडीशी उठाठेव केलीच होती. तें बंदर चिनास पुन्हा देण्यास जपानला जर्मनीनें भाग पाडलें. या ठिकाणीं मोठमोठ्या दगडी कोळशाच्या खाणी आहेत.

केडीज:—हें शहर पोलंडमध्यें असून रशियाच्या पश्चिम सरहद्दीवर आहे.

क्यारोंगा:—आफ्रिकेंत नियासालँडमध्यें. येथें ब्रिटिश सैन्यानें बऱ्याच मोठ्या जर्मन सैन्याचा पराभव केला.

कील:—जर्मन आरमाराचें हें मुख्य ठाणें असून तें हाल्स्टेनच्या पूर्व किनाऱ्यावर आहे. येथून हेंबर्ग ५३ मैल आहे. हें जर्मनीच्या व्यापाराचें मोठें बंदर आहे. या बंदरांत दर वर्षी सुमारें ७ हजार गलबतें येतात. येथें आरमारी शिक्षणाची

युरोपांतील सांप्रतचें महायुद्ध.

धारातीर्थीं देहठेवणारे ग्रेटब्रिटनचे शूर वीर.

युरोपांतील सांप्रतचें महायुद्ध.

धारातीर्थीं देहठेवणारे ग्रेटब्रिटनचे शूर वीर.

पाठशाळा असून एंजीनियरिंगच्या वगैरे दुसऱ्याही शाळा आहेत. तसेंच जहाजें बांधणें, तरत्या गोदी तयार करणें वगैरे कामें येथें फार मोठ्या प्रमाणावर चाललेलीं असतात. हें बंदर सुमारें ३४ फूट खोल असून तेथील बंदोबस्त फार उत्तम आहे.

कीलक्यानल:—या खाडीचें खरें नांव कैसर विल्यम क्यानल. ही उत्तरसमुद्र व बाल्टिक समुद्र यांस जोडते. लांबी सुमारें ६० मैल. बांधण्यास खर्च ७८ लक्ष पौंड आला. प्रथम ही खाडी लहान प्रमाणावर बांधिली होती, पण तिच्यांत मोठ्या लढाऊ जहाजांचा प्रवेश होईना; म्हणून तिची खोली ४६ फूट व रुंदी १४४ फूट केली आहे. रात्रौ येथें विजेचा मोठा प्रकाश असतो. बाल्टिक समुद्रावर स्वामित्व ठेवण्यास ही खाडी फार महत्त्वाची आहे.

काइनिंग्जबर्ग:—हें शहर समुद्रकांठीं बर्लिनच्या ईशान्येस ३३८ मैलांवर आहे. वस्ती सुमारें २२ हजार. ही ईस्ट प्रशियाची राजधानी असून येथें महत्त्वाचा किल्ला आहे. याच्या संरक्षणासाठीं याच्या दोन्ही बाजूंस सहा सहा किल्ल्यांची रांग बांधली असून लढाईच्या दृष्टीनें असे महत्त्वाचे दोन किल्ले मध्यभागीं आहेत.

कॉन्स्टड:—रशियाचें आरमाराचें मुख्य ठाणें. हें पेट्रोग्रॅडपासून पश्चिमेस २० मैलांवर आहे. व या बाजूनें राजधानीवर हल्ला येऊं नये म्हणून येथें आरमारी बंदोबस्त ठेविला आहे. यूरोपांतील फार मजबूत किल्ल्यांपैकीं येथील किल्ला आहे. येथील खाडीच्या दोन्ही बाजूंवर तट बांधिला असून त्यांमधील बुरुजांवर क्रूप तोफा ठेविल्या आहेत. येथील जुने किल्ले अझून चांगल्या स्थितींत आहेत. क्रिमियाच्या लढाईंत या किल्ल्यांचा फार उपयोग झाला.

गोबिनेन:—पूर्वप्रशियांत: कायनिंग्जबर्गहून ६६ मैल. या ठिकाणीं रशियानें जर्मन सैन्याचा मोठा पराभव केला.

चॅटोथिरी—वस्ती १० हजार. एन प्रांतांत मार्ननदीच्या कांठीं. या ठिकाणीं एँग्लोफ्रेंच सेनेनें जर्मनांचा पाठलाग केला; व ब्रिटिश सेनेनें पुष्कळ कैदी व मशीनतोफा पाडाव करून आणिल्या.

चेल्म् किंवा केल्म्:—रशियन पोलंडमध्यें. वस्ती २० हजार. ऑस्ट्रियन सैन्य येथून वाट काढण्यास पाहत असतां रशियन फौजेनें त्यांचा पराभव केला.

जॅडर:—सर्व्हियांत. येथें आस्ट्रियनसैन्याचा सर्व्हियनसैन्यानें पराभव केला.

ट्रीस्ट:—आस्ट्रियाहंगारीच्या आड्रिआटिक समुद्रीवरील ह्या मुख्य बंदरावर जर्मनीचा आज पुष्कळ दिवसांपसून डोळा आहे. वस्ती १ लक्ष ७८ हजार. पैकीं शेकडा ७५ इटालियन आहेत.

टर्लमाँट:—बेलजममधील हें शहर ब्रॅबँट प्रांतांत लुव्हेनपासून लिएजला जाणाऱ्या आगगाडीच्या रस्त्यावर ब्रुसेल्सच्या पूर्वेस २५ मैलांवर आहे. येथील पागा फार उत्तम रीतीनें बांधिलेल्या आहेत.

टॉंग्रेस--हें लहानसें फ्लेमिश शहर सध्यां जर्मनांच्या ताब्यांत आहे.

टूल:--हें फ्रेंचांचें लष्करी ठाणें नेन्सीच्या पाश्चमेस १४ मैलांवर आहे.

टुलोन:--हें बंदर मार्सेलिस पासून ४२ मैलांवर असून भूमध्यसमुद्राच्या किनाऱ्यावरील पहिल्या प्रतीचा किल्ला या ठिकाणीं आहे. वस्ती १ लक्ष. याच्या चारी बाजूंस समुद्रांत व जमिनीवर किल्ले बांधून त्यावर प्रचंड तोफा रचून ठेविल्या आहेत.

ट्रीव्हज:--जर्मनींतील सर्वांत जुनें शहर. येथें प्राचीनकाळाचे पुष्कळ अवशेष आहेत.

डार्डानेल्स:--सामुद्रधुनी. ही ४० मैल लांब असून मार्मोरा व एजिन या समुद्रांस जोडते. हिच्या दोन्ही किनाऱ्यांवर नवीन पद्धतीचे किल्ले बांधून तटबंदी केली आहे.

डेनिव्हिटझ:--प्रशियांत. येथें १८१९ त फ्रेंचांचा पराभव झाला.

डीपे:--फ्रान्सांत. इंग्लिश व डच यांनीं १६९४ त याजवर तोफांचा भडिमार केला.

डीजोन:--फ्रान्सांत. १८७० त जर्मनीनें घेतलें. १८७१ त येथें ग्यारीबाल्डीनें रशियनसैन्यास अडवून धरिलें होते.

डिनाँट:--ता. १५ ऑगस्ट रोजीं या ठिकाणीं निकराची लढाई झाली. हें शहर बेलजममध्यें नेमूरच्या दक्षिणेस १५ मैलांवर आहे.

डयुरेझो:--आलबेनियाची राजधानी. वस्ती ५ हजार.

डाईल:--बेलजममधील एक नदी. ही ब्रॅबांट आणि एँटवर्प यांमधून वेव्हर, लुव्हेन्स आणि मेलीन्स यांचेवरून वाहत जाऊन पुढें सीऊन नदीस मिळते.

डॅन्झील:--प्रशियांत. हें व्हिश्चुलानदीच्या कांठीं असून यास चांगली तटबंदी आहे. १५ व्या शतकांत याची फार भरभराट झाली होती. १८१३ सालच्या युद्धांत फ्रान्सकडून हें ऍंग्लो-जर्मन सैन्यानें परत घेतलें.

नेमर:--बेलजममधील नेमरनांवाच्या प्रांताच्या राजधानीचें शहर. वस्ती ३१,९४० म्यूजनदी सेंबरनदीला मिळते, त्या ठिकाणीं हें वसलें असून याची शोभा सुंदर आहे. येथें फार मजबूत किल्ला बांधिला आहे. याच्या सभोंवार ३ पासून ९ मैलांच्या अंतराअंतरावर उंचावर बांधलेली ९ किल्ल्यांची रांग आहे.

नॅन्सी:--म्यूर्थनदीच्या पश्चिम किनाऱ्यावर हें शहर वसलें असून मेट्झच्या दक्षिणेस ३५ मैलांवर आहे. शहर सुंदर व उत्तम रीतीनें बांधिलेलें आहे.

पारीस:--फ्रान्सची राजधानी. वस्ती सुमारें २७ लक्ष. हें शहर सीननदीच्या दोन्ही किनाऱ्यांवर वसलेलें असून, येथून समुद्रकिनारा २३३ मैल दूर आहे. सर्व जगांत उत्तम किल्ला येथें आहे, असें म्हणतात. याच्या सभोंवार किल्ल्यांच्या तीन रांगा आहेत. यांपैकीं अगदीं बाहेरची रांग १८७० सालच्या लढाईनंतर बांधिली. अगदीं आंतल्या रांगेचा घेर २२ मैल आहे. त्याला ६० दरवाजे असून

९ रेलवेचे फांटे त्यांमधून जातात. यापुढील रांगेचा घेर ३४ मैलांचा आहे. तिसऱ्या रांगेचा घेर ७५ मैल असून ही तटबंदी शहरापासून २१ मैलांवर आहे. या रांगेंतील प्रत्येक किल्ल्यावर २४ पासून ६० मोठ्या तोफा रचून ठेविल्या असून त्यांचे रक्षणास ६०० पासून १२ शें फौज असते. यांपैकीं अगदीं बाहेरची जी किल्ल्यांची रांग आहे, त्यांचें संरक्षण करण्यास १ लक्ष ७० हजार फौज लागेल असा अंदाज आहे. त्याचप्रमाणें शत्रूस पारीस शहरास वेढा घालावयाचा असला, तर तोंडास देण्याची फौज खेरीज करून तिच्यामागें अगदीं कमींत कमी ५ लक्ष लोक तरी घेऊन गेलें पाहिजे. लढाईच्या आरंभानंतर कांहीं दिवसांनीं फ्रेंचसरकारानें आपलें ठाणें येथून बोर्डोला नेलें होतें.

पोला:—ऑस्ट्रिया-हंगारीचें आरमाराचें मुख्य ठाणें. यूरोपांतील हें एक अति सुंदर बंदर आहे. वस्ती ४५ हजार. याचें क्षेत्रफळ ३ चौरस मैल असून याच्या मुखाशीं लहान लहान बेटें आहेत. याच्या मागल्या बाजूस डोंगराच्या रांगा असून त्यांवर उत्तम बंदोबस्त ठेविला आहे.

फ्लॉरेनव्हील:—हें बेलजम-लग्झेंबर्गमध्यें सिमॉईस नदीच्या कांठीं आहे. येथून सेडन पश्चिमेस १६ मैलांच्या अंतरावर आहे. यावर लहानसें शहर वसलें असून त्यावर दीपस्तंभ बांधिला आहे. तिच्यांतून तीन कोटी मेणबत्त्यांच्या प्रकाशायेवढा दांडगा विजेचा प्रकाश उत्तर समुद्रांत पडतो. १८०० पासून १८९० पर्यंत हें इंग्लिशांकडे होतें. नंतर लॉर्ड सालिसबरी यांनीं तें जर्मनीस दिलें. जर्मनीनें त्याजवर कैक कोटी रुपये खर्च करून तें प्रचंड सामर्थ्याचें लष्करी ठाणें केलें आहे. ता. २८ ऑगस्ट रोजीं याच्याच पलीकडील पाण्यांत ब्रिटिश आरमारानें जर्मनीचीं पांच लढाऊ जहाजें बुडविलीं.

बाल्टिक समुद्र:—याच्या उत्तर आणि पश्चिम किनाऱ्यावर अनुक्रमें जर्मनी व राशिया यांच्या सरहद्दी असून ह्या समुद्रांतील वर्चस्वासंबंधानें दोन्ही देशांत स्पर्धा आहे. हा समुद्र उथळ असून याचें पाणी केव्हां जास्ती व केव्हां कमी होतें. हिंवाळ्यांत सर्व किनारा बर्फानें गोठून जातो. पण हल्लीं हेलासिंगफोर्स व क्रॉन्स्टड या बंदरांत बर्फ फोडण्याचीं यंत्रें ठेऊन नेहमीं येण्याजाण्याचा मार्ग मोकळा राहावा अशी तजवीज केली आहे. जर्मन व राशियन आरमारांचें या समुद्रांत युद्ध होण्याचा संभव आहे.

बेलफर्ट:—हें शहर फ्रान्सचें असून तें फ्रान्स व जर्मनी यांच्या सरहद्दीवर आहे. येथें व्हासजेस व झूरा यांच्या दरम्यान फार मजबूत व बहुतेक अभेद्य असा किल्ला बांधिलेला आहे. १६४८ मध्यें हें ऑस्ट्रियाकडून फ्रान्सला मिळालें. १८७१ च्या लढाईंत जर्मन सैन्यानें या शहरास तीन महिने वेढा दिला होता. फ्रॅंकफोर्ट येथें झालेल्या तहान्वयें हें फ्रान्सला पुन्हा मिळालें.

बेलग्रेड:—सर्व्हियाची राजधानी. युद्धाचा आरंभ याच्या आसमंतात भागांतून झाला. १६९० मध्यें तुर्कांनीं हें शहर घेतलें होतें. पण १७१७ त मोठा पराक्रम करून प्रिन्स यूजिन यांनीं तें पुन्हा घेतलें. सर्व्हियाचा राजा किंग अलेक्झांडर व त्याची राणी ड्रागा यांचा १९०३ सालीं येथें खून झाला.

बर्लिन:—प्रशियाची राजधानी. युरोपांतील तिसरें मोठें शहर. एल्ब व ओडर या नद्यांमधील प्रांताच्या व्यापारांचें मुख्य ठाणें. प्रशियन राज्याच्या राज्यकारभाराचें मुख्य स्थान हेंच असून युरोपांत ज्या प्रमुख युनिव्हर्सिट्या आहेत, त्यापैकीं येथील युनिव्हर्सिटी ही एक होय. मूळचें हें गांव कोळयांचें होतें, पण आजची वैभव-संपन्न स्थिति त्याला जितक्या लौकर प्राप्त झाली तितकी लौकर जगांतील अन्य कोणत्याही शहराला प्राप्त झाली नसेल. आजच्या सांप्रतच्या कैसरच्या होहेन-झोलर्न घराण्याचें राहण्याचें ठिकाण हेंच आहे. १८७८ मध्यें येथें कांग्रेस होऊन रुसो-टर्की युद्धाची समाप्ति झाली. १८८० त ग्रीको-टर्कीश सरहद्दीसंबंधानें येथें कॉन्फरन्स भरलें होतें. १८८५ त इंटर्नशनल कॉन्फरन्सची येथें बैठक झाली.

बोर्डो:—फ्रान्समध्यें. वस्ती तीन लाख. पारीसवर जर्मनांची स्वारी होण्याचा संभव दिसला, तेव्हां फ्रान्सचें राजधानीचें ठाणें पारीसहून येथें नेण्यांत आलें होतें. हें जेरोन नदीच्या कांठीं असून प्रख्यात बंदर आहे. पारीसपासून ३५० मैल. येथें दारू पुष्कळ तयार होतो. हें बराच कालपर्यंत इंग्लिशांच्या सत्तेखालीं होतें. १८७०-७१ च्या फ्रँको-जर्मन लढाईत फ्रान्सची राजधानी येथें नेण्यांत आली होती; व तह होईपर्यंत ती तेथेंच होती.

बुलोन:—फ्रान्समध्यें; १८०३ मध्यें इंग्लंडवर स्वारी करण्याचा विचार करीत असतां नेपोलियननें आपला तळ तेथें दिला होता.

ब्रेसलॉ:—सायलेशियांत. १७५७ त ऑस्ट्रियन आणि प्रशियन यांनीं हें घेतलें, व नंतर फ्रेंचानीं घेतलें.

ब्रूजेस—बेलजममध्यें. १७४५ व १७९४ त हें फ्रेंच्यांच्या ताब्यांत होतें.

ब्रूसेल्स:—बेलजमची राजधानी. बेलजमदेशाच्या उद्योगधंद्याचें माहेरघर. या शहरास तटबंदी नसल्यामुळें जर्मनांना कांहीं त्रास न करितां तें घेतां आलें. शहरांत प्रवेश झाल्यावर ८० लक्ष पौंडाची खंडणी कैसरनें येथील लोकांजवळ मागितली. १६ व्या शतकाच्या आरंभीं ज्यांस लो-कंट्रीज म्हणतात, त्यांच्या राजधानीचें हें ठिकाण होतें. १७९४ ते १८१४ पर्यंत हें फ्रेंचांकडे होतें. फ्रान्स, स्पेन व ऑस्ट्रिया यांच्या बरोबरच्या लढाईत या शहराची पुष्कळ दुर्दशा झाली. १८३१ त बेलजमच्या राजधानीचें हें शहर झालें.

बुखारेस्त:—रुमानियांत. १७६७ पासून १७८० पर्यंत रशियन व ऑस्ट्रियन यांचे यास वेढे पडले होते. १८१२ त रशिया आणि पोर्टी यांच्यामध्यें येथें तह झाला.

बुडापेस्ट:—हंगारींत. पूर्वी कैक वेळां या शहरास वेढे पडून युद्धें झालीं.

मेंझ:—जर्मनींतील एक मोठें शहर; व जर्मनीच्या मुख्य किल्ल्यांचें ठिकाण. हें ऱ्हाईन नदीच्या पश्चिम किनाऱ्यावर असून फ्रँकफोर्टपासून २० मैलांवर आहे. शांततेच्या वेळीं येथें सुमारें ८ हजार फौज कायमची ठेवलेली असते. हें फ्रान्सपासून बर्लिनला जाणाऱ्या रस्त्यावर आहे. फ्रेंच रेव्होल्यूशनच्या वेळीं झालेल्या लढाईंत हें शहर बराच काळ फ्रेंचांच्या हातांत होतें. सुटे टाईप पाडून छापण्याच्या कलेचा जन्म याच शहरीं झाला.

माल्टा:—भूमध्यसमुद्रांतील ब्रिटिश-आरमाराचें मुख्य ठाणें. सन १८१४ पासून हें इंग्लंडाकडे आहे.

मॅलिन्स:—हें बेलजममधील पुरातन व महत्त्वाचें शहर एँटवर्प पासन १४ मैलांवर असून फार रमणीय होतें. याच्यावर बरेच वेळां हल्ले होऊन पुष्कळदां तें शत्रूंच्या ताब्यांत गेलें आहे. यास कांहीं तटबंदी नाहीं. लुव्हेनच्या खालोखाल या शहराचा जर्मन सैन्यानें विध्वंस केला.

मेन्यूज:—फ्रान्समधील तटबंदीचें हें शहर मॉन्सच्या दक्षिणेस १३ मैल आहे. येथें जर्मन फौजेनें ब्रिटिश फौजेवर हल्ला करून तीस अडकवून टाकण्याचा शत्रूचा बेत होता; पण तो सपशेल फसला.

मेसीना:—सिसिलीमधील हें बंदराचें शहर नेपल्सपासून २०० मैलांवर आहे. हें फार पुरातन असून एक वेळ याची फार भरभराट होती. १९०८ सालच्या दिसेंबरच्या २८ तारखेस मोठा भूकंप होऊन याच्या पूर्ण नाश झाला. याच बंदरांत जर्मनीचीं गिबेन व ब्रेसला हीं दोन लढाऊ जहाजें, ब्रिटिश जहाजें त्याचा पाठलाग करीत असतां आश्रय धरून राहिली होतीं.

मेट्झ:—हें जर्मन शहर लोरेन प्रांताची राजधानी असून येथें अत्यंत मजबूत किल्ला आहे. स्ट्रॅसबर्गपासून ८० मैल व पारीसपासून १७० मैलांवर हें आहे; वस्ती ६० हजार. मॉसेली नदीस सीन नदी जेथें मिळते, त्या ठिकाणीं हें शहर वसलेलें आहे. या शहरांतील किल्ले वगैरे मूळ फ्रेंचांनीं बांधिले होते. त्याचा विस्तार पुढें जर्मनीनें केला. शहराच्या सभोंवतीं १२ किल्ले आहेत. ता. २७ आक्टोबर १८७० रोजीं दोन महिन्यांच्या वेढ्याच्या अखेरीस फ्रेंचांचा जनरल मार्शल बॅझेन हा मोठ्या सैन्यानिशीं जर्मनांस शरण आला होता. येथून रेलवेचे तीन फांटे जाऊन ते लग्झेंबर्ग, कॉब्लेंझ व स्ट्रॅसबर्ग या शहरांवरून जातात, व दुसरे तीन फांटे फ्रान्सच्या सरहद्दीशीं जोडलेले आहेत. याच्या आसमंतांत मार्गीं ग्रेव्हेलोटचें मोठें रणक्षेत्र आहे. लढाई सुरू होण्यापूर्वी २५ हजार जर्मन फौजेचा येथें कायमचा तळ असे. येथें अनेक युद्धप्रसंग घडले आहेत.

मुल हॉसेन:—हें व्यापाराचें मोठें शहर ऑलसेस लॉरेन प्रांतांत आहे. येथें सुताच्या पुष्कळ गिरण्या आहेत.

म्यूज:—ही नदी फ्रान्समध्यें उगम पावून हाटेमार्न प्रांतांतून वाहत जाऊन व्हासजेस गांवांत शिरते. पुढें त्या प्रांतांतल्या बॅझॉयलीस येथें जमीनीच्या पोटांत गुप्त होऊन, पुढें चार मैलांवर नॉफशॉटो येथें पुन्हा दृग्गोचर होते तेथून आर्डिनीस, म्यूज, व्हर्डून, सेडन, मिझिएरीस आणि गिव्हेट, इत्यादिकांच्या प्रांतांतून वाहत जाऊन पुढें ती बेलजममध्यें शिरते. बेलजममधील दिनांट, नेमर, व लिएज हीं शहरें इच्या कांठीं आहेत. पुढें नेदरलंडमधून मॅस्ट्रिच व व्हेनलो यांच्या जवळून वाहत जाऊन गोरकम जवळ व्हाईन नदीची डावीकडील शाखा जी वाल नदी तिला मिळते. हिची लांबी ५७५ मैल असून सुमारें ४०० मैलांचा भाग तारवांच्या रहदारीस चांगला आहे. हिच्या कांठांवर फ्रेंचांनीं फिल्ल्यांची रांग चांधिली आहे, व त्यामुळें जर्मनीचा फ्रान्सांत शिरण्याचा रस्ता बिकट झाला आहे. या बाजूस अशा तऱ्हेचा अडथळा असल्यामुळें जर्मनी फ्रान्सवर स्वारी करण्यासाठीं बेलजममधून शिरला असावा असें दिसतें. सध्यांच्या लढाईंत या नदीच्या कांठीं अनेक जागीं निकराच्या चकमकी झाल्या आहेत.

मॉन्स:—हें बेलजम देशांतील शहर ब्रुनेंपासून २७ मैलांवर आहे. सांप्रतच्या लढाईंत ब्रिटिश सैन्यानें येथें चांगला पराक्रम गाजविला.

मॉन्हेंज:—जर्मनीच्या लॉरेन प्रांतांत असून मेट्झ व सारबर्ग यांच्यामधील रेलवेच्या रस्त्यावर मार्सलपासून १० मैलांवर आहे.

मॅस्ट्रिच:—हें शहर नेदरलंडमध्यें असून लिंबर्गची राजधानी आहे. ब्रुसेल्सपासून ५६ मैलावर म्यूज नदीच्या कांठीं आहे. लिएजपासून १९ मैलांवर या शहरास तटबंदी नाहीं; पण पुष्कळ फौज येथें उतरण्याची चांगली सोय आहे.

रॅव्हारस्का:—टोमॅसझाफ आणि लँवर्ग यांच्यामध्यें हें पोलिश शहर वसलेलें आहे. ता. ८ सप्तंबर रोजीं राशियनांनीं जर्मनांचा या ठिकाणीं पराभव केला.

ला-फर्टे-सुस-जारे:—जर्मन सैन्य पूर्वाभिमुख चाललें असतां या शहरानजीक येऊन पोचलें होतें. तें पारीसच्या थेट पूर्वेस ४० मैलांवर मार्न नदीच्या कांठीं आहे. येथून पारीस शहराची तटबंदी कांहीं थोडे मैलच दूर आहे.

लँड्रेसीज:—पूर्वी येथें किल्ला होता. सांप्रत हें एक फ्रेंचांचें शहर असून तें सेंबर नदीच्या कांठीं आहे. येथें ता. २६ ऑगस्ट रोजीं जर्मनांची भयंकर कत्तल झाली. त्याविषयीं लॉर्ड किचनेर हे आपल्या यादींत म्हणतात कीं, "लँड्रेसीज येथें एक जर्मन पायदळाची तुकडी अगदीं खांद्यास खांदा भिडवून एका अरुंद रस्त्यांत शिरली, व त्यांनीं तो रस्ता भरून गेला. आमच्या मशीन तोफा इतक्यांत शहराच्या टोंकाकडून त्यांच्यावर

रोखल्या. त्यामुळें अघाडीच्या फौजेचा पुरा नाश झाला; व मागाहून जो भयंकर धुमाकूळ उडाला त्यांत त्या रस्त्यांत मेलेले व जखमी झालेले सुमारें ८००—९०० जर्मन लोक सांपडले."

लेंबर्ग:—गॅलिशियाची राजधानी. ऑस्ट्रियांतील चौथें शहर. वस्ती सुमारें १ लक्ष ६ हजार. हें रशियाच्या सरहद्दीपासून ५० मैलांवर व व्हियेन्नापासून आगगाडीनें ४६८ मैल आहे. पूर्वी या शहरास तटबंदी होती, पण बऱ्याच वर्षांपूर्वी येथील किल्ले पाडून त्यांचीं क्रीडोद्यानें बनविलीं. ता. ३ सप्टेंबर रोजीं रशियानें हें शहर घेतल्याची बातमी आली होती. येथील लोकवस्तींत शेकडा ८० पोल, १० जर्मन; व ८ रुमेनियम व इतर २ असें प्रमाण आहे. शेंकडा ३० ज्यू आहेत. व्यापारधंद्याचें महत्त्वाचें ठाणें असून ११ व्या ऑस्ट्रियन पलटणीचें हें मुख्य ठाणें होतें. येथें कांहीं बंदोबस्त नसल्यामुळें रशियास वाटेल त्या वेळीं याच्यावर हल्ला करितां येण्यासारखें आहे.

लिएज:—बेलजममधील याच नांवाच्या प्रांताची राजधानी. वस्ती सुमारें १ लक्ष ७० हजार. हें म्युज नदीच्या कांठीं असून याच्या सभोंवार समृद्ध अशा दगडी कोळशाच्या खाणी आहेत. येथें मोठमोठे कारखाने होते. व आरमारें तयार करण्याचा मोठा उद्योग चाले. १८८८ नंतर या शहरासभोंवतीं ४ पासून ६ मैलांच्या अंतरा-अंतरावर १२ किल्ल्यांची रांग बांधून याची तटबंदी केली. जर्मनीपासून आगगाडीचा जो फांटा येतो त्याच्या दोन्ही बाजूंस फ्लेरान व शॉड फांटेन हे किल्ले बांधिले असून यांमधील अंतर १ मैलाचें आहे. हे सर्व किल्ले कांक्रीटनें बांधिलेले आहेत; व त्यांचीं छपरें फिरतीं आहेत. तोफांच्या खालीं अशी यंत्ररचना केली आहे कीं, त्यामुळें तोफा वाटेल तशा वर खालीं करितां येतात. या सर्व किल्ल्यांच्या मधून लष्कराचे रस्ते व वाफेचे ट्रामवेचे रस्ते बांधिले आहेत. सांप्रतच्या युद्धांत या किल्ल्यांनीं जर्मन सैन्यास थोपवून धरण्यांत जी शिकस्त केली, त्यावरून या शहराच्या उत्तम बंदोबस्ताची कल्पना होईल. व्हॉन एमिक यांच्या हाताखालील प्रचंड जर्मन सेनेनें ता. १० आगस्ट पासून हे किल्ले हस्तगत करण्याचा निकराचा प्रयत्न चालविला. त्यांच्या तोफांतून भयंकर आगीचा कैक दिवसपर्यंत सारखा वर्षाव चालला होता. त्यानंतर बरेच दिवसांनीं हें शहर पडलें. या शहरांत जर्मनांनीं प्रवेश केला त्या वेळीं जर्मन फौजेंतील लोकांनीं येथील रहिवाशांवर अनन्वित जुलूम केला असें म्हणतात. इतकी विलक्षण चिकाटी दाखवून या शहरानें जर्मन सैन्यास थोपवून धरलें. त्यामुळें मिळालेल्या अवधींत संयुक्त सैन्यास तयारी करण्यास बराच वेळ सांपडला. येथें सुमारें २५ हजार जर्मन फौज कामास आली असावी असा अदमास आहे.

लीले:—हें शहर डूल नदीच्या कांठीं पारीसपासून १५५ मैलांवर आहे. याच्या सभोंवतीं किल्ले असून त्यांचा घेर ३० मैलांचा आहे. वस्ती सुमारें १ लक्ष ९७ हजार.

फ्रान्समधील महत्त्वाच्या किल्ल्यांचें हें ठाणें असून येथें मोठमोठे कारखाने आहेत. याच्या पूर्व बाजूस पंचकोणाकृति भुईकोट आहे. किल्ल्याची रचना नवी व तोफखानाही नवा आहे. पूर्वी येथें लढाईचे प्रसंग घडून आले आहेत.

लिंबर्ग:—हालंड व बेलजम यांच्यामध्यें हा प्रांत विभागलेला असून तो सुपीक आहे. या प्रांतांत सध्यांच्या लढाईंत बऱ्याच चकमकी झडल्या. बेलजम प्रांताचें राजधानीचें ठिकाण हॅसेल्ट. डचलोकांचें मॅसट्रिच हें होय.

लुव्हेन:—हें शहर बेलजममध्यें असून ब्रुसेल्सपासून १५ मैलांवर आहे. वस्ती ४५ हजार आहे. चौदाव्या शतकांपासून याची सुप्रसिद्ध विद्यापीठ म्हणून ख्याती आहे. येथें अनेक शोभिवंत जुन्या इमारती आहेत. त्या इमारतींचा सध्यांच्या युद्धांत जर्मन सैन्यानें नाश केलेला ऐकून सर्व जगास खेद वाटत आहे. येथील ग्रंथालयांत १॥ लाखांवर निवडक ग्रंथ असून एके वेळीं ६ हजार विद्यार्थी यांत राहत असत. या शहरांत जर्मन फौजेनें जो नाश केला व जी कत्तल केली त्या अत्यंत करुणास्पद गोष्टींचा डाग जर्मनीच्या इभ्रतीला लागलेला अर्वाचीन इतिहासांत कायमचा राहील. व युद्ध संपल्यावर जर्मन लोकांस देखील त्यांच्याच लोकांनीं ता. २५, २६, २७ ऑगस्ट रोजीं येथें केलेल्या कृत्यांची फार लाज वाटेल, यांत शंका नाहीं.

लुबलिन किंवा लुबेल्स्क:—रशियन पोलंडमधील लुबलिन सरकारचें राजधानीचें शहर. हें वार्सापासून ९५ मैलांवर आहे. येथें मोठें लष्करी हॉस्पिटल आहे. या ठिकाणीं सात दिवसपर्यंत लढाई होऊन अखेर रशियन सैन्यानें शत्रूस पिटाळून लाविलें. वस्ती ५२ हजार.

ल्युनेव्हिल:—फ्रान्समध्यें नॅन्सीपासून १६ मैलांवर. येथें चांगलीच लढाई होऊन फ्रेंच तोफखान्यानें ५ हजार जर्मन फौजेचा उच्छेद केला. १८०१ सालीं जर्मनीचा बादशहा व पहिला नेपोलियन यांच्यामध्यें येथेंच तह झाला होता.

लक्सेंबर्ग:—याच नांवाच्या डचीच्या राजधानीचें शहर. वस्ती सुमारें २१ हजार. हें शहर ऑलसेट्टी नदीच्या कांठीं असून पूर्वी येथें फार मजबूत दगडी किल्ला होता. हा किल्ला १८६७ मध्यें निकामी केला. पण जर्मनीनें तो ताब्यांत घेतल्यापासून त्याचा पुन्हा बंदोबस्त केला आहे असें म्हणतात. पूर्वी सर्व यूरोपांत जिब्राल्टरशिवाय याच्या इतका मजबूत दुसरा किल्ला नव्हता.

वार्सा:—हें शहर पोलंडची राजधानी असून येथें मजबूत किल्ला आहे. लढाईच्या पूर्वी येथें ३० हजार रशियन फौजेचें ठाणें होतें. येथें १९०५—६ सालांत बंडें उद्भवलीं होतीं. हें शहर विश्चुला नदीच्या पश्चिम किनाऱ्यावर असून सेंट-पीटर्सबर्ग-पेट्रोग्रॅडच्या दक्षिणेस ६२५ मैलांवर व बार्लिनपासून ३०० मैलांवर आहे. १७९५ पासून १८०६ पर्यंत हें प्रशियाच्या ताब्यांत होतें. १८१३ पासून तें रशियाच्या ताब्यांत आहे.

विल्हेमशाव्हन:—उत्तर समुद्रांतील जर्मनीचें हें आरमाराचें मुख्य ठाणें असून वस्ती २६ हजार आहे. बहुतेक उद्योग गोदींतील कामांचाच चालतो. १९०८ सालापासून या बंदराची भरभराट फारच झाली आहे. १९०६ सालीं फार मोठीं प्रचंड लढाऊ जहाजें आंत घेतां येतील अशा गोदी तेथें बांधिल्या आहेत.

वेव्हर:—बेल्जममध्यें ब्रुसेल्सपासून १५ मैलांवर. वस्ती १४ हजार.

शार्लेरॉय:—सँबर नदीच्या कांठीं मॉन्सपासून पूर्वेकडे २३ मैलांवर बेलजम देशांतील हें शहर आहे. या ठिकाणीं ब्रिटिश सैन्यानें युद्धाचे आरंभीं कैक दिवसपर्यंत शत्रूच्या प्रबळ सेनेला तोंड देऊन टिकाव धरिला.

शाबाट्झ:—हें सार्व्हियांत असून सेव्ह नदीच्या पूर्व किनाऱ्यावर बेलग्रेडच्या दक्षिणेस ३७ मैलांवर ड्रिना प्रांतांत आहे. येथें भयंकर लढाई होऊन सार्व्हियनांनीं आस्ट्रियन सैन्याचा पराभव केला.

सेडन:—म्यूजनदीच्या कांठीं आर्डेनीस प्रांतांत हें शहर वसलेलें असून मिझिएरीच्या पूर्वेस १३ मैलांवर आहे. येथें तारिख १ सप्टेंबर १८७० रोजीं जर्मन व फ्रेंच यांची मोठी लढाई होऊन त्यांत मॅकमाहान याचा पराभव झाला, व दुसरे दिवशीं तो आपल्या ८२ हजार सेनेनिशीं शरण आला.

सेमालिन:—हंगारी प्रांतांतील हें लहानसें शहर डॅन्यूब नदीच्या पश्चिम किनाऱ्यावर बेलग्रेड पासून ६ मैलांवर वसलें आहे. ता १० सप्टेंबर रोजीं सार्व्हियनांनीं आस्ट्रियन सैन्याचा पराभव करून हें घेतलें होतें.

सेनलिस:—कांपीनपासून १९ मैलांवर हें शहर वसलेलें आहे. ता० ८ सप्टेंबर रोजीं फ्रेंच हसर सैनिकांनीं ९४ व्या जर्मन पायदळ पलटणीचा बावटा या ठिकाणीं काबीज केला.

सेराजेव्हो:—बोसनिया प्रांताची राजधानी. बेलग्रेडपासून १२० मैलांवर आहे. तेथें १६ व्या शतकांत बांधिलेली एक सुंदर मशीद आहे. ज्याच्या खुनानें युद्धास मुहूर्त करून दिला, त्या ऑस्ट्रियन युवराजाचा सपत्नीक प्राणघात ता० २८ जून रोजीं याच ठिकाणीं झाला. वस्ती ५० हजार.

स्ट्रॅसबर्ग:—आलसेस लॉरेन प्रांताची राजधानी. याचा बंदोबस्त फारच उत्कृष्ट रीतीनें केला असून जर्मन राज्यांतील सर्वोत्कृष्ट किल्ला या ठिकाणीं आहे. याच्या सभोंवतीं १४ किल्ल्यांची रांग आहे. वस्ती १ लक्ष ६८ हजार. हें फ्रेंच सरहद्दीपासून ३० मैलांवर आहे. शत्रूचा हल्ला आल्यास शहराच्या सभोंवतीं पाण्याचें प्रचंड पूर सोडून द्यावे अशी रचना येथें केली आहे.

सुएज कालवा:—हा कालवा ९९ मैल लांब असून १२० फूट रुंद आहे. व याची अगदीं कमी अशी खोली २९ फूट आहे. १८८८ मध्यें सर्वांचा एक करारनामा होऊन या कालव्यांतून कोणत्याही राष्ट्राचें तारूं केव्हांही

जाण्यायेण्यास प्रतिबंध नसावा असें ठरविण्यांत आलें आहे. ही अट लढाई व शांतता या दोन्ही वेळीं सारखीच लागू आहे. कालव्याची मालकी एका इजिप्शिअन कंपनीची आहे. इ. स. १८७५ मध्यें ब्रिटिश सरकारानें या कालव्याचे १८० हजार शेअर ४० लक्ष पौंडाला खेदिवाकडून विकत घेतले. त्यांची किंमत आज दसपट वाढली आहे.

हीलिक्जः- गॅलिशियांत. लेंबर्गच्या दक्षिणेस. येथें रशियनांनीं ऑस्ट्रियनांचा पराभव करून त्यांचें पुष्कळ सैन्य कापून काढिलें.

हेलिगोलँडः--हें लहानसें बेट जर्मनीच्या स्लेसविग-हॉलस्टिन प्रांतापासून उत्तर समुद्रांत २८ मैल दूर आहे. ह्यांत एक लहानसें शहर असून त्यांत एक अति प्रचंड प्रकाश देणारा दीपस्तंभ बांधला आहे. त्यांतून ३,००,००,००० मेणबत्त्यांच्या प्रकाशा एवढा दांडगा विजेचा प्रकाश उत्तर समुद्रांत पडतो. इ. स. १८०७ पासून १८९० पर्यंत हें बेट इंग्रजांचे ताब्यांत होतें. पुढें लॉर्ड सॅलिस्बरी ह्यांनीं तें जर्मनीस दिलें. आपल्या हातीं आल्यापासून जर्मनीनें त्यांत लक्षावधि रुपये खर्चून तें आपलें फार मजबूत असें आरमाराचें ठाणें बनविलें आहे. ता. २८ आगस्ट रोजीं येथें आरमारी लढाई होऊन, ब्रिटिश जहाजानें जर्मनीचीं पांच उढाऊ जहाजें बुडविलीं.

व्हर्डूनः—हें शहर फ्रान्समध्यें म्यूज नदीच्या कांठीं असून याच्या सभोंवार किल्ल्यांची विस्तीर्ण रांग आहे. हें सेडनच्या दक्षिणेस व मेटझच्या पश्चिमेस आहे.

व्हिएन्नाः--ऑस्ट्रिया हंगारीचें हें राजधानीचें शहर डॅन्यूब नदीच्या कांठीं बर्लिनच्या दक्षिणेच्या बाजूस ३४० मैलांवर आहे. इ० स० १८०६ पूर्वीच्या जर्मन साम्राज्याचा अस्त होईपर्यंत १६ व्या शतकाच्या मध्यापासून हें त्या साम्राज्याचें राजधानीचें शहर होतें. १५२९ त व १६८३ त तुर्कांनीं ह्यास वेढा घातला होता. पण त्यांची डाळ शिजली नाहीं.

व्हिसेः—मॅस्ट्रिचच्या दक्षिणेस ९ मैलांवर म्यूज नदीच्या कांठीं लिएजच्या शेजारीं हें लहानसें शहर आहे. हें शहर कित्येक दिवसपर्यंत जर्मनांशीं लढलें व जर्मनांचा त्यांत पुष्कळ नाश झाला. शेवटीं हें शहर त्यांनीं जाळिलें.

व्हिश्चुलाः—ही नदी आस्ट्रियांतील सायलेशिया प्रांतांत कार्पेथियन पर्वतांतून उगम पावून रशियन व प्रशियन प्रांतांतून वाहत जाऊन पुढें बाल्टिक समुद्राजवळ हिला २ फांटे फुटून डँझीगच्या आखातांत समुद्रास जाऊन मिळते. लांबी ६०० मैल. ही नदी कांहीं भागांत ऑस्ट्रिया आणि जर्मनी आणि ऑस्ट्रिया आणि रशिया यांची सरहद्द बनली आहे.

हर्बर्टशोहेः—हें जर्मन न्यू गायनाच्या पूर्वेकडे बिस्मार्क आर्किपेलॅगो या बेटांच्या समुदायांतील न्यू यामर्न नांवाच्या बेटांत आहे. हें ता. ११ सप्टेंबर रोजीं ऑस्ट्रेलेयन आरमारी अधिकारी रीयर अडमिरल बॅट्टी यांनीं घेतलें.

ह्यूए:—बेलजममध्यें-म्यूज नदीच्या कांठीं लिएजपासून १७ मैलांवर. येथें भुई-कोट असून लढाईच्या पूर्वी त्याजवर चांगला बंदोबस्त ठेविला होता वस्ती पंधरा हजार.

प्रकरण ३७ वें.

तुर्कस्तान.

सन. १९१४ च्या "स्टेटसमन ईयर-बुकांत" तुर्कस्तानची जी माहिती दिली आहे, तिच्या आधारें या प्रकरणांतील माहिती लिहिली आहे.

नुकत्याच झालेल्या बाल्कन युद्धांत यूरोपियन तुर्कस्थानाची जी वांटणी झाली, त्यांत कोणास किती प्रांत मिळाला, हें पूर्वी यूरोपखंडाची रूपरेखा या प्रकरणांत सांगितलेंच आहे.

राजघराणें.

तुर्कस्तानच्या सध्यांच्या सुलतानांचें नांव **पांचवे महंमद** असें असून त्यांचा जन्म ३ नवंबर १८४४ रोजीं झाला. यांचे वडील बंधु सुलतान अबदुल हमीद यांस पदच्युत केल्यावर ता० २७ एप्रिल १९०९ रोजीं सध्यांचे सुलतान गादीवर बसले. यांस दोन मुलगे आहेत.

या राज्याचें संस्थापक जें आटोमन घराणें त्यांपैकीं सध्यांचे सुलतान हे ३६ वे पुरुष होत. या राजघराण्यांत अशी वहिवाट आहे कीं, बादशाही झनान्यांत जन्मास आलेल्या मुलांपैकीं जो वयानें सर्वांत वडील असेल त्यास राज्यपद मिळावयाचें. झनाना ही दरबारची एक कायमचीच संस्था आहे. या झनान्यांत झालेल्या मुलांचा-मग तीं मुलें राण्यांपासून झालेलीं असोत अगर सुलतानानें बाळगलेल्या दासींपासून झालेलीं असोत, सर्वांचा हक्क व वंशाधिकार सारखाच समजतात. सध्यांच्या सुलतानामागून युसफ इझेद्दिन यांचा गादीवर हक्क आहे, व त्यांचेमागून सध्यांच्या सुलतानांचे बंधु वाहेद्दिन एफेंदी यांचा गादीवर हक्क पोंचतो.

पद्धतशीर रीतीनें लग्नें करण्याची पद्धत तुर्कीच्या सुलतानांनीं कैक शतकें ठेविलेली नाहीं. जनानखान्यांत ज्या स्त्रिया यावयाच्या त्यांपकीं कित्येक खुबीनें

आलेल्या असतात, व कित्येक विकत आणलेल्या असतात. यांपैकीं बहुतेक तुर्की राज्याच्या हद्दीबाहेरून सार्केशिया वगैरे प्रांतांतील असतात. या स्त्रियांपैकीं सुमारें ७ स्त्रिया राजस्त्रिया म्हणून सुलतान पदरीं ठेवतो; व बाकीच्या त्यांच्या चाकर म्हणून ठेविलेल्या असतात. जनानखान्यावर एक म्हातारीबाई कारभारीण असते, तिला " हतनदार कदीन " असें म्हणतात. ती जनानखान्यावर बंदोबस्तासाठीं ठेवलेल्या खोजांच्या मार्फत बाहेरील जगाशीं संबंध ठेवते.

सध्यांचें, तुर्कस्तानचा राज्यकारभार पाहणारें मंत्रिमंडळ ता. २४ जानेवारी १९१३ रोजीं अधिकारापन्न झालें; व त्याची दुरुस्ती, १९१३ सालच्या जून महिन्यांत मुख्य वजीर महंमद पाच्छा यांचा खून झाल्यानंतर झाली. सध्यांच्या (१९१४ मे) मंत्रिमंडळांत पुढील प्रधान आहेत.—

मुख्य वजीर—प्रिन्स सय्यद हालिम पाशा.
न्यायमंत्री--इब्राहिम बेग.
राज्यकारभार-मंडळाचे अध्यक्ष.—हालिल बे.
युद्धमंत्री.--एनव्हर पाशा.
आरमारमंत्री.—जनरल जमाल पाशा.
शिक्षणमंत्री.—शुक्री बे.
अंतर्व्यवस्था पाहणारे मंत्री.—तलात बे.
सुधराई खात्याचे मंत्री.—महंमद पाच्छा.
खाणी, जंगल, शेतकी आणि व्यापार ह्या खात्यांचे मंत्री-सुलेमान एलबुस्तानी एफेंदी.
पोष्ट व तारखात्याचे मंत्री.—उस्कान एफेंदी.
धर्ममंत्री—शेख उल इस्लाम हैरी बे.

राज्यकारभाराच्या सोईसाठीं एकंदर मुलुखाचे निरनिराळे परगणे केले आहेत, त्यांस ' विलायत ' असें म्हणतात. यांच्या पोटविभागांस ' संजाक् ', त्यांच्या पोटविभागांस ' कइच '; व त्यांच्या पोटविभागांस ' नाही ' असें म्हणतात गांवांस ' करीए ' असें नांव असून त्यांवरील अधिकाऱ्यांस ' मुखत्यार ' असें म्हणतात. विलायतेवर मुख्य अधिकारी असतो, त्यास ' वल्ली ' म्हणतात. या राज्यांतील सर्व प्रजाजनांस, त्याचा वंश मोठा आहे

कीं क्षुद्र आहे या गोष्टीकडे लक्ष न देतां, राज्यांतील मोठमोठ्या जागा मिळूं शकतात.

तुर्क राज्याचे मुख्य तीन विभाग आहेत. (१) यूरोपांतील तुर्कस्तान, (२) एशियांतील तुर्कस्तान (यांत अनटोलिया, अरेबिया,सीरिया, पॅलेस्टाईन, मॅसापोटेमिया आणि कुर्दिस्तान हे प्रांत मोडतात.) व (३) सॅमोस व सायप्रस या बेटांतील प्रांत. १९१३ च्या नवंबरांत समाप्त झालेल्या युद्धांत यूरोपांतील तुर्कस्तानाचा विस्तार बराच कमी झाला आहे, हें पूर्वी सांगितलेंच आहे. एकंदर तुर्क राज्याचें क्षेत्रफळ ७१० चौरस मैल असून त्यांत २१,२७,९०० लोकसंख्या आहे. त्यांपैकीं यूरोपांत असलेले तुर्कस्तानच्या राज्याचे प्रांत म्हटले म्हणजे, इस्तंबूल (कान्स्टांटिनोपल), मुत्तेसारिफत (चतलजा) आणि एड्रिआनोपल हे होत. यांचें क्षेत्रफळ १०,८८१ चौरस मैल असून त्यांतील लोकसंख्या १८,९१,००० आहे.

यूरोपांतील तुर्कस्तानांत मुसलमानांची वस्ती सर्वांत अधिक आहे. याशिवाय दुसरे लोक म्हटले म्हणजे ग्रीक, बलगेरियन, आर्मेनियन, जिप्सी आणि ज्यू हे होत. एशियांतील तुर्कस्तानांत सुमारें ४ लक्ष आरब असून सर्वांत अधिक संख्या तुर्कांची आहे. त्याशिवाय दुसऱ्या अनेक धर्माचे लोक त्यांत आहेत. तुर्कस्तानांतील मुख्य शहरांची लोकसंख्या खालीं दिल्याप्रमाणें:—

इस्तंबूल	१२ लक्ष	बसरा	८० हजार
एड्रिनोपल	८३ हजार	मदीना	४० ,,
स्मर्ना	३ लक्ष ७५ ,,	जेरुसलेम	८५ ,,
बगदाद	३ लक्ष २५ ,,	जाफा	४५ ,,
दमास्कस	२ लक्ष ५० ,,	गाझा	४० ,,
अलेपो	२ लक्ष ५० ,,	ट्रेबिझाँड	५५ ,,
मोसल	८० ,,		
मक्का	८० ,,	दिआरबकर	३८ ,,

धर्म.

येथील राजधर्म महंमदी आहे. मुख्य धर्माधिकारी सुलतान हा असून त्या नात्यानें त्यास कालीफ असें म्हणतात. तुर्क-राज्यांत २१२० मशीदी असून त्यांपैकीं इस्तंबूल शहरांत ३७७ आहेत. सर्व काजींची संख्या ११६०० आहे.

शिक्षण.

तुर्कस्तानांत सर्व लहान मुलांस व मुलींस प्राथमिक शिक्षण दिलेंच पाहिजे, असा कायदा आहे. ७ पासून १६ वर्षें वयापर्यंतच्या सर्व मुलांनीं शिक्षण घेतलेंच पाहिजे अशी सक्ति आहे. मात्र हें शिक्षण सरकारी शाळांतच जाऊन घेतलें पाहिजे, असा कायदा नाहीं. प्राथमिक शिक्षणांत तुर्क भाषा, कुराण, गणीत, इतिहास, भुगोल व निरनिराळ्या तऱ्हेचीं अक्षरें इतके विषय येतात. इस्तंबूल येथें मुख्य विश्वविद्यालय आहे.

१९१२–१३ सालांत तुर्कस्तानची जमाबंदी २६७२८४६१ पौंड होती, व खर्च ३४५६३५७४ पौंड झाला.

तुर्कस्तानच्या सैन्याची व आरमाराची माहिती पूर्वीं दिलीच आहे. सन १९११ सालच्या हिशेबाप्रमाणें तुर्कस्तानाचे व्यापाराचे आंकडे पुढील प्रमाणें होते.

आयात ३७७७४९११ पौंड, निर्गत २२४७४८१८ पौंड.

प्रकरण ३८ वें.

हेग ट्रिब्यूनल.

अथवा

कायमची पंचायत सभा.

राष्ट्रां-राष्ट्रांमध्यें उपस्थित होणाऱ्या वादांचा निकाल करण्यासाठीं कायमची पंचायत सभा २४ राष्ट्रांच्या सह्यांनीं एक करारपत्र होऊन ता. २९ जुलै १८९९ रोजीं स्थापन झाली. या सभेस " हेग ट्रिब्यूनल " असें म्हणतात. पुढें १४ जून १९०० रोजीं मूळ संघटनेस नवें कलम जोडण्यांत येऊन मूळ करारावर ज्यांच्या सह्या झालेल्या नव्हत्या अशा राष्ट्रांसही या सभेंत घ्यावें असें ठरविण्यांत आलें. उभय राष्ट्रांतील मंत्र्यांस शिष्टाई करून जे वाद मिटविता येणें शक्य नाहीं असे वाद मिटविणें सोईचें व्हावें, हा ही सभा स्थापन करण्याचा मुख्य उद्देश होय. या सभेस सर्व प्रकारचे वाद मिटवि-

ण्याचा हक्क आहे. वाद मिटविण्यासाठीं सभासदांची पोटकमिटी कशी नेमावी वगैरे बाबतींचा कायदा ठरविलेला आहे.

या सभेचें काम पाहण्याकरितां एक कायमचें व्यवस्थापक मंडळ नेमिलेलें असतें. व त्याच्या हाताखालीं 'इंटर नॅशनल बूरो' नामक दुसरी एक मंडळी असते. मुख्य व्यवस्थापक मंडळ्यांत या सभेच्या संघटनेवर सह्या करणाऱ्या राष्ट्रांचे प्रतिनिधि असतात, व नेदरलंडमधील परराष्ट्रराज्यकारणाचा मंत्री हा तिचा अध्यक्ष असतो.

कायमच्या व्यवस्थापकमंडळांत, ज्यांस परराष्ट्रराज्यकारणाच्या प्रश्नांची पूर्ण माहिती असते, त्यांचीच नेमणूक करितात. प्रत्येक राष्ट्र जास्तींत जास्ती चार सभासद निवडून देतें. प्रत्येक नेमणूक ६ वर्षांकरितां असते. या सभेंत कोणत्या राष्ट्रांचे किती सभासद होते हें खालीं दिलें आहे.

(ही यादी एप्रील १९१४, सालांतील आहे.)

१ युनायटेड स्टेस्स् ४
२. अर्जंटाईन रिपलिक ४
३ ऑस्ट्याहंगारी ४
४ बेलजम ४
५ बोलिव्हिया ४
६ ब्राझिल ४
७ बलगेरिया २
८ चाईल ४
९ चीन ४
१० कोलंबिया ४
११ क्यूबा ४
१२ डेनमार्क ४
१३ डॉमिनिकन रिपब्लिक ४
१४ इक्वॅडोर ४
१५ फ्रान्स ४
१६ जर्मनी ४
१७ ग्रेटब्रिटन ३
१८ ग्रीस ४
१९ ग्वाटेमाला ४
२० हैटी ४
२१ इटली ४
२२ जपान २
२३ लग्झेंबर्ग १
२४ मेक्सिको ४
२५ नेदरलंड ४
२६ निकारागोवा १
२७ नॉर्वे ४
२८ पनामा २
२९ इराण १
३० पेरू ४
३१ पोर्तुगाल ३
३२ रुमानिया ४
३३ रशिया ३
३४ सालव्हेडोर ४
३५ सर्व्हिया २
३६ सयाम २
३७ स्पेन ४
३८ स्वीडन ४
३९ स्वित्झर्लंड ३
४० तुर्कस्तान ४
४१ युरागवे ४
४२ व्हेनेझुएला. ४

प्रकरण ३९ वें.

राष्ट्रांचीं व्यापारी जहाजें.

वाफेनें चालणारीं जहाजें बांधूं लागल्यापासून जलमार्गानें होणारा व्यापार पूर्वीपेक्षां शतपटीनें वाढला आहे. केवळ वाऱ्यावर हवाला ठेवून शिडें लावून चालणाऱ्या तारवांतून व जहाजांतून चालणारा व्यापार अजूनही बराच चालतो; पण सांप्रत काळीं या कामाचा मोठा वांटा वाफेनें चालणाऱ्या जहाजांस प्राप्त झाला आहे. एकंदर जगांत व्यापाराची ने-आण करणारीं जेवढीं जहाजें आहेत, त्यांपैकीं सुमारें एकतृतीयांश जहाजें ग्रेटब्रिटनचीं आहेत. १०० टनांहून जास्त टन वजनाचीं कोणत्या देशाचीं किती जहाजें आहेत हें पुढील कोष्टकावरून लक्षांत येईल.

देशाचें नांव.	वाफेनें चालणारी जहाजें.	इतर जहाजें.	एकूण टन.
ब्रिटिश	१०,००९	१,२७८	२,०४,३१,५४३
ऑस्ट्रोहंगेरियन	४१९	८	१०,११,४१४
बेलजिअन	१६४	८	१,०४,३८६
डॅनिश	५५२	२१९	७,६२,०५४
डच	६६२	९७	१३,०९,८४९
फ्रेंच	९८७	५६५	२२,०१,१६४
जर्मन	२,०१९	३०२	५०,८२,०६१
ग्रीक	३६५	७७	७,२२,७८२
इटालियन	५९१	५२३	१५,२१,९४२
जपानी	१,०३७	०	१५,००,०१४
नार्वेजिअन	१,५९७	५९४	२४,५७,८९०
पोर्तुगीज	१०५	१०३	१,२०,५७९
रशियन	७१६	५००	९,७४,१७८
स्पॅनिश	५४७	६०	८,४०,९९५
स्वीडिश	१,०४३	३९३	१०,४७,२७०
टार्किश	१३५	१३७	१,५७,२९८
युनायटेड स्टेटसचीं	१,८११	१५२९	५४,२७,६३६

या जहाजांत आकार, गति व वजन या सर्व गोष्टींत मोठीं जहाजें आहेत त्यांचीं नांवें:—

	गांत-नाट.	टन.
	ब्रिटिश.	
एक्विटेनिया	२३	४७,०००
ब्रिटनी	२३	५४,०००
लुसीटनिया	२६॥	३१,५५०
मॉरिटोनिया	२६॥	३१,९३८
ऑलिंपिक	२२	४५,३१४
	फ्रेंच.	
ला फ्रान्स	२३	२३,६६६
	जर्मन.	
अमेरिका	१७॥	२२,६२२
क्रेव्हलंड	२२	३५,०००
इंपरेटर	२२	५२,०००
व्हेटरलंड	२२॥	५८०००

सन १९१३ मध्यें २० नॉटपेक्षां जास्त गतीचीं जहाजें ग्रेटब्रिटनचीं ८, फ्रान्सचीं ४ व इतर देशांचीं ४ याप्रमाणें होतीं.

१९१३ सालच्या मार्च महिन्यांत विलायतेंतील आरमारी खात्यानें कांहीं ब्रिटिश जहाजांवर, परकी सशस्त्र व्यापारी जहाजांनीं हल्ला करूं नये या उद्देशानें, तोफा ठेवण्याची व्यवस्था केली. त्याप्रमाणें कांहीं जहाजांवर त्या वेळेपासून तोफा ठेवण्यांत आलेल्या आहेत, व त्या तोफांवर काम करण्यासाठीं गोलंदाज वगैरेही ठेवण्यांत आले आहेत. सांप्रत सुरक्षिततेसाठीं व्यापारी जहाजांवर विशेष बंदोबस्त ठेवण्यांत आला असेल हें साहाजिक आहे.

प्रकरण ४० वें.

लढाईचा खर्च.

सांप्रतच्या युद्धांत रणदेवीच्या भक्ष्यस्थानीं जितका पैसा पडेल तितका पूर्वी कोणत्याही युद्धांत पडला नसेल. या युद्धानें प्रत्येक देशाच्या सांपत्तिक स्थितीवर पराकाष्ठेचा ताण आणलेला आहे. सांप्रतच्या युद्धास एकंदर किती खर्च लागेल याचा अंदाज करणें फार कठीण आहे. कारण हें युद्ध केव्हां आटपेल याचा कांहींच अंदाज करितां येत नाहीं. युद्धाचा आरंभ झाला

त्या वेळीं प्रसिद्ध झालेल्या एका पुस्तकांत त्या ग्रंथकारानें असें म्हटलें आहे कीं, सुदैवानें ही लढाई जर अल्पकालावधीची झाली व थोड्याच महिन्यांत फ्रँको-प्रशियन लढाईप्रमाणें या युद्धाचा उपशम झाला, तर अर्थशास्त्रवेत्त्यांच्या अंजाप्रमाणें १९१४ सालचे अखेरीपर्यंत ७,९०,००,००,००० रुपये खर्च येईल. पण १९१४ सालाबरोबर या लढाईचीही अखेर न होतां पुढें चालू सालांत म्हणजे १९१५ त दुर्दैवानें ही लढाई जर चालू राहिली, तर प्रत्यक्ष लढाईचा खर्च दर दिवसास कमींत कमी ४५,००,००० पौंड येईल.

वरील आंकडे अर्थातच रणांगणावर अमुक सैन्य गेलें आहे असें गृहीत धरून मांडलेले आहेत. नुसत्या जमिनीवरील युद्धासाठीं सर्व राष्ट्रांचे मिळून ८९ लक्ष लोक गुंतले असावे, असा अंदाज आहे. यांत आणखी आरमारापैकीं ३,४०,००० लोकांची भर घातली पाहिजे. या लोकांस किती खर्च येतो याचा, अगदीं अलिकडील जी बाल्कन लढाई तिच्यावरून, अंदाज करावयाचा म्हणजे लढाईस तयार केलेल्या प्रत्येक इसमास दर दिवसाचा १० शिलिंग खर्च येतो. याशिवाय दारूगोळ्याचा वगैरे खर्च वेगळाच. या हिशोबाप्रमाणें रोजचा खर्च ४४,००,००० पौंड झाला. यांत सैन्य व आरमार यांच्या तयारीचा खर्च धरलेला नाहीं. ही गोष्ट लक्षांत धरली पाहिजे. हा खर्च किती लागेल हें युद्धाच्या कालावर व प्रकारावर अवलंबून राहणार.

रणमैदानावर दारूगोळ्यास किती खर्च येतो याविषयींचींहीं कांहीं अनुमानें बांधलेलीं आहेत. पलटणींतील साधारण बंदुकीच्या एका काडतुसास सुमारें अर्धा आणा खर्च येतो. दररोज रणक्षेत्रावर २० लक्ष फौज लढत आहे व आठवड्यांतून दोनदा त्यापैकीं प्रत्येकाची आपापल्या शत्रूशीं गांठ पडत आहे व प्रत्येक शिपाई १०० गोळ्या सोडीत आहे, अशी कल्पना केली तर आठवड्यास सुमारें १० लक्ष पौंडांचा दारुगोळा पाहिजे. आतां तोफखान्याच्या दारुगोळ्यास किती खर्च येतो याचा अंदाज करणें याहूनही कठीण आहे. असें म्हणतात कीं, जर्मनीपाशीं दोन्ही सरहद्दी मिळून प्रत्यक्ष रणमैदानांत २००० तोफा आहेत, व आणखी तेवढ्याच त्यानें आपल्या सरहद्दीवरील किल्ल्यांवर रोखून ठेविल्या आहेत. इतक्याच तोफा संयुक्त सैन्यांपाशीं आहेत, व त्यांपैकीं निम्मे तोफा आठवड्यांतून एकदां एकमेकांवर सरबत्ती करितात, असें मानलें तर, प्रत्येक सरबत्तीस १० पौंड खर्च लागेल व या हिशेबानें २०,००,००० पौंड आठवड्याचा

खर्च झाला. यांत दाणापाणी, चामड्याचें साहित्य व लढाईस लागणारें इतर सामान वगैरे गोष्टींत होणारी मोडतोड व खर्च यांची रक्कम मिळविली तर प्रत्यक्ष शिपयांस लागणारा खर्च सोडून देतां केवळ लढाऊ सामानाचाच खर्च दर दिवसास क्वचित् कमींत कमी १,५०,००,००० रुपये लागला पाहिजे.

ही गोष्ट जमिनीवरील लढाईची झाली. समुद्रांतील लढाईचा असा अंदाज कांहींच सांगतां येत नाहीं. कारण याची माहिती गुप्त ठेविलेली आहे. ज्या कांहीं कल्पना प्रसिद्ध झाल्या आहेत, त्यांपैकीं एक कल्पना अशी आहे कीं, सर्वांत मोठ्या तोफेंतून फक्त एक वेळाच सरबत्ती करण्यास कमींत कमी ८ शें पौंड खर्च येतो, व ६ इंचाची तोफ असल्यास २०० पौंड येतो. याशिवाय दुर्दैवानें लढाऊ जहाजांचें नुकसान झाल्यास किती तोटा होत असेल याचा अंदाजही करितां येणार नाहीं.

पैसा हा लढाईचा जीव आहे, असें विधान पुष्कळजण करितात, पण इतिहासांतून अशीं अनेक उदाहरणें दाखवितां येतील कीं, पैशाच्या तोट्यामुळें लढाई थांबली किंवा लढाईचा प्रसंग टळला असें क्वचित्च झालें आहे, राष्ट्रांतील सांपत्तिक रक्त शोषून गेलेलें असलें व लोकांस उदरनिर्वाहाचा उद्योग मिळेनासा झाला कीं, उपाशीं मरण्यापेक्षां लढण्यास मनुष्य तयार होतो. आतां ज्या देशांत शेतीचा मोठा धंदा चालतो ते देश अर्थात्च व्यापारी किंवा उद्योगधंदे चालतात अशा देशांपेक्षां जास्त दिवस टिकाव काढतात.

सध्यांच्या लढाईच्या खर्चासंबंधानें निरनिराळ्या ग्रंथकारांचे निरनिराळे अंदाज आहेत. एक फ्रेंच ग्रंथकार म्हणतो कीं, ऑस्ट्रियन सैन्याचा रोज खर्च ८,२०,००० पौंड असला पाहिजे, व रणांगणांतील सर्व सैन्याचा रोजचा खर्च कमींत कमी १४,५०,००० असला पाहिजे.

जर्मन लेखकांच्या मताप्रमाणें एका शिपायाचा एक दिवसाचा खर्च ६ शिलिंग असावा. या हिशेबाप्रमाणें त्यांची २५ लाख फौज रोज रणांत लढत आहे, असें मानलें तर त्यांस रोजचा ७,५०,००० खर्च होत असावा.

प्रकरण ४१ वें.

यूरोपांतील राष्ट्राधिपति व त्यांचीं परस्परांशीं नातीं.

बादशहा पांचवे जॉर्ज.

ह्यांचा जन्म ता० ३ जून १८३५ रोजीं लंडन शहरीं झाला; व विवाह ता० ६ जूलै १८९३ रोजीं प्रिन्सेस मेरी ऑफ् टेक ह्यांच्याशीं झाला. आमच्या बादशहांस पांच पुत्र व एक कन्या आहे. आमचे बादशहा हे महाराणी व्हिक्टोरिया ह्यांच्या मुलांचे (बादशहा सातवे एडवर्ड ह्यांचे) मुलगे व कैसर हे मुलीचे मुलगे असल्यामुळें या उभय राजपुरुषांचें परस्परांशीं आतेभाऊ—मामेभावांचें नातें आहे. आमच्या बादशहांचा यूरोपांतील प्रत्येक दरबारांत नात्याचा संबंध असून सांप्रतच्या लढाईशीं संबंध येणाऱ्या सर्व राजघराण्यांशीं त्यांचें नातें आहे.

कैसर दुसरे विल्यिम.

ह्यांचा जन्म १८५० त झाला असून १८८८ त हे जर्मनीच्या गादीवर बसले. स्लेशविग्–हॉलस्टीनची राजकन्या ऑगस्टा हिच्याशीं ह्यांचा विवाह झाला असून ह्यांस सहा पुत्र व एक कन्या आहे.

दुसरे निकोलस.

रशियाचे झार. ह्यांचा जन्म १८६८ सालीं झाला; व १८९४ त हे गादीवर आले. याच वर्षीं राजकन्या अलाइस हिच्याशीं यांचा विवाह झाला. आमच्या बादशहांच्या माता अलेक्झांड्रा महाराणी व झारसाहेबांच्या माता ह्या बहिणी होत. ह्यांस एक पुत्र व ४ कन्या आहेत.

तिसरे व्हिक्टर इमान्युएल.

इटलीचे राजे. ह्यांचा जन्म १८६९ त झाला. ह्यांचे वडील किंग हंबर्ट ह्यांचा १९०० सालीं खून झाला. ह्यांचा विवाह १८९६ सालीं मॉंटिनीग्रोची राजकन्या हेलेन हिच्याशीं झाला असून या राजकन्येचें नातें सर्व्हिया, रशिया व इंग्लंड येथील राजघराण्यांशीं आहे. ह्यांस एक मुलगा व तीन मुली आहेत.

पहिले आल्बर्ट.

बेल्जमचे राजे यांचा जन्म १८७५ सालीं झाला; व १९०९ सालीं हे गादीवर आले. यांचे चुलते हे महाराणी व्हिक्टोरिया यांचे मामेभाऊ होत. ह्यांची आई ही होहेनझोलर्न घराण्यापैकीं असून कैसर हे त्याच घराण्यांतील आहेत. यांचा विवाह १९०० सालीं बव्हेरियाची जर्मन राजकन्या इलिझाबेथ हिच्याशीं झाला. ह्यांस दोन पुत्र व एक कन्या आहे.

पहिले निकोलस.

मॉंटेनीग्रोचे राजे, ह्यांचा जन्म १८४१ त झाला. ह्यांचा विवाह १८६० त राजकन्या मिलेना व्हुकोटिच हिच्याशीं झाला. ह्यांस तीन पुत्र व सहा कन्या आहेत; पैकीं दोन कन्या रशियन घराण्यांत दिल्या आहेत; व एक इटालीच्या राजेसाहेबांस दिली आहे. चवथी कन्या बॅटेनबर्गचे प्रिन्स फ्रॅन्सिस ह्यांस दिली असून या विवाहामुळें या राजघराण्याचें इंग्लंडच्या घराण्याशीं नातें जमून आलें आहे.

पहिले पिटर.

सर्व्हियाचे राजे. यांचा जन्म १८४४ सालीं झाला; व १९०३ सालीं हे गादीवर आले. १९८८ त मॉंटेनीग्रोची राजकन्या झोरका हिच्याशीं ह्यांचा विवाह झाला. या राणीचें व इटलीच्या राणीचें नातें आहे. ह्यांस दोन पुत्र व एक कन्या आहे. ही राजकन्या रशियाचे प्रिन्स जिन यांस दिली आहे.

बादशहा फ्रान्सिस जोसफ.

ऑस्ट्रियाचे बादशहा. ह्यांचा जन्म १८३० त झाला; व १८४८ त हे गादीवर आले. ह्यांचा विवाह बव्हेरियाची राजकन्या इलिझाबेथ हिच्याशीं १८५४ सालीं झाला. ह्यांस एक मुलगा होता; त्याचा विवाह एका बेल्जन राजकन्येशीं झाला होता. ह्यांच्या दोन कन्यांपैकीं एक कन्या बव्हेरियन राजपुत्रास दिली असून या संबंधामुळें बेल्जमच्या राणीशीं नातें जोडलें गेलें.

प्रकरण ४२ वें.

पारिभाषिक शब्दांचा कोश.

अॅड्व्हान्स गार्ड—यांत सुमारें $\frac{1}{8}$ पासून $\frac{1}{6}$ सैन्यांतील लोक असतात. शत्रूकडील बातमी आणणें व मुख्य फौजेची हालचाल कळूं न देणें हीं कामें करण्यासाठीं या फौजेची योजना होते. मुख्य फौजेपुढील हा एक पडदाच असतो.

अॅथ्रासाइट—साऊथ वेल्समध्यें सांपडणारा एक प्रकारचा बिनधुराचा कोळसा. हा कोळसा आरमारांत वापरतात.

आर्माकोर—याचे बहुधा दोन भाग असतात, त्यास 'डिव्हिजन' असें म्हणतात. मोहिमेंत आणखी एक नवीन भागही जोडण्यांत येतो. जर्मन व फ्रेंच आर्माकोरहून ब्रिटिश कोर लहान असतें. जर्मन व फ्रेंच आर्मी कोरांत ४०,००० सैनिक असतात. ब्रिटिश कोरांत ३० पासून ४० हजारपर्यंत सैनिक असतात.

आर्टिलरी—तोफखाना. याच्या भागांस 'बॅटरी' असें म्हणतात; व त्यांचे, (१) हॉर्स, (२) फील्ड हाविट्झर व (३) गॅरिझन असे तीन भाग असतात. एका हॉर्स आर्टिलरी ब्रिगेडमध्यें दोन बॅटरी व दारुगोळ्याचा सांठा आणि सहा तोफा (सुमारें ६७० माणसें व ७५० घोडे) असतात. यांतील तोफांच्या गोळ्यांचें वजन १३ रत्तल असतें. दुसऱ्या प्रकारच्या ब्रिगेडमध्यें तीन बॅटरी, दारूगोळा व सहा तोफा (७९० माणसें व ७०० घोडे) असतात. यांत $18\frac{1}{2}$ रतलांचा गोळा वापरतात. गॅरिझन भागांत, ज्या किल्ल्यावर हल्ला करावयाचा त्याप्रमाणें माणसें व तोफा असतात.

अॅड्ज्यूटंट—सैन्यांतील मुख्य अंमलदारास मदत करणारा कामदार. मुख्यत्वेंकरून कवाईत व शिस्त यांची जबाबदारी त्याजवर असते.

अॅड्मिरल—आरमारांतील एक मुख्य कामगार. यांत ४ जागा असतात. (१) अॅड्मिरल ऑफ् धी फ्लीट (पगार २११० पौंड), (२) अॅड्मिरल १८२५ पौंड), (३) व्हाइस-अॅड्मिरल (१४६० पौंड), व (४) रीअर अॅड्मिरल (१०९५ पौंड). अॅड्मिरलच्या हाताखालीं आरमारी सैन्याचा मुख्य भाग किंवा जहाजांचा एक काफिला असतो.

अॅड्मिरॅल्टी—ब्रिटिश आरमाराच्या कामकाजाची मुख्य कचेरी. हिच्यावर मुख्य अंमलदार मि० विन्स्टन चर्चिल हे आहेत.

ऑर्डर्ली—नित्याच्या कामकाजावर ठेवलेला शिपाई.

इन्फंट्री—पायदळ. घोड्यावर बसणाऱ्या पायदळास 'माउंटेड इन्फंट्री' असें म्हणतात; व त्यांस दोन्ही तऱ्हेनें लढण्यास शिकविलेलें असतें. इन्फंट्रीच्या एका कंपनींत १२०

माणसें असतात. ८ कंपन्या म्हणजे बटॅलियन; ४ बटॅलियन म्हणजे एक ब्रिगेड. एका इनफंट्री डिव्हिजनमध्यें १८,००० माणसें, ८० तोफा व ६,००० घोडे असतात. यांत केवळ युद्ध करणारी माणसें असतात. दोन इन्फंट्री डिव्हिजनचें एक आर्मीकोर होतें.

ए. डी. सी.—मुख्य अंमलदाराच्या हाताखालीं रोजच्या कामांत मदत करणारा कामगार.

कॅव्हलरी:—घोडेस्वार. यांच्या एका ट्रूपमध्यें ३० पासून ५० पर्यंत माणसें असतात. ४ ट्रूप्स=१ स्क्वॉड्रन (१५० माणसें). याच्यावरील अंमलदारास 'मेजर' असें म्हणतात. ३ स्क्वॉड्रन व मशीन तोफ मिळून एक कॅव्हल्री रेजिमेंट होतें, आणि अशा तीन रेजिमेंटची एक ब्रिगेड होते. ब्रिगेड एकटींच मोहिमेवर जाते, तेव्हां तिच्याबरोबर इंजिनीयर व हॉर्स आर्टिलरी असते. ४ ब्रिगेड, २ हॉर्स आर्टिलरी ब्रिगेड, ४ इंजिनिअर ट्रूप व इतर किरकोळ कामाचीं माणसें मिळून एक कॅव्हलरी डिव्हिजन होतें. यांत ८३०० घोडेस्वार व बऱ्याच मोटारगाड्या असतात. यांत निव्वळ लढाऊ फौज ७,०००.

कमांडर:—(आरमारांतील) लेफ्टेनंट व कॅपटन यांच्यामधील अंमलदार.

कमांडर-इन्-चीफ्—लष्करांतील सर्वांत मोठा अधिकारी. याच्यावरील अधिकारी म्हटला म्हणजे युद्धखात्याचा स्टेट सेक्रेटरी हा होय.

कमोडोर—(आरमारांतील) काफिल्यावरील एक मुख्य अधिकारी. ॲड्मिरल नसल्यास त्याचें काम हा अधिकारी करितो.

कॅप्टन—ब्रिटिश आरमारांत लढाऊ जहाजावरील एक अंमलदार. याच्या हाताखालीं कमींत कमी २० तोफा आतात. लष्करांतील कॅप्टनच्या हाताखालीं पायदळाची एक कंपनी किंवा घोडेस्वाराचें एक ट्रूप किंवा तोफखान्याची एक बॅटरी असते. हा लेफ्टेनंटच्या खालचा अंमलदार असतो.

कर्नल—रेजिमेंटवरील मुख्य अंमलदार. ही जागा जनरल व मेजर यांच्यामधील आहे.

कमांडर—किल्ला, लष्कराचें ठाणें किंवा लष्करी शाळा याजवरील अंमलदारास हें नांव देतात.

कमिसरिएट—लष्कराबरोबर धान्य व वैरण वगैरेचा पुरवठा घेऊन जाणारें खातें. एका आर्मी कोरबरोबर कमिसरिएटच्या १२ कंपन्या असतात.

कमिशन - सैन्यांतील अंमलदारास अधिकाराची अंमलबजावणी करण्यासाठीं राजाच्या नांवानें दिलेला लेखी हुकूम.

कंपनी—सुमारें १०० शिपायांची तुकडी.

कॉर्पोरल—पायदळांतील सर्वांत खालचा कामदार. याचा पगार दिवसाचा १ शिलिंग ९ पेन्सपासून २ शिलिंग ८ पेन्सपर्यंत असतो.

काशा—रशियन फौजेंतील लोक एक प्रकारची पेज तयार करून खातात ती.

किलोमिटर—यूरोपखंडांतील लांबी मोजण्याचें एक माप. ९३० यार्ड (सुमारें $\frac{3}{5}$ मैल). १ हजार मिटर=१ किलोमिटर. ३९·३=१ मिटर.

कोसॅक—तुर्कस्तान, पोलंद व दक्षिण सैबेरिया यांच्या सरहद्दीजवळील प्रांतांत राहणारे लोक. हे लोक स्वतंत्र जातीचे आहेत, अशी जी समजूत आहे; ती चुकीची आहे. लष्करांत चाकरी करावी, याच अटीवर यांस जमिनी लावून दिल्या आहेत. प्रत्येक कोसॅकला आपला घोडा, पोषाक वगैरे ठेवावा लागतो. फक्त शस्त्रें तेवढीं सरकार देतें; व कवाईत सरकार शिकवितें. युद्धाच्या प्रसंगीं दहा कोसॅक प्रांतांतून ८९० कॅव्हल्री व स्क्वॉड्रन (प्रत्येक १२५ माणसांची), १०८ पायदळ तुकड्या (प्रत्येक १२५ माणसांची) तयार होतात. एकंदर कोसॅक शिपायांचें दळ १,८०,००० माणसें, १,७०,००० घोडे व २४० तोफा इतकें आहे. जगांतील अति उत्तम घोडेस्वारांत यांची गणना होते. हे रानटी लोक असावेत, अशी साधारण लोकसमजूत आहे; व कवींनींही त्यांची अशीच कीर्ति गाइली आहे; पण हे लोक मोठे उद्योगी असून, रशियांतील इतर लोकांपेक्षां अधिक शिकलेलेही आहेत.

कोपेक—रशियांतील एक नाणें. १०० कोपेक म्हणजे १ रुबल (रुप्याचा). एका रुबलची किंमत सुमारें २ शिलिंग १० पेन्स असते.

क्रोन—ऑस्ट्रियांतील रुप्याचें एक नाणें. किंमत १० पेन्स. १०० हेलर म्हणजे १ क्रोन.

क्रूझर—जलद जातीचें लढाऊ जहाज. यांचे अनेक वर्ग असून त्यांपैकीं कांहीं कवच चढविलेलीं व कांहीं बिन कवचवालीं असतात.

गार्ड ब्रिटिश सैन्यांतील ३ रेजिमेंटास हें नांव आहे.

गुल्डेन—हॉलंडांतील रुप्याचें नाणें. यास 'फ्लोरिन' असेंही म्हणतात. किंमत सुमारें १ शिलिंग ७$\frac{3}{4}$ पेन्स.

जनरल—सैन्यांतील फील्ड मार्शलच्या हाताखालचा अंमलदार. याच्या हाताखालीं लेफ्टेनंट जनरल, मेजर जनरल आणि ब्रिगेडियर-जनरल असे अंमलदार असतात.

जिनीव्हा कन्व्हेन्शन्—लढाईत जखमी झालेल्या लोकांच्या शुश्रूषेची व्यवस्था करण्यासाठीं १२ देशांच्या सहीनें १८६४त झालेला करार. या कराराची दुरुस्ती १९०६ मध्यें होऊन हेग कनव्हेन्शनकडून तो मान्य करण्यांत आला आहे.

झूवेज--अलजीरिया व उत्तर आफ्रिका यांत कामगिरी करण्यासाठीं तयार झालेलें गोरें सैन्य.

टर्को--अलजीरियामधील फ्रेंच सैन्य. यांत सर्व आरब आहेत.

टार्पेडो—लढाऊ गलबत फोडण्याकरितां स्फोटकारक द्रव्यें भरून तयार केलेलें एक अणकुचीदार लांबट नळीच्या आकाराचें शस्त्र. हें टार्पेडो बांडीवरील नळींतून सोडतात.

डमडम बुलेट—एक प्रकारची गोळी. ह्या गोळ्या अंगांत शिरल्यावर फुटून पसरत जातात हेग कन्व्हेन्शननें ह्या गोळ्या वापरण्याची मनाई केली आहे.

डिक्लेरेशन ऑफ् लंडन-१९०८-९ सालीं हीं कलमांची यादी तयार होऊन त्याअन्वयें आरमारी युद्धाचे कायदे ठरविण्यांत आले. ही यादी पुढील राष्ट्रांस मान्य आहे, असें मानण्यांत आलें आहे. ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, हॉलंड, ऑस्ट्रिया, हंगारी, इटली, जपान, रशिया, स्पेन आणि युनायटेड स्टेट्स. 'हौस ऑफ लॉर्डस' नें यास संमति न दिल्यामुळें यास तहाचें स्वरूप आलेलें नाहीं.

डयूकेट—एक सोन्याचें डच नाणें. याची किंमत १० गुल्डेनबरोबर आहे.

दिनार--सर्व्हियांतील एक रुप्याचें नाणें, याची व फ्रँकची किंमत सारखी आहे.

नॉट—जहाजांची गति मोजण्याचें माप. २५ नॉट गतीचें जहाज म्हणजे एका तासांत २५ नॉटिकल मैल चालणारें जहाज. १ नॉटिकल=६०८० फूट. अगदीं अतिजलद ड्रेडनॉटची गति तासास २५ मैल असते. अतिचपल टॉर्पेडो बोट डिस्ट्रॉयरची गति ३० किंवा त्याहून अधिक नॉट असते. २० नॉट=२३ मैल.

पेट्रोल:--२० घोडेस्वारांची तुकडी.

पारिस्कोप:--सबमरीनवर असणारी वरील टोंकास दुर्बिणीचीं भिंगें बसविलेली कांच नळी. हिच्यांतून सबमरीनवरील अंमलदार पाण्याच्या पृष्ठभागाची पाहणी व शत्रूची टेहळणी करितात.

पारीस:—सर्व्हियांतील एक तांब्याचें लहान नाणें. हें फ्रेंचांच्या सेंटाइमबरोबर असतें

पर्पर—मॉंटेनीग्रोमधील एक रुप्याचें नाणें. हें ऑस्ट्रियन क्रोनबरोबर असतें.

फ्रँक- फ्रेंचांचें हें एक रुप्याचें नाणें, किंमत सुमारें १० पेन्स. १०० सेंटाइमबरोबर एक फ्रँक.

फील्डगन: -हिच्यांत १५ रत्तल दारू भरतात. कामास ही फार जलद असते व मारा साडेसहा हजार यार्डांपासून १० हजार यार्डांचा असतो.

फ्लोरिन--हें एक डच नाणें आहें. गुल्डेनचें दुसरें नांव.

बटॅलियन--लढाईच्यावेळीं पायदळाची १,००० शिपायांची तुकडी. बटॅलियनवरील अंमलदारास 'लेफ्टेनंट कर्नल' असें म्हणतात.

बर्गोमास्टर—जर्मनी, बेल्जम वगैरे देशांतील शहरांमधील चीफ मॅजिस्ट्रेट. बिलावतेंत अशा अधिकाऱ्यास 'मेयॉर' व फ्रान्समध्यें मेयर असें म्हणतात.

बॉय स्कॉउट्स्—ही संस्था मूळ मेजर जनरल सर रॉबर्ट बेडन पॉवेल यांनीं विलायतेंत स्थापन केली; व आतां तिचा सर्व जगांत प्रसार झाला आहे. हिच्यांतील मूळ कल्पना प्रत्येकानें रोज एक तरी चांगलें कृत्य करावें, अशी आहे. हें लष्करी खात्यापैकीं खातें नाहीं, पण सांप्रत सरकारानें यांतील तरुण मुलांस नोकरीवर घेऊन त्यांजकडे वातम्या पोंचविण्याची वगैरे कामें सोंपविलीं आहेत.

मशीनगन--तोफखान्यामधील व बंदुकीसारखें गोळीबाराचें यंत्र. यांतून बंदुकी सारखींच काडतुसें सोडतात.

मार्क--जर्मन रुप्याचें नाणें. किंमत अदमासें १ शिलिंग. १०० पेनी म्हणजे १ मार्क.

मिट्रल्यूज--फ्रेंचांची मशीनगन. हिच्यांतून फार जलद गोळ्यांचा वर्षाव होतो.

मेजर--सैन्यांतील खालच्या दर्जाचा एक अंमलदार.

यूलन—जर्मन सैन्यांतील घोडेस्वारांची एक पलटण. यांच्याजवळ भाले असतात.

रिचेस्टा--जर्मनीचें पार्लमेंट.

रुबल--रशियांतील एक रुप्याचें नाणें. किंमत २ शिलिंग १ $\frac{1}{3}$ पेन्स. १०० कोपेक = १ रुबल.

रेड क्रॉस सोसायटी—रणांगणांत जखमी झालेल्या लोकांची शुश्रूषा करणारी मंडळी. हिचे सुमारें ६०,००० सभासद आहेत; व तिच्या अनेक शाखा आहेत.

लीरा—इटलींतील एक रुप्याचें नाणें. किंमत एक फ्रेंच फ्रँक. १०० सेंटिसेमि= १ लीरा.

श्रापूनेल--लहान गोळ्यांनीं भरलेला मोठा गोळा. ज्या जनरलनें हा गोळा प्रथम तयार केला, त्याचेंच नांव यास पुढें पडलें.

सबमरीन—पाण्यांतून किंवा पाण्यावरून दोन्ही तऱ्हेनें चालणारी बोट. लढाईंत शत्रूचें लढाऊ जहाज फोडण्याचें काम ही करतें. फ्रेंचांच्या सबमरीनबोटी फार चांगल्या आहेत, असें म्हणतात.

सीज गन—फार मोठ्या तोफा. अति बळकट किल्ले पाडण्यासाठीं यांचा उपयोग करितात. या ओढण्यास ३२ घोडे लागतात.

सेंट जॉन अँब्युलन्स ब्रिगेड—इजा झालेल्यांस तात्कालिक मदत करणारी मंडळी. हिचे ४ हजारांवर सभासद आहेत.

हाविट्झर—एक जलद काम करणारी, वजनास हलकी अशी छोटी तोफ.

हायड्रोप्लेन—पाण्यांत व पाण्यावरून चालण्यासाठीं तयार केलेलीं विमानें.

व्हिक्टोरिया क्रॉस—विशेष शौर्य दाखविणाऱ्यास देण्यांत येणारा बहुमानाचा बिल्ला. हा प्रथम १८५६ सालांत देण्यास सुरुवात झाली.

प्रकरण ४३ वें.

युद्धाशीं संबंध आलेल्या थोर पुरुषांचा कोश.

ॲडलबर्ग—जर्मनीच्या कैसरचे पुतणे.

ॲडेर—जनरल सर डब्ल्यू. पी., के. सी. बी.-रॉयल मरीन लाईट इनफंट्रीवरचे मुख्य अधिकारी.

ॲलेनबी—मेजर जनरल. क्याव्हलरी डिव्हिजनवर हे मुख्य आहेत. यांचा जन्म १८६१ त झाला असून १८८४ त त्यांनीं लष्करांत नोकरी धरिली.

अलेक्झांडर—सर्व्हियाच्या लष्कराचे सेनापती. जन्म १८८८. किंगपीटर यांचे हे द्वितीय पुत्र असून पुढें हेच गादीवर बसणार. कुमानोहो येथें तुर्कांबरोबर झालेल्या युद्धांत यांनीं चांगला पराक्रम गाजविला होता.

आलबर्ट—बादशहा पांचवे जार्ज यांचे पुतणे. यांचें वय १९ वर्षांचें असून लढाऊ जहाज कॉलिंगवुड यावर हे मिडशिपमन आहेत.

आलबर्ट—बेलजमचे राजे. यांचा जन्म १८७५ त झाला असून १७ दिसेंबर १९०९ रोजीं ते गादीवर आले. यांस दोन मुलगे आहेत.

आस्किथ—ब्रिटिश साम्राज्याचे मुख्य प्रधान. जन्म ता. १२ सप्तेंबर १८५२ रोजीं झाला. शिक्षण आक्सफर्ड येथील कॉलेजांत झालें. १८७६ पासून लंडन-मध्यें बॅरिस्टरचें काम करूं लागले. १८८६ त पार्लमेंटचे सभासद निवडून आले, व १९०८ पासून हे मुख्य प्रधानाच्या जागेवर आहेत.

इसिक—जनरल व्हान. यांचा जन्म १८४८ त झाला असून १८७० सालच्या युद्धांत हे लढाईवर गेले होते. लिएज येथें झालेल्या लढाईंत हे सैन्याचे मुख्य अधिपति होते.

ऍडॉक—रीयर ॲडमिरल सर. आरमारखात्यांतील एका काफल्याचरील अधिकारी. १९०० सालांत हे चीनमधील लढाईंत होते.

क्यांबेल—रीयर ॲडमिरल. आरमारखात्यातील अधिकारी. जन्म १८६५ मध्यें. १९०५-६ सालांत प्रिन्स व प्रिन्सेस ऑफ वेल्स यांच्या स्वाऱ्या हिंदुस्थानांत आल्या, त्या वेळीं त्यांजबरोबरील टोरिव्ह्यू जहाजावर हे अधिकारी होते.

क्यास्टेलनो—जनरल. जनरल जाफ्रे यांच्या हाताखालील अधिकारी. वय ६२. फ्रँकोजर्मन-युद्धांत यांनीं पराक्रम गाजविला होता. उत्तम व चतुर लढवय्ये अशी यांची यूरोपखंडांत मोठी ख्याती आहे.

कॉड्रिंग्टन--लेफ. जनरल सर ऑलफ्रेड. युद्धाचे आरंभीं ब्रिटिश वॉर कौन्सिलचे सभासद म्हणून यांस नेमण्यांत आलें.

किचनेर:—फील्ड मार्शल अर्ल--ह्यांचा जन्म १८५१ त झाला असून, ह्यांनीं आपला सर्व जन्म लष्करास अर्पण केला आहे. हे अविवाहित आहेत. ह्यांची शिस्त फार कडक असून योजलेला बेत सिद्धीस नेण्यांत ह्यांनीं स्वत:च्या सौख्याकडे कधींही लक्ष्य दिलें नाहीं. सैन्य व लोक या उभयतांतही यांच्यासंबंधानें अत्यंत आदर वसत आहे. लष्करांत अनेक मोठमोठ्या जागांवर यांनीं जबाबदारीचीं कामें केलीं आहेत. लॉर्ड रॉबर्ट यांच्या हाताखालीं हे 'चीफ् ऑफ् स्टाफ' या हुद्द्यावर होते. बोअर युद्ध चांगल्या रीतीनें निकालास आणल्याचें श्रेय ह्यांस आहे. हिंदुस्थानांत सेनापतीच्या जागीं ह्यांची योजना झाल्यावर इकडील सैन्यांत त्यांनीं पुष्कळ सुधारणा केली. सध्यांच्या सेक्रेटरीच्या जागीं ह्यांची नेमणूक झालेली पाहून, सर्वांस संतोष व समाधान वाटलें. ह्यांचीं मोठीं चरित्रें प्रसिद्ध झालीं असून तीं वाचनीय आहेत.

केज:—कमोडोर-हेलिगोलँडजवळ झालेल्या समुद्रांतील चकमकींत हे ॲड्मिरल पदी ह्यांच्या हाताखालीं होते.

केन्सिंग्टन:—बॅरन-जन्म १८७३ त झाला. सध्यांच्या मोहिमेंत वेल्समधील स्वयंसैनिकाबरोबर हे गेले आहेत.

कोएस्टर:—हॅन्स लड्विक रेमेड व्हॉन-' जर्मन नेव्ही लीग'चे अध्यक्ष. वय ७०. ह्या लीगमध्यें १० लक्ष सभासद आहेत.

कोवेझ—मेजर जनरल सर. वय ५२. ब्रिटिश-सैन्याच्या हालचालीवरील हे एक व्यवस्थापक आहेत.

गुडेनो, कमोडोर—हे ब्रिटिश आरमारांतील एक अधिकारी असून, ता. २८ ऑगस्ट १९१४ रोजीं हेलिगोलँडजवळ जें समुद्रयुद्ध झालें, त्यांत होते.

ग्युबिन्स, सर्जन जनरल सर—हे ब्रिटिश-सैन्यांतील मेडिकल सर्व्हिसचे डायरेक्टर जनरल आहेत.

गॅबल,—व्हाइस ॲडमिरल सर डौग्लस—ब्रिटिश आरमारांतील एका काफिल्यावर हे अधिकारी असून. ड्रेडनॉट नामक जहाजावर ह्यांचें निशाण आहे. वय ५७. १८७१ त हे आरमारांत शिरले.

गॉल्ट,—हॅमिल्टन—कॅनडामधील मॉंट्रीलच्या ह्या श्रीमंत गृहस्थांनीं स्वत:च्या खर्चानें एक पलटण तयार केली आहे.

गॉफिनेट, बॅरन--बेल्जमचे राजे आलबर्ट ह्यांचे हे ए. डी. सी. आहेत.

गॉश्चेन, राइट ऑनरेबल सर विल्हेलियम एडवर्ड--युद्धाच्या पूर्वी बर्लिनच्या दरबारांत हे ब्रिटिशांचे वकील होते. वय ६७

गौड्नर, जनरल--लीएज येथील किल्ल्यांच्या संरक्षणार्थ ठेवलेले एक कामगार.

गोघ, कॅलथॉर्प--रीअर ॲडमिरल, ब्रिटिश आरमारांतील एक अधिकारी. टॉर्पेडो-संबंधाच्या माहितींत हे निष्णात आहेत. ह्यांनीं अनेक लढायांत कामें केलीं आहेत. वय ५०.

ग्रँट:—रीअर ॲडमिरल वुइलियम-ब्रिटिश आरमारखात्यांतील हे एक अधिकारी असून ड्रेक जहाजावर ह्यांचा बावटा आहे.

ग्रीअरसन,—लेफ्टेनेंट जनरल सर जेम्स—हे दुसऱ्या ब्रिटिश आर्मीकोरवर अधिकारी होते. यूरोपांतील लष्करावर ह्यांनीं कैक ग्रंथ लिहिले आहेत. हे फ्रान्स-मध्यें १७ ॲगस्ट १९१४ रोजीं मरण पावले.

चार्चिल—राईट ऑनरेबल विन्स्टन. वय ४०. एकोणीसाव्या वर्षीं यांनीं सैनिकाच्या धंद्याची दीक्षा घेऊन क्यूबा, हिंदुस्थान, सौडन येथें काम केलें. बोअरलढाईच्या वेळीं बोअर लोकांनीं यांस पकडलें असतां त्यांच्या हातून हे मोठ्या चातुर्यानें निसटून गेले. ब्रिटिश-प्रधान-मंडळांत यांनीं अनेक जागांवर कामें केलीं आहेत. सध्या हे फर्स्ट लॉर्ड ऑफ धी एडमिरल्टी या हुद्यावर आहेत.

चेंबरलेन--राइट ऑनरेबल ऑस्टिन. हें मरहूम जोसेफ चेंबरलेन यांचे पुत्र. हे पूर्वी चॅन्सिलर ऑफ धी एक्सचीकर या जागेवर होते.

जॉर्ज,—प्रशियाचे राजपुत्र—जर्मनीच्या कैसरचे हे पुतणे असून, लढाईच्या आरंभींच्या दिवसांत ह्यांस पकडल्याची बातमी आली होती.

जँकोव्हिक:—जनरल-सर्व्हियाच्या सैन्यांतील एक प्रमुख अधिकारी.

जॅक्सन:—व्हाइस ॲडमिरल सर. हे १९१२ पासून 'चीफ ऑफ् धि वॉर स्टाफ' ह्या हुद्द्यावर आहेत. आरामारखात्यांत साहित्याची वगैरे रचना करण्यांत हे फार कुशल आहेत.

जॅगो,—हर व्हान—कैसरचे परराष्ट्रराजकारणमंत्री. जर्मनींतील हे एक वॉर लॉर्ड आहेत. वय ५१. हे अविवाहित आहेत.

जेल्लिको—ॲडमिरल सर रशवर्ध—ब्रिटिश आरमारावरील मुख्य अधिकारी. आरमारखात्यांत ह्यांनीं ४२ वर्षें नोकरी केली आहे. भूमध्यसमुद्रांत १८९३ सालीं 'व्हिक्टोरिया' जहाज बुडालें, त्यांतून जी थोडी मंडळी वांचली, त्यांतील हे एक होत. सर्व आरमारांत त्यांच्याइतका आवडता अधिकारी दुसरा नाहीं. हे आरमारांत शिरले त्या वेळीं यांचें वय अवघें १३ वर्षांचें होतें. ह्यांचें कार्य-कौशल्य पाहून ह्यांस कैसरनीं 'ऑर्डर ऑफ् धि रेड ईगल ऑफ् प्रशिया' हा बहुमान अर्पण केला. ह्यांची ह्यातारी दाई मिस स्लॉइट हिनें आपला नुकताच ८८ वा वाढदिवस साजरा केला. ह्यांचे वडीलही आरमारखात्यांतील अधिकारी होते.

जॉर्ज, सर्व्हियाचा राजपुत्र—ऑस्ट्रिया व सर्व्हिया यांमध्यें ज्या पहिल्या चकमकी झाल्या, त्यांत बेलग्रेड येथें यास तोफेच्या गोळ्यांनीं जखम झाल्याची बातमी आली होती. पांच वर्षांपूर्वीच ह्यानें आपला गादीवरील हक्क सोडून दिला आहे. याच्या कृत्यामुळें त्यास 'बॅड बॉय ऑफ यूरप' असें नामाभिधान प्राप्त झालें आहे.

जोचिम,—प्रिन्स—कैसरचे सहावे व सर्वांत धाकटे पुत्र. मॉंट्रील येथील लढाईंत ह्यांच्या मांडींत गोळी घुसल्याची बातमी आली होती. वय २३.

जोफर, जनरल—फ्रेंचांचे मुख्य सेनापति (चीफ ऑफ धि जनरल स्टाफ). हे ह्या जागीं १९११ पासून आहेत. १८७० सालच्या लढाईंत हे होते. ह्यांनीं फ्रेंच सैन्यांत अनेक मोहिमांवर कामें केलीं आहेत. हे मितभाषणी, निश्चयी व हातीं घेतलेलें काम निकालास लावणारे आहेत. फ्रेंच सैन्यांत यांची अशी ख्याति आहे कीं, ह्यांच्या तोंडून शब्द निघाला कीं, तें काम शेवटास गेलेंच म्हणून समजा. आरमारांत व इतर लोकांतही हे फार प्रिय आहेत. हे घोड्यावर बसण्यांत फार पटाईत आहेत. लॉर्ड किचनेर व जनरल जोफर या दोघांत अनेक बाबतींत साम्य आहे. कितीही काम पडलें, तरी ह्यांस त्रास म्हणून वाटत नाहीं. युद्धाच्या आरंभीं सात दिवसपर्यंत हे युद्धक्षेत्रांच्या सरहद्दीवर मोटारमधून अहोरात्र फिरत होते. हे दिसण्यांत भव्य पुरुष असून, अंगानेंही मजबूत आहेत. यांचा विवाह होऊन १० वर्षें झालीं, पण अद्याप त्यांस संतति झाली नाहीं.

झेप्लिन, कौंट—ह्यांचें वय ७४ वर्षांचें आहे. जर्मनींतील प्रचंड विमानांची रचना ह्यांनीं केली असून त्यांस ह्यांचें नांव दिलें आहे.

टर्पिट्स, ॲड्मिरल व्हॉन—हे १८९७ पासून जर्मन-आरमारांत स्टेटसेक्रेटरी आहेत. वय ६४. त्या आरमारांत टॉर्पेडोचा प्रवेश यांनींच केला; व जर्मन आरमार बांधण्यासही हेच मुख्यतः कारणीभूत झाले. ह्यांच्या मुलाचें शिक्षण विलायतेंत झालेलें आहे.

टेनेंट, राइट् ऑनरेबल एम. पी.—हे विलायतेंत युद्धखात्याचे पार्लमेंटरी अंडर सेक्रेटरी आहेत. हे ॲस्क्विथ साहेबांचे मेहुणे असून त्यांचे प्रायव्हेट् सेक्रेटरी होते.

डफ—कमांडर. बर्मिंगहॅम जहाजावरील कप्तान. या झरानें ता. ९ ऑगस्ट रोजीं उत्तरसमुद्रांत जर्मनांची एक सबमरीन फोडली.

डाऊग्लस—जनरल सर चार्लस. ब्रिटिश सैन्यामधील इन्स्पेक्टर जनरल. यांनीं अनेक ठिकाणीं चांगलीं कामें केलीं आहेत.

डी एस्पेरे—जनरल. फ्रेंचांच्या सैन्यांतील एक अधिकारी.

डी बुनसेन—राईट आनरेबल सर मॉरीस. युद्धाचे आरंभीं व्हियेन्ना येथील दरबारांत हे ग्रेट ब्रिटनचे वकील होते.

डिगाईसे—जनरल. यांचें नांव लिएज येथील झालेल्या लढाईत प्रसिद्धीस आलें. त्या किल्ल्याचें मोठ्या चिकाटीनें रक्षण करण्याचें मुख्य श्रेय यांसच आहे.

डेलकासे – एम्. थिओफिल. जन्म १८८२. फ्रेंचांचे युद्धमंत्री. प्रधानमंडळांत यांची नेमणूक १८९४ त झाली. सुप्रसिद्ध फॅशोडा प्रकरणांत फ्रान्स व ग्रेटब्रिटन यांमधील वादाचा निकाल यांनीं मोठ्या चातुर्यानें लाविला.

डयूमाँट, सँटोस —हे फ्रान्समधील प्रसिद्ध वैमानिक असून फ्रेंच सरकारास युद्धांत मदत करण्यास गेले आहेत.

निकोलस,—रशियाचे झार—ह्यांचा जन्म १८६८ त झाला. आमच्या बादशहांचे हे आतेभाऊ होत. उभयतांच्या स्वरूपांत पुष्कळ साम्य आहे.

पागेट,—लेफ्टेनंट जनरल सर आर्थर हेन्री—हे अशँटी, सौडन ब्रह्मदेश, व दक्षिण-आफ्रिका येथील लढाईंत होते; व त्यांत ह्यांनीं चांगला पराक्रम करून कीर्ति मिळविली आहे.

पों,—जनरल—हे १८७०-७१ सालच्या फ्रँको-जर्मन लढाईंत होते. ह्यांचा एक हात तुटला आहे, तथापि लष्करांत मोहिमेवर हे गेले आहेत.

पिटर,—सर्व्हिया राजे—जन्म १८४४ त झाला.

पाइंकरे,—रेमंड - हे १९१३ सालापासून फ्रान्सचे अध्यक्ष आहेत. वय ५३. हे उत्तम वक्ते, प्रसिद्ध लेखक, कुशल चित्रकार व प्रख्यात बॅरिस्टर आहेत. फ्रान्स व इंग्लंडांत हे लोकप्रिय असून कैसरनें देखील ह्यांच्याविषयीं अत्यंत प्रशंसेचे उद्गार काढले आहे.

पुट्निक,—सर्व्हियन सैन्याचे मुख्य अधिकारी—हे लष्करी डावपेंचांत चतुर असल्याची ख्याति आहे.

फर्ग्युसन, मेजर जनरल सर चार्लस—ब्रिटिश पांचव्या डिव्हिजनवरचे कामदार.

फिशर, ॲडमिरल लॉर्ड - हे कांहीं वर्षांपूर्वी आरमारखात्यांत फर्स्ट सी-लॉर्ड होते. अर्ध्या शतकापेक्षां जास्ती वर्षें ह्यांनीं आरमारखात्यांत नोकरी केली आहे. १९१० सालीं ह्यांनीं पेन्शन घेतलें; पण ते सध्याच्या लढाईंत सल्ला वगैरे देण्याच्या कामांत मदत करीत असतात.

फ्रेंच,—फील्ड मार्शल सर जॉन—मोहिमेवर गेलेल्या ब्रिटिश फौजेचे सेनापति. ह्यांचा जन्म ८५२ सालीं झाला असून आरंभीं आरमारखात्यांत काम केल्यावर ८७४ सालीं ह्यांनीं लष्करांत नोकरी धरली; व लवकरच त्यांची कीर्ति वाढूं लागली. १८८४-८५ च्या ईजिप्तच्या मोहिमेंत हे होते. बोअर लढाईंतही ह्यांनीं चांगला पराक्रम गाजविला. ह्यांस 'फील्ड मार्शल' हा किताब १९१३ सालीं देण्यांत आला. ह्यांचा सैन्यांतील अधिकाराचा हुद्दा 'इन्स्पेक्टर जनरल ऑफ फोर्सिस' असा आहे.

फॉक, जनरल–१८७० सालच्या लढाईंत हे होते. सांप्रतच्या युद्धांत एका फ्रेंच आर्मी कोरवर हे अधिकारी आहेत.

फ्रान्सिस जोसेफ—ऑस्ट्रिया–हंगारीचे बादशहा. यांचा जन्म १८३० सालीं झाला; व १८४८ सालीं हे गादीवर आले.

फ्रेडरिक विल्यम—जर्मनीचे युवराज. ह्यांचा जन्म १८८२ सालीं झाला. ह्यांच्या युद्धपरीक्षेची ही पहिलीच वेळ आहे. त्यांना ब्रिटिश-सैन्यांतील अकराव्या हुसर पलटणीचे 'कर्नल–इन् चीफ' हा सन्मानार्थी किताब मिळालेला आहे.

बेले--व्हाइस अडमिरल सर लुई. मार्लबरो जहाजावर हे अधिकारी आहेत. यांचें वय ५६ वर्षांचें असून १८७० पासून हे आरमारखात्यांत नोकरी करीत आहेत. यांस आरमाराची फार चांगली माहिती आहे, अशी यांची ख्याती आहे.

बिटी--रियर एडमिरल सर डेव्हीड. हे आरमारखात्यांत असून कांहीं काळ त्या खात्यांत सेक्रेटरीच्या जाग्यावर होतें. फार थोड्या वेळांत यांनीं आपल्या अंगची चांगलीच कर्तबगारी दाखविली आहे.

बेथेल—व्हाइस ॲडमिरल. हे प्रिन्स जार्ज जाहाजावर आहेत.

बेथमन हालवे--डॉक्टर थिओबाल्ड. हें जर्मन साम्राज्याचे चेन्सिलर असून १९०९ सालापासून प्रशियनप्रधान व परराष्ट्रराजकारणाचे मंत्री आहेत. यांचा जन्म १८५६ त ब्रँडेनबर्ग येथें झाला. १८७९ त ते नोकरींत शिरले. १८९९ पासून त्यांनीं अनेक मोठमोठ्या हुद्यांच्या जागांवर कामें केलीं आहेत.

ब्रॅडफर्ड—व्हाइस अडमिरल. ब्रिटिश आरमारांतील एका काफिल्यावर हे मुख्य अधिकारी आहेत. तोफांच्या सरबत्तीविषयीं यांना उत्कृष्ट माहिती आहे.

ब्रिजिस—ब्रिग्रेडियर जनरल विल्यम थॉसले–ऑस्ट्रेलियानें पाठविलेल्या तुकडीवरील मुख्य अधिकार यांस देण्यांत आला आहे.

ब्राऊनिंग—रियर ॲडमिरल. हे आरमार खात्यांत कामदार असून यांचें वय ५१ वर्षांचें आहे. यांचा डावा हात तुटलेला आहे. पण पूर्वी दोन लढायांत यांनीं चांगलें काम केल्यामुळें सांप्रतच्या युद्धांतही यांची योजना करण्यांत आली आहे.

वर्चटोल्ड ऑस्ट्रियाचे परराष्ट्रराजकारणाचे मंत्री. यांचें धोरण बिस्मार्कच्या सांप्रदायापैकीं आहे असें म्हणतात.

वेकर—एम्. पी. ब्रिटिश लष्करी खात्याचे फायनेनशिअल सेक्रेटरी.

वेरेसफर्ड– कमांडर. बिस्मार्क आर्किपेलेगोमधील नॉ पार्मर्न नांवाचें जर्मनीचें बेट ज्या ऑस्ट्रेलियन आरमारानें घेतलें त्यावर हे मुख्य होते.

बोथा—जनरल. दक्षिण आफ्रिकेंतील यूनियनचे प्रीमियर. दक्षिण आफ्रिकेंतील युद्धामधील बोअर लोकांचे हे सुप्रसिद्ध पुढारी होते.

बोए द लॅपीरेर—अडमिरल. फ्रेंच आरमारावरी अधिकारी. यांनीं या खात्यांत मोठमोठ्या हुद्यांवर कामें केलीं आहेत.

ब्रुसिलोफ—लेफ्. जनरल अलेकाझिस. हे रशियन सैन्यांतील लढाईंचे उत्तम डावपेंच जाणणारे अधिकारी असून हेलिग्ज येथील लढाईंत ऑस्ट्रियन सैन्यावर यांनीं मोठा जय मिळविला होता.

बुलर—कॅप्टन. हायक्लायर जहाजावरील मुख्य अधिकारी. या जहाजानें कैसर विल्यम डरग्रॉसे हें जहाज आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्याजवळ बुडविलें.

बेडन पॉवेल—लेफ. जनरल सर. जन्म १८५७ त. बाईज स्काऊट नांवाची चळवळ यांनीं अस्तित्वांत आणिली. त्याच चळवळींत त्यांनीं आपलें सर्व लक्ष्य घातलें आहे.

बूलो—प्रिन्स व्हॉन—यांचें वय ६४ वर्षांचें आहे. १९०९ सालापर्यंत हे जर्मन-साम्राज्याचे चेन्सिलर होते. जर्मनींतील हे एक वॉर लॉर्ड आहेत.

मरे—मेजर जनरल सर आर्चिबाल्ड जेम्स—हे सर जॉन फ्रेंच ह्यांच्या हाताखालीं 'चीफ् ऑफ् स्टाफ्' ह्या हुद्यावर आहेत. ह्यांस दक्षिण आफ्रिकेंत जबर जखम झाली होती. वय ५४.

मॅडन:—रीअर ॲड्मिरल-चार्लस—ॲड्मिटल जेलिको ह्यांच्या हाताखालीं हे 'चीफ् ऑफ् स्टाफ्' ह्या हुद्यावर आहेत. हे योजना वगैरेच्या कामांत फार कुशल आहेत. वय ५२. सर जॉन जेलिको यांशीं ह्यांचें मेहुण्याचें नातें आहे.

माइल्स:—सर हर्बर्ट—जिब्राल्टर येथील गव्हर्नर व सेनापति. दक्षिणआफ्रिकेंतील युद्धांत हे गेले होते.

मॉटकुकुओली—ॲड्मिरल कौंट—ऑस्ट्रियाच्या आरमारावरील मुख्य कमांडर.

मिलन: ॲड्मिरल सर बर्कले—१९१२ पासून भूमध्यसमुद्रांतील आरमारावर हे मुख्य अधिकारी आहेत. वय ६०

मूर:—रीअर ॲड्मिरल—हे आरमारखात्यांतिल मुख्य अधिकारी आहेत. यांचा बावटा इन्व्हिन्सिबल् जहाजावर आहे.

मेन्सडॉर्फ पुल्ली-डाएट्रीचरिन:—कौंट आल्बर्ट—हे विलायतेंत ऑस्ट्रियाचे वकील होते.

मोल्टके:—जनरल हेल्मूथ व्हॉन—ह्यांचा जन्म १८४८ त झाला असून सुप्रसिद्ध कौंट मोल्टके ह्यांचे हे पुतण्ये होत. ह्यांच्या शरीराची आकृति धिप्पाड असून कैसरचे हे जिवलग दोस्त आहेत. १९०६ सालापासून हे जर्मन-सैन्यांत मुख्य अधिकारी आहेत. १८७० सालच्या लढाईंत हे होते. ह्यांस चॅन्सेलरची जा देऊं केली होती, पण ती यांनीं पत्करली नाहीं.

यूजिनी—फ्रेंच बादशहा तिसरे नेपोलियन यांची पत्नी. यांनीं आपलें 'थिस्ल' नांवाचें तारू जखमी झालेल्या लोकांच्या उपयोगासाठींदिलें आहे.

रजकी,—जनरल—हे रशियन-सैन्यांतील प्रसिद्ध जनरल असून लेंबर्ग व दुसऱ्या महत्त्वाच्या लढायांत ह्यांनीं जय मिळविले आहेत. वय ६०.

रीडस्डेल,—एडवर्ड—हे ब्रिटिश 'रेड क्रॉस सोसायटी' च्या कार्यकारी मंडळीचे अध्यक्ष आहेत.

रेडमंड,—जॉन एम्. पी. —आयरिश लोकांचे सुप्रसिद्ध पुढारी.

लापेरेः —ॲडमिरल ब्रूए-फ्रेंचांच्या आरमारी सैन्यावरील मुख्य अधिकारी वय ६१.

लॅव्टनः—ब्रिगेडियर जनरल सर जॉन फ्रेंच यांचे मिलिटरी सेक्रेटरी.

लीच नोवस्कीः—प्रिन्स-युद्ध सुरू होण्यापूर्वी इंग्लंडच्या दरबारीं हे जर्मनीचे वकील म्हणून होते. वय ५४.

लॉइड जॉर्जः—राइट ऑनरेबल-ह्यांचें वय ५९ वर्षांचें असून हे ग्रेटब्रिटनचे फडनीस आहेत. सांप्रतच्या समयीं व्यापाराची जी स्थिरता अद्याप कायम आहे, तिचें सर्व श्रेय यांस आहे. हे लोकप्रिय मंत्री आहेत.

लुईः—प्रिन्स ऑफ ऑर्लियन्स-हे फ्रान्सचा राजा लुई फिलीफ ह्याचे पणतू. हे ऑस्ट्रियाच्या सैन्यांत अंमलदार होते. पण त्यांनीं फ्रान्सला आपली मदत देऊं केली.

विलियम्, जर्मनीचे कैसर.—जन्म १८५९ त झाला असून हे १८८८ त गादीवर आले. ह्यांचा विवाह १८८१ त झाला.

व्हिक्टर एमॅन्युएल, इटलीचे राजेसाहेब—यांचा जन्म १८६९ त झाला; व विवाह १८९६ त मॉंटेनीग्रोची राजकन्या हेलेन हिच्याशीं झाला. हे १९०० सालीं गादीवर आले.

व्हिव्हाएनी—हे फ्रान्समध्यें मुख्य प्रधान आहेत.

सर एडवर्ड ग्रे—इंग्लंडचे परराष्ट्रराजकारण मंत्री. हे आज कैक वर्षें या जागेवर असून, अत्यंत चतुर व शांतताप्रिय मुत्सद्दी अशी सर्व जगांत त्यांची ख्याति आहे. ह्यांचें वय ५० वर्षांचें असून, आपल्या वयाच्या २९ व्या वर्षी ह्यांनीं पार्लमेंटसभेंत प्रवेश केला. ० यूरोपखंडामधील महायुद्धाचीं गंडांतरें मोठ्या चातुर्यानें दोन वेळां यांनीं टाळिलीं आहेत. ह्यांचा स्वभाव व वर्तन यांविषयीं शत्रूंच्या मनांत देखील अत्यंत आदरभाव आहे.

सॅझोनॉफ्—रशियाचे परराष्ट्र-राजकारण-मंत्री.

सोनॉफ्, जनरल—ह्यांस 'रशियन किचनेर' असें म्हणत असत. हे रो-जपानी युद्धांत प्रसिद्धीस आले. पूर्व प्रशियांत गेलेल्या विजयी सेनेवर

हे मुख्य अंमलदार होते; पण ऐन जयाच्या वेळींच ऑस्टेरोड येथें ह्यांच्या अंगावर अकस्मात् गोळा पडून हे ठार झाले.

सारेल,—जनरल जोफर ह्यांच्या हाताखालीं. फ्रेंचसैन्यांतील एक अंमलदार.

सालँड्रा,—सिनोर—हे इटलीचे मुख्य प्रधान आहेत.

सोलियर्स,—जनरल—बेल्जन सैन्यांतील 'चीफ् ऑफ् स्टाफ्' ह्या हुद्यावरील अधिकारी.

स्टँफोर्डहॅम,—बॅरन्—बादशहा पांचवे जॉर्ज ह्यांचे हे प्रायव्हेट् सेक्रेटरी आहेत.

स्मिथ डोरेन, जनरल सर होरेस—ह्यांचा जन्म १८५८ त झाला असून ४० वर्षें हे लष्करांत नोकरीवर आहेत. झुलू—लढाईंत व त्याचप्रमाणें दक्षिण आफ्रिकेंतील लढाईंत हे होते.

हगार्ड:—मेजर आर्थर. व्हेटरन कोरचे हे अध्यक्ष आहेत.

हॅमिल्टन:—जनरल सर—जन्म १८५३. ह्यांनीं पुष्कळ पराक्रम गाजविला आहे. हे बोअर व अफगाण लढाईंत होते. यांनीं रूसो-जपानी युद्धावर एक पुस्तक लिहिलें असून त्याच्या कैक आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या आहेत.

हॉर्नबी:—रीअर ॲडमिरल रॉबर्ट फिप्स. ह्यांचा बावटा डोरिस जहाजावर आहे.

हाल्डेन:—लॉर्ड—१९१२ पासून हे इंग्लंडचे लॉर्ड हायचॅन्सेलर आहेत. हे १८८५ सालीं पार्लमेटांत शिरले; व दोन वर्षांपूर्वी लॉर्ड झाले. हे अविवाहित आहेत. वय ५८.० ह्यांचें शिक्षण कांहीं विलायतेंत व कांहीं जर्मनींत झालें आहे. परदेशांत प्रवास करून मिळविलेलें ज्ञान व बर्लिन येथें असतांना मिळविलेली माहिती यांचा सध्यांच्या प्रसंगीं युद्धसंबंधीं तयारी करण्यांत ह्यांस फार उपयोग झाला. हे फार विलक्षण बुद्धिमत्तेचे पुरुष आहेत; व लॉर्ड किचनेर यांजबरोबर ते सांप्रत जोडीनें काम करीत आहेत.

ह्यूजेस:—कर्नल—कॅनडांतील लष्कराचे मंत्री.

हेन्रिक:—प्राशियाचे राजपुत्र—कैसरचे बंधु—जन्म १८६२.

हेंडरसन:—कर्नल सर—वैमानिक सैन्यांतील डायरेक्टर जनरल.

हेग:—लेफ्टनेंट जनरल सर डौग्लस. ब्रिटिश फौजेंतील एका आर्मी कोरवरील अधिकारी.

होएन झेंडॉल:—बॅरन् कॉन्रड व्हॉन—ऑस्ट्रियन दळाचे सेनापति.

ॐनमः श्रीरामचंद्राय

आर्यमहौषधालय मु. पो. आजलें.

—००००*०००•—

मदनविलासामृतसंजीविनी

वीर्यस्तंभक, रक्तशोधक, अत्यंत कामोत्तेजक, चित्तोत्साह, बुद्धि-कांतिवर्धक व पूर्णधातुपौष्टिक, वर्णमाक्षिक-मौक्तिक-कस्तूरी प्रवालादिमिश्र अपूर्व गुटिका

या गोळ्यांनीं क्षयरोग, पांडुरोग, जीर्णज्वर, मस्तकशूळ, मेंदूचे विकार, वाळंतरोग, संततीस अपाय करणारे गर्भाशयस्थ विकार, संधिवातादि अनेक वातरोग, कडकी, नेत्रविकार, कटिशूल इत्यादि नवीन अगर जुनाट असलेले नानाविध रोग तावडतोब दुरुस्त होऊन पित्तोत्साह, बुद्धि आणि कांति वाढते. अंगांत परिपूर्ण शक्ति येते. शरीरस्थ रस, अस्थि, मज्जा, शुक्र वगैरे सप्त धातूंची वृद्धि होऊन मनुष्यास सर्व प्रकारें संसारसुखाचा उत्तम लाभ होतो. वरील एकंदर रोग त्वरित व निश्चालस जाऊन सर्व प्रकारें देह अगदीं जोमदार आणि आयुष्मान् होण्यास या गुटिका हेंच अगदीं प्रतिक्षेचें औषध होय. यामुळें लक्षावधि लोक यांचे नित्य ग्राहक होत आहेत. गोळ्या रुपयाच्या आंत मिळणार नाहींत. त्या एकदम सहा रुपयांच्या किंवा त्याहून अधिक घेणारांस टपालखर्च माफ. त्याच्या आंत घेणारांस ट. ख. वेगळा ४ आणे पडेल. ३२ गो. १ रु.; ७० गो. २ रु.; १६० गो. ४ रु.; २६० गो. ६ रु. आणि ५२० गो. १० रु.

थंडगार नेत्रांजन—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, कांच वगैरे डोळ्यांचे एकंदर विकार तावडतोब बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार होते. कु.१॥रु.

कर्णस्रावनाशक अप्रतिम तैल—यानें कानांचे सर्व प्रकारचे व्रण व तत्संबंधी इतर विकार त्वरित बरे होतात. बा. १ रुपया.

परम्यावर अपूर्वमिश्रण—हे कसलाही नवा किंवा जुना परमा त्याच्या सर्व विकारांसह अगदीं जलद बरा करण्याच्या कामीं रामबाण आहे. बा. १ रु.

दंतरक्षक पूड—ही दांत व हिरड्या यांचे सर्व विकार तत्काल दुरुस्त करून दांत स्वच्छ व मजबूत करण्यांत प्रतिज्ञेची आहे. ड. ६ आणे.

उष्णवात—मलबद्धता, ढेंकरा येणें, पोटांत केव्हां केव्हां आग अथवा थंडी होणें, चमका मारणें, कधीं छातींत धडधडणें, अपचन, पोट फुगणें, कधीं अन्न थोडें व कधीं जास्त खपणें, केव्हां ग्लानि आणि कधीं थोडी हुशारी वाटणें, लघवी कढत अथवा पिंवळी-तांबडी असणें, अगर कधीं निद्रा साफ न येणें तर कधीं जास्त असणें, क्वचित् भोंवळ उद्भवणें, डोळे त्रासून तापणें व कधीं जड होणें, कधीं हात व पाय यांस तप्तता किंवा सर्दी होणें हे सर्व किंवा यांतील कित्येक विकार उष्णवातानें उद्भवतात. ते आमच्या गोळ्या व तैल यांनीं अगदीं जलद बरे होतात. ३० गो. ड. २ रु. व तैलाची बा० १ रु. एकूण किं. ३ रु.

स्वदेशीय सार्सापरिला—हा अत्यंत गुणकारक, फार टिकाऊ, सुगंधि व मधुर कषाय शास्त्रियशोधानें तयार केला असून याचे अपूर्व गुण आज पुष्कळांच्या अनुभवांत आहेत. नवीन अथवा मुरलेल्या उपदंशामुळे अगर दुसऱ्या कोणत्याही कारणांनीं शरीरांतील रक्त बिघडून जे अनेक विकार उद्भवतात ते यानें फार जलद दुरुस्त होऊन रक्ताची शुद्धि व परिपूर्ण वृद्धि होते. १० तो. बा. १ रु.

सुरंगी, मालती, कल्हार, लक्ष्मीविलास इ० बादशाही अति उंची अत्तरें व त्याचप्रमाणें गुलाब हिना वगैरे अत्युत्कृष्ट सुवासिक अत्तरें दीड रुपया तोळ्यापासून वाढल्यादराने पंचवीस रुपये तोळ्यापर्यंतही पूर्ण खात्रीचीं मिळतात. शिवाय केसांस लावण्याचीं हरएक प्रकारचीं सुवासिक तैलें दर रुपयास आठ तोळे भावानें देऊं.

सूचना—वरील औषधें व सुगंधिसामान पूर्ण खात्रीचें असल्यानें आज तीस वर्षांत त्यांचा लक्षावधि लोकांस अप्रतिम उपयोग झाला असून त्यांचा नेहमीं खप होतही आहे. अनुभवानंतर पूर्ण खात्री पटेलच. औषधें माहितीचें खर्ड्यासह रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठवूं. प्याकिंग व टपाल खर्च वेगळा. घाऊक घेणारास कमिशन भरपूर सर्व औषधांच्या आणि आरोग्यरक्षणाच्या माहितीचें सचित्र मोठें पुस्तक फुकट देऊं. माल मागविणें तो खालील बिनचूक पत्त्यावर मागवावा.

कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य,

मु. पो. आंजलें, ता. दापोली, जि. रत्नागिरी.

आर्यवनौषधालय—मुर्डी.

मदनामृतसंजीविनी.

या गोळ्या सेवन केल्यानें शरीर निरोगी होऊन सौख्य प्राप्त होतें, हें अवश्य लक्षांत ठेवावें. याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे, इंद्रियशिथिलता, कडकी, गर्मीसंबंधाने मुरलेले विकार, मस्तकशूल, मूळव्याधि, वातरोग, निद्रानाश इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें. पचनशक्ति व स्मरणशक्ति भरपूर वाढून, धातु व रक्त यांची शुद्धि, वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होऊन मनास उत्साह प्राप्त होतो. दूध व जडान्न पचूं लागतें. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास या गोळ्या अत्यंत उपयोगी आहेत. गुटिका १ रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम ४ रुपयांच्या वर कितीही घेणारास टपालखर्च माफ आहे. ४ रुपयांचे आंत घेणारास टपालखर्च ५ आणे पडेल. दर—एकदम ३५ गो. १ रु., ७५ गो. २ रु., ११५ गो. ३ रु., १६५ गो. ४ रु., २७५ गो. ६ रु., ५५० गो. १० रुपये.

१ अपूर्व नेत्रांजन.

यानें वडस, साहरा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, कांच इत्यादि नेत्रांचे सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगावर हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. डबीस १ रुपया.

२ पर्म्यावर अपूर्व मिश्रण.

कोणताही नवा आणि जुना पर्मा व तज्जन्य सर्व विकार पथ्य नसतां सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकेंत जाते; असें रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बाटली किं. १ रुपया. १। भार बाटली २ रुपये.

३ सर्व सामानाचा कॅटलॉग मागवा, तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ मुळींच नसून, तीं पूर्ण खात्रीचीं असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत. याशिवाय मोठमोठ्या रोगांवर अनक औषधें यथोक्त, रसायनें, भस्में, पाक, गुटिका, आसवें, तेलें, सुगंधि अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनुपानखर्डा सोबत. टपाल वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोगाचें निदान व चिकित्सा कळवूं.

पत्ता—मुर्डी, पो. हर्णै, जि. रत्नागिरी.

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.

चारुतरचें

अमृतबिन्दु.

अजीर्ण, पोटदुखी, शूल, ढाळ, मुरडा, अतिसार, संग्रहणी, कॉलेरा, गर्भिणी स्त्रीची उलटी, दमा, खोकला, श्वास, अर्धशिशी, डोळ्यांची झांपड, साधारण डोकें दुखणें, मस्तकाचे सर्व विकार, डोळ्यांचे सर्व विकार, दांतांतील कळ, दांतांतून रक्त निघणें, गुल्म, कानांची ठणक, कानांतून पू वाहणें, गजकर्ण, खरूज, नायटे, सर्व प्रकारची सूज, संधिवात, नामर्दी, प्रमेह, तोंड येणें, आंग फुटणें, रक्ताची उलटी, जंत पडणें, कमर दुखणें, बरगड्या दुखणें, अस्वस्थता, सुस्ती, अंडवृद्धि, सरदी, वायगोळा, ताप, नळ फुगणें, नळाश्रित वायु, शरिरांतील कोणत्याही भागाचें दुखणें, विंचु, भोंवरा, मधमाशी, चांचड, ढेंकूण, मच्छर वगैरे चावल्यामुळें होणाऱ्या वेदना वगैरे हजारो रोगांवर उत्तम औषध फक्त एकच.

चारुतरचें

[अमृतबिंदु हे आहे.]

दरमहा या औषधाच्या हजारों बाटल्यांचा खप होत आहे. "चारुतरचें अमृताबिंदु" हें खरें औषध आहे व म्हणून त्या औषधाच्या प्रत्येक बाटलीवर सरकारी रजिष्टर नंबर ८४१–१० हा छापलेला असतो. बाटली घेतांना तो नंबर पाहून बाटली विकत घ्यावी. ज्या बाटलीवर आमचा वरील नंबर नाहीं, तें औषध आमचें नसून बनावट आणि नकली समजावें.

सूचना—विशेष माहितीकरितां आम्चा कयाटलॉग मागवा. घड्याळाचें बक्षिस अद्याप दिलें जातें.

अमृतबिंदु ऑफिस,—नडियाद आणि मुंबई.

पाहल्यापासून च हुषारी ची आवश्यकता.

जेव्हां कॉलरा (पटकी) होतो तेव्हां डाक्टर अथवा वैद्य यांस बोलाविण्यास वेळ सांपडत नाहीं अशावेळीं सुख संचारक कंपनी मथुरा यांचा तयार केलेले सुधासिंधु जवळ असला तर मृत्यूचें भय रहात नाहीं. हा घेण्यास इतर कसल्याही अनुपानाची गरज लागत नाहीं. फक्त पाण्याबरोबर घेतल्यानें आपला गुण दाखवितो.

२३ वर्षे अनुभविलेला. सरकारांतून रजिष्टर केलेला.

कफ	अतिसार	थंडी ताप
दमा	रक्ताची आंव	मळमळणें
खोकला	संग्रहणी	मुलांचे हिरवे पिंवळे जुलाव
पटकी	उलट्या होणें	आंग दुखणें
शूल	पोट दुखी	डांगी खोकला

इत्यादि रोगांवर स्वादिष्ट व सुगंधित औषध किं. ॥.)

सरकारांतून रजिष्टर केलेलें व २३ वर्षे अनुभवलेलें.

कसलाही त्रास अथवा आग झाल्याशिवाय गजकर्ण मुळापासून घालविणारें किंमत ४ आणे.

आमच्या औषधांच्या सर्टिफिकिटांसह सचित्र क्याटलाग व क्यालेंडर मागविल्यास सर्वांस फुकट पाठविलें जातें

मिळण्याचा पत्ता—क्षेत्रपाल शर्मा,

मालक, सुख संचारक कंपनी, मथुरा.

सुलभ-पुराण-ग्रंथमाला.

(सरळ गोष्टीच्या रूपानें सुलभ मराठी भाषांतर.)

हिंदुलोकांचे चार वर्ण व चार आश्रम, त्यांच्या रीतिभाति, नीति व आचारविचार याविषयींच्या माहितीचें आगर म्हणजे आपले पुराणग्रंथ होत. पुराणांत सृष्टीची उत्पत्ति, तत्त्वज्ञान, धर्म, भारतवर्षीय भूगोल, राजवंशांचे इतिहास, लोकांचीं चरित्रें, ऋषींचीं कुळें, वगैरे असंख्य विषय आहेत. अशा ह्या पुराण-ग्रंथांचा लाभ मराठी वाचकांस सुलभरीतीनें थोडक्यांत व्हावा म्हणून, आमच्यांतील अठरा पुराणें व तितकींच उपपुराणें सरळ गोष्टीच्या रूपानें तयार करून तीं अल्प किंमतींत ग्राहकांस देण्याची व्यवस्था केली आहे. या पद्धतीनें आतांपर्यंत **मत्स्यपुराण, गणेशपुराण व पद्मपुराण** (पूर्वार्ध) याप्रमाणें ३ पुराणें प्रसिद्ध केलीं असून, पुढें छापण्याचें काम सुरू आहे. प्रत्येक पुस्तकांत त्या त्या पुराणाचे अध्यायवार गोष्टीच्या रूपानें सार देऊन, प्रस्तावना, अनुक्रमणिका व सूची यांसह एकेक पुरें केलेलें आहे. हीं पुराणें वर्गणीदारांस २१५० पृष्ठांस ८ आणे या दरानें पडतांत येतात. कापडी पुठ्यांत बांधलेलें पुस्तक पाहिजे असल्यास दोन आणें अधिक आकार पडतो. हल्लीं प्रसिद्ध झालेलीं पुराणें खालीं लिहिलेल्या किंमतीस मिळतात.

१ मत्स्यपुराण—(पृष्ठें २५०) कागदी पुठ्ठा किं. ८ आ. कापडी पुठ्ठा १० आ.
२ गणेशपुराण—(पृष्ठें २५०) कागदी पुठ्ठा ८ आणे, कापडी पुठ्ठा १० आ.
३ पद्मपुराण—(पृष्ठें ४५०) (पूर्वार्ध) कागदी पुठ्ठा १४ आ. कापडी पुठ्ठा रु. १

वर लिहिलेल्या किंमती फक्त वर्गणीदारांकरितां आहेत. वर्गणीदारांशिवाय इतरांस २५० पृष्ठांस १ रु० या दरानें किंमत पडते. वर्गणीदार होऊं इच्छिणारास फक्त नांव नोंदवून तिन्ही पुराणें घ्यावीं लागतात. प्रवेश फी वगैरे कांहीं द्यावी लागत नाहीं. पुढें जसजशीं पुराणें प्रसिद्ध होत जातील, त्याप्रमाणें अगाऊ सूचना पाठविण्यांत येऊन नंतर तें पुराण २५० पृष्ठांस आठ आणे या दरानें पाठविण्यांत येईल. हल्लीं पद्मपुराण उत्तरार्ध व स्कंद पुराण अशीं दोन पुराणें छापत आहेत. वर्गणीदार होऊं इच्छिणारांनीं आपलें नांव नोंदविण्याची त्वरा करावी. पत्रव्यवहार—

दामोदर सांवळाराम आणि मंडळी, ठाकुरद्वार, मुंबई—या पत्त्यावर करावा.

शेकडों एम्. डी. डॉक्टरांनीं उत्तमोत्तम ठरविलेले व महाराष्ट्रांत अत्यंत प्रिय झालेले.

अत्यंत सोपे वैद्यक.

[हजारों व्याधींना १२ औषधें. किंमत १ रु., पो. ख. २ आणे.]

गो. रा. दाते, वकील, मु. पो. जामनेर, जि. खानदेश.

डोंगरे

यांचे

बालामृत.

लहानमुलांची शक्ती वाढवून त्यांस पुष्ट बनविण्यांत सुप्रसिद्ध झाल्यामुळें त्याची अलीकडे फार नकल होऊं लागली आहे. सबब डोंगरें यांचें बालमृत घेते वेळीं तें डोंगरे यांचेच असल्याबद्दल खात्री करावी.

बाटलीची किंमत १२ आणे. टपाल ४आणे.

के. टी. डोंगरे अॅण्ड कंपनी, गिरगांव, मुंबई.

व्हिगोराईन्.

याचे सेवनानें स्नायूंच्या दुर्बलतेपासून होणारे विकार म्हणजे हातापायांची आग, शरीरामध्यें केव्हांही उत्साह नसणें, स्मरणशक्ति कमी झालीशी वाटणें. पचनक्रिया नरोबर न चालणें, लघ्वीतून अल्ब्यूमिन् (धात) जाणें वगैरे रोग बरे होऊन मनुष्य तरतरीत व मजबूत होतो.

हार्बिंजर वर्क्स मुंबई, नं० ७.

REFBK-0001159